
ळशास्त्री

हरदास

नागपूर

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2128



REFBK-0018853

# तिभारत

## व स्फुट काव्य

२१२६ काव्य
संक्षि
८०७८८
१२।१०।८३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलाव
अनुक्रम........................ दि: ..............
क्रमांक ........................ नों. दि: ..............

म. म. साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास

यांचे

श्रीमन्महाभारतावरील काव्य ( मराठी )

# गीतभारत

## व स्फुट काव्य

(मराठी व संस्कृत)

संपादिका

वीणा हरदास

REFBK-0018853

काळ प्रकाशन, पुणे

श्रावण वद्य ४, शके १८९५
दिनांक १८ ऑगस्ट १९७३

मूल्य १० रुपये

प्रकाशक : शं. रा. दाते, काळ प्रकाशन, १४०४ सदाशिव पेठ, पुणे ३०
मुद्रक : मु. शं. दाते, यशवंत मुद्रणालय, १८३५ सदाशिव पेठ, पुणे ३०

# आत्मनिवेदन

शास्त्रीबुवाच्या अभिजात वाणीने आणि लेखणीने मनाला भुरळ पाडली नाही असा मनुष्य विरळा. त्यांच्या तीव्र राजनैतिक हिंदुत्वनिष्ठ धारणेशी मतभेद असलेले लोकदेखील त्यांच्या वक्तृत्वाची अन् लेखनाची मुक्तकंठाने प्रशंसा करीत. त्यांच्या लेखणीच्या किमयेने साहित्याचे बरेचसे प्रांत उजळले आहेत. आणि ज्या ज्या प्रांतात त्यांच्या प्रभावशाली लेखणीने पदन्यास केला तो प्रत्येक प्रांत तिने आपल्या वैशिष्टचाने भारून टाकला आहे; नव्हे प्रथम श्रेणीत सन्मानाचे स्थान मिळवले आहे. अर्थातच काव्याचा प्रांतही त्यांतून सुटला नाही.

शास्त्रीबुवांनी मराठी वाङ्मयात कमीतकमी पंधरा सहस्र पृष्ठांची भर घातली असून सर्वच वाङ्मय शाखा आणि देवी सरस्वतीचे दालन समृद्ध केले आहे. ग्रंथ लेखनाच्या मानाने त्यांच्या काव्याचे प्रमाण थोडे असले तरी स्वतंत्र दृष्टीने पाहता ते तसे नाही. प्रस्तुत ग्रंथात त्यांच्या महाभारतावरील रचनेचा आणि स्फुट कवितांचा तेवढा समावेश केला आहे. ग्रंथांत स्फुट कविता मागाहून समाविष्ट केल्या असल्या तरी त्यांच्या निर्मितीचा काळ मात्र प्रारंभीचा आहे. त्यांच्या प्रतिभेची कळी जशी फुलायला लागली तशी भावकाव्याची निर्मिति प्रथम झाली. परंतु त्यांच्याच प्रार्थनेवरून श्री राजहंसवहना देवी सरस्वतीचा वरदहस्त त्यांना लाभताच त्यांच्या कवितेने पांडित्याचे आणि निपुणतेचे वळण घेतले आणि रसोद्‌गमी माधवी लता फुलावी तशी ती फुलू लागली. त्यांची समस्यापूर्ति ही संस्कृत रचना इ. स. १९३५–३६ मध्ये संस्कृत परीक्षांसाठी झालेली आहे. त्या वेळी शास्त्रीबुवा सारे अठरा वर्षांचे होते.

शास्त्रीबुवा केवळ साहित्यिक अन् कवि मात्र नव्हते. ते ज्वलन्त राष्ट्रनिष्ठ आणि भारतीय अस्मितेचे एकनिष्ठ उपासक होते. भारतीय संस्कृति व हिंदुराष्ट्र-वाद यांवरील आत्यंतिक श्रद्धा, भारतवर्ष व त्याची सारी वैशिष्टचे या विषयीचे उत्कट प्रेम, परप्रत्ययनेय नवमतवाद आणि निर्बंधशून्य सुधारणावाद याविषयीचा पूर्ण तिरस्कार ही शास्त्रीबुवांच्या अस्मितेची सारी वैशिष्टचे असून एखाद्या नियत-कालिकातील राजकीय स्वरूपाचा लेख असो की साहित्य समालोचनपर लेखांक असो, की त्यांची कोणतीही वाङ्मयकृति असो, त्यांतून ही सारी वैशिष्टचे आविष्कृत झाल्याविना राहात नाहीत. विधायक स्वरूपाची ध्येयनिष्ठा शास्त्रीबुवांच्याजवळ असल्यामुळे त्यांची एकही कृति निष्ठाशून्य नाही. एका राष्ट्राच्या महान् परंपरेच्या रक्षणाची उत्कट व आंतरिक तळमळ त्यांत आहे. आशावादही जबरदस्त आहे. त्यांच्या प्रत्येक कृतीला तत्त्वनिष्ठेची बैठक लाभली आहे.

धर्मवीर डॉ. बा. शि. मुंजे यांनी १९३७ मध्ये नाशिक येथे भोसला मिलिटरी स्कूलची स्थापना केली. तेथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता प्रात:स्मरण असावे म्हणून त्यांनी ऐतिहासिक पण संस्कृत कवींना जाहीर आवाहन केले. शिक्षण सैनिकी असल्यामुळे विद्यार्थी संपूर्ण भारतातून येत. तेव्हा सर्वच भाषाभाषी लोकांची सोयी व्हावी म्हणून त्यांनी ते प्रात:स्मरण सस्कृतातून असावे अशी इच्छा प्रगट केली होती. हिंदुस्थानच्या मागील सहस्र वर्षाच्या इतिहासांत "पुण्यश्लोक" "चिरंजीव" "महापातकनाशन" इत्यादि पदवीत बसण्याची ज्यांची योग्यता आहे अशांची नांवे संस्कृत श्लोकांत गुंफल्यास पाठांतराबरोबरच आपल्या स्फूर्तिदायक इतिहासाचेही विद्यार्थ्यांना सतत स्मरण होत राहील अशी आशा त्यांनी व्यक्तविली होती. ह्या त्यांच्या प्रगट विनंतीस अनुसरून फेब्रुवारी ३८ मध्ये संस्कृत प्रात:स्मरण तयार केले होते.

इ. स. १९४३ मध्ये श्री संत पांचलेगांवकर महाराजांनी हिंदुराष्ट्रसेनेसाठी आणि हिंदुदलासाठी हिंदुराष्ट्रध्वजाची संस्कृतात प्रार्थना करून मागितली. हिंदुराष्ट्रध्वज म्हणजे कृपाणकुंडलिनीयुक्त भगवाध्वज. शास्त्रीबुवांनी करून दिलेली हीच प्रार्थना दलांत व सेनेत म्हटली जाते.

इ. स. १९५७ मध्ये शास्त्रीबुवांनी कामकोटि पीठाचे शंकराचार्य प. प. श्री चन्द्रशेखर सरस्वती स्वामी महाराजांच्याजवळून मंत्रदीक्षा घेतली. पहिल्याच गुरुपौर्णिमेला त्यांनी महाराजांच्यावर आरती आणि अष्टक रचून पाठवले. त्या दिवसापासून पूजनीय आचार्य स्वामींची पूजा झाल्यानतर तेथील शिष्यमंडळी हीच आरती आणि अष्टक म्हणतात. उर्वरित स्फुट कविता नियतकालिकांच्या मागणीवरून वेळोवेळी दिल्या आहेत.

शास्त्रीबुवांच्या सर्वच स्फुट कविता जशा प्रासंगिक आहेत तसा त्यांच्या महाभारतावरील काव्यालाही इतिहास आहे. आमच्या घरी श्रावण महिनाभर श्री दक्षिणामूर्ति महाराजांचा उत्सव प्रतिवर्षी करण्याची पद्धति आहे. त्यात पूर्वी प्रतिदिनी नित्य नव्या हरदासाचे कीर्तन होत असे. शास्त्रीबुवा राजकारणप्रवृत्त होते तोपर्यंत ही प्रथा चालू होती. इ. स. १९४८ मध्ये ते राजकारणातून निवृत्त झाले ४९ च्या मे महिन्यांत संघबंदीच्या कारागृहातून सुटून आल्यावर श्रावणात त्यांनी महिनाभर कीर्तने केली. त्यांतील कथा भागासाठी त्यांनी महाभारताची निवड केली महाभारत हा ग्रंथ खूप मोठा असल्यामुळे नित्य नूतन कथा लावता यावी हा त्यामागे त्यांचा हेतु होता.

महाभारत ही मुळात व्यास महर्षींनी केलेली सस्कृत पद्यरचना आहे. संस्कृत वाङ्मयातील कितीतरी ललितकृति महाभारतांतील उपकथानकांवर आधारलेल्या आहेत. भासाची बहुतेक नाटके, कविकुलगुरु कालिदासाचे अभिज्ञान शाकुंतल महा-

भारताच्या उपकथानकावरच आहे. काव्यापुरताच विचार करायचा तर महाकवि माघ याचे "शिशुपाल वध" हे प्रौढ, सुश्लिष्ट अन् अर्थगंभीर काव्य, विद्वदौषध म्हणून ज्याचे वर्णन करतात ते श्री हर्षाचे विख्यात "नैषध" काव्य महाभारतातील उपाख्यानावरच आहे.

आपल्या भारतवर्षातील काही प्रांतिक भाषांमधून महाभारताची रूपांतरेही झाली आहेत. मराठीत श्री ज्ञानदेवापासून तो मोरोपंत, मुक्तेश्वर, वामन पंडितापर्यंत किंबहुना रघुनाथ पंडितापर्यंतच्या सर्व प्राचीन महाकवींच्या प्रतिभेचे उन्मेष महाभारतानेच घडविले आहेत. शिवाय देवनाथ, दयाळनाथ, महिपति, जयराम कवि, माणिकदास, केशवसुत, आनंद कवि ह्या संतकवींच्या द्रौपदीचा धावा, अभिमन्युवध, जयद्रथवध, भीष्मप्रतिज्ञा, दुर्वासकृत सत्त्वहरणप्रयत्न अशा किती तरी महाभारतातील प्रसंगावर रचना आहेत. संपूर्ण महाभारतावर अशी फक्त मोरोपंतांचीच रचना उपलब्ध आहे; पण ती एका आर्यावृत्तातच आहे. मुक्तेश्वरांची चारच पर्वे (आदि, सभा, वन व विराट) उपलब्ध आहेत; पण ती ओवीबद्ध आहेत. वामन पंडितांची रचना केवळ श्लोकबद्ध आहे. तात्पर्य, एकाच वृत्तातील काव्याचा कथेत उपयोग नसतो. म्हणून शास्त्रीबुवांनी स्वकृत काव्य वापरण्याचा संकल्प करून काव्यरचनेला प्रारंभ केला.

इ. स. १९४९ ते ६७ ह्या एकोणीस वर्षांच्या कालावधीतील ही रचना आहे. प्रतिदिनी रात्री एका कथेपुरेशी रचना ते करीत, दुपारी पाठ करीत अन् सध्याकाळी ती लावीत. श्रावणाला जोडून आलेल्या अधिक मासांतील तीस कीर्तने धरून एकूण ६०० कीर्तनांतून हा कथाभाग त्यांनी पूर्ण केला. ह्यातही भीष्मपर्व दोन वर्षे, द्रोणपर्व चार वर्षे, कर्ण पर्व दोन वर्षे म्हणजे केवळ युद्ध आठ वर्षे आणि आदि, सभा व विराट मिळून बारा वर्षे इतका कालावधि त्यांना लागला.

ह्यांत त्यांनी पदे, साकी, अंजनीगीत, दिंडी, श्लोक, घनाक्षरी, ओवी आणि कटाव इतके प्रकार हाताळले आहेत. पदे विविध चालीची आहेत काही तर पोवाड्यांच्या चालीची आहेत. काही पदांच्यावर लावणी असे म्हटले आहे. पण आज लावणी ह्या शब्दाचा जो सांकेतिक अर्थ आहे तो मात्र इथे लागू पडत नाही एका विशिष्ट चालीच्या पदालाच कीर्तनक्षेत्रात लावणी असे म्हणतात. कटावाचा उपयोग विशेषकरून संकुलयुद्धाच्या वर्णनासाठी त्यांनी केला आहे, ह्याशिवाय शास्त्रीबुवा मधनमधून मूळ महाभारत संहितेतील संस्कृत श्लोक, मोरोपंतांच्या आर्या, ज्ञानदेवांच्या ओव्या, गीतचे श्लोक, श्रीमद् भागवत संहितेतील संस्कृत श्लोक. गोपाळजी महाराजांचे काव्य, शिवाय संस्कृत पंडितांच्या वर उल्लेख केलेल्या रचनेतील श्लोक त्या त्या प्रसंगी वापरीत. हा संग्रह करताना मात्र मी ते सर्व वगळून फक्त शास्त्रीबुवांची कृति तेवढी घेतली आहे. एवढ्या तीन सव्वा तीनशे पृष्ठांच्या

ग्रंथात फक्त विष्णुकवींचे दुर्गास्तवन तेवढं मी घेतलं. युद्धाच्या प्रारंभी श्रीकृष्णांनी अर्जुनाला ते करायला सांगितलं होतं. एखादा श्लोक किंवा ओवी शास्त्रीबुवांची आहे या कल्पनेनं तसे नसताही ह्या संग्रहात आली असली तर ती चूक माझी आहे अन् ती न जाणून झालेली आहे.

कित्येक ठिकाणी दुसऱ्या कवींच्याही कविता संग्रहात घ्याव्या असा मोह मला झाला. वस्त्रहरण प्रसंगी शास्त्रीबुवांनी " ये धावत कृष्णाबाई । अति कनवाळे । निजजनमनसरसमराळे " हाच धांवा द्रौपदीच्या तोंडी वापरला. तो संग्रहांत घालण्याचा मोह मला झाला होता. भीष्मप्रतिज्ञाभंगावरचे वामन पंडितांचे श्लोक मनाला मोह घालणारे आहेत. काही स्थळी तर मूळ महाभारत संहितेतील श्लोकांनी जसा उठाव येतो तसा तो दुसऱ्या कोणत्याही मराठी रचनेने येत नाही. एकच प्रसंग उदाहरण म्हणून घेऊ. रणांगणात भीमाच्या गदेने डोके फुटून दुःशासन रथातून खाली पडतो. भीम त्याचा हात तोडताना विचारतो, " द्रौपदीच्या केसांना हिसके देणारा, तिचे वस्त्र फेडणारा तो तुझा हात कोणता ? दुःशासन म्हणतो,

" अयं करिकराकारः पीनस्तन विमर्दनः ।
गोसहस्रप्रदाताच क्षत्रियान्तकरः करः ।।
अनेन याज्ञसेन्यान्मे भीमकेशा विकर्शिताः ।
पश्यतां कुरुमुख्यानां युष्माकं च सभासदाम् ।।"

हा ठसका कोणत्याही मराठी कृतीत नाही. मोरोपंतांच्या कांही आर्याही अशा सुंदर आहेत, कर्णाचे चाक पृथ्वी गिळते, ते वर उचलताना तो अर्जुनाला युद्धनीतीचं स्मरण देऊन तू धर्मनिष्ठ आहेस तेव्हा निःशस्त्र अशा माझ्यावर वार करू नकोस असं म्हणतो. तेव्हा श्रीकृष्ण मागच्या एकेका प्रसंगाची आठवण करून देऊन विचारतात, " कर्णा, आता तुला धर्म आठवतो, पण " तेव्हा कोठे गेला होता राधासुता तुझा धर्म " ह्या सर्वांचा त्यांनी वापर केला होता असो.

शास्त्रीबुवांनी रचलेले हे महाभारतावरील काव्यही पूर्ण नाही. ह्यांत आदि, सभा, विराट, उद्योग व युद्ध (भीष्म, द्रोण व कर्ण) इतकी पर्वे आहेत. पण एवढ्यात साधारणपणे आरंभापासून तो युधिष्ठिर जेव्हा राजे होतात इतका कथाभाग आलेला आहे. संकल्पच तसा केला असता तर कदाचित् ते पूर्ण झालेही असते. कदाचित् म्हणण्याचे कारण असे की, वाल्मीकि रामायणाचे समवृत्त रूपांतर करण्याचा त्यांनी संकल्प केला होता पण तो पूर्णतः सिद्धीस गेला नाही. तोच काय पण किती तरी संकल्पित कार्येही अपुरीच राहिली. " रात्र थोडी अन् सोंगं फार " अशी एक म्हण आहे तसं त्यांचं जीवन होतं. नित्यक्रमसुद्धा पार पडेलच याची शाश्वती नव्हती. नव्हे तो अनियमित व्हावा हाच संकेत होता जणू.

ह्याव्यतिरिक्त श्रीदक्षिणामूर्ति महाराजांच्या उत्सवाच्या प्रक्षाळपूजेला किंवा चातुर्मास्यातील एकादशीला कीर्तन करीत तेव्हा एखाद्या उपकथानकाची रचना करीत. कच देवयानी, तारकासुरवध, पाशुपताख्यान, रामायणांतील विश्वामित्रागमन, अहिल्योद्धार अशी कितीतरी आख्याने त्यांची उपलब्ध आहेत. शिवाय प्रतिवर्षी गोकुळाष्टमीला कृष्णजन्म अन् भाद्रपद वद्य प्रतिपदेला श्रावण मास समाप्तीप्रीत्यर्थ गोपालकाला करीत त्यासाठीही त्यांनी स्वतंत्र रचना केली आहे. पृष्ठांची मर्यादा घातल्यामुळे ह्या संग्रहांत त्यांचा समावेश मी करू शकले नाही. श्री वासुदेवानंद सरस्वतींच्यावरही त्यांचं काव्य आहे.

शास्त्रीबुवांच्या पांडित्याला शोभेल, नव्हे खुलवील असे अपार शब्दभांडार त्यांच्याजवळ होते. त्यांची भाषा समर्थ असून सर्वच रसांचा सारख्याच उत्कटतेने ती आविष्कार करू शकत असे. त्यांच्या लेखनांतून अत्युत्कट साहित्यगुण प्रगट झालेले आहेतच. त्यांच्या काव्यांतही भावव्यक्तीकरणाचे सामर्थ्य आहेच. भाव व्यक्त करणारे पोषक असे शब्दशिल्प त्यांच्याजवळ आहे. शब्दयोजना तरी इतकी सहजपणें साध्य झाल्याचा प्रत्यय येतो की, जणू महाराष्ट्र शारदेच्या पूजेसाठी त्यांच्याजवळ अवती भवती सर्वस्पर्शी ध्वनिरूप सुगंधी सुमनांच्या परड्याच भरल्या आहेत असं वाटावं.

एकदा साहित्य समालोचनासाठी एका कवीची संस्कृत शतश्लोकी त्यांच्यासमोर होती. श्लोकांच्या खाली त्या कवीच्या पत्नीनं त्यांचा मराठीतून अर्थ दिला होता. मला म्हणाले, "माझं महाभारतावरचं काव्य मी प्रकाशित करीन त्याला टीपा तू जोडायच्यास." तेव्हा तर मी त्यांच्या त्या शिळोप्याच्या गोष्टी समजायची. पण आता असं वाटतं, टीपा जोडून झाल्या पण त्यांनी आपल्या उपस्थितीत हे कार्य करून घेतल असतं, त्यांच्या मार्गदर्शनानुसार त्याला स्वरूप आलं असतं म्हणजे हा काव्यग्रंथ जसा सजला असता, अर्थातच ते हे रूप नव्हे. माझ्या अल्पमतीप्रमाणे हा प्रयत्न झाला. टीपा म्हणजे अर्थ मात्र नव्हे. दोन कवितांच्यामधील कथारूप सांधा जोडणं एवढंच त्यांचं कार्य. आनंद हा शब्द तर माझ्या उर्वरित आयुष्यासाठी नाही. पूर्वायुष्यात त्याशिवायच काही नव्हतं. आता त्यांची अतृप्त इच्छा आठवून आपल्या अल्पमतीप्रमाणे तिला साकार करण्याचा प्रयत्न करणं अन् त्यांतच समाधान मानणं एवढंच हाती आहे.

काव्याची हस्तलिखित प्रत पाठव असं ती. स्व. मामा दाते यांचं पत्र आलं अन् यंदा काव्यग्रंथाचं प्रकाशन होणार हे निश्चित झालं. मामांनीही आपली माया आवरली असती तर हेही समाधान माझ्यासाठी दुष्कर झालं असतं. प्राचार्य राम शेवाळकरांना प्रस्तावनेसाठी पत्र घातलं. त्यांचं उत्तर आल, "पात्रापात्रतेचा विचार तू करायचा आहे, मी तुझ्या आज्ञेच्या बाहेर नाही." पात्रतेची साक्ष

द्यायला त्यांची प्रस्तावना स्वयमेव समर्थ आहे. मी वेगळं कांही लिहावं असं नाही, त्यांचं आमचं नातं धर्माचं अन् माझा अधिकार केवळ वयाधिक्याचा. पण हे दोन्ही ते मानतात हा त्यांचा विशेष आहे. आमच्या पोटांत त्यांच्याविषयी कौतुक आहेच.

दुसरा प्रयत्न डॉ. शं. दा. पेंडसे यांच्याकडे पुरस्कारासाठी केला. भारताची सांस्कृतिक अस्मिता जागृत करणे हे स्वतःचे जीवितकार्य मानलेले जे काही विद्वान् शारदोपासक महाराष्ट्रात आहेत त्यांत नागपूरचे डॉ. पेंडसे हे अग्रगण्य होत. गेली तीन तपे त्यांनी आपली वाणी व लेखणी या एकाच कार्यासाठी झिजवली. संतवाङमयावर लिहिलेल्या त्यांच्या ग्रंथांनी त्यांची विद्वत्ता सर्वमान्य झाली. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे ते पुण्यास जाऊन राहिले आहेत. त्यांचे शास्त्रीबुवांच्यावर अकृत्रिम प्रेम होते. त्यांना तर पत्रसुद्धा न घालता नुसती काव्याची हस्तलिखित प्रत आणि तोंडी निरोप दिला. हे काम प्रा. सौ. कुसुमताई मराठे यांनी केलं. आज च र वर्षं झाली. थोरल्या बहिणीप्रमाणे त्या माझी पाठराखण करताहेत. निःस्वार्थ प्रेमाचाच अनुभव त्यांच्या सहवासांत मला मिळतो. डॉक्टर साहेबांना इतकी पृष्ठं वाचण्याचे तरी श्रम सोसतील किंवा नाही असं आम्हाला वाटत होतं. पण त्यांनी प्रकृतीकडे दुर्लक्ष करून पुरस्कार लिहून पाठविला. कृतज्ञता व्यक्त करण्यापलीकडे माझ्याजवळ त्यासाठी दुसरे शब्द नाहीत.

नागपूरचेच एक तरुण चित्रकार श्री. सुधीर इंगळे यांनी ह्या ग्रंथाच्या सजावटीसाठी सुंदर चित्रे काढून दिली. ते तर ही संधि त्यांना मिळाली हा आपल्यावर अनुग्रह झाला असंच समजतात.

शास्त्रीबुवांच्या पुण्यदिनी त्यांचीच कृतिपुष्पं त्यांच्याच चरणी अर्पण करून निवेदन संपवते.

श्रीदक्षिणामूर्ति मंदिर,
सकल ७, महाल,.
नागपूर २

**वीणा हरदास**

# प्रस्तावना

भारतातील सांस्कृतिक संचिताचे थोर भाष्यकार व महाराष्ट्रातील 'जंगम विद्यापीठ' म्हणून यथार्थ ख्याति पावलेले प्रकांडपंडित म. म. बाळशास्त्री हरदास यांच्या तेजस्वी व्यक्तित्वाचा एक मनोरम पैलू प्रस्तुत ग्रंथाच्या रूपाने संकलित रीत्या प्रथमच वाचकांसमोर येत आहे. बाळशास्त्रींचा चतुरस्त्र व प्रगाढ व्यासंग आणि देदीप्यमान वक्तृत्व यांनी मंत्रमुग्ध न झालेला मराठी माणूस हा एक संशोधनाचाच विषय ठरावा. विद्वत्व व वक्तृत्व यांच्या लोकोत्तर संगमाच्या बाबतीत महाराष्ट्रात बाळशास्त्रींचे नांव उपमानभूत झालेले आहे. अभ्यासविषयाच्या मूळ सत्त्वाचा अचूक वेध घेणारी 'क्षुरस्य धारे'-सारखी त्यांची तीव्र मेधा, गूढ व विसंवादी वाटणाऱ्या बाबींमधील सुजाण अर्थ लावणारी त्यांची प्रगल्भ प्रतिभा, ग्रंथविषयाचे अभिजात ऐश्वर्य प्रकट करणारी त्यांची भरजरी भाषाशैली आणि दुर्बोध विषयाचे अनायास आकलन झाल्याचा आनंद मानावा की हे सर्व लीलया प्रत्ययास आणणाऱ्या त्यांच्या विद्युन्मय वक्तृत्वाचे गोडवे गावे या संभ्रमात श्रोत्यांना नेऊन टाकणारी त्यांची अवीट रसवंती, यांपैकी प्रत्येक बाबीचे स्मरण हेही मराठी मनाला संतत स्फुरणदायी ठरणारे आहे ज्ञानकोशाला जिभा फुटाव्यात व त्या जिभांनाही 'श्री शारदागुणे रसवत्ता प्राप्त व्हावी' असा अद्‌भुत प्रत्यय त्यांच्या व्याख्यानांतून येत असे. तारुण्याला मोहिनी घालणारी जी विविध रमणीय वेडं असतात त्यांमध्ये बाळशास्त्रींच्या व्याख्यानांचा हमखास समावेश होत असे. तरुणांना वयाचे अव्यय मोल कळावे व वार्धक्यालाही तारुण्याचे कोंब फुटावेत असे विलक्षण सामर्थ्य त्यांच्या वाणीत होते. वक्तृत्वाच्या बाबतीतले एक रोमांचकारी स्वप्न उणीपुरी तीन दशके बाळशास्त्रींच्या रूपाने मराठी माणसाने आपल्या मनीमानसी अभिमानाने मिरवीत नेले होते.

ज्ञानाची अव्यभिचारी व अखंड साधना हा बाळशास्त्रींच्या व्यक्तित्वाचा धर्म होता तर भान हरवणारे वक्तृत्व हे त्यांच्या व्यक्तित्वाचे विलोभनीय वैभव होते. त्यांच्या प्रखर पांडित्याला लालित्याची मनोहर किनार होती. लालित्याच्या या गुलाबपाण्याने त्यांचे लेखन व प्रवचन सुगंधित झालेले असे. त्या दृष्टीने त्यांच्या भाषा सौष्ठवाचा, पल्लेदार वाक्यरचनेचा, समर्पक व अर्थसुन्दर शब्दयोजनेचा अभ्यास

उद्‌बोधक ठरेल. भाषेच्या अंगी सुप्त असलेल्या संगीताचा, लयींचा व नादमयतेचा गुण हा चांगल्या वक्तृत्वांतून अखंडपणे निथळत असतो. वक्तृत्वामध्ये शब्दांची केवळ अर्थवाहकताच लक्षात घेऊन चालत नाही. त्यांच्या गर्भात लपलेले सौन्दर्याचे कोष उलगडण्याची हळुवार रसिकताही अंगी बाणावी लागते. हे सौन्दर्याचे डोळस भान नसते तर बाळशास्त्रींचे ज्ञान हे वेदाभ्यासजड वृद्धांच्या निस्तेज व निर्दन्त कौतुकाला तेवढे पात्र ठरले असते.

रसज्ञतेची ही सूक्ष्म जाणीव कधी कधी वेगळया माध्यमांतूनही डोके उंचावून पहायची. त्यांतूनच बाळशास्त्रींच्या काव्यरचनेचा जन्म झाला. त्यांचे काव्य हे प्रेरणाजन्य नसून प्रज्ञाजन्य आहे, तथापि शब्दांवर जरब व लयीची सवय यामुळे परस्मैपदी काव्यही हृदयंगम होऊ शकते हे पंडिती काव्याच्या अभ्यासकांना सांगावयास नकोच. प्रस्तुत संग्रहाच्या उत्तरार्धातील बाळशास्त्रींची काव्यरचना ही मराठीतून अलीकडे लुप्त झालेल्या पंडिती काव्यपरंपरेशी सोयर सांगणारी आहे. या रचनांमधून बाळशास्त्रींची जीवननिष्ठा व श्रद्धाविषय नेमके प्रकट झाले आहेत. पुष्कळशी रचना ही प्रासंगिक स्वरूपाची असली तरी त्यांतून दीर्घकाळ टिकणाऱ्या व आपल्या प्रकाशाने इतिहास प्रक्षाळून टाकणाऱ्या काही तथ्यांचाही आविष्कार उत्कृष्टपणे झालेला आहे. या गुणांमुळे त्या कवितांनी प्रासंगिकतेच्या मर्यादा ओलांडून टाकल्या आहेत. बाळशास्त्रींच्या श्रद्धांचे विषय विविध असले तरी सर्वांचे गोत्र एकच आहे. आत्मार्पणासाठी आतुर असलेले, देश व धर्म यांवरील जाज्वल्य प्रेम, असीम त्यागाचे किंबहुना हौतात्म्याचे अनिवार आकर्षण, उच्च ध्येयावर पिसाटपणे केलेली पतंग-प्रीति या बाबी त्यांना सदैव भुरळ घालीत असतात. तारुण्याला झपाटून टाकणाऱ्या या ज्वालामय वेडाने पछाडलेले बाळशास्त्री प्रामुख्याने आपल्याला या कवितांमधून भेटत जातात व त्यामुळेच वरवर बहिर्लक्षी वाटणाऱ्या त्यांच्या कवितेला आत्मनिष्ठेचा सुवर्णस्पर्श होऊन जातो. बाळशास्त्रींनी आपल्या गुरूवर रचलेली गीर्वाण पद्ये भावभक्तीने ओथंबलेली आहेत. भक्ति विषयाबद्दलची आर्द्रता व आर्तता त्यांत ओतप्रोत भरलेली असल्यामुळे त्या रचनांवर स्तोत्रांतील पावित्र्याचे प्रोक्षण झाल्यासारखे वाटते.

बाळशास्त्री आडनांवाने 'हरदास' असले तरी 'वृत्तीने' नव्हते. पण दक्षिणामूर्ति संस्थानातील श्रावणमासाने त्यांना आडनावाचे सार्थक करण्यास भाग पाडले. कटाक्षाने आपल्या स्वतःच्या दक्षिणा-

मूर्ति मंदिरातच फक्त श्रावणमासात, पण महिनाभर बाळशास्त्री कीर्तने करीत, क्वचित् परंपरेची मदत घेतली तरी बहुंशी आख्यान-रचना स्वकर्तृक असे. या कीर्तनांना प्राधान्याने टिपणे घेणाऱ्या शिक्षितांची अफाट मांदी जमत असे. कीर्तन संस्थेला आवश्यक असणारा गायकी वळणाचा कंठ नसतानाही या कीर्तनावर लोभाव-णारी गर्दी पाहिली की त्यांच्या कीर्तनाचे पृथगात्म वैशिष्टय लक्षांत घेणे भाग पडे. पूर्वरंगातील व्यासंगपूर्ण विचारमंथन व उत्तर रंगांतील रसप्रकर्ष प्रकट करणारे त्यांचे गद्य त्यांच्या गायनातील अभावावर मात करून जाई. त्या निमित्ताने रचलेल्या महाभारतावरील आख्यानांचा हा गुच्छ त्यांच्या चिरंतन स्मृतीवर प्रेम करणाऱ्या मराठी वाचकांच्या हाती देताना कर्तव्यबुद्धीचे आर्द्र समाधान होणे स्वाभाविक आहे.

महाभारत हे एक विशाल वटवृक्षांनी गजबजलेले संकीर्ण अरण्य आहे. त्यांच्या फांद्यांमधून व पारंब्यांमधून वाट काढताना दमछाक होते. त्यांच्या प्रचंड बुध्यांचा आधारही वाटतो व धाकही वाटतो. त्यांची छत्रच्छाया विसावा देते आणि वैराग्यही उत्पन्न करते. मानवी जीवनाच्या संकुलतेचे, गुंतागुंतीचे, परस्परांमध्ये गुरफटलेपणाचे व मति गुंग करून टाकणाऱ्या अथांगतेचे व वैचित्र्याचे इतके वास्तव व प्रत्यय-कारी चित्रण इतरत्र दुरापास्त आहे. अशा आर्ष ग्रंथाच्या सुबोध आकल-नाची पहिली गोडी बाळशास्त्रींच्या व्याख्यानांनी महाराष्ट्रातील नव्या व आधुनिक पिढीला लावली. त्याच महनीय सौन्दर्यशोधाचा पद्यावि-ष्कार या आख्यानसंग्रहाच्या रूपाने आज उपलब्ध होत आहे. बाळ-शास्त्रींचे कीर्तन ऐकण्याचे भाग्य लाभलेल्या नागपूरच्या श्रोत्यांचे मनः-पूर्वक अभिनंदन करून मराठी वाचक या पुस्तकाचे सानंद व साभार स्वागत करील असा मला विश्वास आहे. कारण बाळशास्त्रींच्या प्रचंड प्रपातासारख्या वक्तृत्वाच्या आवेगात एरव्ही गुदमरून गेलेले या आख्या-नामधील काव्य निर्भेळपणे आस्वादण्याची संधि या निमित्तानेच त्यांना मिळत आहे. महाभारतातील सर्व रुद्रता व रम्यता तोलून धरण्याची किमया या पद्यांनाही साधली आहे. एरव्ही हे इतके उत्कटपणे लक्षात आले नसते.

माझी थोरली बहीण ती. स्व. वीणा हरदास हिने हा आख्यान-संग्रह संपादित केला आहे. म. म. बाळशास्त्रींच्या ज्ञानयज्ञात तिचा वाटा फक्त भाविक श्रोत्याचाच नव्हता. शेवटपर्यंत एका मर्मज्ञ व चोखंदळ 'सखाराम बाबांचीही ' भूमिका तिने निष्ठापूर्वक व सातत्याने

बजावली आहे हे ज्यांना माहीत आहे त्यांना तिने हा संग्रह ज्या साक्षेपाने व नेटकेपणाने संपादित केला आहे त्याचे नवल वाटायला नको. तिने जोडलेल्या टीपांनी यातील पद्यांची समुचित सांधेजुळणी तर झालीच आहे, पण महाभारतांतील अग्रथित भागाचा मोजक्या शब्दांत परामर्शही घेतला जाऊन कथांशाला एकप्रकारे परिपूर्णता आली आहे. बाणभट्टाच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र पुलिंद याने अगदी बेमालूमपणे आपल्या पित्याच्या अपूर्ण ग्रंथकर्तृत्वाची पूर्तता केली. या संग्रहातील वीणाबेनच्या गद्याने हीच कामगिरी केल्याची साक्ष विचक्षण वाचकांकडून मिळेल हा मला विश्वास आहे. ज्ञानाचे पूजन करण्याचे वळण तिला पतीच्या सान्निध्यातच लागले होते. लेखनाचाही सराव होताच. स्वतंत्रपणे लेखन करण्याची प्रेरणा मात्र त्यांच्या निधनानंतर त्यांच्या बद्दलच्या उत्कट निष्ठेतून व त्यांच्या अखंड मनोमय सान्निध्यातून मिळाली. पतीचे अपूर्ण राहिलेले कार्य पूर्ण करण्याची श्रद्धा व तितिक्षा वीणाबेनजवळ आहेच. पण त्याबाबतची क्षमताही तिच्याजवळ असल्याचे आश्वासन गतवर्षी पतीच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने प्रकाशित झालेल्या म. म. बाळशास्त्रींच्या चरित्रग्रंथाच्या पहिल्या खंडाने दिले आहे.

एका मानवी ज्ञानहोत्राचे प्रदीर्घ सान्निध्य किती प्रेरणादायी असू शकते याची याहीपेक्षा अभिमानास्पद प्रमाणे वीणाबेनच्या या पुढच्या लेखनातून मिळावीत अशी सार्थ अपेक्षा बाळगण्याचा माझा हक्क या निमित्ताने सूचित करून ठेवणे इष्ट होईल.

बाळशास्त्रींच्या हयातीत त्यांची प्रस्तावना मिळविण्यात धन्यता मानणाऱ्यांच्या गर्दीत कसाबसा भांबावून उभे राहण्याची पात्रता असणाऱ्याला त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या ग्रंथाला प्रास्ताविक लिहिण्याचा योग यावा हे विपरीत व निर्दय वास्तव केवळ दोन कारणांमुळे शक्य झाले. त्यांपैकी एक : थोरल्या बहिणीची आज्ञा व दुसरे : मागे असलेला पणजोबापासून तो वडिलांपर्यंतचा ज्ञानसाधना व ईश्वरोपासनेचा पवित्र वारसा. बहिणीचे अंधळे वात्सल्य व पूर्वजांची विनायास पुण्याई यांमुळेच हे अधिकारातिक्रमण करण्याचे साहस हातून झाले. एरवी आपली हिंमत नव्हती.

लोकमान्य टिळक, महाविद्यालय,
वणी (जि. यवतमाळ)

राम शेवाळकर

# पुरस्कार

माझे मित्र कै. साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांच्या "गीत-भारत व स्फुट काव्य" या काव्यग्रंथाला पुरस्कार लिहिताना, आज ते आपल्यात नाहीत याचा फार खेद होतो. प्रत्येक मनुष्य मर्त्य आहे ही गोष्ट खरी असली तरी कर्तृत्ववान् पुरुषांचा अकाली मृत्यु ही घटना दुःखदायी असते. त्यांचा मृत्यु ही केवळ कौटुंबिक हानि नसते, ती राष्ट्रीय हानि असते व ती भरून येणे कठीण असते. कर्तृत्वाच्या ऐन भरात असताना या प्रतिभासंपन्न विद्वान् वाचस्पतीला काळाने आपल्यातून ओढून न्यावे हा दुर्दैवाचा दारुण आघात आहे. त्यांच्या अकल्पित व एकाएकी झालेल्या निधनाची वार्ता ऐकून काही काळ मी इतका सुन्न होऊन गेलो की दुखवट्याचे औपचारिक पत्र पाठविण्याचेही भान मला राहिले नाही याचा खेद होतो. हिंदु जातीला उत्कृष्ट कार्यकर्ते लाभत नाहीत हेच खरे !

कै. बाळशास्त्री हरदास यांचे घराणे मूळ तेलंगणातील होते. गोदाकाठच्या तैलंगणाने कृष्णशास्त्री तैलंग, शास्त्रीबुवांचे पितामह श्री नारायणमहाराज, बापूजी अणे, डॉ. हेडगेवार यांच्यासारख्या थोर पुरुषांच्या अमूल्य देणग्या महाराष्ट्राला दिल्या. ही घराणी महाराष्ट्रात आली. त्यांनी महाराष्ट्र व मराठी भाषा आपली मानली. भारताची व भारतीय संस्कृतीची सेवा केली. कृष्णा आणि गोदा ह्या महाराष्ट्रात उगम पावलेल्या लोकमातांनी कर्नाटक व तेलंगणाची भूमि समृद्ध केली आहे. या नद्यांच्या काठी वाढलेली महाराष्ट्र, कर्नाटक व तेलंगण यांची संस्कृति एक आहे व भाषा भिन्न असल्या तरी या तिन्ही प्रदेशांतील घराणी रक्ताच्या नात्याने एकमेकांशी संबद्ध आहेत. म्हणून गोदा-काठच्या संत एकनाथांनी जेव्हा महालक्ष्मीला प्रकट होण्याविषयी आवाहन केले, त्या वेळी माहूर, कोल्हापूर, तुळजापूर आणि पंढरपूरच्या महालक्ष्मीबरोबर कर्नाटक आणि तेलंगण महालक्ष्मीलाही आवाहन केले. कानडा विठ्ठल पंढरपूरला आला तोच मुळी महाराष्ट्र, कर्नाटक व तेलंगण यांचे ऐक्य करण्याकरिता आला. या तिन्ही प्रदेशांतील भक्त

पंढरपूरला एकत्र येत. तिघांनीही विठ्ठल मंदिराच्या जीर्णोद्धाराला देणग्या दिल्या आहेत.

कै. बाळशास्त्री यांच्या पितामहांनी गेल्या शतकाअखेर नागपुरात श्रीदक्षिणामूर्तीची बाला त्रिपुरसुंदरीसह स्थापना केली. माझी साठी उलटल्यावर मी नागपुरास असेपर्यंत आठ दहा वर्षे दर महाशिवरात्रीला माझ्या वाढदिवशी श्रीदक्षिणामूर्तीच्या दर्शनाला सहकुटुंब जात असे. त्या वेळी साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास व त्यांच्या पत्नी सौ. वीणाताई हरदास यांनाही भेटण्याचा आमचा नियम असे. अनेक विषयांवर त्या वेळी चर्चा होई. म. म. बाळशास्त्री क्वचित् एखादे वेळी घरी नसले तर त्यांची जागा त्यांची पत्नी भरून काढी. त्या आपल्या पतीशी व त्यांच्या ध्येयवादी जीवनाशी समरस झाल्या होत्या. साहित्याचार्य प्रवासाचे, प्रवचनांचे, वाचनाचे व लेखनाचे अपार परिश्रम करीत. प्रवास व प्रवचनांच्या अखंड उद्योगात ते वाचन लेखन करतात तरी केव्हा याचे मला आश्चर्य वाटे. ते रात्री जागून वाचन लेखन करीत असत. त्यांनी प्रकृतीची काळजी घ्यावी असे मी त्यांना सांगत असे. पण त्यांनी आपल्या प्रकृतीकडे कधीही लक्ष दिले नाही. प्रत्येक क्षण त्यांनी राष्ट्राच्या सेवेत वेचला. आमच्यासारख्याकडून वार्धक्यात काही होण्यासारखे नसल्यामुळे आमचे आयुष्य देवाने तुम्हांला द्यावे असेही मी त्यांना म्हणे. पण देवाने ते ऐकले नाही.

नागपूरचे श्रीदक्षिणामूर्ति मंदिर हे अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण आहे. दक्षिणामूर्ति ही शंकराची मूर्ति आहे. शंकराच्या देवालयांत त्याची मूर्ति नसते, पिंडी असते. हेच मंदिर असे आहे की, तेथे शंकराची देहधारी ज्ञानमूर्ति उभी आहे दक्षिणामूर्तीच्या अनेक मूर्तींपैकी ही मेधामूर्ति आहे. दक्षिणामूर्ति मंत्राचा जप करून जो त्याची उपासना करतो त्याला प्रज्ञा, प्रतिभा व मेधा या तिन्ही गुणांचा लाभ होतो. कै. बाळशास्त्री हरदास यांच्या पितामहांनी या मंदिरात कोठेही बाहेर न जाता, अशी तपश्चर्या आमरण केली. दक्षिणामूर्तीच्या डाव्या बाजूला बाला त्रिपुरसुंदरीची मूर्ति आहे. ही शिवाची शक्ति आहे व शिवाच्या स्वाधीन आहे. तिला प्रमुखस्थान नाही, ते शिवाला आहे. या शिव-शक्तींची उपासना करीत नारायण महाराज अयाचित वृत्तीने रहात.

या सत्पुरुषाने ज्ञानमय शिवाची जी आमरण उपासना केली तिचे फळ त्यांचे नातू श्री. बाळशास्त्री यांना मिळाले व त्यांना प्रज्ञा, प्रतिभा व मेधा यांचा लाभ झाला. त्यांनी नवीन शिक्षण घेतले नव्हते. तरीही त्याचे पांडित्य, ग्रंथकर्तृत्व व हजारो श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणारे अमोघ वक्तृत्व पाहिले म्हणजे कै. बाळशास्त्री हाच एक चमत्कार आहे व त्याचे श्रेय त्यांच्या पितामहांच्या तपश्चर्येला आहे असे मला वाटे.

भारतीय राष्ट्र आणि भारतीय संस्कृति हे शास्त्रीबुवांच्या परमादराचे विषय होते. रामायण, भारत व भागवत यांचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. भागवताची तर त्यांनी किती पारायणे केली होती त्याला गणतीच नाही. एका दिवसात संपूर्ण भागवताचा पाठ त्यांनी केला होता. आणि असे अनेक पाठ करण्याचा त्यांचा विचार होता. भारतातील व्यक्तिरेखावरील त्यांचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. पण ते नुसते ग्रंथकार नव्हते, प्रतिभासंपन्न कवीही होते हे या गीतभारत व स्फुट काव्यांतून लक्षात येईल. प्रस्तुत गीतभारत युद्धपर्वाच्या अखेर संपले आहे. म्हणजे जवळजवळ कथारूप महाभारत संपूर्ण झाले आहे. यात आदि पर्वात १०१, सभापर्वात ३१, विराटपर्वात २४, उद्योग पर्वात २०, आणि युद्धपर्वातील भीष्म, द्रोण, कर्ण व शल्य ही चार पर्वे मिळून १३८ पदे आहेत. शिवाय त्यांनी साकी, दिंडी, घनाक्षरी यांचाही उपयोग केला आहे. प्रत्येक पानावर कथाभागाचा गद्यात सारांश दिला आहे. या गीतभारताचे रसिकावलोकन प्रसिद्ध कवि प्राचार्य राम शेवाळकर यांनी आपल्या प्रस्तावनेत केले ही आनंदाची गोष्ट आहे.

या संग्रहात साहित्याचार्यांच्या काही संस्कृत व मराठी स्फुट कविता आहेत. मराठी, सस्कृत व हिंदी ह्या तिन्ही भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. या तिन्ही भाषांतून ते अस्खलित वक्तृत्व करीत व गंगौघाप्रमाणे असणाऱ्या त्यांच्या विचारधनाच्या व वक्तृत्वाच्या ओघात श्रोते सुस्नात होत असत. संस्कृत श्लोकात त्यांनी त्यांचे दीक्षागुरु श्री चंद्रशेखरसरस्वती यांच्यावर केलेले अष्टक आहे. या दीक्षाग्रहणाचे ते जेव्हा वर्णन करीत तेव्हा आनंदाने त्यांच्या अंगावर रोमांच उभे रहात. "प्रातःस्मरणम्" हे ५३ श्लोकांचे संस्कृत स्तोत्र वाचनीय व पाठ करण्यासारखे आहे. कारण त्यात साऱ्या भारत वर्षातील श्रीरामचंद्रापासून तो आतापर्यंत झालेल्या क्रांतिकारकांचे स्मरण आहे.

मराठी स्फुट काव्यात 'माउलीची महात्मता' या तीनच हृदयस्पर्शी श्लोकांत ज्ञानेश्वरीची महती गायिली आहे. ते म्हणतात,

दैवे झाली हतपतित ही सत्प्रजा उद्धरावी ।
यासाठी या कलियुगतमी जन्म घे ज्ञानदेवी ।
नामा, एका सतत वदती, श्री तुका जीस आई ।
ठेवी प्रेमे पदयुगि तिच्या हा महाराष्ट्र डोई ॥

स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल बाळशास्त्रींना परमादर असे. त्यांच्या १९५४ सालच्या ७१ व्या वाढदिवशी त्यांना मूक भाववंदना करताना ते म्हणतात –

"उपेक्षिता! आज ही स्वीकरी मूक भाववंदना!" ज्या स्वातंत्र्यमंत्राचे तू प्रथम उच्चारण केलेस व त्याकरिता खडतर हालअपेष्टा भोगल्यास "येई ते स्वातंत्र्य परी ये स्मरणही न तुझे कुणा" याचे त्यांना फार दुःख होते. तथापि शेवटी –

"परी अस्मिता या राष्ट्राची जागृत होता खरी ।
तुझी हृदयसंपुटी पूजितिल भारतीय वैखरी ॥
आकांक्षा पुनरुत्थानाची पेटताच अंतरी ।
द्रष्टया! होइल मूर्ति विराजित तुझी हृदयमंदिरी" ॥

असा आशावाद प्रकट करतात. १३ व १४ क्रमांकाची दोन भावगीते साहित्याचार्यांची रसिकता व भावानुसारी ललित कोमल रचना दाखवितात. तथापि त्यांचा स्थायीभाव "विजयादशमीच्या संदेशा"त आढळतो. त्यांच्या आशाआकांक्षा व्यक्त करणाऱ्या ऊर्जस्वल संदेशातील शेवटच्या ओळी देऊन हा पुरस्कार संपवितो.

"अहो राक्षसी संस्कृती ये उफाळून जाळावया ती पुन्हा मानवा ।
असे आसुरी धर्म संहारकारी जरी मानवी वेष घेती नवा ।
दिनी आजच्या साद घाली प्रभूराम, रे जाग रे जाग हिंदू माना ।
निखंदूनि तीते करी विक्रमे तू पुनः धर्मसाम्राज्य संस्थापना ।

'माउली'
१२४/५ एरंडवणे, पुणे

शं. दा. पेंडसे

# अनुक्रमणिका


पृष्ठांक

आत्मनिवेदन ३

प्रस्तावना ९

पुरस्कार १३

**गीतभारत**

१ आदिपर्व (पदे १–१०१) १– ९६

२ सभापर्व (पदे १०२–१३२) ९७–१३१

३ विराटपर्व (पदे १३३–१५६) १३३–१५४

४ उद्योगपर्व (पदे १५७–१७६) १५७–१८२

५ भीष्मपर्व (पदे १७७–१९९) १८३–२०८

६ द्रोणपर्व (पदे २००–२६७) २०९–२५५

७ कर्णपर्व (पदे २६८–३१४) २५६–२८८

**स्फुट काव्य**

१. काव्यनिर्मितीपूर्वी भगवंतास मागणे २८९

२. हिंदुराष्ट्रध्वजवंदना २८९

३. श्रीकांची कामकोटि पीठाधिपति
श्रीमत् स्वामी श्रीचंद्रशेखरसरस्वती
सद्गुरुनाथांची आरती २९०

४. श्रीमत् सद्गुरु श्रीचंद्रशेखर सरस्वत्यष्टकम् २९१

५. मकरसंक्रमणम् २९२

६. समस्यापूर्तयः २९२

७. प्रातःस्मरणम् २९३

८. श्रीगणेशाला मागणे २९६

९. पद, त्रिपुरसुंदरीचे २९७

१०. माउलीची महात्मता २९७

११. स्वीकरी मूक भाववंदना २९८

१२. विजयादशमीचा संदेश २९८

१३. वीणे कर बाई झंकार २९९

१४. ,, ,, ,, ,, २९९

१५. सुदिन उगवणार का ? ३००

१६. खिन्न मना, जाग ३०१

१७. रासबिहारी बसू ३०१

# ग्रंथातील रेखाचित्रे


| | | |
|---|---|---|
| १ | श्रीमन्महाभारत लेखन | १९ |
| २ | महाभिषाला व गंगेला ब्रह्मदेवाचा शाप | २ |
| ३ | भीष्मजन्म | ८ |
| ४ | भीम व बकासूर युद्ध | ७० |
| ५ | द्रौपदीला कुंतीचा आशीर्वाद | ८१ |
| ६ | सुभद्राहरण | ९३ |
| ७ | शुकभोजन | ११५ |
| ८ | द्रौपदी वस्त्राहरण | १२८ |
| ९ | कीचकवध | १४५ |
| १० | उत्तर गोग्रहण | १५० |
| ११ | श्रीकृष्ण साह्ययाचना | १५५ |
| १२ | श्रीकृष्ण शिष्टाई | १५६ |
| १३ | संजयास दिव्यदृष्टि | १८५ |
| १४ | अर्जुन विषाद | १८९ |
| १५ | भीष्मांची तृषाशांति | २०६ |
| १६ | कर्णाच्या रथाचे चाक पृथ्वीने गिळले | २८५ |



श्रीमन्महाभारत लेखन

# म. म. बाळशास्त्री हरदास



पार्थिव देहाने देवाघरी गेलात
पण
चैतन्यरूपाने माझ्या मनोमंदिरात
चिरंतन अधिष्ठित आहात.
आपली
आपल्या कृतिपुष्पांनी केलेली
ही अर्चना स्वीकारावी.

—वीणा

महामहोपाध्याय साहित्याचार्य

# बाळशास्त्री हरदास

यांनी रचित

# गीतभारत

## आदिपर्व

### पद १ लें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ........
मुंबई शाखा
(संदर्भ प्रत)

मोक्षदायिनी पुरीत पहिले स्थान जिला लाभले ।
निराकार निर्गुण परमेश्वर जेथे लोभावले ।। धृ. ।।
मान्धाता रन्तिदेव राजा हरिश्चन्द्र ज्या स्थळी ।
विद्या विक्रम धैर्य तपस्या सनाथ करिती बळी ।।
मानवेन्द्र वैवस्वत निर्मी मनू तपस्या बळे ।
आद्य कवी वर्णी यद्गुणगण सर्वांहुनि आगळे ।।

(चाल) जन्म घे जिथे करुणाघन परमेश्वर ।
वर्णील बाळ तद्गुण कैसे पामर ।
नृप महाभिष तिथे होय पौरुषंधर ।
शौर्य तपस्या पांडित्या यत्तनुमंदिर लाभले ।।
निराकार निर्गुण०

(साकी) ज्याचा भूमिजय विश्वांतरि गाजे खरकरवाल ।
राजसूय शत अश्वमेध तो करि सहस्र भूपाल ।।
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदा वार्ता ।।

---

टीप– " महाभिष नांवाचा अयोध्येचा राजा होता. त्याने शंभर राजसूय व हजार अश्वमेध यज्ञ केले होते. अशा त्या पराक्रमी, तपस्वी व विद्वान् राजाची कीर्ति दिगंती पसरली होती. "

## पद २ रे




महाभिषाला व गंगेला ब्रह्मदेवाचा शाप

पितामहाच्या दर्शनार्थ ते लावण्याची खनी ।
पातली देवी मंदाकिनी ।। धृ. ।।

श्री नारायण चरणसम्भवा अघनगचयभंगिनी ।
उपासिति सदा जिला सुरमुनी ।।
यद्‌गुणगणमोहित होउनिया वीतराग स्मरहर ।
जिला दे स्थान आपुले शिर ।।
पवनस्पर्शें चन्द्रोज्ज्वल तद्वसन वक्षिचे ढळे ।
अधोमुख सुरमुनि ते जाहले ।।

(चाल) परि देवीच्या लावण्ये लोभावला।
अनिमिष नेत्री तत्पाना सरसावला।
श्री गंगेचा तो नेत्रविषय जाहला।
दैवोपहता होय मोहिता तत्समयी सुरधुनी।
पातली देवी०

( साकी) अविनय तो पाहता होय संक्रुद्ध जनक विश्वाचा।
अंतःकल्याणामृत भरिता वदे शापसम वाचा ॥
ऐका श्री भारतवार्ता
जी तोषद भवदा वार्ता ॥

---

टीप– "राजर्षि महाभिष आपल्या पुण्याईने स्वर्गलोकाला गेला. एकदा तो ब्रह्मदेवाच्या दरबारात गेला असता त्याच ठिकाणी स्वर्नदी गंगाही आली. वाऱ्याने चंद्राप्रमाणे उज्ज्वल असे तिचे वस्त्र उडाले. राजा अनिमिष नेत्रांनीं तिच्याकडें पहातच राहिला. त्याच्या ह्या अमर्यादिने रागावून ब्रह्मदेवांनी दोघांनाही 'मृत्युलोकी जन्म पावाल' असा शाप दिला."

(साकी) तव चेतोहर देवनदी भूलोकी तव सहवासी।
होउनि देइल अमित यातना योग्य विषयसक्तासी।
ऐका श्री भारतवार्ता।
जी तोषद भवदा वार्ता ॥

## पद ३ रे

अघनगभंगा पितामहपदा वंदुनि मंदाकिनी।
निघे तो शाप आठवित मनी ॥ धृ. ॥
मार्गी दिसले अष्टवसू जर्जर वपु कज्जलसम।
अन्यथा जे तेजे रविसम ॥
पृच्छा करिता सरिद्वरेला दीनपणे सांगती।
ब्रह्मसुत मुनि वसिष्ठ शापिती ॥

महदपमानज फळ भोगाया मर्त्य लोकिं जन्मणे।
 यातना अमित देवि साहणे ॥
माता हो आमुची तुझ्या गे पदपद्मी प्रार्थना।
 येऊ दे करुणा तव तरि मना ॥

(चाल) जन्मताच माते करुणा इतुकी करी।
उदकांत बुडवुनी घे जीवन सत्वरी।
राहू न दुःखमय दीर्घकाल भूवरी।
हाचि मोचनोपाय आमुचा कथी ब्रह्मसुत मुनी।
 निघे तो शाप०

---

टीप—" मृत्युलोकी गंगा तुझी पत्नी होईल व तुला अप्रिय अशा गोष्टी करील. दोघेही ब्रह्मदेवाचा शाप ऐकून खाली आले. गंगेला वाटेत मूळचे सूर्यकिरणा-प्रमाणे तेजस्वी, पण ऋषि वसिष्ठांच्या शापाने काळे ठिक्कर पडलेले अष्टवसू भेटले. हेही पृथ्वीवर जन्म घेण्यासाठीच चालले होते. त्यांनी देवी गंगेला आपली माता होण्याविषयी व जन्मतःच पाण्यात बुडवून हे दुःखमय जीवन संपविण्याविषयीं प्रार्थना केली."

## पद ४ थे

यद्योगे अभिधान होय या राष्ट्राचे भारत।
 जयाचा वंशधर्म भारत ॥ धृ. ॥
सानपणी नरसिंह सिंहदंता लीलेने गणी।
 दंडी यज्ञशत्रु जो रणी ॥
प्रतापाग्नि त्या भरतकुळी नरमणे होय भूपती।
 प्रतीपाभिध गुणगणसंहती ॥
उत्तुंगत्वे यशोध्वजा वंदी कुलपुरुषा सदा।
 केवि वर्णू तद्गुणसंपदा ॥
(चाल) मंत्र्यांच्या स्कंधी राज्यभार ठेवुनी।
तो धर्म नित्य गंगाद्वारी राहुनी।

जपयज्ञी रतला आसनजय साधुनी ।
बहु संवत्सर भूप राहिला उग्र तपस्यारत ।
जयाचा वंशधर्म०

टीप–"भरतकुलोत्पन्न प्रतीप नांवाचा राजा होता. सर्व प्राणिमात्रांच्या हितासाठी झटणारा असा तो राजा हरिद्वारास जाऊन जपजाप्यादि करून तपश्चर्या करू लागला."

## पद ५ वे

अंकावरि ती वरांगना पाहुनी ।
तरळे स्मित त्याच्या वदनी ॥ धृ. ।
वदला देवी काय तुझे अभिधान ।
करिसी कां हा सन्मान ॥
अंतःकरणी काय हेतु गे धरिला ।
अंक हा कशास्तव वरिला ॥
सौंदर्य तुझे भूलोकीचे नाही ।
स्वर्गीय गमे लवलाही ॥
(चाल) ती वदली हे नरनाथ ।
व्हावा तू जीवननाथ ।
यास्तव हा धरिला पंथ ।
सहचरी मला आजीवन तू मानी ।
तरळे स्मित०

टीप–"एके दिवशी गंगा नदी सुंदर स्त्रीरूप धारण करून त्या ध्यानस्थ राजाच्या भरदार अशा उजव्या मांडीवर जाऊन बसली. राजाने हसून तिला मांडीवर बसण्याचे कारण विचारले. गंगा म्हणाली, "मी आपल्या ठिकाणी अनुरक्त असून माझा आपण जीवनसहचरी म्हणून अंगीकार करावा."

## पद ६ वे

भार्या व्हाया पातलीस कल्याणी ।
परि धर्म ते मनी नाणी ॥ धृ. ॥
शशिवंशीया सारे धर्मप्राण ।
हो जीवननिष्ठा जाण ॥
दक्षिणांक हा जाण स्नुषा-कन्येचा ।
तो स्वीकरिला तू साचा ॥
तव बांधाया कंठी मंगळसूत्र ।
होईल योग्य मम पुत्र ॥
(चाल) वदली देवी स्मितयुक्त ।
नरनाथ एक संकेत ।
गूढता ज्यात अतिरिक्त ।
उकलाया तो शक्त न माझी वाणी ।
परि धर्म ते ०

टीप – "अतिशय धर्मज्ञ अन् नीतिमान् असा तो राजा म्हणाला, 'हे कल्याणी, उजवी मांडी ही कन्या व स्नुषा ह्यांची असते. तेव्हा तू माझ्या पुत्राशी विवाह कर.' गंगादेवीने त्याचे म्हणणे स्वीकारले,पण आपली एक अट सांगितली. ती म्हणाली, 'मी करीत असलेल्या चांगल्या किंवा वाईट कोणत्याही कृत्याविषयी आपल्या मुलाने विरोध दाखवू नये."

(दिंडी) तया नरपाळा पुत्र तीन होते ।
युद्धयज्ञी जे शोभताति होते ॥
ज्येष्ठ देवापी होय तपाधीन ।
कलाप ग्रामी वसे ध्यानमग्न ॥
पुत्र मध्यम शांतनू त्या नृपाचा ।
पौरुषे वाटे अपर गर्भ साचा ॥
तोचि राज्याचा उत्तराधिकारी ।
स्पर्शमात्रे जो जरादुःख वारी ॥
(साकी) यौवनस्थ सुत होता सांगे पूर्व कथा नृप कानी ।
ऐसी लावण्यवती स्वप्नी पाहिली न लोकांनी ॥

ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदा वार्ता ॥

टीप – "प्रतीप राजाने आपला शांतनु नावाचा मुलगा तारुण्यात आल्यावर त्याला गंगेची पूर्व कथा सांगितली."

(साकी) मृगयासक्त नृपति एकाकी सुरसरित्तटी धन्वी ।
असता एकांती दूर दिसे लावण्यमयी तन्वी ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदा वार्ता ॥

## पद ७ वे

गुंतले कुठे कमले श्री भगवंत ।
टाकुनी तुला विपिनांत ॥ धृ. ॥
कां हिमालयी ध्यानमग्न शिव झाले ।
गिरिजे तुज हे वन रुचले ॥
तू उमा रमा जरि न या स्थळी आली ।
मग काय तयांची आली ॥
सौंदर्य तुझे पाहताच मोहरलो ।
देवी तनुभान विसरलो ॥
(चाल) ती सस्मित बोले राया ।
पातले सहचरी व्हाया ।
चाटूक्त कशास्तव वाया ।
तव सहवासा आतुरले मम चित्त ।
टाकुनी तुला ०

टीप – "राजा शंतनु गंगातीरी मृगया करीत असता त्याच्या पित्याने पूर्वी सांगितल्याप्रमाणे ती सुस्वरूप स्त्री त्याला दिसली."

(साकी) न सुत बुडविला पती असे मी सुतशोकानलि तप्त ।
यासहि बुडविसि काय क्रूरे जसे बुडविले सप्त ॥ धृ. ॥
विप्रिय करोनि माझे मत्सहवास समय संपविला ।
ऐसें वदोनि गंगेने तो भूमिपाळ कंपविला ।
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदा वार्ता ॥

## पद ८ वे

अधमाधम यन्नामग्रहणे तरती विश्वांत या ।
सजति नारदही गुण गावया ॥ धृ. ॥

वधिन काय तीच मी आपुले नरपाळा आत्मज ।
टाक विपरीत भाव चित्तज ॥




भीष्मजन्म

म्हणती मंदाकिनी त्रिपथगा देवनदी जन्हुजा ।
वंदिती सुरमुनिही पदरजा ॥
भार्या झाले देवकार्य सिद्धयर्थ तुझी भूपते ।
स्मरण राहील तुला या सुते ॥

(चाल) ते देव वसू बुडविले आपुल्या जली ।
मागती हाचि वर ते जोडूनि अंजलि ।
इच्छिती न मज्जन मर्त्यलोककज्जली ।
कार्य होय संपन्न अनुज्ञा दे आता जावया ।
सजति नारदही ०

---

टीप — " अष्टवसूंना दिलेले वचन पूर्ण करण्याकरिता गंगादेवीने आपली पहिली सात मुले पाण्यात बुडवून मारली. विरोध केल्यास ती आपल्याला सोडून जाईल म्हणून राजा बोलला नाही. परंतु आठवा तरी वाचवावा म्हणून राजाने तिला अडविले. त्याबरोबर कराराप्रमाणे राहण्याची मर्यादा संपली म्हणून आपला सर्व वृत्तान्त कथन करून आणि तो मुलगा स्वाधीन करून गंगा स्वर्लोकी निघून गेली."

(घनाक्षरी) कोण आपव मुनिवर्य । करी देवहि हतवीर्य ।
आर्य वृत्त देववर्य । ते अनार्य वृत्त का ? ॥

## पद ९ वे

ब्रह्मर्षीची तपःसमृद्धी पाहुनि संतोषली ।
माता कामधेनु पातली ॥ धृ. ॥

वदे मला या आश्रमांत दे मुनिवर्या आश्रय ।
हव्य मी अर्पिन सप्रश्रय ॥
जननी परि पूजुनी तिला दे स्थान आश्रमी मुनी ।
संचरे निर्भय ती त्या वनी ॥
विहारार्थ पातले एकदा अष्टवसू त्या वनी ।
पाहिली कामधेनु लोचनी ॥
दशसहस्र वर्षे जीवन ये तैसे स्थिर यौवन ।
करिता हिचे दुग्ध प्राशन ॥

(चाल) ऐकताच बोले द्यूची भार्या तया ।
हे रत्न पाहिजे आश्रमांत कासया ।
न्या आपुल्याच मंदिरि हे शोभावया ।

सखी एक मानुषी करिन मी अजरामर भूतली ।
माता कामधेनू०

टीप – "राजा जनमेजय वैशंपायनांना आपव ऋषींची व अष्टवसूंची शापकथा विचारतो. वैशंपायन सांगतात, राजा, वसिष्ठ ऋषींनाच आपव म्हणतात. अष्टवसू एकदा त्यांच्या आश्रमांत आले असता वसिष्ठांची कामधेनु त्यांना दिसली. द्यु नांवाच्या वसूच्या पत्नीने आपल्या पतीजवळ त्या गाईची मागणी केली.

(साकी) ध्यानी पाहे अष्टवसू ते पाप करिती बळ दर्पे ।
दे शाप न कां दंश करावा पुच्छ तुडविता सर्पे ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदा वार्ता ॥

## पद १० वे

हे नरनाथा घेउनि जाते बाळ ।
करिन मी नीट संभाळ ॥ धृ. ॥
हा विद्येचा कंठमणी व्हायास ।
करिन मी उचित सायास ॥
घडवाया मी ही सुतमूर्ति मनोज्ञ ।
आणीन दिव्य शिल्पज्ञ ॥
या पुत्राच्या प्रतिभेचे उन्मेष ।
करितील मुनी अनिमेष ॥
(चाल) विद्या घेउनि संपूर्ण ।
हा होता यौवनपूर्ण ।
अर्पीन तव करी तूर्ण ।
विरहानलि या तोवरी देह संभाळ ।
करिन मी ०

टीप– "तिच्या इच्छेसाठी अष्टवसूंनी गाय पळवली. वसिष्ठांनी ज्ञानदृष्टीने ते जाणले अन् रागावून शाप दिला की, 'तुम्ही सर्व मनुष्ययोनीत जन्मास जाल. द्यु मात्र पुष्कळ काळपर्यंत पृथ्वीवर राहील.' आठवा मुलगा तो द्यु होता."

यांप्रमाणे पूर्वकथा राजाला सांगून गंगा त्याला घेऊन अंतर्धान पावली."

(साकी) भूप म्हणे जाणवला विरहक्लेश हेतु दुष्करसा ।
गंगाहि मद्वियोगे झाली मत्सम का शुष्करसा ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जो तोषद भवदा वार्ता ॥

## पद ११ वे

हे नरपाळा। परिचय आहे ना माझा ।
ठरले अतिदु:खद । जीवनांत मी भाजा ॥ धृ. ॥
विरहाग्नीचे। हे जीवन इंधन ठरले ।
व्हावे अमृतासम। तेचि गरलमय ठरले ॥
या सहवासी । क्षण जे सुवर्णमय झाले ।
त्यांचे स्मारक हे। चरणीं अर्पण केले ॥
संभाळावे । हे रत्न अलौकिक राया।
यत्कीर्तिगान गंधर्व लागती गाया ॥
(चाल) यापरी बोलता सती गहिवरे।
वात्सल्य लोचनांतुनी पाझरे ॥
गांगेय समर्पण करी निजकरे ।
निववी हृदया तो सुत आलिंगुनि राजा ॥
ठरले अतिदु:खद०

टीप– " पत्नीवियोगाच्या दु:खाने होरपळलेला तो राजा गंगाकिनारी मृगये-साठी आला असता त्याला एके ठिकाणी तिचा प्रवाह शुष्क झालेला दिसला. तेवढ्यात शुभ्रवस्त्रा अशी ती गंगा आपल्या स्वरूपसुंदर मुलाला घेऊन प्रकट झाली. शूर, धनुर्धारी आणि सकलशास्त्रपारंगत अशा त्या सुगुणी मुलाला राजाच्या स्वाधीन करतांना तिच्या मातृहृदयाला वेदना झाल्या. "

(साकी) म्या देवव्रत ऐसे या अन्वर्थ ठेविले नाम ।
ने पुत्ररत्न शोभो या कुळदीपके तुझे धाम ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदा वार्ता ॥

(धनाक्षरी) यौवराज्यी नरपाळ। बसवी गंगेचा बाळ।
करी लोक प्रतिपाळ। लोकपाळ साच तो।

## पद १२ वे

तो राय गंध कमलाचा। वातावरणी दरवळला ॥
भूपाचा मानसभृंग। त्यायोगे भान विसरला ॥
तच्चित्तनियंत्रित देह। त्या गंधाते अनुसरला ॥
तीरावरि कालिंदीच्या। रमणीय पाहिली बाला ॥

(चाल) लावण्यामृत सरितेचे।
उत्फुल्ल कमल ते साचे।
चित्तभृंग पाहुनि नाचे।
तो संयमहिम गिरिराज। दर्शनमात्रे विरघळला।

---

टीप–"शंतनूने आपल्या देवव्रत नांवाच्या ह्या मुलाला राज्याभिषेक केला. एके दिवशी यमुनेच्या कांठी राजा फिरत असता जिच्या अंगाला लोकोत्तर परिमल येत आहे अशी सुस्वरूप तरुणी त्याच्या दृष्टीस पडली. राजाचे मन तिच्यावर बसले."

(साकी) परि आहे मच्चित्ती राया एक काम पुरवा हो।
सद्वर लाभ सुखामृत पूरी मत्प्रकाम पुरवा हो ॥
ऐका श्रीभारत वार्ता।
जी तोषद भवदा वार्ता ॥

## पद १३ वे

ते दाशपतीचें वाक्य। पडताच कर्णरन्ध्रांत ॥
वीरमूर्ति गांगेयाची। राहिली उभी हृदयांत ॥
स्मरले तद्‌गुणगण चित्ती। अति दुर्लभ जे विश्वांत ॥
पूर्त्यर्थ वासनेच्याही। ते अकार्य ये न मनांत ॥

(चाल) सलतो जरि मन्मथ बाण ।
जरि व्याकुळ होती प्राण ।
राये स्वीकरिले मौन ।
वारणेन्द्र तच्चित्ताचा । फसला न मोहपंकांत ॥

टीप—"राजाने त्या मुलीच्या बापाजवळ स्वतःकरिता तिची मागणी केली. त्या मुलीच्या पित्याने ती गोष्ट कबूल केली; पण एक अट घातली की, "ह्या मुलीपासून तुला जो मुलगा होईल, त्यालाच तुझ्यामागून राज्याभिषेक व्हावा. दाशपती धीवराच्या त्या अटीने राजाचें चित्त व्यथित झाले. गांगेय देवव्रताची प्रेमळ मूर्ति त्याच्या नजरेसमोर उभी राहिली."

(साकी) गांगेय पित्यासि पुसे दिसता कृश हरिणकाय तात ।
कारण चिंतारोगे ऐसे क्षीणकाय होतात ॥
ऐका श्री भारतवार्ता ।
जी तोषद भवदा वार्ता ॥

## पद १४ वे

झाले आहेतहि होतिलही सत्पुत्र ।
गांगेयापुढती सारेच त्रपापात्र ॥ धृ. ॥

सस्मित बोले । जनकाच्या संतोषार्थ ।
मज अदेय दाशा । काहीच न जगतांत ।
त्यागिले पित्याचें । राज्यासन मी जाण ।
या मातेंचा सुत । मी राजा मानीन ॥

गंगेसम बा मज । नारी अवघ्या जाण ॥
अत्युग्र बृहद्व्रत । आजीवन पाळीन ॥

(चाल) आविष्कृत होता अशी दिव्यता ।
हा भीष्म भीष्म बोलती देवता ।
पुष्पांनी आच्छादिती तनुलता ।

म्हणती तरले याच्यायोगें शशिगोत्र
गांगेयापुढती०

टीप – " धीवरकन्येच्या स्मरणाने राजा शंतनु तळमळत असे. तो निस्तेज आणि कृश झालेला पाहून देवव्रत धीवराकडे त्याच्या कन्येची पित्यासाठी मागणी करण्याकरता गेला व आजन्म ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा करून तिला माता म्हणून त्याने नमन केले. "

## पद १५ वे

पुत्रयुग्म विश्वासे देउनि गांगेयाच्या करी।
राय परलोक गति स्वीकरी ।। धृ. ।।
साम्राज्योचित उपचारे उत्तरक्रिया साधुनी।
जाय त्या द्वारि जिथे स्वर्धुनी ।।
पुत्राकरवी श्राद्धविधीच्या सशास्त्र संपादनी।
प्रकटली देवी मंदाकिनी ।।
कुशावरी पिंडदान व्हावे तोच नवल वर्तले।
सर्वही स्तिमित नेत्र जाहले ।।
(चाल) ये मही भेदुनी शंतनुचा कर वर।
शब्दही उमटला घनगंभीर स्वर।
तू धन्य पिंड दे हातावरि सत्वर।
शास्त्रनिष्ठ परि झिडकारुनि ते कुशास्तरण स्वीकरी।
राय परलोक०
(साकी) चित्रांगद गंधर्वाधिप त्या कपट पाटवे भारी।
सरस्वतीच्या तीरी वर्षत्रय समरमखी मारी ।।
ऐका श्री भारत वार्ता।
जी तोषद भवदा वार्ता ।।

टीप–" दोन मुलांना भीष्मांच्या स्वाधीन करून राजा शंतनु स्वर्गस्थ झाला. धर्मज्ञ अशा भीष्मांनी शंतनूचा हात जमीन भेदून वर आला असताही शास्त्राप्रमाणे कुशाग्रावरच पिंड दिला. "

सत्यवतीचा मोठा मुलगा चित्रांगदही चित्रांगद नांवाच्या गंधर्वाकडून कपटाने मारला गेला.

## पद १६ वे

जिकुनि भार्गवराम परतला कुरुकुलनलिनी रवी ।
जया दे जन्म नदी जान्हवी ॥ धृ. ॥

नगर द्वारावरी दुंदुभी नाद वदे स्वागत ।
वर्षती सर्वहि लाजाक्षत ॥
पौर म्हणति हा राहु मुखातुनि सुटला जी भास्कर।
पदी सामंत नमविती शिर ॥
राजमंदिरांतुनी भूप ये अनुज करी वंदन ।
दे तया प्रेमे आलिंगन ॥

(चाल) मग सत्यवतीते भीष्म करी वंदन ।
वदला केले मी भार्गवमद खंडन ।
ती प्रेमाश्रूंनी न्हाणी निजनंदन ।
वदली वत्सा मृत्युमुखांतुनि धर्म तुला वाचवी ।
जया दे०

---

टीप – " विचित्रवीर्य विवाहास योग्य झाला असे जाणून भीष्माचार्यांनी काशीराजाच्या तीन कन्या स्वयंवरास जाऊन जिंकून आणल्या. त्यातील मोठी जी अंबा तिचे शाल्वावर प्रेम असल्यामुळे तिला त्यांनी त्याच्याकडे सन्मानाने परत केले. मुलींना पळवून आणताना त्यांना वाटेत स्वयंवरासाठी आलेल्या राजांशी घनघोर युद्ध करावे लागले. "

(साकी) भावी न टळे अन्यथा न टाळाया कां कामरण ।
करिता भीष्म कसे त्या येते मध्यम वयांत मरण ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदा वार्ता ॥

## पद १७ वे

कालगजे मथिता नलिनीशी योजनगंधा दिसे।
तिच्या दुःखाते तुलना नसे ।। धृ. ।।
पुत्रद्वय होउनी निपुत्रिक भाग्यहीन होय ती।
पित्याची पापे तिज भोवती ।।
अत्युत्कट पुण्यपाप लोकी याच भोगणे असे।
ईश्वरी न्याया खंडन नसे ।।
तिचा शोक अनिवार, कराया सांत्वन शक्त न कुणी।
दृढव्रत काय करिल नरमणी ।।

(चाल) त्या सम्राज्ञीच्या होय मनी कंपन।
भवितव्य दिसे तिज वंशाचे दारुण।
संपला गमे कुरुवंश सुतावाचुन।
आशेचा न च किरण एकही दृष्टिपथी ते दिसे।
तिच्या दुःखाते०

---

टीप – " अंबिका व अंबालिका या दोघींशी विचित्रवीर्याचे लग्न झाले. पण दुर्दैवाचे ताट पुढे वाढून ठेवले होते. विषयलोलुपतेमुळे राजा विचित्रवीर्य मृत्युमुखी पडला. तोही अनपत्य गेल्यामुळे कुरुवंश नष्ट होणार हे भीषण भविष्य जाणून सत्यवतीला अतिशय दुःख झाले."

(साकी) धर्मे माता मी धर्मज्ञा धर्मसेतु रक्षाया।
कथिते मान्य करी स्वीकारी स्त्रीस्वधर्म रक्षाया।
ऐका श्री भारत वार्ता।
जी तोषद भवदा वार्ता ।।

## पद १८ वे

गांगेय वदे। जे प्रेमे कथिसी माते।
ते धर्माते मान्य गे सर्वथा माते ।। धृ. ।।
परि सुज्ञ कसे। सेवितील गे वमनाते।
त्यक्तस्त्री विषय। गमे तैसाचि मनाते ।।

तुजसाठी मी गे । केली घोर प्रतिज्ञा ।
ती भंगुनि कैसे । दावावे मुख सूज्ञा ॥
चंद्रमा शीत गुण । रवि तेजा सोडील ।
उष्णता दहन । सीमा सागर सोडील ॥
परि शांतनव तुझा । पुत्र आपुले शील ।
मृत्युच्या मुखांतहि । गे अभंग राखील ॥

(चाल) करितो माते तव पदी वंदन ।
होवो शीलाचा कधी भंग न ।
ते होइल या कुरुकुळा लांछन ।
गंगेसम हो तू कवच सुता या माते ।
ते धर्माते०

टीप – "पितृवंशाची व मातृवंशाची वृद्धि व्हावी म्हणून दीन, दुर्दैवी व दु:खी सत्यवती त्या वेळच्या रूढ पद्धतीला अनुसरून भीष्मांना विचित्रवीर्याच्या पत्नीच्या ठिकाणी पुत्र उत्पन्न करण्याची आज्ञा करू लागली. भीष्म आपल्या घोर प्रतिज्ञेची आठवण करून देऊन म्हणाले, 'निसर्गातील सर्व अशक्य गोष्टी शक्य होतील पण मी ब्रह्मचर्य सोडणार नाही."

(साकी) भीष्म म्हणे भ्रष्टता न शिवता मला वंशयश राहे ।
ऐसा शिष्टश्रुतिसंमत वंशार्थ उपायही आहे ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद १९ वे

बाल्यी असता पितृसदनी मी जाणे न हिताहिता ।
घडली अघटित घटना सुता ॥ धृ. ॥
यात्रीच्या तारणार्थ योजी नौकानयनी मला ।
पराशर मुनि तिथे पातला ॥
त्याते घेउनि तोयमध्यगत नौका होता मुनी ।
पाहे अनिमिष मज लोचना ।

सामर्थ्यें नीहार निर्मुनी करी कृपा मुनिवर।
"कमलगन्धा हो" दे मज वर॥
(चाल) तत्काल होय सुत कृष्ण द्वैपायन।
जन्मताच त्यातें प्राप्त होय यौवन।
बोले जाया दे आज्ञा मजलागुन।
स्मरता दर्शन देइन ऐसे वदला मज तत्त्वता।
घडली अघटित०

टीप – "एखादा विद्वान् व गुणवान् ब्राह्मण बोलावून त्याजकडून हे कार्य करून घ्यावे असे भीष्मांनी सुचविले. त्यावर सत्यवतीने एक पूर्वीची हकीकत सांगितली. श्रेष्ठ धर्मवेत्ते पराशर ऋषि यमुना नदी तरून जाण्याकरिता आले असता सत्यवतीच्या सौंदर्याने मोहित होऊन आणि स्वतःच्या प्रभावाने धुके निर्माण करून त्यांनी तिला वश केले. तिचे कन्यात्व नष्ट न होता तिला कृष्ण द्वैपायन व्यासांची प्राप्ति झाली."

(साकी) भीष्म वदे माते आवाहन करि कुमारकानीन।
शरणागत वत्सल वंशा या देइल जीवनदान॥ धृ.॥
व्यास म्हणे धर्मज्ञे आज्ञा जरि तुझी शिरोधार्या।
संवत्सर व्रत करो कथिन ते तव पुत्राच्या भार्या॥
ऐंका श्री भारत वार्ता।
जी तोषद भवदावार्ता॥
(घनाक्षरी) वदे तैं श्रीव्यास। व्यर्थ होइल सायास।
कैसे मम तेजास। सहायास शक्त ही॥

## पद २० वे

अंबिकेस तैं पाचारुनिया देवी।
सस्नेह वदे ते भावी॥ धृ.॥
तव देवर गे पुत्रदान देईल।
हे कुल अभंग राखील॥
संदिग्ध वचे परि तन्मानसपद्म।
आठवी भीष्मपदपद्म॥

ऋतुकाली ती देवव्रत चिंतूनी ।
पहुडली आपुल्या शयनी ॥
(चाल) तो दुस्सहतेजा येत ।
पाहता होय भयभीत ।
कंपित झाले तच्चित्त ।
चुकविणार ती केवि आपुले भावी ।
सस्नेह वदे०

टीप — "भीष्मांच्या अनुमतीने सत्यवतीने व्यासांना पाचारण करून इच्छितकार्य सांगितलेः व्यास कबूल करते झाले. अंबिकेला त्यांचे तेज सहन न होऊन तिने डोळे मिटून घेतले."

(साकी) व्यास म्हणे मातेच्या दोषे होइल सुत ज्यात्यंध ।
नागयुत बळ कुटिलबुद्धि राहील सदा लोभांध ॥
ऐका श्री भारतवार्ता ॥
जी तोषद भवदावार्ता ॥
(श्लोक) देवी सत्यवती विचार करुनी अंबालिकेला वदे ।
हीनांगा अधिकार गे नृपपदी श्रीवेदमाता न दे ॥
राहो पुत्र तुझा तरी नृपपदी ही एक आशा मनी ।
वत्से पूजुनिया प्रसन्न करि तू अत्युग्र तेजा मुनी ॥
(घनाक्षरी) परी तेज तपस्सदन। पाहताच म्लानवदन।
पांडु झाला वपुवर्ण । भये मनहि थरथरे ॥
(साकी) पुसता पांडुत्व कथी म्हणवुनि धरूनिया तद्धनुते ॥
माय म्हणे बा तिसरा द्यावा कल्पतरुसमूह नुते ॥
ऐका श्री भारतवार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

टीप—"सत्यवतीने मुलगा कसा होईल असे व्यासांना विचारले. मातेच्या दोषामुळे मुलगा आंधळा होईल असे त्यांनी सांगितले. हीनांगाला राज्याचा अधिकार पोचत नाही, म्हणून सत्यवतीने अंबालिकेला व्यासांची सेवा करण्याकरिता पाठविले. ती भीतीने पांढरी पडली. मुलगा आईसारखा पांडुर होईल असे व्यासांनी सांगितले. तेव्हा सत्यवतीने तिसऱ्या मुलाची मागणी केली."

## पद २१ वे

मग सत्यवती वदे स्नुषेला बाई।
मुनिकृपापात्र गे होई ॥ धृ. ॥

परि भयभीता ईश्वरास वंचाया।
सांगे दासीला जाया ॥
प्रगटताच तो मुनिभास्कर वंदूनी।
पूजिला नम्र होऊनी।
कर जोडुनि ती पूजन करि भक्तीने।
प्रार्थी विशुद्ध भावाने ॥

(चाल) सामर्थ्य पादपद्मांचे।
ऐकिले असे मी त्याचे।
तोडिताति बंध भवाचे।
यापरि दुसरे द्रुत भवमोचक नाही।
मुनिकृपापात्र ०

(साकी) मांडव्याच्या शापे झाला दासीसुत यमधर्म।
विदुर अशा नामे झाला तो सज्जनवृंदा वर्म ॥

ऐका श्री भारत वार्ता।
जी तोषद भवदावार्ता ॥

---

टीप– " सत्यवतीने पुन्हा अंबिकेला तयार केले. तिने सासूला हो म्हणून पण फसवून आपल्या दासीला पाठविले. तिला झालेला पुत्र तो विदुर होय. मांडव्य ऋषींच्या शापाने यमधर्म दासीपुत्र होऊन पृथ्वीवर आले."

(साकी) कोण्या एका नरपति नगरी चौर्य करुनि चोरांनी।
पळता आश्रम केला आश्रय, वाचावयासि रानी ॥

ऐका श्री भारत वार्ता।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद २२ वे

राजाज्ञेने शूळावरि तो दूत चढविती मुनी ।
परि न ये क्रोध अणुहि तन्मनी ॥ धृ. ॥
समाधीत योग्यांना कळता खगरूपे पातले ।
वदति हे काय दुःख पातले ॥
शासन या राजास करावे वदता बोले मुनी ।
दुःखद कर्मगती जाणुनी ॥
नृपदोष न हा कर्मगती ही शक्य नसे टाळणे ।
ऐकिती रक्षकगण बोलणे ॥
(चाल) तत्कथन ऐकता राजा थरकापला ।
द्रुत येउनि तेथे तो मुनिवर वंदिला ।
शूलाहुनि मुनिवर उतरविण्या धावला ।
शूलाग्र न परि निघे मानिती नवल तपोधन मुनी ।
परि न ये०

---

टीप– " मांडव्य ऋषि तपश्चर्या करीत असता काही चोरांनी शिपाई पाठीमागे येत असल्यामुळे धन लपविण्याकरिता त्यांच्या आश्रमाचा आश्रय केला. शिपायांनी संशयाने त्या ऋषीला राजासमोर नेले. राजाने त्यास सुळावर चढविले. ऋषीने आपल्या प्राणांचे संयमन करून सुळावरच तपश्चर्या सुरू केली. त्यांची योग्यता ओळखून राजाने पश्चात्तापपूर्वक ऋषीला खाली घेतले, पण त्यांच्या पोटातले शूलाग्र काही निघाले नाही. "

(साकी) धर्म वदे देवा कुतुकसाधनी तुच्छी ।
कां घातली सुई बाळपणी त्वा पतंगिका पुच्छी ॥
ऐका श्री भारतवार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद २३ वे

यमधर्माचे बोल ऐकुनी क्रुद्ध होय मुनिवर ।
वदे त्या कटुतर शापोत्तर ॥ धृ. ॥

न्यायान्यायाचा निर्णय कां असाच करिसी सदा।
भोगविसि जीवांना आपदा॥
अनुपनीत असता केले मी । अज्ञाने केवळ ।
तयाचे दिधले कां मज फळ ॥
अनुपनीत कृत्यांना धर्मी सदा क्षमापन असे।
तुला कां धर्मा ठाउक नसे ॥
(चाल) दिधलास उग्रतर दंड मला व्यर्थ रे।
हे धर्मासन केलेस कलंकित खरे ।
अन्यायाचरणे कोण भवार्णवि तरे ।
पदत्याग करुनी दासीचा हो सुत भूमीवर।
वदे त्या कटुतर०

---

टीप–"ह्या आत्मवेत्त्या ऋषीने यमधर्माच्या सभेत जाऊन शूलाग्र अडकून राहण्याचे कारण विचारले. लहानपणी गमतीखातर एका पतंगाच्या पुच्छाला काडी टोचल्याचे प्रायश्चित्त म्हणून ही शिक्षा भोगावी लागत असल्याचे धर्मराजाने त्यास सांगितले. अज्ञानावस्थेत घडलेल्या गोष्टीबद्दल इतका घोर दंड कां दिलास म्हणून मांडव्यांनी धर्मराजालाच शाप दिला की, तू पृथ्वीवर दासीपुत्र होऊन राहा."

(दिंडी) सुता सुंदर गांधार नरेशाची।
ऐकिले मी वरपात्र महेशाची ॥
वधू धृतराष्ट्रा मला गमे युक्त।
परी सांग तुला जे गमे युक्त ।

(साकी) धृतराष्ट्रार्थ वराया कन्या गंगापुत्रे जवन।
पाठविला गांधारपतिकडे दूतवर जसा पवन।

## पद २४ वे

हो भरतांची। भूमि शीलधनांची
खनि आदर्शांच्या। तेजस्वी रत्नांची ॥ धृ. ॥
या रत्नचयी। अनन्वयालंकार।
गांधारसुतारूपे। झाला साकार।

आपुला पिता । करी ज्याला कन्यादान ॥
कळले तिजला । आहे तो लोचनहीन ॥
अनुरूप असो । अर्धांगीपण अपुले ॥
या विचारांत । तच्चित्त सर्वथा रतले ॥

(चाल) पतिच्या न दिसें जग जरी लोचना ।
हव्यास कशास्तव हवा या मना ।
निर्विषय करिन आपुल्या लोचना ।
या भावे नेत्रा । पट्टबंध करि साची ।
खनि आदर्शाचिया ०

---

टीप –" बालपण संपवून तीनही युवराज तारुण्यदशेप्रत प्राप्त झाले. धृतराष्ट्रासाठी भीष्माचार्यांनी गांधार देशाची राजकन्या गांधारी हिची निवड केली. आपला भावी पति अंध आहे हे तिला समजले. पतिव्रता धर्मानुसार आपल्यालाही नेत्रसुख भोगण्याचा अधिकार नाही असा विचार करून त्या सतीने डोळ्याला कापडाची जाड पट्टी बांधली. "

(साकी) कुन्ती पितृसदनी कासारी पद्मिनी तशी वाढे ।
दुर्वास तेथे ये ज्याचे जाच कडु जसे काढे ॥ धृ ॥

ऐका श्री भारत वार्ता ॥
जी तोषद भवदावार्ता ।

## अंजनी गीत २५

शंकरांश दुर्वास तापसी ।
तज्जनकाच्या ये गेहासी ।
तत्पदसेवा दे कुंतीशी ।
मुदितमने भूप ॥
सेवाप्रमुदित मानस तीते ।
देता झाला मनूत्तमाते ।

बोले यज्जपमात्रे तूते ॥
इष्टद सकळ सुर ॥

---

टीप– "कुंती लहानपणी कुंतीभोजाच्या घरी राहत होती. एके दिवशी दुर्वास तेथे आले. राजाने कुंतीलाच त्यांच्या सेवेसाठी नियुक्त केले. सेवेने प्रसन्न झालेल्या दुर्वासांनी तिला एक अभिचारयुक्त मंत्र दिला व सांगितले की, तू या मंत्राने ज्या देवाचे आवाहन करशील तो देव तुला आपल्या प्रभावाने पुत्र देईल."

## पद २६ वे

पाहे कुंती रवितेजा आकाशी ।
स्फुरले तच्चिताकाशी ॥ धृ. ॥
मुनिदत्त महामंत्र परीक्षा घ्यावी ।
कौतुहलपूर्ति करावी ॥
ती भक्तीने करांजलिस जुळवोनी ।
तो लोकबन्धु आव्हानी ॥
अवरुद्ध नभी मंत्रे भास्कर झाला ।
द्रुतगती भूवरी आला ॥
(चाल) पाहताच त्या मूर्तीते ।
ये कंप तिच्या देहाते ।
करि भय स्पर्श चित्ताते ।
निरखील कसा ती बाला तेजोराशी । स्फुरले ०
(साकी) मंत्रपरीक्षार्थ बालभावे कष्ट दिले मी देवा ।
चुकले क्षमा करावी कळता क्रोध नसो भूदेवा ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जो तोषद भवदावार्ता ॥

---

टीप– "ऋषि दुर्वासांनी दिलेल्या महामंत्राची परीक्षा घेण्याकरिता बालसुलभ औत्सुक्याने कुंतीने समोर आकाशमंडलांत दिसणाऱ्या सूर्यनारायणालाच आव्हान केले. मंत्राचा प्रभाव असा विलक्षण की, भगवान् सूर्य प्रत्यक्ष तिच्यासमोर येऊन उपस्थित झाले. भीतीने कुंतीची देहलता कांपू लागली."

## पद २७ वे

वदे देव आदित्य आमुचे दर्शन अनपार्थ ।
नर्मातहि जाईल कसे गे सांग पृथे व्यर्थ ॥
भवितव्याची प्रबल प्रेरणा आदित्या होई ।
कौमार्याचा भंग न करिता पुत्ररत्न देई ॥
सहजकवचकुंडलधर रविसम तो भास्वर होता ।
भारतीय रणयज्ञाचा तो ईशदत्त होता ॥
जाता भास्कर भयमग्ना ती बाला थरथरली ।
देवगर्भ गंगेच्या पदरी रक्षणार्थ घाली ॥
(चाल) संभाळ वदे गद्‌गदस्वरे बालक ।
ती अधिरथसूता करवी तत्पालक ।
हर्षला मनी परि जगत्सूत्रचालक ।
क्षत्रनाशकर ईशाचे ते महास्त्र अनपार्थ ॥
नर्मातहि जाईल ०

---

टीप– "अज्ञानामुळे माझ्या हातून अपराध घडला तरी मला क्षमा करावी व माझे रक्षण करावे असे कुंती विनवीत असता सूर्यनारायण म्हणतो, 'कुंती, माझे दर्शन अमोघ आहे. तू होऊन मला थट्टेने बोलावले असलेस तरी ते व्यर्थ कसे जाईल? तिच्या कौमार्याचा भंग होऊ न देता सहज कवचकुंडलधारी असा पुत्र नारायणाने तिला दिला. नातलगांच्या भीतीने तिने तो गंगेत सोडला. नारायण हसले. ते भविष्य जाणत होते. भावी भारतीय रणयज्ञाचा तो अध्वर्यु ठरणार होता. क्षत्रियांचा नाश करणारे जणू काही ते अमोध अस्त्र ठरणार होते."

## पद २८ वे

तैं कन्या स्वयंवराचा । करि निश्चय पृथ्वीपाळ ॥
अवनीचे येती राजे । पातला पांडु नरपाळ ॥
कौतुकार्थ ये ऋषिसंघ । तत्पदी नमविती भाळ ॥
(चाल) नव मणिमय मंडप साजे ।
सिंहासन पंक्ति विराजे ।
द्वारी नव दुंदुभि गाजे ।
द्रुत प्रवेशती भूपाळ । पातला०

## पद २९ वे

धात्याची निर्माण कला ही यद्रूपे पूर्ण ।
कुंतिराजकन्या त्या रंगी प्रवेशली तूर्ण ।। धृ. ।।

तिला पाहता चितविहग सेन्द्रिय समीप आले।
शुभासनी पृथ्वीपाळांचे देहमात्र उरले ।।
स्वर्णमयी मौक्तिकस्त्रजा घेउनी करी कन्या ।
वाटे नारायण शोधाया उभी सिंधुकन्या ।।
प्रौढा एक सखी परिचय दे तिला नरेशाचा ।
मंद चालता उमटे मंजुळ नाद नूपुरांचा ।।

(चाल) ती दीप शिखेसम क्षण राहे ज्या स्थळी ।
त्या दिसे मुखश्री भूपाची उजळली ।
परि सरता पुढती दिसे तिथे काजळी ।
नैराश्योर्मि ताण्डवे जाहला सभासिंधु पूर्ण ।
कुंतिराजकन्या ०

---

टीप– "कुंतीचा विवाह स्वयंवराच्या पद्धतीने झाला. मणिमय स्वयंवर मंडपात आलेल्या राजमंडळात कौरवेश्वर पाण्डूही उपस्थित झाला. सर्व सद्‌गुणसंपन्न सौंदर्यवती कुंतीने हाती सुवर्णमाला घेऊन मंडपात प्रवेश केला. नारायणाला शोधण्याकरिता सागरकन्या लक्ष्मीच आली की काय असे तिथे जमलेल्यांना वाटत होते."

(साकी) यच्चरिते सुजनांच्या हृदयी सुधा शत्रुच्या शल्ये ।
सद्विज, सामात्य, सबळ भरतश्रेष्ठ पूजिला शल्ये ।।

कोणता योजुनिया काम ।
केले वदे धन्य धाम ।।

(घनाक्षरी) वदे तदा आपगेय । सुरा यद्‌गुणगण गेय ।
वदति याञ्चा हे हेय । क्षत्रियास सर्वथा ।।

## पद ३० वे

वदे तै मद्रप गांगेया ।
झालो धन्य दर्शने या ॥ धृ. ॥

तवाज्ञापालन हे कार्य ।
मानितो नित्य शिरोधार्य ।
परी वदताति सदा आर्य ।
कुलक्रम पालन अनिवार्य ।
करावी क्षमा मला आर्या ।
झालो०

अर्थविनिमय कन्यादानी ।
मानिला प्रशस्त विज्ञांनी ।
मानिती दोष जरी मानी ।
कुलक्रम आमुचा सन्मानी ।
रक्षो देशाचारा या ।
झालो ०

---

टीप–"पांडूचा दुसरा विवाह व्हावा म्हणून भीष्म मद्रपतीकडे त्याची मुलगी मागायला गेले. कन्येच्या मोबदल्यांत सुवर्णालंकार, रत्ने, मणि, मोती व इतर द्रव्य देऊन त्यांनी माद्रीचा स्वीकार केला."

## पद ३१ वें

गंगानंदन चरणरजःकण चर्चुनिया भाला ।
योजनगंधाशीर्वचकवचा विनम्र तो त्याला ॥ धृ. ॥

चरणन्यासे नरसिंहाच्या वसुंधरा हाले ।
सागरोर्मि ताण्डवानुकरणे तत्सेना चाले ॥
दुमदुमले दिक्कोन गर्जता भैरव रणभेरी ।
विपक्षीय सेनांना वाटे काळाची फेरी ॥

वैनतेयसम जवन दशार्णावरी भूप गेला ।
कार्मुकटंकारेच दशार्णाधीश शरण गेला ॥
विजयाचा दुंदुभी वाजवित मागध आव्हानी ।
प्रत्युत्तर युद्धेच दे तया मगधेश्वर मानी ॥

(चाल) रणयज्ञकुंड पेटले घोर जेधवा ।
झाला मगधेश्वर स्वये हवी तेधवा ।
घे पुण्यार्जित परिवेष तनूचा नवा ।
क्षात्रधर्म पाळुनी योग्य तो भूप धन्य झाला ।
योजनगंधाशीर्वच ०

टीप—" विवाहोत्तर सुख काही काळ अनुभवून पृथ्वी जिंकण्याच्या ईर्ष्येने महाराज पांडु स्वारीवर निघाला. निघतेवेळी सत्यवती आजी व पिता भीष्मांना त्याने वंदन केले. लुटारू दशार्णांना त्याने प्रथम लढाईत जिंकले. नंतर मगध देशाचा राजा जो दीर्घ त्याजवर चढाई करून पांडूने रणयज्ञांत त्याची आहुति दिली."

## पद ३२ वें

हे गांगेया । विजयध्वज फडकावोनी ।
येतसे पुत्र तव । कुलगौरव साधोनी ॥ धृ. ॥

दाशार्ण काशि सुह्म पुंड्र झाले करद ।
झाला धनलाभे अपर पुत्र तव धनद ॥
संग्रामी ते । देहहीन होति विदेह ।
झाले संज्ञेचे । सार्थक निस्संदेह ।
तो शस्त्रेन्धनमय । बाणौघ महाजाल ।
पाहता पांडु पावक । कंपित भूपाल ।
राज्याचे केले । वत्साने साम्राज्य ।
पावन वरदाने । अपुल्या यश हे प्राज्य ।

(चाल) हे वच त्या अमृतापरी वाटले ।
चित्तांत रम्य भाव तै दाटले ।

हर्षाश्रुबिंदु लोचनी उमटले।
देवव्रत त्या। दूतांना सन्मानी।
येतसे पुत्र तव ०

टीप– "राजा पांडूच्या विजयध्वजाची वार्ता घेऊन आलेल्या दूतांचा देवव्रत भीष्मांनी देणग्या देऊन हर्षित चित्ताने सन्मान केला. दूतांनी भीष्मांना सांगितले. 'हे राजन्, तुझ्या पुत्राने मगध राजा जिंकून व अशाच प्रकारे काशी, सुह्य व पुण्ड्र ह्यांच्यावर जय मिळविला. मिथिलेवर स्वारी करून तेथील विदेहांना देहहीन करून जणू त्यांना सार्थनामा केले. शस्त्र हे ज्याचे इंधन आहे, बाणांचे वर्षाव ह्या ज्याच्या ज्वाळा आहेत असा पांडरूप अग्नि जवळ आलेला पाहताच सर्व राजे कंपित होतात."

## पद ३२ वे

अचतुर्वदन ब्रह्मदेव वा दो हातांचा हरी।
दर्शने अघनगचय संहरी ॥
अभाललोचन नीलकण्ठ वा केवळ ज्योतिर्मय।
करी जो भवभीता निर्भय।
शाखांच्या विस्तरे स्वयंभू वेदतरू बहरवी।
सदा जो पुरुषार्थ ज्ञानवी ॥
यदृच्छया तो गांधारीच्या प्रासादी ये मुनी।
करी त्या प्रसन्न पद वंदुनी ॥
(चाल) तो अशनातीतहि वदे क्षुधा कष्ट दे।
त्वरित गे स्नुषे आतृप्ति मला अशन दे।
जणु गांधारीला वेदशीर्ष पाठ दे।
गुणातीत गुणमय मायेचा स्वीकार कसा करी।
दर्शने ०

टीप– "चार तोंडे नसलेले ब्रह्मदेवच, चार हात नसलेले जणू विष्णूच, तृतीय नेत्र नसलेले जणू शंकरच अन् ज्याच्या केवळ दर्शनाने पापांचे पर्वत जळतात असे महर्षि व्यास थकून भुकेने व्याकूळ होऊन स्वेच्छेनेच गांधारीच्या महाली आले; आणि तिला भोजन मागू लागले."

(श्लोक) हुताशापरी मत्सरे पेटुनी या
करीती हठे गर्भनिष्कासन ॥
तदा मांसपेशी पडे दीर्घ ती पा-
हुनी खिन्न झाले सतीचे मन ॥
तिचा त्याग जो ती कराया निघे तों
प्रभू धावुनी ये तपस्वी मुनी ।
तया वृत्त तो सांगता दुःखवेगे
करी रोदना स्फुंदुनी स्फुंदुनी ॥

(साकी) गांधारी सुत कृतरव परिसुनि गोमायु गृध्रकाक ।
गर्दभ अन्य कुलक्षण देती स्वयंस्फूर्त पशुहाक ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ।

## पद ३४ वे

गांगेया जोडुनि पाणी । प्रज्ञाचक्षु वदे वाणी ।
घटना जी भैरव होय । ती करी कंपित मम काय ।
ती वाराया सदुपाय । आगमविहित असे काय ।
करी दुःखे रोदन राणी । प्रज्ञाचक्षु ०

टीप – "व्यास ऋषींना प्रसन्न करून गांधारीने शंभर पुत्रांचा वर मागून घेतला. पुढे ती गर्भवती असता दोन वर्षे तो गर्भ प्रसव न होता तिच्या उदरी राहिला. कुंतीला सुंदर मुलगा झाल्याचे ऐकून दुःखाने तिने आपला गर्भ पाडला. तो घट्ट मांसाचा गोळा ती टाकून देणार तोच व्यास धावून आले. त्यांनी खटपटीने त्या मांसपेशीचे काही काळ संरक्षण करवून घेतले. पहिला जन्म दुर्योधनाचा झाला. जन्मताच तो गाढवासारखा आवाज करून रडला. त्याबरोबर गाढवे, गिधाडे, कोल्हे, कावळे सर्वच ओरडू लागले. धृतराष्ट्र व गांधारी दोघेही मिळून भीष्मांना ह्या-वरील उपाय विचारू लागले."

## पद ३५ वें

तो मृगयेच्या व्यसनाधीन नृपाळ।
न च जाणे सांजसकाळ ॥ धृ.॥
पशुमारण हा एक होय तद्धर्म।
ओढवले प्राक्तन कर्म ॥
प्रणयासक्ता मृगयुग्मा देखोनी।
विंधिले मृगाते बाणी ॥
प्रगटले तदा तेथ महदाश्चर्य।
संमूढ होय नृपवर्य ॥

(चाल) ते मृगशरीर जाऊनी।
प्रगटला महर्षी कोणी।
ज्याते नृप विंधी बाणी।
ब्रह्मण्यहि तो झाला मुनिजन काळ।
न च जाणे०

---

टीप—"वनविहारांत दंग असलेल्या पांडूला मृगयेचे जणू काही व्यसनच लागले. त्या व्यसनासक्त स्थितीत त्याच्या हातून विहारात दंग असलेल्या मृगरूप एका ऋषीची हत्या घडली. प्राण सोडताना ऋषीने पांडूला शाप दिला. 'माझ्या' ऐन विहरणात तू मला ठार मारलेस. विहाराच्या इच्छेने स्त्रीजवळ गेलास की तत्काळ तुझे मरण ओढवेल."

## पद ३६ वें

वैराग्याचा निश्चय करुनी संयम शिकवी मना।
स्वीकरी भूप तपोजीवना ॥ धृ. ॥
निवर्तावया वदता देती उत्तर जाया तया।
सतीचा धर्म तरी कासया ॥
प्राणाविण तनु सरोवर जसे शून्य जीवनाविण।
तेवि पतिविण नारीजीवन ॥

राजोचित आभूषण वस्त्रे परिजनांत विखरुनी ।
तयांना नगरी दे धाडुनी ॥

(चाल) तो राजर्षी मग जाय गंधमादना ॥
उरला होता अणु मात्र मनोन्मादना ।
वैराग्ये झाला मान्य तपस्वी जना ।
वृत्त ऐकता गांगेयाच्या अश्रु येती लोचना ।
स्वीकरी भूप ०

---

टीप —"शापित अवस्थेत वनांत राहून तपस्व्याचे जीवन कंठण्याचा निश्चय पांडूने केला. दोन्ही स्त्रियांना राज्यांत परत जाण्यास त्याने सांगितले. परंतु इंद्रियांवर विजय संपादन करून व कामसुखाचा परित्याग करून स्वर्गातही पतिलोकाची प्राप्ति व्हावी म्हणून त्या दोघीही त्याच्या तपस्येत सामील झाल्या."

(श्लोक) पितामह सभेप्रती निघति तापसी जावया ।
परी न शकले सवे नृपति पांडुतें न्यावया ।
अपुत्र न च शक्त ते वदति स्वर्ग लंघावया ।
प्रयत्न करि हे नृपा त्वरित पुत्र लाभावया ॥

## पद ३७ व

दीर्घतम्याची दिव्यकथा कथुनिया वदे नरपती ।
अलोकी साध्वी कुंतीप्रती ॥ धृ. ॥

आगम संकेतानुरूप गे सफल काम मज करी ।
पुत्र या संसारार्णवि तरी ॥
नकार बहुवार देऊनिही ती पाळी पतिशासना ॥
वदे निजमुनि मंत्रोपासना ॥
भूपाज्ञेने मंत्रे ती करि धर्मा आवाहन ।
करूनिया पवित्र निज तनुमन ॥

(चाल) ते तेजाची अति दीप्त प्रभा फाकली ।
मग धर्ममूर्ति लोचना दिसू लागली ।
परम श्रद्धेने कुंतीने वंदिली ।
सस्मित सानुग्रह वदले तै मूर्त धर्म तिजप्रती ।
अलोकी ०

---

टीप—"पुत्रवन्त नसल्यामुळे आपण ब्रह्मलोकात जाऊ शकत नाही, ह्या विचाराने दु:खी होऊन पंडूने कुंतीची विनवणी केली. आगम संकेतानुरूप पुत्रोत्पत्ति करण्याविषयी तो तिची प्रार्थना करू लागला. कुंती स्वत:ला ऋषीकडून मिळालेल्या मंत्राची कल्पना देऊन पांडूच्या आज्ञेने भगवान् यमधर्मराजांना पुत्रप्राप्तीसाठी आवाहन करती झाली.

## पद ३८ वे

मग विश्वाचे बाहे जीवनसूत्र ।
व्हावया तत्कृपापात्र ॥ धृ. ॥

प्रगटले तदा मृगारूढ श्रीपवन ।
प्राणने करिति जे अवन ।
सुस्मित प्रभा इतस्तता उधळीत ।
बोलिले अनुग्रहभरित ॥
दुर्वासांचा केवि करू सन्मान ।
तुज काय हवे वरदान ।

(चाल) द्या वदे मला सन्तान ।
जे सर्वाधिक बलवान ।
या जगी अदेय सन्ता न ।
ज्यापुढे बळी होतील त्रापापात्र ।
व्हावया ०

(साकी) अंकी असता भीम जननिच्या व्याघ्र गर्जना झाली ।
देहभान विसरली निजस्थानाहुनि कुंती ढळली ॥

अंकावरूनी पडे भीमतनु शिलोच्चयावरि तूर्ण ।
वज्रसम स्पर्शें झाले त्या चंड शिलेचे चूर्ण ।
ऐका श्रीभारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

टीप—" भगवान् यमधर्मांच्या कृपाप्रसादाने कुंतीला धर्मनिष्ठ युधिष्ठिरांची प्राप्ति झाली. मग तिने वायुदेवतेला आवाहन केले व त्यांच्याजवळ अधिक बलवान् अशा पुत्राची मागणी केली. त्यांच्या कृपेचे फळ म्हणून भीम जन्मले.

(श्लोक) करी तप विशुद्ध धी नृपति एक संवत्सर ।
सुरेन्द्र कुल पर्वती वरद द्यावया ये वर ॥
वदे नरपते तुझी सफळ व्हावया कामना ।
सुरद्रुमपति स्वये वरद, बा करी याचना ॥

(साकी) पुत्र आपणापरी प्रभावी त्रिजगदेक कोदंडी ।
द्यावा जो लीलेने रिपुमद महाद्रिपक्षा खंडी ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद ३९ वे

आकाशगिरा । वदली भूपा गुणधामा
हा पार्थ जाण । बलपौरुष विक्रम सीमा ॥ धृ.॥

एकाकी तर्पिल । त्रिजगत्पावन दहना ।
शरवृंदे भंगुनि या । वृंदारक पृतना ॥
होईल पुत्र तव । त्रिजगदेक कोदंडी ।
लीलया देवगंधर्व । विक्रमा खंडी ॥
कालांतक रुद्रा । पाहिल हा निज नयने ।
संतृप्त करिल । देवा नि युद्ध लीलेने ॥
सावळे परब्रह्म । जे जगाचे प्राण ।
मानील तुझ्या । पुत्रास बहिश्चर प्राण ॥

तव बाइ पृथे । राजहंस सुत कीर्तीचा ।
एकेचि पदन्यासे । जेता स्वर्गाचा ॥

(चाल) नमितील प्रथम भक्त जे ईश्वरा ।
नति दुजी तुझ्या गे पृथे लेकरा ।
संकेत होय भारती हा खरा ।
तुंगत्वाची तव । वंशाच्या ही सीमा ।
हा पार्थ जाण ०

---

टीप – "देवाधिदेव इंद्रापासून कुंतीला महापराक्रमी अर्जुनाची प्राप्ति झाली."

(घनाक्षरी) पुत्र कुंतीला तीन । आणि मी भाग्ये हीन ।
कसे जीवन रसहीन । सत्त्वहीन घालवू ? ॥
पृथा भगिनी अत्युदार । दयेला न तिच्या पार ।
स्वसा जीवन कासार । सारहीन करील का । ?

(साकी) माद्रीच्या करुणावचने तैं पृथाहृदय विरघळले ।
मंत्रमेघ तैं मोदामृत सद्वृष्टि कराया वळले ॥
करीनास त्या आव्हान ।
सुंदर सुत होती दोन ॥

(घनाक्षरी) जरी कामजयी भूप । बघुनि माद्रीचे रूप ।
तप्त करी मदनताप । घोर शाप विसरला ॥

---

टीप – " कुंतीला तीन पुत्र झालेले पाहून आपल्यालाही पुत्र असावा असे माद्रीला वाटणे साहजिक होते, कुंतीने हर्षाने तिला मंत्र दिला. अश्विनीकुमारांच्या पासून तिला जुळी मुलें झाली. "

परंतु पुढे दुर्दैवाचे ताट वाढून ठेवले होते.

## पद ४० वे

सुखकवचाच्या आंत दुःखविष भरले ।
नृपदैव हेच अनुसरले ॥ धृ. ॥
मृत्युचेच ते गाढालिंगन ठरले ।
जे प्रियामिषा अनुसरले ॥

सहगमन करी तै मद्राधिप कन्या ।
गति नैव सतीला अन्या ॥
त्या बालांचे कवच होय तैं कुंती ।
तिज शरण वनी मुनी होती ॥
(चाल) गेला तत्प्राणाधार ।
यापुढे गाढ अंधार ।
हो आश्रय विश्वाधार ।
संकटी सदा संत जया अनुसरले ।
नृपदैव हेच ०

टीप — " माद्रीच्या सौन्दर्याने मोहित होऊन व दुर्दैवाने मनोवृत्ति स्वाधीन न राहून एकांतात पांडूने विहरणाच्या इच्छेने तिला स्पर्श करताच तो गतप्राण झाला. माद्री सती गेली व पांच मुलांना घेऊन कुंती राजधानीत परतली."

(साकी) द्या आज्ञा सुकृते तुमच्या मी पुण्यगतिस जाईन ।
बाई दया न सोडा स्वर्गी त्वद्गुणगण गाईन ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता

(साकी) व्यास कथी मातेला कुरुकुळि जे विनाशकर भावी ।
धाडी तपोवनीं की स्वर्गी तप करोनि शोभावी ॥
गेल्या उत्तम लोकाप्रति त्या धरुनि कास योगाची ।
पडली गळा समृद्धि तयांच्या दिव्य मोद भोगाची ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद ४१ वे

मत्सरेंधने अधसुतांची सद्बुद्धि जाळिली ।
विनाशक बुद्धि कवटाळिली ॥ धृ. ॥

केलिपरिभवे क्रुद्ध करी तो भीमविनाशा पण ।
योजी साधनही दारुण ॥

जलकेलीस्तव प्रमाण कोटी तीर्थाप्रति जावया ।
सजला पांडुसुता न्यावया ॥
प्रेमे वंचक साग्रह भीमा दे विषान्न दारुण ।
परी त्या जगदीश्वर तारण ॥

(चाल) त्या गरलाने तो देहभान विसरला ।
वल्लरी बंधने तो भीमदेह बांधिला ।
वंचके स्वर्नदीजलांत तो लोटिला ।
परी ईश्वरे भीमतनू ती सलिली प्रतिपाळिली ।
विनाशक बुद्धि ०

टीप – "कुरुकुळाचे भयानक आणि विनाशकारी भविष्य सांगून व्यासांनी सत्यवती, अंबिका व अंबालिका यांना तपस्येकरिता वनांत पाठविले. एकशेपांचही मुले एकत्र खेळत असता पराक्रमी भीमाचे लोकोत्तर सामर्थ्य लक्षांत घेऊन धृतराष्ट्र-पुत्र पांडवांचा द्वेष करू लागले. दुर्योधनाने जलक्रीडेचे आमिष दाखवून भीमाला विष घालून नदीत लोटून दिले."

## पद ४२ वे

जगत्सूत्रचालक परमात्मा जया करी रक्षण ।
तयाचे कोण करिल मारण ॥ ध्रु. ॥

जलगत भीमतनू आदळली सर्पनिवास स्थली ।
करी ते सुदंश मर्मस्थली ॥
दंशे त्या विषबाधा जाउनि सावध झाला बळी ।
सुपर्णासम नागा निर्दळी ॥
क्रोधे ये वासुकी पहाया तन्मंत्री आर्यक ।
होय तो भीम-दुःख मोचक ॥

(चाल) तो मातामह भीमाचा कवळी तया ।
नागराजही दे अमृत तया प्यावया ।
की बाधो ना विष अत्युल्बणही तया ।

मृत्युदेवता झाली त्याचे दैवे संरक्षण ।
तयाचे कोण ०

---

टीप--"मृत्युदेवताच भीमाचे संरक्षण करती झाली. वेलींच्या पाशाने बांधून जलप्रवाहात फेकला गेलेला भीम नागलोकांत बेशुद्धावस्थेतच पोहोचला. मोठ्या मोठ्या विषारी नागांनी त्याला दंश केला. विषावर विषाचाच उतारा मिळून भीम निर्विष झाला. सावध झाला. नागराज वासुकीचा नातू शूरशेन व त्याचा नातू भीमसेन असे ते नाते जाणून वासुकीने त्याला अमृतकुंड प्यायला दिले.

(साकी) चिंताकुल जननी पद वंदुनि वदे युधिष्ठिर मातें ।
भीम काय आला सदनी । दिसला न शोधिता माते ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदादार्ता ॥

## पद ४३ वे

वचन वज्रपाते त्या सतिचे मन कंपित झाले ।
पुत्राकरवी निजभवनी तै विदुरा आणविले ॥ ध्रु. ॥

वृत्त सांगुनी वदे काय लक्षुनिया राज्यासन ।
कूट राजनीतिज्ञ टाकिती पाश आजपासून ॥
तुझ्याच मी पदरात टाकिते बंधूंचे बालक ।
आजपासूनी विदुरा आपण यांचे प्रतिपालक ॥

क्षत्ता वदला सावध देवी मौन वरुनिया रहा ।
अधिक गुप्त होईल अन्यथा दुष्टांचा वार हा ॥

(चाल) तो अष्टम दिवशी भीमसेन पातला ।
तच्चित्तनभी जणु मोदमेघ प्रगटला ।

अत्यद्‌भुत तद्‌भाग्योदय आकर्णिला ।
परमेशाचे कृपादान तें देवीने मानिले ।
पुत्राकरवी निजहृदयी ०

टीप– " क्रीडा व विहार करून परतल्यावर धर्मराज कुंतीपाशी भीमाची चौकशी करू लागले. तेव्हा ती अत्यंत दु:खित झाली. विदुरांना बोलावून त्यांना तिने सर्व वृत्त सांगितले व मुलांचा संभाळ करण्याची विनंती केली. " मौनानं राहून सावध राहिल्यास हे दिवस जाऊन सुखाचा काळ येईल अशी आशा विदुरांनी प्रगट केली.

(साकी) स्वात्युदके शुक्तिपुटी होते जन्म जेवि मोत्याचें।
मखपात्री संभव हो तैसा द्रोण नाम हो त्याचे ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद ४४ वे

शशांक रेखेपरी मित्रता वर्धमान प्रतिदिनी ।
देत उत्साह छात्रजीवनी ॥ धृ. ॥

निज प्रतिभेचे साह्य द्रोण दे नित्य नराधिपसुता ।
जपला व्हायास्तव तद्धिता ॥
भूपनंदना वाटे व्हावे उतराई आपण ।
करावे सर्व तया अर्पण ।
एकांती गाठुनि द्रोणाते घेउनि हाती कर ।
वदे तो पांचाल नरेश्वर ॥

(चाल) होईन भूप मी विप्रवरा जेधवा ।
अर्पीन राज्य अर्धाधिक तुज तेधवा ।
बोलतो ठेउनी साक्षी गिरिजाधवा ।

टंकित झाले द्रोण मुनीच्या मित्रवाक्य ते मनी ।
देत उत्साह ०

---

टीप–" ऋषि भरद्वाज स्नानाला गंगातीरी गेले असता घृताची नांवाच्या अप्सरेला पाहून विरघळले. त्यांनी आपले वीर्य एका द्रोणात धरून ठेवले. त्याच पात्रामध्ये त्याला द्रोण नांवाचा मुलगा झाला. पांचाल देशाचा राजकुमार द्रुपद हा विद्यार्थी जीवनांत द्रोणांचा मित्र होता. मी राजा झालो म्हणजे तुला माझे अर्धे राज्य देईन असे तो बोलला होता.

(साकी) मूर्त धनुर्वेदसम दिव्यास्त्रज्ञ नीतिशास्त्रज्ञ ।
भुजप्रतापे करि जो अगणित सांग रण महायज्ञ ।।
परिसुनि जाय द्रोण महेन्द्राचळी तया भेटाया ।
चिंतुनी सत्पुरुषांचे दर्शन जाते न कधी वाया ।।

ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ।।

(साकी) भारद्वाज म्हणे इच्छितसे मी अनंतधन दात्या ।
आकर्णित होतो नित्य प्रभु लाजविती धनदा त्या ।।
सरहस्यव्रत अस्त्रें दिधलीं पढविला धनुर्वेद ।
केला स्वरूप छात्रे परिभक्त्यर्थ उरविला भेद ।

ऐका श्री भारतवार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ।।

---

टीप–" सर्वशास्त्रवेत्ते, महापराक्रमी, इंद्रियनिग्रही असे भृगुपुत्र परशुराम आपली सर्व संपत्ति ब्राह्मणांना दान करीत आहेत असें ऐकून द्रोणाचार्य त्यांना भेटण्याकरिता महेंद्र पर्वतावर गेले. द्रोण धनाच्या आशेने गेले होते. पण सुवर्ण आणि इतर संपत्ति दान देऊन संपली होती, म्हणून सर्व अस्त्रे व मंत्रानुष्ठानाचे रहस्य यथास्थित सांगून सर्व धनुर्वेद रामांनी द्रोणांना दिला.

## पद ४५ वे

कशी महंता पिशाचिनीची बाधा जन नाचवी ।
विडम्बी द्रुपदासमही कवी ॥ धृ. ॥

किरीट कोटि स्पर्श वंदना उचित चरण लाभता ।
तयाते झाला झिडकारिता ॥
वैभवमद्ये भान हरपुनी उपहासाते करी ।
आपुला विनाशपथ स्वीकरी ॥
वदे ' मलिन निष्कांचन याचक नरपाळाचा सखा ।
केवि बा बक हंसाचा सखा ॥
वर्णसाम्य कोकिल सख्यत्वाकारण का वायसा' ।
शीघ्र जा येथुनि नरवायसा' ॥
(चाल) ते शब्द हलाहल पीडा दे अंतरी ।
परि श्री शंभूसम पचवी निज अंतरी ।
सर्वथा द्रोण मुनि मौनव्रत स्वीकरी ।
परी मौन ते पंचालांचा भाग्यरवी लोपवी ।
विडम्बी०

---

टीप—" दारिद्र्याला कंटाळून महापराक्रमी द्रोणाचार्य राजा द्रुपदाकडे येऊन आपल्या मैत्रीची व पूर्वीच्या वचनाची राजाला आठवण देते झाले. तो उन्मत्त राजा मात्र त्यांचा उपहास करू लागला. द्रोणाचार्यांचे चित्त व्यथित झाले. पण त्या वेळी त्यांनी मौन स्वीकारले."

## पद ४६ वे

मग ऐषीकास्त्रे वीटा । करि आकर्षण गुरुराय ।
शरपाते मुद्रा येता । झाले ते पुलकितकाय ॥
आश्चर्यमुग्ध नृपपुत्र । पुसती त्या वंदुनि पाय ।
कोणते ग्राम कुलगोत्र । अभिधान आपुले काय ॥

(चाल) तो वदे कथावृत्ताते।
जाउनी आपगेयाते।
तो एक जाणता माते।
शंभूसम या विश्वांत। तो विद्यानिधि कुरुराय॥
(साकी) बाळमुखे कळता भीष्म म्हणे 'परशुराम की द्रोण।
आला असेल भाग्ये लोकी तिसरा यापरि कोण'।
ऐका श्री भारता वार्ता।
जी तोषद भवदावार्ता।

---

टीप– " राजा द्रुपदाकडून अवमानित झालेले द्रोण हस्तिनापुरात आले. एकदा खेळता खेळता राजपुत्रांची विटी विहिरींत पडली. कुणालाच ती काढता येईना. द्रोणाचार्यांनी ती ऐषीकास्त्राने काढून दिली. तसेच बाणाच्या साह्याने अंगठी पण काढली. आश्चर्यचकित होऊन सर्व कुमार हा चमत्कार पितामहांना सांगते झाले, त्यांनी हे द्रोण आहेत असे ओळखले,

(साकी) स्मरले स्वसख द्रुपदवचन मज म्हणोनिया मग राहो।
यत्नांतर करुनि असा निश्चय गेलो तन्नगरा हो॥
भीष्म म्हणे राज्य तुझे यत्प्राप्त्यर्थ देव नवसावे।
ते कुरु भाग्ये आले त्वत्पद क्षणहि दूर न वसावे॥
ऐका श्री भारत वार्ता।
जी तोषद भवदावार्ता॥
(घनाक्षरी) वदे कोणीहि न वचन। तदा शोण करुनि नयन।
वदे क्षत्रिय अभिधान। कां न त्यजितसा तुम्ही॥
तदा सद्गुरुचे पाय। धरुनि इंद्राचा तनय।
वदे जाइल जरि काय। कार्य करिन आपुले॥
वदे स्पर्शुनि गुरु गात्र। धनुर्वेदा तू पात्र।
तुझ्या सन्मुख हे क्षात्र। त्रपापात्र निश्चये॥

---

टीप— " भीष्मांनी द्रोणांकडे जाऊन हस्तिनापुरी येण्याचे कारण विचारले. द्रोणांनी द्रुपदकथा सांगितली. नवसाने ज्यांची प्राप्ति अशक्य ते द्रोण होऊन घरी चालत आलेले पाहून भीष्मांनी प्रतिष्ठेने त्यांना ठेवून घेतले. कुमारांना अस्त्रविद्या शिकविण्यासाठी त्यांची नियुक्ति केली. अस्त्रविद्या मी शिकविल्यावर माझे एक काम कराल ? द्रोणांनी मुलांना विचारले, सर्वांनी खाली माना घातल्या. पण द्रोणांना वंदन करून फक्त अर्जुनाने प्रतिज्ञा केली.

## पद ४७ वे

गूढास्त्रे पुत्रास द्यावया कपट करी गुरुवर ।
लोभे पतन पावती वर ॥ धृ. ॥
कमंडलू देउनी सूक्ष्ममुख जलार्थ जाया वदे ।
भव्यमुख पात्र निजसुतास दे ॥
सूक्ष्मबुद्धि वारुणास्त्र योगे पात्र भरुनि तत्त्वता ।
पार्थ मागे टाकी गुरुसुता ॥
प्रसन्न होउनि रहस्यविद्या पार्था दे सद्गुरु ।
की तो पदनतजन सुरतरू ॥
सूपा आज्ञा दे विझवी तू दीप यदा अर्जुन ।
कराया सिद्ध होय भोजन ॥

(चाल) त्या तमी न चुकता करिता ते भोजन ।
करि गूढार्थाचा विचार तो अर्जुन ।
तो ज्ञानशलाका करी प्रकाशित मन ।
शर मोक्षाभ्यासे अंधारी शब्दवेध मजवर ।
साधिता येइल की सत्वर ।

(साकी) वत्सा पार्था करिन तुला मी त्रिजगदेक कोदंडी ।
गर्वोद्धत रिपुमद लीलेने समरमखी तू खंडी ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जो तोषद भवदावार्ता ॥

---

टीप—"इतर शिष्यांपेक्षा आपल्या मुलाला जास्त शिकविता यावे म्हणून पाण्यास जातांना अश्वत्थाम्याला मोठ्या तोंडाचे भांडे आचार्य देत. अर्जुन ते ओळखून वारुणास्त्राने कमंडलु भरी. एकदा जेवतांना दिवा विझवून आचार्यांनी परीक्षा घेतली. तेव्हा दृढ अभ्यासाने अंधारांत देखील शरसंधान चुकणार नाही हे समजून अर्जुन रात्रीसुद्धा व्यासंग करू लागला."

(साकी) वनांत मृण्मय गुरुमूर्ति करी धरुनि भाव साराधी ।
ताराधीश चकोरन्याये साधु त्यासि आराधी ॥

ऐका श्री भारत वार्ता।
जी तोषद भवदावार्ता ॥

(दिंडी) वनी मृगयेस्तव जाति कौरवेय।
शशग्रहणा सोडिला सारमेय।
अशुचि तन्नादे त्रस्त एकलव्य।
दावि विद्याबलस्वीय अप्रमेय।

(साकी) क्षत तिळहि न होता शर भरिले श्वमुखि पाहुनी पार्थ।
वदती विस्मित अनुभविला हो आज धनुर्वेदार्थ ॥
ऐका श्री भारत वार्ता।
जी तोषद भवदावार्ता ॥

---

टीप– "व्याध राजपुत्र एकलव्य आचार्यांच्याजवळ शिकण्याच्या इच्छेने आला. व्याध म्हणूनच आचार्यांनी त्याला शिकविण्याचे नाकारले. त्याने मातीची द्रोणमूर्ति करून गुरुभावनेने तिच्यासमोर एकनिष्ठपणे बाण मारण्याचा अभ्यास केला. एकदा एक कुत्रा कर्कश ओरडत होता. एकलव्याने त्याचे ओरडणे कुठल्याही प्रकारची पीडा किंवा इजा होऊ न देता सात बाणांत बंद केले.

## पद ४८ वे

ही भरतांची। भूमी शीलधनाची।
खनि आदर्शाच्या। तेजस्वी रत्नांची ॥
त्या रत्नचयी। अनन्वयालंकार।
शिष्यत्वाचा। हा एकलव्य साकार ॥
आकर्णुनिया ते। वृत्त एकलव्याचे।
शिष्यांना द्याया। पाठ एकनिष्ठेचे ॥
त्या वनांतरी। द्रुतगती सद्गुरू येई।
तत्पदी निशादाधिपसुत ठेवी डोई ॥
श्रीद्रोण वदे। आचार्य दक्षिणा देई।
तव उपासना बा। त्याविण निष्फळ होई ॥

(चाल) निज शीर्ष द्यावया वदे सिद्ध मी।
ध्यायास ते न गुरु वदे दैत्य मी।
अंगुष्ठमात्र अर्पणे तुष्ट मी।
संधानकला। तन्मिषे समर्पुनि साची।
पूजा बांधी तै। निज सद्‌गुरुचरणांची ॥

---

टीप– "एकलव्याचे शरसंधानकलेतील आश्चर्यकारक कौशल्य पाहून तो अर्जुनापेक्षा श्रेष्ठ धनुर्धारी होईल अशी आचार्यांना भीति वाटली. त्यांनी गुरुदक्षिणेच्या मिषाने त्याच्या उजव्या हाताचा अंगठा तोडून मागितला. एकलव्याने तो चरणी समर्पण करून गुरुपूजा बांधली. धन्य तो शिष्योत्तम !"

(साकी) झाले कुतुक फळांचे धर्मादिक सुयोधन गदाते।
ये घेउनि बळराशि वृकोदर दुर्योधनहि गदा ते ॥
दावी दुर्योधनहि गदेचा त्यासमान परिवेष।
रविमण्डलमध्यग हरिसम ते दिसति भिन्न जरि वेष ॥
ऐका श्री भारत वार्ता।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद ४९ वे

आचार्य वदे। तो विद्याचंद्रचकोर।
यद्रूपे मम। विद्याच होय साकार ॥
रंगी यावा तो। विष्णूसम मम जिष्णू।
होईल यद्‌गुणे। कुलगौरव वर्धिष्णू ॥
विनये आला तै। धनुर्वेदसा पार्थ।
सद्‌गुरुकृतगुणवर्णन करण्यास्तव सार्थ ॥
लीलेने भेदी। सूक्ष्म कठिण चल लक्ष्ये।
गंगासुतही डोलवी शीर्ष तद्‌दाक्ष्ये।
(चाल) पार्थास्त्र चमत्कृतिरसी रंगले।
भीष्मादि देहभानही विसरले।
ज्या घोषमयचि विश्व ते भासले।

अस्त्रमेघ तो । वाहवीत विस्मयपूर ।
करि नृत्य मुदे । ज्ञात्यांचा मानसमोर ॥

टीप– " सर्व राजकुमारांची विद्या घेणे सपले असल्याची जाणीव द्रोणांनी धृतराष्ट्राला दिली. राजाने आपल्या मुलांचे कौशल्य व कौतुक पाहण्याकरिता रंग-भूमि तयार केली. सर्व पराक्रमी राजपुत्रांनी शस्त्रास्त्रविद्येतील अपूर्व करामत करून दाखविली. मस्त हत्तीप्रमाणे दिसणारे दुर्योधन व भीम गदायुद्धाचे प्रात्यक्षिक दाखविण्याकरिता व अर्जुन अस्त्रविद्येतील कौशल्य दाखविण्याकरिता आला. "

## पद ५० वे

रणभेरीपरि तलताडित तो बाहुशब्द उमटता ।
रंगद्वाराकडे लागले जनलोचन तत्त्वता ॥ धृ. ॥
सिंहचरणविन्यास तो दिसे कमलायत लोचन ।
वाटे रविचे तेज प्रगटले नरशरीर घेऊन ॥
स्वात्युदके शुक्तिपुटी जैसे जन्म मौक्तिकाचे ।
नरमौक्तिक रवितेजे ये हे कुंत्युदरी साचे ॥
सहज कवच कुंडलधर तो द्रोणाचार्या वंदुनी ।
दर्पाहिंकृति पूर्ण वदे पार्थाते संबोधुनी ॥
वृथा तुला अस्त्रज्ञानाचा गर्व पृथानंदना ।
या रंगी पातलो तुझ्या मी विद्यामदखंडना ॥

(चाल)ते ऐकताच आचार्य बोलिले तया ।
हा उगाच येथे शब्दव्यय कासया ।
शूरांच्या रंगी स्थान नसे बा तया ।
घे कार्मुक ये रंगी दावी विद्याबल तत्त्वता ।
रंगद्वाराकडे लागले ०

टीप–"अर्जुन द्रोणांच्या आज्ञेनुसार आपले शस्त्रास्त्रविद्येतील कौशल्य दाखवीत असतानाच रंगमंडपाच्या दाराकडून दंड थोपटल्याचा आवाज येऊ लागला. मागोमाग कवचकुंडलधारी कर्ण रंगभूमीवर येऊन धडकला व अर्जुनाला म्हणाला, ' गर्व होऊ देऊ नकोस. तुझ्यापेक्षा जास्त करामत मी करून दाखवू शकतो. ' द्रोणांनी त्याला बडबड न करता रंगमंडपांत येण्यास आव्हान दिले. "

(साकी) कर्ण म्हणे आहे एक मनी काम तो करी पूर्ण ।
वाटे मज तिसऱ्या पार्थासी द्वंद्वयुद्ध हो तूर्ण ।।
कर्ण म्हणे काय तुझे येथे रंग सर्व सामान्य ।
गुरु समक्ष उडविन शिर वदता बाण हे न सामान्य ।।
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ।।

## अंजनी गीत ५१ वे

रणकोलाहल नाद ऐकुनी । स्त्रिया पाहती गवाक्षातुनी ।
पांडु चक्रवर्तीची राणी । त्या स्थानी होती ।
सहज कवच कुंडलधर कर्ण । पाहताच थिजली परिपूर्ण ।
तो नारायण प्रसाद तूर्ण । स्मरणपथी आला ।।
अज्ञाने ते सहोदरद्वय । प्रवर्तले द्वंद्वास्तव निर्भय ।
वाटे परि जननीहृदया भय । व्याकुळले चित्त ।।
नेत्रापुढती ये अंधारी । भरला कंप असीम शरीरी ।
वदे संकटी तूच तमारी । तारी ही दीना ।।

टीप– "कर्णानेही आपले सर्व कौशल्य दाखविले. ते पाहून दुर्योधनाने अत्यानंदाने कर्णाला आलिंगन देऊन त्याच्याशी सख्य जोडले. कर्णाने अर्जुनाशी द्वंद्वयुद्ध करण्याची इच्छा प्रकट केली. आचार्यांच्या आज्ञेने द्वंद्वाला सुरवात झाली. आपण सहोदर आहोत हे माहीत नसल्यामुळे कर्णार्जुन युद्धाला प्रवृत्त झालेले पाहून माता कुंती व्याकूळ झाली व तिला मूर्च्छा आली.

## पद ५२ वे

नवयौवनपुष्प जो समर्पी जनकाच्या चरणी ।
त्या वंशाचा कुलदीपक हा आव्हानी तुज रणी ।।
वीणा गुणगणनही टाकुनी यद् गुणगणगायनी ।
रंगे श्रीशारदा असे वंशी बा नरमणी ।

भारत या राष्ट्राचे अभिधान जयाच्या गुणे ।
ज्याच्या विक्रमसूर्यापुढती सूर्य तेजही उणे ॥
श्री नारायण चरणसंभवा देवी मंदाकिनी ।
नामे अधमाधम अघभंजन करिते जो सुरधुनी ॥
वृंदारक गणनुता चराचर वंद्यपदा जान्हवी ।
दग्धकाम परमेश्वर ही जी निजशीर्षी वाहवी ।
तीही यद्‍गुणलब्धा सोडुनि स्वर्ग रमे या स्थली ।
राणी होउनि ज्याची झाला नरपति तो या कुली ॥
(चाल) जाणसी काय या भार्गवमदखंडना ।
सुरमुनि करिती यच्छीले पदवंदना ।
तुलनाच नसे या देवनदीनंदना ॥
झाला भारतचक्रवर्ति जो अरि खंडुनिया रणी ।
त्याचा नंदन कुलदीपक हा बाहतसे तुज रणी ॥

---

टीप—"कर्णार्जुन युद्धाला सज्ज झाले असता कृपाचार्य कर्णाला म्हणाले, कर्णा, गंगापति शंतनु, गंगापुत्र भीष्म, वीर पंडु अशा नरमणींनी भूषित केलेल्या कुळांत अर्जुनाचा जन्म झाला आहे. तूही आपले मातापिता व कुळगोत्र सांग. कारण नांव घेण्यासारखी जातकुळी ज्यांचा नाही, अशांशी राजपुत्र युद्ध करीत नसतात."

(साकी) दुर्योधन बोले जरि द्वंद्वी युक्त पदचि रायाचे ।
देतो वीराग्रगण्य कर्णा राज अंगदेशाचे ।
ऐका श्री भारतवार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद ५३ वे

शुभ्रत्वे राजहंससंघी बका स्थान लाभता ।
घोर उन्माद चढे तत्त्वता ॥ धृ. ॥
नीरक्षीर विवेकी त्याची परि संपे हंसता ।
पावे विश्वी उपहास्यता ॥

अधम सारथीपुत्र चढविला नरेन्द्रसिंहासनी।
परी अभिजातता न ये मनी॥
अंगराज्य देणार तुला हे क्षत्रिय निरपत्रप।
करिसि स्वीकार तूहि निस्त्रप॥

(चाल) अध्वरी ठेविती पुरोडाश ब्राह्मण।
सारमेय कां ते करिल कधी भक्षण।
कार्य वा नराचे जातिधर्म रक्षण।
शस्त्रपूत मरणाचा कैंचा लाभ सारथीसुता।
घोर उन्माद०

टीप—"कृपाचार्यांचे भाषण ऐकून व समपराक्रमी असूनसुद्धा केवळ कर्ण राजा नाही, एवढ्यासाठी त्याचा उपहास होतो हे पाहून दुर्योधनाने कर्णाला अंग देशच्या राज्याचा अभिषेक केला. परंतु भीम म्हणाला, 'हे नीचा, यज्ञांत अग्नीजवळ ठेवलेला पुरोडाश ज्याप्रमाणे कुत्र्याने खाणे अयोग्य, त्याप्रमाणे तू सूतपुत्र असता राज्याचा उपभोग घेणे अयोग्य होय."

(साकी) सूतकुळी न च संभव याचा देवपुत्र हा कर्ण।
क्षत्रकुळीच उपजला याचा स्पष्ट सांगतो वर्ण॥ धृ.॥
ऐका श्रीभारत वार्ता।
जी तोषद भवदावार्ता॥

## पद ५४ वे

धार्तराष्ट्र ते। वदतसे वायुपुत्राते।
याचे सूतज। अभिधान जाण मिथ्या ते॥
इतिहास मला। भीमा सूज्ञांनी कथिला।
हा देवपुत्र। कुंडलकवचासह झाला॥
कां चंद्राचे। पृथ्वी हे जन्मस्थान।
सिंधुशुक्तिगर्भी। मौक्तिक होते जाण॥
प्रसवते कधी। मृगी काय गा व्याघ्र।
सूतज कैसा। होईल हा नरव्याघ्र॥

(चाल) क्षत्रांचे धृति शौर्य हे लक्षण।
या व्यक्तित्वाचे करी वीक्षण ॥
कासया लाविसी वृथा दूषण।
सूत प्रारब्धे पालक केवल याचे ॥
सूतज याचे ७

---

टीप—" भीमाने कर्णाचा केलेला उपहास ऐकून दुर्योधन म्हणाला, 'भीमा, सूर्यासारख्या तेजस्वी पुरुषाची उत्पत्ति, हरिणीपासून वाघ जन्मावा अशी खचित नसली पाहिजे. मोत्याची उत्पत्ति सागराच्याच पोटी होते.' "

(साकी) द्या दक्षिणा अशी द्रुपदाचा सर्व गर्व खाणावा।
युद्धी भग्न करावा बांधुनि मत्समीप आणावा ॥
ऐका श्री भारतवार्ता।
जी तोषद भवदावार्ता ॥

(घनाक्षरी)) वदे द्रोणाते पार्थ। जाती वेगे हे व्यर्थ।
कर्ण होउ द्या अपार्थ। या जयार्थ साधनी ॥
अहंकारी हे मग्न। रणी होतिल जै भग्न।
तदा शर हे शत्रुघ्न। कार्यमग्न पहावे ॥

(साकी) अरिबळभयार्त निर्भय केले आपुले पुर द्रुपदे।
भारद्वाजे निर्भय केले भयभीत सुरद्रुपदे ॥
ऐका श्री भारतवार्ता।
जी तोषद भवदावार्ता ॥

---

टीप— "सर्व राजकुमार अस्त्रविद्येत पारंगत झाल्यावर गुरुदक्षिणेची वेळ आली तेव्हा 'पांचाल देशचा राजा द्रुपद याला समरांगणांत पकडून घेऊन या म्हणजे माझी दक्षिणा पावली' असे आचार्य द्रोण म्हणाले. इतर सर्व राजकुमारांचा पराक्रम संपला म्हणजे मग आम्ही आमची कर्तबगारी दाखवू असे अर्जुन म्हणाला सर्व राजपुत्रांनी गुरु द्रोणाबरोबर जाऊन पांचाल देशावर स्वारी केली."

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ९८८५२
ग्रं. शा.
(स्थळ प्रत

## पद ५५ वे

ऐकताच आक्रंदन ते । धावला तया रक्षाया ।
तै प्रलयवातसा पार्थ । पंचाल मेघ वाराया ।
वा प्रलय धनंजय पेटे । सेनारण्या जाळाया ।
चालती पुत्र माद्रीचे । तद्रथचक्रा रक्षाया ।
(चाल) तत्पार्श्वी द्रुत येऊन ।
ठाकला गदा घेऊन ।
वाटे जो रुद्रसमान ।
प्रिय पुत्र वायुदेवाचा । निज अग्रज यश रक्षाया ।
(साकी) पांचाळ बळासि नभी शिरता जेवि सागरा मकर ।
वाटे द्विजापराधे आला राग धरुनि रामकर ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥
(घनाक्षरी) क्रुद्ध नाराची कदन । करिति ते चावुनि रदन ।
दोन अर्णव खवळून । करिति गर्जना जणू ॥
जणू गंधद्विप दोन । खवळविति ते रणविपिन ।
कालिकेचे वा दोन । शोण नयन भासती ॥
(साकी) मग तो भीमासि म्हणे अर्जुन देउनिया हाकेला ।
न वधावे कटक वृथा परता भूप भग्न हा केला ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

टीप–"अति दीनपणे केलेले कौरवांचे आक्रंदन ऐकून अर्जुन तीन भावांसह धावून गेला व तुंबळ युद्ध करून त्याने अति पराक्रमी द्रुपदाला पकडले."

## पद ५६ वे

नतशीर्ष तदा । होउनी गुरूच्या चरणी ।
वदतसे विनम्र स्वर कौरवकुलतरणी ॥
इप्सिततम ही । दक्षिणा अर्पितो चरणी ।
या वत्सा स्थान असो जी अंतःकरणी ॥

पंचाळपती । लोटिला परी पार्थाने ।
बंधमुक्त केले मित्राते श्रीद्रोणे ॥
तै उपहासे । वदले श्री गुरुदेव ।
जाणसी काय या विप्रा हे नरदेव ।
(चाल) तव सख्यत्वाची मनी वासना ।
तल्लाभ नृपपदाविणा होईना ।
पंचालपते हे तुझे शास्त्र ना ॥
जित दास परी । तू माझा मी नृपतिमणी
वदतसे ०

(साकी) द्रुपदा तुज अभय दिले पावो तुझी ही न तनु कंपा ।
आम्ही ब्राह्मण ज्या न विसंबे क्षांति शांति अनुकंपा ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता

---

टीप —" जिंकलेल्या द्रुपदाला अर्जुनाने द्रोणाचार्यांच्या समोर आणून उभे केले. आता तो जितदास व हे राजे ठरले. तेव्हा मैत्री कायम ठेवण्याकरिता द्रोणांनी त्याला अर्धे राज्य दिले.

(साकी) राज्यार्ध समग्र यश द्रोणे हरिले म्हणोनि मानी ।
पावे ताप असा जो लेश न निवे लक्ष सोमांनी ॥
उपयाजाख्य मुनीते सेवी काम तो पुसे आर्य ।
द्रुपद तयाला सांगे होते जे तच्चित्ती कार्य ॥
ऐका श्री भारतवार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद ५७ वे

ब्राह्मण्याचा उपयोग न हा पांचालपते वरा ।
याचिसी कसा अहिता वरा ॥ धृ. ॥
रागद्वेषार्थ कां तप:सामर्थ्य योजिती कुणी ।
वज्र कां वापरती मत्कुणी ॥

सत्तत्वास्तव जीवनदीपा अखंड बा जाळणे ।
हे असे ब्राह्मण्याचे जिणे ॥
ब्रह्मर्षीची हत्या होईल निरयाचे साधन ।
तिथे कां उपयोगी तव धन ॥

(चाल) जे छत्रभूत वर्णांना विश्वांत या ।
माहेर मंत्रविद्येचे म्हणती जया ।
अग्रहार असती स्वर्लोकाचे जया ।
त्यांना हे प्रार्थिता त्रपा तुज ये न कशी नरवरा ।
याचिसी कैसा ०

---

टीप–" अर्ध राज्यच नव्हे तर द्रोणाचार्यांनी आपले सर्व यशच हरण केले म्हणून द्रुपद राजा अति दु:खी झाला. त्याच्या मनांतून त अपमान जाईना. तो उपयाज नांवाच्या ब्राह्मणाकडे गेला व द्रोणांना मारणारा मुलगा होईल असे अनुष्ठान तुम्ही करा असे म्हणू लागला. एका ब्रह्मर्षीची हत्या करण्याकरिता अनुष्ठान ही कल्पना उपयाजाला न पटून त्याने आपला वडील बंधु याज याच्याकडे राजाला जावयास सांगितले.

(साकी) म्हणसील कसा लोभी तो आचरणे हे जाणावे ॥
भक्षी विजनी स्थळ शुचिता देखता न जे भक्षावे ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद ५८ वे

संपत्तीचा लोभ करीना वश या जगती कुणा ।
अलिप्ता नररूपी शिवगणा ॥ धृ. ॥
द्रुपद मनोरथ पुरवायाते धनलोभे याज ये ।
तन्मनी धर्मविचारहि न ये ॥
हवनान्ती तो याज महर्षी हविर्भाग घेउनी ।
वदे ये राणीला घेउनी ॥
वदली राणी विनये सांजलि त्या संकटसेतुला ।
मुनिवरा क्षमा करावी मला ॥

(चाल) वपुदोषे योग्य न हविर्भाग घ्यावया ।
मुनिवरा करावी कन्येवरि या दया ।
मज धर्मसंकटी कोण वाचवील या ।
मंत्रशक्ति देते न अवास्तव मूल्य वदे तो कुणा ।
अलिप्ता नररूपी ०

टीप—" निर्जन वनांतील खाण्याची वस्तु तिच्या पवित्रापवित्रतेचा विचार न करता जो खातो तो लोभी समजावा. याज ब्राह्मण असाच होता. द्रुपद राजाने पुष्कळ संपत्तीचा लोभ दाखविताच तो हे कर्म करण्यास तयार झाला. त्यांनी एक यज्ञ केला. यज्ञान्ती राणीला बोलावलें. तिचे स्नान व प्रसाधन व्हायचे होते. मंत्रशक्ति इष्ट कार्य तडीस नेल्यावाचून थोडीच राहते ?"

(साकी) देवीच्या आत्मरजोदोषे जै स्वभाग राहविला ।
अग्निमुखी तो होमी संतति अमृतसागरा हविला ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद ५९ वे

धात्याची निर्माणकला यद्रूपें हो पूर्ण ।
तडित्कांतिमय कन्या प्रसवे ती वेदी तूर्ण ॥ धृ. ॥
शरदुत्पलगन्धा कन्या ती शरदुत्पलनयना ।
स्वसा म्हणुनिया असे जिचा अभिमान पद्मलोचना ॥
गर्जे आकाशगिरा राया तिच्या जन्मकाळी ।
क्षत्रान्ताही सुंदररूपे येत महाकाली ॥
परमेशाचे जाण असे हे मोहनास्त्र जाल ।
न्यास तयाचा दक्षपणे तू राया प्रतिपाळ ॥

(चाल) जानकी निमित्ते राक्षस राष्ट्रक्षय ।
होईल हिच्यास्तव कौरव वंशक्षय ।
योजना ईश्वरी तुला नसावे भय ।
ईशाचे हे कार्यसिद्धिचे साधन परिपूर्ण ।
तडित्कांतिमय कन्या ०

---

टीप–"याजाने ते संस्कार केलेले होमद्रव्य अग्नीस अर्पण केले. तेव्हा किरीट-कवचासहित अग्निज्वालेप्रमाणे वर्ण असलेला एक पुत्र वर आला, व यज्ञवेदीच्या मध्यभागातून एक मुलगी वर आली. त्या वेळी आकाशवाणी झाली की, ही सुंदरी क्षत्रियांचा व कौरवांचाही नाश करील."

(साकी) धृष्टद्युम्न असे पुत्राचे नाम अर्थ साधुनी ।
कृष्णा हे कन्येचे केले नामकरण साधूंनी ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जो तोषद भवदावार्ता ॥

## पद ६० वें

तो द्रोणापदाश्रित झाला । घ्यायाते विद्यादान ।
तो स्वीय मृत्यु प्रत्यक्ष । आचार्या होते ज्ञान ।
ब्राह्मण्य परी मृत्यूला । दे प्रेमे विद्यादान ।
तो ज्ञानसूर्य गुरुदेव । शत्रुमित्र भावे हीन ।
(चाल) गुरुशरीर विलया गेले ।
ते पंचत्वांत निमाले ।
परि यशोगान ते उरले ।
ब्रह्मासम सम गुरुराय । नित्य शुद्ध सत्यज्ञान ।

---

टीप–"अति धीट असल्यामुळे मुलाचें नांव धृष्टद्युम्न व मुलीचें नांव तिच्या सावळ्या रंगामुळे कृष्णा ठेवले. धृष्टद्युम्न अस्त्रविद्या शिकण्याकरिता द्रोणाचार्यां-कडे आला. हा आपला वध करणार हे माहीत असूनही आपल्या कीर्तीच्या रक्षणा-साठी आचार्यांनी त्याला सर्व विद्या दिली."

(घनाक्षरी) पौर वदति धृतराष्ट्र । पुरे अंध धृतराष्ट्र ।
पांडुपुत्र धृतराष्ट्र । राष्ट्र वैभवार्थ हो ।

## पद ६१ वे

धनुर्वेद संप्रदाय हा कुंभ-संभवापासूनी ॥
तयाच्या दक्ष रहा रक्षणी ॥ धृ. ॥
अगस्त्य जे अग्निवेश्य मुनिला दे जे गुरु तो मला ।
केले पात्र तयाचे तुला ॥
देतो अभिनव अस्त्र आज मी ब्रह्मशिरो नामक ।
तेजे जाळी जे पावक ॥
अल्पवीर्य शत्रूवरि याचा प्रयोग न करी कधी ।
अस्त्र हे अमानुषासहि वधी ॥
(चाल) इच्छेनुसार अर्पिशील जरि दक्षिणा ।
देईन अस्त्र तुज शिष्यवरा दक्षिणा ।
दे शपथपूर्व आपुले वचन या क्षणा ।
पार्थ वदे मत्शीर्ष मागता ठेविन या चरणी ।
तयाच्या ०

---

टीप– "धृतराष्ट्राने पंडुपुत्र युधिष्ठिर यास अभिषेक करून युवराज करण्याचे ठरविले.

अगस्त्य ऋषींनी आपला शिष्य अग्निवेश्य यास व त्यांनी आपला शिष्य द्रोण याला दिलेले ब्रह्मशिर नांवाचे सबंध पृथ्वीला जाळू शकणारे अस्त्र द्रोणाचार्यांनी विश्वासाने अर्जुनाला दिले. फक्त हें अस्त्र माणसावर किंवा अल्प सामर्थ्याच्या शत्रूवर सोडू नये अशी अट घातली. अर्जुनाने आचार्य मागतील ती गुरुदक्षिणा देण्याचे कबूल केले."

## पद ६२ वे

गंगानंदन चरणरजःकण चर्चुनिया भाला ।
जननीच्या आशीर्वचकवचा विनम्र तो ल्याला ॥
गुरुदेवांच्या वरकृपेचे छत्र शिरी घेउनी ।
पार्थ निघे दिग्विजयासाठी कार्मुक टंकारूनी ॥
चरणन्यासे नरसिंहाच्या वसुंधरा हाले ।
सागरोर्मि तांडवानुकरणे तत्सेना चाले ॥

दुमदुमले दिक्कोन गर्जता भैरव रणभेरी ।
विपक्षीय सेनांना वाटे काळाची भेरी ॥
(चाल) त्या वातात्मज साह्यार्थ ये धनंजया ।
तै काय उशिर अरिसैन्य दग्ध व्हावया ।
ये विजयश्री करमाला अर्पावया ।
अजिंक्य जे पांडूला नमविति पार्थपदी भाळा ।
जननीच्या आशीर्वच ०

---

टीप–" पितामहाचा व मातुश्रीचा आशीर्वाद घेऊन अर्जुन दिग्विजयासाठीं बाहेर पडला. पांडु राजा ज्यांना जिंकू शकला नाहीं त्यांनासुद्धा अर्जुनाने जिंकले. सौवीर राजे, यवन राजे जिंकून त्याने कुरुराज्यात द्रव्याच्या राशी आणून ओतल्या.

## पद ६३ वे

हे गांगेया । विजयध्वज फडकावोनी ।
येतसे पौत्र तव । कुलगौरव साधोनी ॥धृ. ॥
दाशार्ण काशि सुह्म पुंड्र झाले करद ।
झाला धनलाभे अपर पुत्र तव धनद ॥
जिंकिल्या दिशा । दक्षिण पूर्वा पार्थाने ।
दिक्कोन गर्जले । कार्मुक टंकाराने ॥
तो शस्त्रेंधनमय । बाणौघ महाकाय ।
पाहता पार्थपावक कंपित भूपाल ॥
हे ऐकताच । पांडुमूर्ति चित्ती आली ।
श्री गांगेयाच्या । चित्ती गजबज झाली ॥
(चाल) मनि हर्षदुःख भाव तै उमटले ।
तीर्थराजता चित्त ते पावले ।
नीरपूर नयनांतुनी चालले ।
देवव्रत त्या । दूतांना सन्मानी ।
येतसे पौत्र तव ०

टीप– " विजय संपादन करून येत असल्याची बातमी दूतांच्या तोंडून ऐकून भीष्माचार्यांना अर्जुनाविषयी प्रेमाचे भरते आले त्यांना त्याच्या पित्याची आठवण झाली. आनंद आणि दुःख यांचे संमिश्र भाव त्यांच्या मनांत दाटले."

## पद ६४ वे

शिरे मनि स्वार्थवह्निकणिका।
अंधनृप पाचारी कणिका ॥ ध्रु. ॥
वदे राज्याचा लोभ मनी।
धर्म नय पथ न दिसे नयनी॥
भीति परलोकाची न मनी।
असावे राज्य याच भुवनी॥
पथदर्शक होशिल म्हणि का।
अंधनृप० ॥ १ ॥
संग्रामे न मिळेल जय।
विनाशा पावतील तनय॥
विक्रमे अधिक पांडुतनय।
रणी जिंकील कोण विजय॥
तूळ हे विजय वन्हि कणिका।
अंधनृप० ॥ २ ॥

(साकी) चिंता करिता वदला जंबुक आचराल जरि सारे।
सांगेन युक्ति स्वेष्टफलप्रद मद्भाषण परिसा रे॥
स्नान करुनि ये व्याघ्र पाहुनी दीन वदे नव घाला।
काय असे तो सांगे कपटी म्लानवदन वाघाला॥

(घनाक्षरी) सख्या बोले मज नकुल। असे व्याघ्रामिष गरल।
आखु भक्षू दे चपल। वरिल नाश तो स्वये॥
परी मित्रा त्वत्त्राण। असे कर्तव्यचि जाण।
तुच्छ मित्राहुनि प्राण। तुझी आण मज गमे॥

(साकी) ऐकुनिया या वंचकवचना गेला शरण बिळाला।
चित्ती म्हणे न मेलो हा मज अतितर लाभ मिळाला॥
मग जंबूक वदे आखुवृकव्याघ्ररायही नकुला।
म्या जिंकोनि पळविले तेथे लाभ काय हीन कुला।
ऐसेचि प्राज्ञे साधावे आत्मकार्य नैपुण्ये।
अघशमनार्थ करावी होइल स्वार्थसिद्धि तै पुण्ये॥

(साकी) पोरस्तुत धर्मगुणश्रवणे अंधपुत्र खळमळती ।
सद्‌गीत श्री हरिगुण ऐकुनि पिशाचसे तळमळती ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

---

टीप– "पांडुपुत्रांचे लोकोत्तर बळ, अपूर्व वीर्य, विलक्षण पराक्रम व सामर्थ्याचा लौकिक ऐकून राजा धृतराष्ट्र चिंतेने तळमळू लागला. त्याला रात्री झोप येईना. तेव्हा कणिक नांवाच्या राजनीति उत्तम जाणणाऱ्या मुत्सद्द्याला बोलावून धृतराष्ट्र पुढचा उपाय विचारू लागला, शत्रूला हस्तगत करून साम, दान, दंड, आणि भेद या चार उपायांनी शत्रूचा वध कसा करावा हे समजाऊन सांगताना कणिकाने उदाहरणादाखल एका कोल्हयाची गोष्ट सांगितली. शिकार केलेल्या हरिणाचे मांस एकट्याला खाता यावे म्हणून कोल्हयाने, वाघ, उंदीर, मुंगूस व लांडगा या चारी मित्रांना मसलतीच्या जोरावर फसविले."

## पद ६५ वे

तप्तलोह शंकुतुल्य ताता बोलति जे हे जन ।
ऐकता विटले माझे मन ॥
हा अंध न राज्यार्ह आमुचा नृप पांडू नरपती ।
तयाचा पुत्र असो नरपती ॥
जन चातक घन युधिष्ठिरचि हा अंध मेघ पांडूर ।
असे जन बोलताति कटुतर ॥
आशीविष हे पांच पाळुनी निजसुत शत बुडविले ।
काय या व्यवहारी मिळविले ? ॥
(चाल) भाग्यांत आमुच्या दासांचे जीवन ।
व्यवसाय गमे परदत्त पिंड भक्षण ।
तेजस्वी साहिल केवि असे जीवन ।
दुर्गति पिशाचिनीचे कवळ न होऊ दे नंदन ।
ऐकता विटले०

---

टीप – "पांडव आपल्या गुणांनी उदयास आलेले पाहून पौरजन सभांमध्ये त्यांची स्तुति करू लागले. ज्येष्ठ पांडव धर्मराजाच्या योग्यतेविषयीचे प्रजाजनांचे उद्‌गार तर दुर्मति अशा धार्तराष्ट्रांना तापलेल्या लोखंडाची सळई कुणी कानांत

घालावी असे वाटू लागले. दुर्योधन पित्याला म्हणाला, "हे तात, धर्म जर राजा होईल तर आपली उपजीविका दुसऱ्यांनी दिलेल्या तुकड्यावर होणार. तेव्हा आपण वडील असूनही हे काय मिळविलंत ?"

---

(दिंडी)　जगी धनदाने वश न होय कोण ।
पौर वश होतिल तात तुझी आण ।
वशीकरणाचा मंत्र हा प्रधान ।
तिथे वांछाकल्पद्रुम थिटे जाण ।

(साकी)　अंध म्हणे पशुपति यात्रोत्सव पहावया सद्रत्ने ।
सिद्धहि यद्दर्शन सिद्धोस्तव उपासिती सद्यत्ने ॥
पांडुपुत्र जाणार निश्चये कळता प्रेरी यवन ।
निर्माया अंधज लाक्षामय प्राणनाशना भवन ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

---

टीप – "पांडवांना राज्याबाहेर घालविण्याकरता पौरजनांना धन देऊन वश करावे असे दुर्योधनाने सुचविले. वारणावतास पशुपति यात्रोत्सवासाठी पांडव व कुंती यांना धृतराष्ट्राने पाठविले व तेथे त्यांच्या नाशाकरता यवनाकडून लाक्षागृहाची निर्मिति केली."

## पद ६६ वे

जाता जननी बंधुसहित श्री धर्मराज नंदन ।
गंगासुत कृपद्रोण विदुर नृपपदी करी वंदन ॥
अति भास्वर भूषविता पांडव सुवर्णमय स्यंदन ।
धिष्ण्यस्थित वाटले ज्वलित ते मूर्त हव्यवाहन ॥
निघता सचिवोत्तंस वदे बाहुनी धर्मनंदना ।
करी यावनी अन्या न कळो म्हणुनि शब्दयोजना ॥
जाण असे राजनीति वत्सा धर्मा वारांगना ।
सपरिवार तुज जाळायाची असे मात्र योजना ॥

(चाल) वारणावती तू अखंड सावध रहा ।
लाक्षागृह आहे जेथे म्हणतिल रहा ।
अवसर पाहुनि तू पलायनाचे पहा ।
गुप्त मार्ग निर्माया येइल खनक बा विचक्षणा ।
गंगासुत कृपद्रोण०

(साकी) सदनी जाता शत दुष्टांचे कृत्य मतहि अंधाचे ।
कळवी भीमा धर्म करवुनी ग्रहण भित्तिगंधाचे ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जो तोषद भवदावार्ता ॥

टीप—" मातावंधूसहित धर्मराज वारणावतास जावयास निघाले तेव्हा सर्व वडील मंडळींना वंदन करून त्यांचा आशीर्वाद घेते झाले. तेव्हा महामति विदुर धर्मराजाला एकीकडे घेऊन यावनी भाषेत पुढल्याकरिता सावधगिरीची सूचना देते झाले. "

(साकी) भेटे विश्वासनिधी त्याते विदुरप्रेरित खनक ।
धर्म म्हणे संरक्षी आम्हा रक्षितो जसा जनक ॥
होता बिळ सिद्ध वदे अनुजा धर्मराज हा यवन ।
अन्य सहा जीवांसह घालुनि दग्ध करी हे भवन ॥
ऐका श्री भारत वार्ता
जो तोषद भवदावार्ता ॥
पांच पुत्रासह एक तै निषादी ।
दैवयोगे त्या जतुगृहासि साधी ।
भोजनोत्तर आकंठ मद्यपान ।
करुनि अपुले विसरली देहभान ॥

## पद ६७ वे

घोर निशीथी स्वये गृहाचे भीम करी दीपन ।
हवी दे दुष्ट यवन बांधुन ॥ धृ. ॥
मातेसह ते विवरी शिरती शीघ्र पांडुनंदन ।
येति जों पौर तिथे धावुन ॥

माता स्कंधी करी धर्म फाल्गुन यम घे कटिवरी ।
वायुज जाय अग्रजापरी ॥
विवर पुरस्थित महारण्य तो उल्लंघुनि द्रुतगती ।
पातला श्री गंगेच्या तटी ॥

(चाल) तो विदुरप्रेरित दूत भेटला तया ।
दावी दृढ नौका नदीपार व्हावया ।
विपदर्णव सेतू मूर्त होय तो तया ।
भवगंगा ती गंगा उल्लंघिती पांडुनंदन ।
हवी दे०

---

टीप – " लाक्षागृहांतून बाहेर पडण्याकरिता खनकाने एक भुयार तयार केले. एके दिवशी आपल्या पांच पुत्रांसह एक भिल्लीण लाक्षागृहांत आश्रयार्थ आली असता ती योग्य संधि समजून भीमाने स्वतःच गृहास रात्री अग्नि लावला. "

(साकी) प्रेत षट्क पाहुनी म्हणति जन हाय काय हे कर्म ।
धृतराष्ट्रा पांडवघाती त्वां कोण देखिला धर्म ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद ६८ वे

अज्ञानी ते । द्रुत वारण नगरनिवासी ।
पाठविती दुःखद वार्तेसह दूतांसी ॥ धृ. ॥

गजनगरीते । वृत्त घेउनी आले ।
ऐकता पौरजन । दुःखाब्धीत बुडाले ॥
निष्प्राणचि ते । दिसले गंगासुत द्रोण ।
सांत्वन त्यांचे करण्यास्तव शक्तचि कोण ॥
आगळा परी । अंधाचा दिसला शोक ।
इतिहास दिसे फसताति दांभिका लोक ॥

(चाल) आक्रंदन अंधज करी अतितर ।
हा भरतासम बोलती नागर ।
ते अमृत वाटले तया परि गर ।
परि विदुर हसे । चित्ती त्या पाखंडासी ।
पाठविती दुःखद ०

(ओवी) धेनू वस्त्रे कनकी । संतुष्ट व्हावया परलोकी ।
बहुत दक्षिणा स्वहस्तकी । पांडवोद्देशे देतसे ॥

टीप—" सहा प्रेते पाहून लोकांना ते पांडव आणि कुंती असावे असे वाटले. हस्तिनापुरी बातमी आली. धृतराष्ट्राला शोक अनावर झाल्यास नवल नाही. दुर्योधनाचा शोक पाहून तर लोक त्याला भरताचीच उपमा देऊ लागले. विदुर फक्त त्याचा ढोंगीपणा जाणत होते. इहलोकी सुख न मिळाले तरी चालेल पण परलोकी त्यांनी संतुष्ट व्हावे म्हणून धृतराष्ट्राने अनेक प्रकारचा दानधर्म केला. "

(साकी) दीनवचन मातेचे परिसुनि सत्वर भीम निघाला ।
शोध करित उदकाचा एका वनकासारी आला ॥
नाही पात्र जवळ काही ।
प्राक्तनगति अशी ऐका ही ॥
मरणाधिक या दुःखापासूनि विधिच्या बापा सोडी ॥
ऐसे बोलुनि भिजवुनि घेता झाला मग पासोडी ॥
धावत ये जननीजवळी ।
पाहिली निद्रित भूमितळी ॥

## अंजनी गीत ६९ वे

कुंतिभोज नरपालनंदिनी । पांडु चक्रवर्तीची राणी ।
आनक दुंदुभिचो ही भगिनी । हतभागिनी कैसी ॥
प्रिय स्नुषा ही गांगेयाची । साम्राज्ञी भारतवर्षाची ।
पूज्या जननी नरसिंहाची । भूमीवरि लोळे ॥
राज्यासन जो त्रैलोक्याचे । भूषवील तेजस्वी साचे
भाजन तो धर्मन्यायाचे । भूमीवरि लोळे ॥

नरोत्तंस हा तृतीय पांडव । यत्कार्मुक टंकाराचा श्रव ।
गमे शत्रुहृदया मृत्यूरव । तो वरि भूशय्या ॥
पुत्र अश्विनींचे मृदुगात्र । जे सौंदर्य-जलाचे पात्र ।
कैसे बंधू मिलित नेत्र । पांसुचयी दिसती ॥

टीप – " इकडे विवरातून बाहेर पडून जंगलातून जात असता कुंती तहानेने व्याकूळ झाल्यामुळे भीम पाणी आणण्यास निघाला. पण दैवाची विचित्र गति ! भांडे कुठे होते ? अंगावरील उत्तरीय वस्त्र भिजवून घेऊन भीम येतो तो पांचही जण झाडाच्या तळवटी जमिनीवर झोपी गेलेले त्याने पाहिले. ते पाहून त्याला अनिवार दुःख झाले. राजोचित उपचार ज्यांनी घ्यायचे, त्यांची ही अवस्था पाहून कोणालाही दुःखच होईल. "

(ओवी) हिडिंबा अवलोकी नयने । तव निद्रेत पांचही जणे ।
भीम देखिता पंचबाणे । हृदयमर्मी ताडिली ॥
म्हणे हा मूर्तिमंत मदन । नीट नेटका बळसंपन्न ।
याचे होऊनि अंगनारत्न । भोग भोगू अनेक ॥

(घनाक्षरी) करूनि ऐसा निर्धार । होय मानवी सुकुमार ।
करूनि सुंदर शृंगार । भीमानिकट पातली ॥
कोण सुंदर जितमार । वनी कैसा संचार ।
सदा उपवनी विहार । नरायोग्य राजसा ॥

## पद ७० वे

तो वीणा मंजुळ नाद । ऐकताच पाहे वीर ।
तो दिव्य अंगना कोणी । जी पुष्पाहुनि सुकुमार ।
देवीच की अरण्याची । आली तद्दृष्टिसमोर ।
ते स्वप्न असे वा माया । ना होय मनी निर्धार ।

(चाल) लावण्यामृत सरितेचे ।
उत्फुल्ल कमल ते साचे ।
पाहुनी वदे तो वाचे ।
तू देवी वा गंधर्वी । करिसी कां वनसंचार ।

टीप—" त्याच अरण्यात जवळच हिंडिब राक्षस राहत असे. त्याच्या आज्ञेवरून त्याची बहीण हिंडिबा नरमांसाच्या आशेने ह्या सहा जणांजवळ आली. भीमाचे रूप पाहताच क्रूरकर्माची भावना जाऊन त्या ठिकाणी पतिप्रेमाची भावना तिच्या मनांत उत्पन्न झाली. तिने राक्षसरूप टाकून सुंदर रूप धारण केले."

(साकी) अंतरिक्षमार्गे मजसंगे चला प्राण रक्षाया ।
न हो देह त्या पुरुषा दाते कवळ नाथ भक्षाया ॥
अस्वाभाविक विलंब होता येतो शोध कराया ।
पाहे मनुजाकृति भगिनी जी सजली भीम वराया ॥
वदे की माजलीस फार । प्रथम तुज वधितो मग जार ॥
परते करकर दात खात को निज भगिनीस वधावे ।
निद्रित निद्राभंग न व्हावा यास्तव हरिसुत धावे ॥
निरपराध तव भगिनी आहे सापराध बा मदन ।
अबलेवरि विक्रमे काय मी करिन तुझे निर्दलन ॥
ऐका श्री भारत वार्ता
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद ७१ वे

सर मागे वाग सुमार्ग । अन्यथा मरशिल रे ॥ धृ. ॥
नरेची वधिला पुरुषादांचा राजा राक्षस रावण रे ॥ १ ॥
नरे निवटिला इंद्रविजेता मेघनाद रणचत्वरि रे ॥ २ ॥
वधे तुझ्या मी वन तापसजन करिन आज निष्कंटक रे ॥३॥ सर मागे०

टीप–" भावापासून संरक्षण करण्याकरिता आकाशमार्गाने तुम्हा सर्वांना मी घेऊन जाते असे हिंडिबेने भीमास सुचविले. भीमाने ती सूचना नाकारली. मनुष्यरूपाने सजलेल्या आपल्या बहिणीच्या अंगावर हिंडिब तुटून पडला. भीम हिंडिबाशी त्वेषाने लढू लागला."

## पद ७२ वें

द्वंद्वयुद्ध करिता ते करिती वीर घोर गर्जना ।
आघाते शब्देही देती परस्परां तर्जना ॥
घोर गर्जितें दचकुनि जागृत झाले निद्राकुल ।
पाहे तो कुंती विद्युत्प्रभ ललना शोकाकुल ॥
वदे कोण देवी गंधर्वी अथवा वनदेवता ।
मुखावरी खिन्नभाव उमटे कैसा तव तत्त्वता ।
काय तुझ्या पतिदेवे केला त्याग तुझा देवते ।
देवांनाही प्रारब्धाची काय दशा भोवते ॥
(चाल) ती वदली सर्वही वृत्त तिला सांगुनी ।
तव देवद्युति सत्पुत्र गुंतला रणी ।
तच्चिंतेने मी व्याकुळ झाले मनी ।
ऐकताच ते वृत्त जाय तै पार्थ करित गर्जना ।
आघाते ०

## पद ७३ वे

ती निशाचरी कुंतीला जोडुनि पाणी । वदली करुणामय वाणी
पतिभावे या तव तनया मी वरिले । सर्वस्व समर्पण केले ॥ १ ॥
होय ना जरी हे मत्पाणिग्रहण । देईन तव पदी प्राण ॥ २ ॥
मूढ मी परी भक्त याच पायांची । करू नका उपेक्षा साची ॥ ३ ॥
(चाल) तुमचे हो हृदय विशाल ।
कारुण्यपूर्ण ते बोल ।
करिती कुंतीमन लोल ।
सस्नेह तिच्या ठेवी शीर्षी पाणी ।
वदली ०

टीप—"इकडे हिडिंबा कुंतीपाशी येऊन भीमाची पति म्हणून प्राप्ति करून घेण्याकरता तिची प्रार्थना करू लागली. हिडिंबेच्या सुंदर रूपावरून ती कुणी देवताच अवतरली असावी असे कुंतीला वाटले."

(साकी) गुरुवचने वायुज एकचि दे रुदपत्यरत्न तीते ।
नाम घटोत्कच दे पितरा सुख शतहि सुत न देती जे ॥
स्कंधी पृथेसि वाहुनि लंघुनि मत्स्यादि देश दूर ।
तापसवेष स्वीकारुनि त्या वना लंघिती शूर ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद ७४ वे

अचतुर्वदन ब्रह्मदेव वा दो हातांचा हरी ।
दर्शने अघनगचय संहरी ॥ धृ. ॥
अभाललोचन नीलकंठ वा केवळ ज्योतिर्मय ।
करी जो भवभीता निर्भय ॥
शाखांच्या विस्तरे स्वयंभू वेदतरू वहरवी ।
सदा जो पुरुषार्थ ज्ञानवी ॥
पितामहा पाहताच त्या कुंतीसह वंदिती ।
चरणरज निजशीर्षी ठेविती ॥

(चाल) वदले ते कळले दुष्टांचे कैतव ।
लाभेल तुम्हा परिणामी सुख वैभव ।
दिसतो भाग्योदय तुमचा मज अभिनव ।
सच्चरिते विपदेंत सदा साह्या येतो श्रीहरी ।
दर्शने अघनग ०

---

टीप– " धर्मराजांच्या आज्ञेने भीम हिडिंबेशी रममाण झाला. तिला घटोत्कच नावाचा पुत्र झाला तपस्व्यांचा वेष धारण करून अरण्ये ओलांडीत असता वाटेत पांडवांना व्यासांचे दर्शन झाले. त्यांनी आपत्तीचा काळ धैर्याने काढल्यास पुढे चांगले दिवस येतील असा आशीर्वाद दिला "

(साकी) भीमासि म्हणे रडतो दुःखे सकुटुंब विप्र बाहे ।
मज बहु दुस्सह झाले आले नेत्रासि अश्रु पाहे ।

भीम म्हणे शोध करी स्वमुखे विप्रनायका पूस ।
वारीन दुःख सर्वहि दहना भार काय कापूस ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद ७५ वे

दीनवदन तो विप्र वदे ही घोर मृत्युची दरी ।
स्मरता कंप उठे अंतरी ॥ धृ. ॥
कन्या पुत्रा अथवा तुजला द्यावे संरक्षण ।
न्याय हा कसे करू मारण ॥
स्वये बळी जातो आनंदे तेच उचित वाटते ।
ऊर हे शोकभरे दाटते ॥
कांता बोले जाऊ द्याजी सौभाग्यासह मला ।
असे सद्भाग्य धर्म बोलिला ॥

(चाल) कन्या तो बोले परक्याचे हे धन ।
पाठवा मुक्त व्हा सर्वहि चिंतेतुन ।
ही नाही तरि जाणारचि भवनांतुन ।
बोल ऐकता नव शोकाचा उदय होय अंतरी ॥
स्मरता कंप उठे०

टीप – "एकचक्रा नगरीत एका ब्राह्मणाच्या घरी पांडव व कुंती आश्रयार्थ राहिले. एके दिवशी तो ब्राह्मण व त्याचे कुटुंब शोकमग्न असून सर्व जण रडतांना कुंतीने पाहिले. ब्राह्मण मीच बळी जातो असे म्हणत होता तर त्याची पत्नी मीच बळी जाते असे म्हणत होती. मी परक्या घरी जाणारी आहे तेव्हा माझा बळी देऊन आपण चिंतामुक्त व्हा असे मुलगी म्हणत होती. भीमाने ब्राह्मणाचे शोकाचे कारण विचारण्याकरता कुंतीला पाठविले."

(साकी) हासविली हर्षविली तो व्यसनार्त बाळ शब्दाने ।
ग्रीष्मदवाकुळ बर्हिकुळे जेसी मेघे अब्दाने ॥ ऐका०

विप्र म्हणे शिव शिव परघातक स्वार्थलुब्ध नरकामी ।
तैसा या कर्मे माते मी होईन नरकगामी ॥ ऐका०
परि बा विप्रवरा प्रगटावे हे न मनी जिरवावे ।
विद्यार्थि जनोपद्रव होतो यास्तव गुप्त असावे ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जो तोषद भवदावार्ता ॥

## पद ७६ वे

ऐकताच हे । तै धर्म वदे मातेला ।
तू परार्थ कैसा । सर्वनाश पत्करिला ॥
वीर्ये ज्याच्या । जतुगृही वाचलो माते ।
निवटुनि राक्षस दे प्राणदान आम्हाते ॥
आश्रय माझ्या । एकमात्र जो स्वप्नांचा ।
प्रिय पुत्र केवि गे । करिसि कवळ मृत्यूचा ॥
ऐकताच ते । नेत्री सौदामिनि तेज ।
उसळे मातेच्या । वदे हेच का ओज ॥

(चाल) क्षत्राणी प्रसवे जगी नंदन ।
तो दीनांचे बा करो रक्षण ।
हे धर्माचे पांडवा शासन ।
तू लावु नको बा कलंक या कुसव्याला ।
तू परार्थ कैसा०

टीप—"नरभक्षक बक राक्षस व त्याला रोज नगरीतून पाठवावा लागणारा त्याचा आहार याबद्दल ब्राह्मणाने कुंतोला माहिती दिली. कुंतीने त्या जागी भीमाची योजना केली. ज्याच्या बाहुबलावर इतकीं संकटे आपण पार केली त्या भीमाची राक्षसाच्या आहारासाठी योजना केल्याबद्दल धर्मराजाने तिची निर्भर्त्सना केली."

(साकी) पांचालाधिप गुरुत्रयांचा इतिहास कथी सारा ।
वदे वधेच्छेला विप्राच्या याज देत आकारा ॥ ऐका०




भीम व बकासुर युद्ध

चुकलो क्षमा करा दोष मला पुरुषा राजे घडले।
या भावे ते बकराक्षस वपु नगरद्वारी पडले ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद ७७ वे

जनांना झाला तै आनंद ।
विप्रा पुसती कैसा वळला संप्रति दयापयोद ॥
वदे विप्र कुणि मंत्रसिद्ध ये विप्र कराया बोध ।
तोच जाय राक्षस निवटाया देउनि आशीर्वाद ॥

टीप – "कुंतीने व्यासांनी केलेले भविष्यकथन सांगून धर्मराजांना शांत केले. ब्राह्मणाने ही गोष्ट कुणाला सांगू नये अशी त्याला अट घालण्यात आली. भीमाने स्वसामर्थ्याने बकराक्षसाचा वध करून त्याचे शरीर नगराच्या वेशीवर टाकून दिले. त्या नगरीतील राक्षस संपलेला पाहून अर्थातच सर्वांना अतिशय आनंद झाला.

त्या ब्राह्मणाच्या घरी आलेल्या दुसऱ्या एका ब्राह्मणाने पांडवांना द्रुपद–द्रोणांचे भांडण, त्यातून द्रुपदाने अपमानित झाल्यामुळे याज नांवाच्या ब्राह्मणाकडून यज्ञ करवून घेऊन धृष्टद्युम्नाची व द्रौपदीची करून घेतलेली प्राप्ति वगैरे सर्व हकीकत सांगितली."

(साकी) गंधर्वराज मी क्रीडति या प्रवाहात मज्जाया ॥
बालिश हो कां येता संकटसागरांत मज्जाया ॥
ऐका श्री भारतवार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ।

(दिंडी) अलाते ते खंडुनी तीक्ष्ण बाण ।
वदे पार्थ तया करी परित्राण ॥
अनस्त्रज्ञा दाखवी पौरुषाते ।
काय गायक जिंकील क्षत्रियाते ॥
तुम्ही तंत्री घेउनी रंजवावे ।
पारितोषक आमुचे मुदे घ्यावे ॥
नटविटांचा संबंध रणी काय ?
सावधान रहा रक्ष रक्ष काय ॥

(साको) धर्म म्हणे हे याची म्हणत्ये नमुनि बायको पावे ।
सिंहे शशकी मशकी गरूडे सांग काय कोपावे ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

---

टीप – "एकचक्रा नगरी सोडून उत्सुकतेने द्रुपदपुराला पांडव येत असता वाटेत गंगानदीच्या तीरावर जलक्रीडा करीत असलेल्या चित्ररथ गंधर्वाशी त्यांची गांठ पडली. तो पांडवांना न ओळखून मदाने अपमानास्पद बोलला व एकाएकी बाणांचा प्रहार करू लागला. अर्जुनाने त्याची निर्भर्त्सना करून त्याच्यावर अग्न्यस्त्राचा प्रयोग करून त्याचा रथ वगैरे जाळून टाकला व त्याला बांधून धर्मराजासमोर आणले. गंधर्वपत्नीच्या प्रार्थनेसाठी धर्मराजांनी त्याला अभय दिले."

(साकी) घे विद्या आग्नेया देउनि सख्य करी अनपार्थ ।
वदे तदा गंधर्वाधीशा स्मितपूर्वक तै पार्थ ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद ७८ वे

मग तपतीची सुरस कथा सांगुनिया ।
गंधर्व वदे कौन्तेया ॥ धृ. ॥
क्षात्रा आहे कवच जाण ब्राह्मण्य ।
त्याविना येत कार्पण्य ॥
नृपसत्तेचा नेत्र पुरोहित जाण ।
तत्स्थैर्याचा तो प्राण ॥
ज्यास्तव टाकी गाधिज राजश्रीला ।
वाहुनि घे घोर तपाला ॥

(चाल) धिक् क्षात्रबला उद्घोषी ।
ब्रह्मतेज बल हे घोषी ।
निज वपु तपमार्गे शोषी ।
तो ब्रह्मर्षी होय नरप कौन्तेया ।
गंधर्व वदे कौन्तेया ॥

टीप – " स्वत: आग्नेय अस्त्र गंधर्वाला देऊन व त्याच्या जवळची चाक्षुषी नावाची विद्या अर्जुनाने घेतली. गंधर्वाने अशा रीतीने अर्जुनाशी सख्य करून त्याला कुरुवंश जिच्यापासून उत्पन्न झाला अशा सूर्यनारायणाची कन्या तपतीची व संवरण राजाची कथा सांगितली व चांगल्या पुरोहिताची योजना करण्याची सूचना दिली."

(साकी) मग उत्कोचक तीर्थी जाउनि पाण्डव धौम्या वरिती ।
तद्योगे भाग्यश्री झाली पृथासुता तै वरितो ॥ धृ. ॥
ऐका श्री भारतवार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

(अभंग) मार्गी जाता जाता भेटती ब्राह्मण ।
तयासी ते सुज्ञ पुसताती ॥
कोठुनिया आला कोणिकडे जाता ।
आम्हांसि वाटता देवापरी ॥

## पद ७९ वे

द्रुपदपुराप्रति जाऊं । तेथ महोत्सव पाहू ॥ ध्रु. ॥
सुकुमार सावळी द्रुपद दुहिता ।
पाहुनि दृक्सुख घेऊं ॥ तेथ ० ॥
वाटते आम्हासी वरिल तुम्हांसी ।
आम्ही बहु धन लाहू ॥ तेथ ० ॥

टीप--" उत्कोचक तीर्थी जाऊन धौम्य ऋषींना पांडवांनी पौरोहित्य दिले. पुढे द्रुपदपुराला जात असता काही ब्राह्मण तिकडेच जात असलेले पांडवांना दिसले. ह्यांना पाहून ब्राह्मणांना वाटले की सुंदर आणि तेजस्वी अशा ह्यांच्यापैकीच एकाला द्रौपदी माळ घालील. "

(साक) जतुगृहदाह श्रवण तयाला कधि न सत्य वाटे ते ।
वांछित सिद्ध्यर्थ धरी राजा युक्तिच्याच वाटे ते ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥
घोषविले की चढवुनि धनुला पांच शरी लक्षाते ।
जो भेदील कृती त्या कन्या ही वरील दक्षाते ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद ८० वे

मंद पदन्यासे येता ती कुवलायत लोचना ।
विषय न उरला ध्यानास्तव तै अन्यलोकलोचना ।

वदती ब्रह्मा केवि करी हा रूपाविष्कार ।
लावण्याचा तो जड कैचा होय शिल्पकार ॥
घोर महेश्वर भयकंपित तनु रक्षाया प्राण ।
वाटे स्त्रीरूपे या सजला स्वये पंचबाण ॥
दग्ध मदन तनुला द्याया कां पुनश्च संजीवन ।
सजले धन्वंतरी कराया औषध संजीवन ॥

(चाल) शशिकला कौमुदी वस्त्रगाळ घोळुनी ।
तो आर्द्र करूनिया स्वये सुधासेचनी ।
घडविली मूर्ति लावण्यमया सुखखनी
जगदीशाची माया वाही येत विश्वमोहना ।
विषय न उरला ०

---

टीप—"पांचालपति द्रुपदाची इच्छा द्रौपदी अर्जुनाला द्यावी अशीच होती. लाक्षागृहदाहात ते जळाले हे त्याला खरे वाटेना. त्याने अर्जुन प्रगट व्हावा म्हणून एक युक्ति योजली. अर्जुनावाचून इतरांस वाकविताच येऊ नये असे बळकट धनुष्य करविले व आकाशात फिरणारे कृत्रिम यंत्र करून ह्या धनुष्याने जो लक्ष्याचा भेद करील त्यास द्रौपदी मिळेल असे जाहीर केले."

(साकी) हा दुर्योधन नृप व्यासवरे बंधु जन्मले शतगे ।
हा कर्ण ज्यापुढे चापश्रुतिकुशलता न लेश तगे ।
ऐसे समागतांचे कळवी जन्मकर्मवृत्त तिला ।
को लक्ष्य भेदकर ही अकुलज रुचो न कृष्णामतिला ।
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद ८१ वे

श्रीकृष्ण वदे । विनये तै बलभद्राते ।
जी कथितो कर्णेन्द्रिय तोषण भद्राते ॥
या द्विजवृंदी । मज दिसती कुंतीतनय ।
हा नर्मालाप न सोडीन कसा विनय ॥

वार्ता आली । जतुगृही दग्ध ते झाले ।
परि ती मिथ्या हे मन्मन कथिते झाले ।
शोधित होतो । मी चाराकरवी आर्या ।
राहिलो उपस्थित याच हेतुने कार्या ॥
(चाल) भस्माच्छादित वन्हिसे पाण्डव ।
द्विज वेष जरी घेतला अभिनव ।
पाहता गमे मन्मना उत्सव ।
पावतील ते । यापुढे गमे भद्राते ।
जो कथितो ०

टीप--"हातांत सुमनमाला घेतलेली व बहुमोल अलंकारांनी विभूषित अशी द्रौपदी स्वयंवर मंडपात आली. तिच्या सखीने तिला उपस्थित राजे लोकांचा परिचय करून दिला. लक्ष्यभेद करणारा कुलीन असावा अशी द्रौपदीची अट होती. भस्म लावून ब्राह्मणरूपाने वसलेल्या पांडवांना श्रीकृष्णांनी ओळखले."

(साकी) जो कर्ण म्हणेन शिवी देइन इला अन्य पतिला मी ।
तोचि म्हणे कृष्णा सूतमहं जातुचिन्न वरयामि ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जो तोषद भवदावार्ता ॥

## पद ८२ वे

प्रार्थना करी श्रीकृष्णा पांचाल ।
भेदा हे यंत्र विशाल ॥ धृ. ॥
तो भाग परी पार्थाचा जाणोनी ।
वदला मंदस्मित वाणी ॥
या स्वयंवरी आलो भाग न घ्याया ।
हा उत्सव मात्र पहाया ॥
(चाल) बोलतो वसे जे स्वमनी ।
तव धृष्टद्युम्ना भगिनी ।
मत्स्वसा आजपासोनी ।

प्रार्थी अन्या भेदाया यंत्र विशाल ।
भेदा हे ०

टीप– "कर्णाने लक्ष्यभेद करून 'द्रौपदी मीच मिळवीन' अशी प्रतिज्ञा केली. तोच द्रौपदीने 'मी सूताला वरणार नाही' असे मोठ्याने सांगितले. सर्व क्षत्रिय धनुष्य उचलण्याच्या बाबतीत जेव्हा निराश झाले तेव्हा द्रुपदाने कृष्णांनाच लक्ष्यभेद करण्याची विनंती केली. कृष्णांनी तिचा भगिनी म्हणून गौरव केला."

## पद ८३ वे

द्रुपद म्हणे भूमिपाळा ।
कैसी वरिल माझि बाळा ॥ धृ. ॥
समर्थ न धनुते उचलाया ।
त्यावरी बाणहि योजाया ॥
दूर मग मत्स्यभेद राया ।
भूषविति व्यर्थ केवि काया ॥
असो धिक्कार भूमिपाळा ।
कैसी वरिल ० ॥ १ ॥
कर्ण धनू सज्ज केले ।
त्यावरि बाणहि योजियले ॥
मग ते यंत्र लक्ष्य केले ।
न वरी परि कन्या बोले ॥
सूतपुत्रास दुष्कुळाला
कैसी वरिल ० ॥ २ ॥
यादव कृष्णसहित आले ।
पणाला नाहिच अनुसरले ॥
पहाया स्वयंवरी आले ।
स्वये कृष्ण असे बोले ॥
म्हणावे काय धर्मपाळा ।
कैसी वरिल ० ॥३ ॥

टीप– "उपस्थित राजे लोकांचे लक्ष्यभेद करण्याच्या संबंधातील असामर्थ्य पाहून राजा द्रुपद चिंताकुल झाला."

## पद ८४ वे

सक्रोध नृपाधम सारे । गर्जती कर्णमुख वीर ।
नृपसंघाचा अपमान । पांचाल करी हा घोर ।
मानार्थ करू संग्राम । वाहो रक्ताचा पूर ।
(चाल) जाळू हो कन्या होमी ।
द्रुपदास वधू संग्रामी ।
अपमान न साहू आम्ही ।
थरकला मनी पांचाल । ता घोष ऐकता घोर ॥ १ ॥
तै होय सज्ज द्विजवृंद । परि पार्थ तयास निवारी ।
धावत्या कर्णवेगाते । निज शरसंधाने वारी ।
आशीविषदंशापरि तें । बाणजाल रिपु संहारी ।
(चाल) वृक्षदंड घेउनि भीम ।
साह्यार्थ करी संग्राम ।
पार्थावरि प्रेम असीम ।
त्यावरि मद्रप ये वीर । तो घोष ० ॥ २ ॥
(साकी) कर्ण :– तू चापवेद किंवा भार्गव, शक्र की स्वये विष्णू ।
मजसी झगडेसा होता सुत एक पांडुचा जिष्णू ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥
(घनाक्षरी) किती पळति शस्त्रहीन । वीर टिकती पळहीन ।
रणी आच्छादुनि वदन । कुपित रदन घाशिती ॥

---

टीप– "आपली इतकी सुंदर कन्या राजसमूहांतील एकाही राजाला न देता एका ब्राह्मणाला देत आहे असे पाहून ते राजे संतप्त होऊन द्रुपदाला ठार मारण्याच्या व द्रौपदीला जाळून टाकण्याच्या घोषणा करू लागले. सर्वजण अर्जुनावर तुटून पडले."

(दिंडी) पृथा बोले आंतुनी सर्व सेवा ।
नसो थारा अल्पही भेदभावा ।
कर्णशूलासम वाक्य तया वाटे ।
दुःख भय चिंता अंतरात दाटे ।

(साकी) समजाउनि माता धर्म म्हणे अर्जुना इचा विधिने ।
पाणि स्वीकारावा बा तू शक्तिकीर्तीच्या विधिने ॥
धर्म म्हणे पांचाची व्हावी राजनंदिनी भार्या ।
श्रुतिची मातेची सम आज्ञा न च आम्हा परिहार्या ।
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

---

टीप–" भीमार्जुन द्रौपदीसहित घरी आले व " आई आम्ही भिक्षा आणली आहे " असे म्हणाले. तेव्हा " बाळांनो, सर्वजण मिळून तिचे सेवन करा " असे कुंती म्हणाली; परंतु आजची भिक्षा म्हणजे द्रौपदी आहे हे लक्षात आल्यावर आपण फार अनर्थकारक बोललो असे तिला वाटले. नंतर तिने आपले बोलणे तर खोटे होणार नाही व द्रौपदीवर अधर्मकारक अन्याय होणार नाही असा उपाय सुचव, असे धर्मराजाला म्हटले. अर्जुनाने ती जिंकली असल्यामुळे त्याने एकट्याने तिचे पाणिग्रहण करावे असे धर्मराजाने सुचविले. अर्जुनाने ती गोष्ट नाकारली. तेव्हा ही कल्याणी आम्हा सर्वांचीच भार्या होईल असा धर्मराजाने निर्णय दिला."

## पद ८५ वे

कुलालसदनी संकर्षणयुत गुप्तपणे श्रीहरी ।
पातला जो अघनगसंहरी ॥ धृ. ॥
कुंतीच्या चरणासि वंदुनी वदे नंदनंदन ।
करी जो विगतगर्व नंदन ॥
आत्याबाई कृतार्थ झाले गमे आज लोचन ।
पाहुनी तव संकटमोचन ॥
धर्मा भीमा नमुनि जिष्णुला प्रभु दे आलिंगन ।
करिति ते माद्रीसुत वंदन ॥

(चाल) साभिमान बोले धर्मा रक्तेक्षण ।
यापुढे आमुचे खड्ग तुझे रक्षण ।
आर्य दे तया अनुमोदन संकर्षण ।
वदे युधिष्ठिर 'कळलो कैसे सांग सख्या श्रीहरी
दर्शने जो अघनगसंहरी ॥

(साकी) आश्वासन देउनी वाहवी पूर प्रेमाश्रूंचा ।
मग तो जलदश्यामा करुणा घे निरोप धर्माचा ॥
ऐका श्री भारतवार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

टीप–"बलरामासह श्रीकृष्ण पांडवांची भेट घेण्याच्या इच्छेने ते रहात होते त्या कुंभाराच्या घरी आले. त्या सहाही जणांना सुखरूप पाहून ह्या दोघांनाही खूप आनंद झाला. आता यापुढे आम्ही तुमचे संरक्षण करू असे दोघांनीही पांडवांना आश्वासन दिले."

## पद ८६ वे

हे नरनाथा । तेजस्वी बंधू पांच ।
तन्माता गमली । तेजे अदिती साच ॥ धृ. ॥
पाहिले न मी । ज्यापरी तयांचे धाम ।
कळले न तयांचे । यत्नशतेही नाम ॥
मध्यरात्रिला । त्या स्थळी तया भेटाया ।
श्रीकृष्ण पातले । संकर्षणयुत राया ॥
भिक्षान्न तया । वाढिले स्वये वत्सेने ।
नमुनिया तया । सेविले तेच अभिमाने ॥

(चाल) विप्रांचा करिती जरि अभिनय ।
ते द्विज न वाटती मला, क्षत्रिय ।
कुंतीसुत ते भासती दुर्जय ।
लक्ष्यभेद करतो । गमे धनंजय साच ।
तन्माता गमली । तेजे ०

टीप– "लक्ष्यभेद करून द्रौपदीला जिंकून नेणारा हा वीर खरोखर कोण आहे हे समजून घेण्याच्या उत्सुकतेने धृष्टद्युम्न पांडवांच्या पाठोपाठ लपत छपत गेला. त्यांच्या बिऱ्हाडी कृष्ण बलराम आलेले व आणलेल्या भिक्षेचे सर्वांनी सेवन केलेले त्याला दिसले. पण खूप प्रयत्न करूनही त्याला त्यांचे नांव, कुळ, किंवा गोत्र कळू शकले नाही."

## पद ८७ वे

पूजा घेउनि वदे पुरोहित नरपाळे प्रेषिले ।
विक्रमे तन्मन संतोषले ॥ धृ. ॥
पांडु चक्रवर्तीची व्हावी स्नुषा आपुली सुता ।
पार्थ वर तच्चित्ती तत्त्वता ॥
भूतकाल हा असो आपुले गोत्र नाम कुलकथा ।
नृपतिची जाणा मनिची व्यथा ॥
मंदस्मितयुत धर्म वदे पणपूर्तिक्षण उगवता ।
संपले प्रश्न सर्व तत्त्वता ॥
(चाल) कुलहीन कसा उचलील तिथे पाउल ।
बलहीन कसा त्या धनुते कर लाविल ।
सामान्ये कां तो मत्स्यभेद होईल ।
नरपाळाचे तापे व्यर्थचि मानस चितानले ।
विक्रमे ०

(साकी) भूदेव न हो क्षत्रिय आम्ही पांडुराजसुत राया ।
विप्रवेष अवलंब असे हा व्यसनार्णव उतराया ॥
ऐका श्री भारतवार्ता ।
जो तोषद भवदावार्ता ।

---

टीप– "तेव्हा द्रुपदाने आपला पुरोहित पुन्हा पांडवांच्याकडे पाठविला. त्याने धर्मराजांना जेव्हा कुळगोत्र विचारले तेव्हा धर्मराजांनी जे उत्तर दिले ते फारच सुंदर आहे. धर्मराज म्हणाले, हे ब्राह्मणश्रेष्ठ द्रौपदी स्वयंवरासाठी तुमच्या राजाने जो पण लावला तो जिंकणारा मनुष्य दुबळा, नीचकुलोत्पन्न किंवा अस्त्रज्ञानशून्य कसा असेल ?"

## अंजनीगीत पद ८८ वे




द्रौपदीला कुंतीचा आशीर्वाद

पूजुनिया व्यासांच्या चरणा ।
वदला पंचालांचा राणा ।
धर्मसंकटी पदयुग शरणा ।
संरक्षण द्यावे ॥

एकांती नेउनि पंचाला ।
वेदव्यास वदे वाणीला ।
दैवी घटना कथितो तुजला ।
कालेच्छा जाण ॥

(साकी) कुंतीस म्हणे वरिले हे कुरुकीर्ति हेतु जामाते ।
पाळावी दिधली कन्या ही सेवेसि तुझ्या माते ।
ऐका श्री भारतवार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ।

---

टीप—" एका स्त्रीला एकापेक्षा जास्त पति असावे किंवा नाही ही धर्मचर्चा द्रुपद व धर्मराज ह्यांच्यामध्ये चालू असता श्रीव्यास महर्षि तेथे प्रगट झाले. त्यांनी पांचही पांडवांचे पूर्वजन्म कथन करून द्रौपदी ही स्वर्गलक्ष्मी असल्याचे सांगितले. हा पूर्वीचा देवसंकेत असल्यामुळे चिंता न करिता तू अनुमति दे असे ते म्हणाले. त्याप्रमाणे द्रुपदाने पांचही पांडवाच्याबरोबर द्रौपदीचा विवाह लावून कुंतीच्या स्वाधीन तिला केली."

## पद ८९ वे

तै धृतराष्ट्रा । श्री विदुर वदे वार्ता ही ।
पंचाल नरपती । झाला तुमचा व्याही ॥ धृ. ॥
तै अंध वदे । हे संजीवन मूर्तमना ।
पांचालीयुत दुर्योधन आणा नमना ॥
वदला क्षत्ता । ती पाण्डवभार्या कृष्णा ।
नीचांची तन्नाशाची न पुरे तृष्णा ॥
ते द्रुपदपुरी । आहेत नवे जामाते ।
यदुमणी साह्य त्या कथी चार हे माते ॥
(चाल) ऐकता अंध नरपती दचकला ।
डात्र की कुटिल नीतिचा उलटला ।
भाव तो मनीचा मनी लपविला ।
वदला विदुरा मधु अमृतासम वार्ताही ।
मत्पुत्रचि पाण्डव । द्रुपद आमुचा व्याही ॥
(साकी) नसता विदुर वदे दुर्योधन धृतराष्ट्राते 'तात'।
मज बहु दुःखद संप्रति तुमचे मंत्रवर्ण होतात ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

टीप – "विदुरांनी आनंदाची बातमी म्हणून धृतराष्ट्राला सांगितली. पण ती सरळ न सांगता द्रुपद राजा तुमचा व्याही झाला अशा प्रकारे सांगितली. धृतराष्ट्राला वाटले आपल्या दुर्योधनानेच द्रौपदीचे पाणिग्रहण केले. परंतु विदुरांनी त्याच्या भ्रमाचा भोपळा फोडून खरी हकिकत सांगितली. पांडव जळून मेले नाहीत ह्या कल्पनेचे दुःख झाले तरी त्याने वरवर आनंद व्यक्त केला. पण ते दुर्योधनाला आवडले नाही."

(साकी) अंध म्हणे पांडव गुणवर्णन विदुर चित्ततोषार्थ ।
संमत साधन योजाया जे समर्थ तन्नाशार्थ ॥

ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

(घनाक्षरी) वदे तया अंधतनय । अर्पुनिया रत्ननिचय ।
धने वळवु द्रुपदराय । यथा पाण्डवा त्यजी ॥
करू भेद पांडवांत । चार जावे यतचित्त ।
राजकन्येचे चित्त । तद्विरक्त वा करू ॥
चित्त तीक्ष्ण कर्ण वाम । वरी वरितिल परि साम ।
वधू गुप्तपणे भीम । तया काम देउनी ।
तोच शत्रूंचा प्राण । जरी झाला निष्प्राण ।
उरे पाण्डवा न त्राण । गतप्राणसेच ते ।

---

टीप – "आपले खरे स्वरूप विदुरासमोर प्रगट होऊ नये म्हणून मी पांडवांचे गोडवे गायले; त्यांच्या नाशासाठी तुम्हांला जे उपाय योजावयाचे असतील त्यांना माझी अनुमति आहे असे धृतराष्ट्र म्हणाला. तेव्हा दुर्योधन पांडवांच्या नाशाच्या एकापेक्षा एक योजना सुचवू लागला.

(साकी) तो वणवा विझवा भेट दिली जोवरी न त्या वाते ।
यादव साह्यापूर्वी जाउनि ससैन्य निवटू अरिते ॥

ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद ९० वे

ऐकता वदे । रक्तेक्षण गंगातनय ।
क्रव्यादवह्नि सुत तुझा पवन राधेय ॥ धृ. ॥
ते सत्य होय । जे पौर बोलती राया ।
लाक्षागृह रचिले । तूं पाण्डव जाळाया ॥
वार्ता येता । अग्नीत होय तद्‌हवन ।
लोकांना मी । दाखवू न शकलो वदन ।
राज्य न तुमचे त्यांचेहि असे हे जाणा ।
ते बळे स्वर्गिचा । घेऊ न शके राणा ॥
(चाल) सन्माने कुंतीसुता आणवा ।
प्रेमादरपूर्वक तया वागवा ।
होईल कीर्तिचा लाभ हा नवा ।
द्रोणही वदे । हे युक्त वदति गांगेय ।
क्रव्यादवन्हि०

टीप—"दुर्योधनाच्या सगळ्या योजना व्यर्थ आहेत असे कर्णाचे मत पडले. कर्णाने दुर्योधनाला सुचविले की, द्रुपद आणि कृष्ण आपली अपार यादवसेना घेऊन जोपर्यंत पांडवांना मिळाले नाहीत तोपर्यंत तू आपली समशेर त्यांच्यावर फिरव. धृतराष्ट्राने मसलतीसाठी भीष्मांना बोलावले. तेव्हा भीष्मांनी पांडवांना अर्ध राज्य देऊन समेट करावा असें सुचविले. आणि दुर्योधनाला कर्णाची जोड म्हणजे पेटत्या अग्नीला वाऱ्याची साथ मिळावी तसे आहे असे सांगितले."

(घनाक्षरी) वदे क्रोधे राधेय । द्रोण आणि आपगेय ।
हेचि खरे अंतराय । राज्यलाभ व्हावया ॥

## पद ९१ वे

अंबांकस्थित शिशू शशी कवळाया इच्छी मृषा ।
तेवि तव पाण्डवमारण वृषा ॥ धृ. ॥
एकाकी द्रुपदपुरी पार्थे केले तव कन्तन ।
तदा कां वरिलेसि पलायन ॥

प्रेतमांसमत्ते जंबूके सिंहाव्हान न वृथा ।
तेवि तव पार्थ पराभव कथा ॥

(चाल) एकाकी उरले ते न आज पाण्डव ।
पांचाल आणि त्या साह्य जाण यादव ।
उघडता कशास्तव मृत्युगर्त हा नव ।
गमे मुमूर्षो कुलनाशाची तुला लागली तृषा ।
तेवि तव०

(साकी) अंध वदे हे मूर्ख करावी क्षमा जोडितो हात ।
जा विदुरा आणाया पाहो वदन सुनेचे तात ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

---

टाप— "पांडवांना घरी आणावे हा भीष्मद्रोणांनी दिलेला सल्ला कर्णाला पसंत नव्हता. त्याच्या मताने भीष्मद्रोणांचाच राज्यलाभात खरा अडथळा होतो. परंतु विदुरांनी पुढे होऊन धृतराष्ट्राला सावध करून कुलनाश टाळण्याचा प्रयत्न केला. धृतराष्ट्राने पांडवांना आणण्याकरिता विदुरांचीच योजना केली."

(श्लोक) प्रभूत धन घेउनी विदुर जाय आणावया ।
पृथातनय वंदिता अति उदश्रु झाले तया ।
बलासहित भेटले कमलनेत्र त्या श्रीहरी ।
द्रवद्हृदय होउन कवळितो तयाते उरी ॥

## पद ९२ वे

मग विदुर वदे त्याही वदती नरपाळ ।
पाठवा सुनेसह बाळ ॥ ध्रु. ॥
सुतविरहाचे तीव्र दुःख अनुभविले ।
संजीवन आज मिळाले ॥
पंचाल वदे जे बल-श्रीकृष्णा मान्य ।
सर्वथा होय ते मान्य ॥

घननीळ वदे तै मंदस्मितयुत राया ।
दे तोष पित्याच्या हृदया ॥
(चाल) जनकाचे प्रेम अपूर्व ।
मानावे मंगल पर्व ।
परमेश्वर जाणे सर्व ।
क्षत्ता जाणे जे गूढ वदे घननीळ ।
पाठवा०

---

टीप– "कुंती आणि द्रौपदी यांच्यासहित पांडवांना आणण्याकरिता विदुर द्रुपद नगराला गेले व ह्या सातही जणांना स्वतःच्या राजधानीत पाठविण्याविषयी त्यांनी द्रुपदाला विनंती केली. कृष्ण बलरामांच्या संमतीने द्रुपद राजाने पांडवांना जाण्याला परवानगी दिली."

(साकी) प्रणता देते पदपद्माचे ज्याच्या रजहि गतीते ।
त्या प्रभुमते परतता सुखविति ते सदार जगतीते ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदात्रार्ता

## पद ९३ वे

चिरवांछित ते नरेन्द्र करिती प्रवेश जे गजपुरी ।
झाले स्वागत अमरापरी ॥ धृ. ॥
पौर म्हणति ही राजनंदनी नव्हे नगर देवता ।
घेउनी आली या देवता ॥
असता त्या गजपुरी वदे त्या स्वार्थे संप्रेरित ।
अंध हा नीच असे मत्सुत ॥
राज्यार्ध स्वीकार करा व्हा स्वतंत्र हे शुभकर ।
त्यजा हा पापबुद्धि सत्वर ॥
(चाल) खाण्डवप्रस्थ वासार्थ वीर निवडिती ।
श्रीकृष्णानुमते नवे नगर वसविती ।

वाटली पुरी ती नूतन द्वारावती ।
त्रिभुवन शिल्पी वास करीती निर्माया तै पुरी ।
झाले स्वागत अमरापरी ॥

---

टीप— "द्रुपदाच्या अनुज्ञेने कुंती, द्रौपदी व कृष्णबल ांच्यासह पांडव हस्तिनापुरांत आले. नागरिकांनी त्यांचे हर्षाने स्वागत केले. पुन्हा कलह होऊ नये म्हणून खांडवप्रस्थाचे राज्य धृतराष्ट्राने त्यांना दिले. त्या प्रदेशांत त्यांनी सुंदर नगर बांधले."

## पद ९४ वे

इंद्रप्रस्थी वीणापाणी ये सुरमुनि नारद ।
म्हणति ज्या भवजलनिधिपारद ॥ धृ. ॥
सत्कारुनि पूजिती यथाविधि पाण्डव मुनिनायका ।
वंदी कृष्णा कृष्णालका ॥
वदे महर्षी एक विषयरत करा समय हितकर ।
अन्यथा ऐक्यनाश सत्वर ॥
सुंद आणि उपसुंद सहोदर बंधू दैत्या णी ।
विक्रमे ज्या धाके सुरमणी ॥
विश्वांतिल लावण्य घेउनी अनुपमेय सुंदरा ।
विनिर्मी ब्रह्मदेव अप्सरा ॥

(चाल) ती तिलोत्तमा लावण्यलता पाहुनी ।
अभिलाषा दोघांच्याहि उद्भवे मनी ।
उन्मादे वधिती परस्परा धावुनी ।
संयम पाळुनि करा समय जो कलहरोग पारद
म्हणति ज्या ०

(साकी) समय असा करुनिया वर्तता एकदा असे घडले ।
गोधन एका विप्रवराचे दस्युच्या करी पडले ॥
पार्थ म्हणे ब्राह्मणार्थ लागो नियमलंघने शब्द ।
बारांची काय कथा शतही वनी घालवू अब्द ॥

ऐका श्री भारतवार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ।

टीप—" पांडवांच्या राजधानीचे नांव इंद्रप्रस्थ, एकदा नारदांनी पांडवांच्याकडे येऊन असा उपदेश केला की, द्रौपदीच्या बाबतीत पाचही भावांनी आपल्याला एका नियमाचे बंधन घालावे. तो नियम हा की, एका भावानें दुसऱ्याला द्रौपदीशी एकांतांत पाहिले तर त्याने बारा वर्षे वनवासात जाऊन ब्रह्मचर्याने काळ घालवावा. असें न केल्यास ऐक्य टिकणें कठीण आहे. यासाठी सुंदोपसुंदांची कथा त्यांनी सांगितली.

(साकी) तीर्थाटन करिता आनंदे गंगाद्वारी पार्थ ।
करी वास सत्कर्म व्हावया विप्रासह अनपार्थ ॥
ऐका श्री भारतवार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद ९५ वे

श्रीनारायण चरणसंभवा देवी मंदाकिनी ।
अवलोकुनि पार्थाच्या आले प्रेमाश्रू लोचनी ॥
प्रणामांजली विश्वमंगला देवीला अर्पुनी ।
अभिषेकास्तव जली उतरला पार्थ अर्घ्य अर्पुनी ॥
देवनदीसलिली अवलोकी तया नागकन्यका ।
हृदय तयेचे लक्ष्य होय तै मकरध्वज सायका ॥
चरण कवळुनी आकर्षी त्या अंतर्हित राहुनी ।
असहायपणे अर्जुन नेला नागलोकि ओढुनी ॥
(चाल) सुसमिद्ध पाहुनी तिथे हव्यवाहन ।
भक्तिने धनंजय करी हवी अर्पण ।
प्रार्थना करी त्या झांकुनिया लोचन ।
तो ये नूपुरनाद गमे तो कर्णरसायन मनी ।
अवलोकुनि ०

टीप—" एकदा एका ब्राह्मणाच्या गायींचे चोरांपासून संरक्षण करण्याकरिता शस्त्रे आणायला अर्जुन शस्त्रागारात गेला. तेथे त्याने धर्मराज व द्रौपदी यांना पाहिले. सर्वांचा निरोप घेऊन तो वनवासाला निघाला असता गंगाद्वारी आला. स्नानार्थ तो पाण्यांत उतरला. कल्पना नसतांना त्याच्या सौन्दर्यावर मोहित होऊन नागकन्येने त्याला पाताळांत नेले."

(श्लोक) पृथुश्रोणिश्रान्ता उदितमदना खिन्नवदना ।
तदा पाहे कुंतीतनय नयनी कुंदरदना ।
वदे चित्ती झाले सफल ववुनी रूपनयन ।
प्रकाशे या स्निग्धामृतरसमये धन्य सदन ।

(साकी) ती ऐरावत नागप वंशज कौरव्यसुता आर्या ।
विभ्रम दाउनि विविध मनोरम होय जिष्णुची भार्या ।
ऐका श्री भारतवार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

(दिंडी) अमित पुण्यद उत्तरापथी तीर्थे ।
देवतायतने निरीक्षिली पार्थे ।
विप्रवृंदा तो करी तुष्ट दाने ।
वंशकीर्ती सद्‌गुणे विस्तराने ॥
असा भ्रमता मणिपुरी पार्थ आला ।
चित्रवाहन ये भूप दर्शनाला ।
मुदे सत्कारी अर्जुना नरेंद्र ।
मनी झाला संतुष्ट मानवेन्द्र ॥

---

टीप– "रूपयौवनसंपन्ना अशी ती नागकन्या उलुपी अर्जुनानें आपला स्वीकार करावा म्हणून मनधरणी करू लागली. अर्जुन व्रतस्थ होता. तरी त्याला त्यातून पळवाट दाखवून तिने आपला हेतू सिद्ध करून घेतला. तेथून अर्जुन पुष्कळशी तीर्थे पहात पहात मणिपूर राज्यात आला."

## पद ९६ वे

नरेन्द्रकन्या चंद्रज्योत्स्नेपरी मनोहारिणी ।
गवाक्षमार्गे निरखित होती शशिकुलचूडामणी ।
तेजस्वी क्षत्रिय धर्माचे मूर्ताविष्करण ।
पार्थरूप पाहुनि जडले त्यावरि अंतःकरण ॥
कन्येचे जाणुनी हृदय मणिपूरपति विजया ।
विनवी पाणिग्रहण करावे कन्येचे सदया

(चाल)　पुत्रिकाधर्म वरुनी ही चित्रांगदा ।
अर्पितो करी स्वीकार विचित्रांगदा ।
प्रार्थितो निवारी कन्याचिंतागदा ।
अप्रार्थित भाग्याचा या स्वीकार करी नरमणी ।
गवाक्षमार्गे ०

---

टीप– " मणिपूरची राजकन्या चित्रांगदा खिडकींतून अर्जुनाचे रूप न्याहाळीत होती. अर्जुनाने तिच्या रूपावर मोहित होऊन राजाजवळ तिची मागणी केली. त्या राजाचा मुळांत एकपुत्री वंश होता. त्यातूनही त्याला ही कन्या. तेव्हा तिचा होणारा प्रथम पुत्र मणिपूर राजवंशाच्या वृद्धीसाठी देण्याचे अर्जुनाजवळून कबूल करून घेऊन चित्रवाहनाने आपली कन्या त्याला दिली."

(अभंग)　स्त्रीरत्न सुभद्रा सुरूप ती जाण ।
ऐकुनि अर्जुन संतोषला ॥
कामाने व्यापिले अर्जुनाचे मन ।
जपतप ध्यान विसरला ॥

(साकी)　चलो उधो अब तो हे बताऊं धनुखधारि संन्यासी ।
कामिन कानन धूंड फिरत है कहताती रथबासी ॥

(अभंग)　तेव्हा आठवीला दीनाचा कैवारी ।
संकट निवारी देवराया ॥
शीघ्र धावोनिया आलासे गोविंद ।
पुरवाया छंद अर्जुनाचा ॥

(दिंडी)　हरी बोले कां मला आठवीले ।
सांग विजया तुज दुःख काय झाले ।
येरु बोलें सर्वही धैर्य गेले ।
तुझ्या भगिनीने वेड लावियेले ।

---

टीप– " मणिपूरच्या राजकन्येशी विवाहबद्ध होऊन तिला पुत्ररत्न होईतो॰ पर्यंत अर्जुन तिथेच राहिला. पुढे पश्चिम किनाऱ्याने फिरत फिरत अर्जुन प्रभासक्षेत्री आला. तिथे त्याला श्रीकृष्णांचे दर्शन झाले. ते दोघेही रैवतक पर्वताच्या उत्सवासाठी गेले असता कृष्णभगिनी सुभद्रा अर्जुनाच्या नजरेस पडली."

(अंजनीगीत) तुवा केले तीर्थाटन । सदा चित्ता समाधान ।
आता हे विषयाचे ध्यान । कासया तूते ॥
घ्यावा यमनियमांचा ध्यास ।
सोडावी विषयांची आस ।
पार्था तूं घ्यावा संन्यास ।
आशापाश तोडावा ॥

## पद ९७ वे

क्षुधातुरा विष द्यावे तैसे सख्या काय सांगसी ।
सदाचा मज समजुनि तापसी ॥
संन्यासी होता धर्माचे दुःखी होइल मन ।
माता संपवील जीवन ॥
संन्यासाचा अधिकार न राजन्या शास्त्रे दिला ।
काय बा धर्मलोप चांगला ॥
कामातुर पार्थाचे हे ऐकुनिया परिदेवन ।
भविष्या चिंती मनमोहन ॥
धर्माच्या नव राज्या येईल स्थैर्य पूर्ण यास्तव ।
करावे पार्थ स्वप्न वास्तव ॥

(चाल) हा वृष्णिकुरु संबंध जरी होइल ।
संकर्षणशक्ति सदा साह्य राहिल ।
पापिष्ठांचा आधार नष्ट होइल ।
कूटनीतिचा प्रयोग करण्या करी सिद्ध मानस ।
सदाचा मज०

टीप– "अर्जुन सुभद्रा विवाह झाला तर पांडव व बलराम यांचे ऐक्य झाल्यामुळे पांडवांनी नवीनच स्थापन केलेल्या राज्याला स्थैर्य व बल प्राप्त होईल ह्या विचाराने श्रीकृष्णानी अर्जुनाची सुभद्रा मिळविण्याची इच्छा पूर्ण करण्याकरिता सर्वप्रकारे त्याला साह्य दिले."

(अंजनीगीत) वंचावया बलदेवासी । पार्था तूं व्हावे संन्यासी ।
तरिच सुभद्रा ती गुणराशी । लाभेल तुजला ॥

यापरि बोलुनि नारायण । करुनी त्याचे समाधान ।
द्वारकेसी करी गमन । तै यादव राणा ॥

(साकी) कपट यतीची कीर्ती कळता रामही म्हणे पाहू ।
प्रार्थूनि या आणुनि भिक्षेला शीर्ष तत्पदी वाहू ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

(श्लोक) आणोनिया निजगृही यतिलागि रामे ।
पूजोनिया निजमने बहुपुष्प दामे ।
तो जेविता हसतसे बहु चक्रपाणी ।
जो गाइला मुनिजनी बहु या पुराणी ॥

(साकी) यतिदर्शना सुभद्रा बैसे तै निजाग्रजाजवळ ।
कपट यतीचा तिला पाहता हस्तगत गळे कवळ ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

---

टीप – "श्रीकृष्णांनी अर्जुनाला त्रिदंडी सन्यास दिला. बलरामांच्याजवळ संन्याशाची खूप स्तुति करून त्याला घरी आणले आणि सुभद्रेला त्याच्या सेवेला दिले."

(श्लोक) सुभद्रेचे धामी उचित बसणे या यतिवरा ।
अहो या पुण्याने सुगुणि झणि लाभेल नवरा ।
म्हणे बाहे बुद्धि परमकुशला दुर्लभ अशी ।
मिळाली कोठोनी वद वद सख्या सांग मजशी ॥

(घनाक्षरी) तदा रैवतकी पर्व । जाति यात्रेला सर्व ।
पूजिती भावे शर्व । अमित शर्म व्हावया ॥
वदे तै मेघश्याम । भक्तमानस विश्राम ।
झणी होइ पूर्णकाम । समय साधुनी सख्या ॥

## पद ९८ वे




सुभद्राहरण

प्रलयंकर शंकरसा तो। खवळला प्रभू बलराम।
दुंदुभी वाजली घोर। सुचवी दारुण संग्राम।
तें सभेत यादववीर। पातले शीघ्र बलधाम ॥
(चाल) रक्तेक्षण बोले राम।
भगिनी अमुची अभिराम।
हरिली पार्थे निष्काम।
दाखवू तयाते शीघ्र। मृत्यूचें भीषण धाम ॥ १ ॥
गर्जना उठे तै घोर। संग्रामी पार्थ वधू या।
श्रीकृष्ण परी निःशब्द। त्या सभांगणी पाहुनिया।
संशयोर्मिमाला ग्रासी। तै श्रीसंकर्षण हृदया।

(चाल) हा सखा नव्हे बा पाप।
ठेचावा जैसा साप।
परि समजुनि त्या निष्पाप।
मानिसी काय हे कृत्य। पापत्मक परि अभिरामा।

---

टीप—"अर्जुनाच्या यतिवेषाला बलराम भुलले. परंतु अर्जुनाने सुभद्रेला रथांत घालून पळविली, तेव्हा त्यांचा भयानक संताप झाला. पार्थाला मारण्याची गर्जना ते करू लागले. या सर्व प्रकरणांत कृष्ण मात्र स्तब्ध होते."

## पद ९९ वे

श्रीकृष्ण वदे। मी चरण वंदितो आर्या।
आशीर्वच द्या या मंगल विवाह कार्या॥ धृ.॥
मज सांगावे। या जगी कोण राजन्य।
जो करू शके माझ्या पार्थाशी जन्य।
मत्सख्यापरी। शौर्य धैर्य सद्गुणधाम।
कोणीही न दिसे तेजस्वी अभिराम।
सद्भाग्ये हा। लाभला पती वत्सेला।
वांच्छित वत्सेचे हेच कथी तो मजला।
(चाल) हा मणिकांचन योग जी हलधरा।
निरपराध जय मारणी का त्वरा।
अपराधी पार्थ न परी मी खरा।
वत्सेसह विजया सदनी आणू आर्या।
आशीर्वच द्या या ०
(साकी) बहु रंजवी प्रियेच्या करूनी सांत्वन पार्थ मनाते।
प्रेषी गोपीवेषे भद्रा द्रुपदजांघ्रि नमनाते॥
देवि तुझी प्रेष्या ती म्हणता गहिवरली अति कृष्णा।
रहा सुखी वदली भगिनी तू शोभलीस श्रीकृष्णा॥
ऐका श्री भारत वार्ता।
जी तोषद भवदावार्ता॥

टीप—"श्रीकृष्णांनी अर्जुनाची योग्यता कथन करून बलरामांना अर्जुन-सुभद्रा विवाहाला उद्युक्त केले आणि अर्जुन सुभद्रेला घेऊन इंद्रप्रस्थाला पोहोचण्याच्या आंत त्यांना सन्मानपूर्वक परत आणून त्या दोघांचा विधिपूर्वक विवाह लावून दिला. वनवासाचा काळ संपेपर्यंत द्वारकेतच राहून अर्जुन सुभद्रेला घेऊन इंद्रप्रस्थात गेला. द्रौपदीच्या भेटीला अर्जुन गेला असता ती त्याला पुष्कळ प्रकारांनी बोलली. तिचे सांत्वन करून गोपीवेषांत सुभद्रेला तिच्या दर्शनासाठी अर्जुनाने पाठविली."

## पद १०० वे

शक्रप्रस्थी रामकृष्ण येती आंदण घेउनी।
वंदिती यत्पदनख सुरमुनी ॥ धृ. ॥
संकर्षण परतले आग्रहे राहे प्रभु त्या पुरी।
पदांबुज ज्याचे अघ संहरी ॥
चित्र असावे निज रूपाचे पार्थगृही यास्तव।
रूप घे ते ईश्वर यास्तव ॥
तो अभिमन्यू प्राण बहिश्चर श्रीकृष्णाचा गमे ॥
जयाविण पळ न देवमन रमे ॥
(चाल) कोदंड वेद पंडित तो पार्थासम।
निर्भय रणरंगी वाटे कृष्णासम।
सुखवी जनहृदया चंद्रज्योत्स्नेसम।
उठे तया पाहुनि हर्षाचे ताण्डव पाण्डवमनी। वंदिती०
(साकी) द्विजरूपी हुतवह एकांती श्रीकृष्णा भेटोनी।
याची खांडववन व्हायाते रोगमुक्त पेटोनी ॥
ऐका श्री भारत वार्ता।
जी तोषद भवदावार्ता ॥
(दिंडी) कुणी पूर्वी श्वेतकी राय होता। अध्वरांचा जो असंख्यात होता।
आज्य यज्ञी त्या अमित भक्षियेले। अग्निदेवाही अग्निमांद्य झाले।
अजीर्णे तो अति पीडिला हुताश। रूक्षभक्षण औषधी त्या गदास।
लक्षि खांडव परि रक्षि त्या महेन्द्र। प्रार्थि यास्तव भग्नाश द्वारकेन्द्र।

टीप—"अर्जुन इंद्रप्रस्थाला गेल्यावर श्रीकृष्ण व बलराम मोठमोठे नजराणे घेऊन इंद्रप्रस्थाला गेले. लग्नाचा अहेर देऊन व पांडवांनी केलेला आदरसत्कार

घेऊन बलराम द्वारकेस परतले, पण श्रीकृष्ण तेथेच राहिले. कांही दिवसांनी सुभद्रेच्या पोटी अभिमन्यूचा जन्म झाला. पुढे एकदा कृष्णार्जुन जलक्रीडा करण्यास्तव गेले असता एक तेजस्वी ब्राह्मण त्यांच्याकडे आला."

(साकी) प्रार्थी कपिकेतना मयासुर जी सांगा मज सेवा ।
पार्थ वदे 'सख्य असो' अथवा माग यादवा देवा ॥
(घनाक्षरी) असे कथुनिया मयास । कुंदरदन मंदहास ।
त्वरे जाय निजपुरीस । साधुवंद्य श्रीहरी ॥
(श्लोक) मयहि जाय हिमाचल गव्हरी ।
मुदित हो प्रभु हेच तदंतरी
मिळवि दिव्य सभेस्तव साधना ।
अनृणतेस्तव ती जणु साधना ॥

### पद १०१ वे

शिल्पकलेचा प्रभु तो निर्मी दिव्य सभा भास्वर ।
पाषाणांचा नाद जिच्या करि तुच्छ किन्नरस्वर ॥ धृ. ॥
मणिमय सोपानांच्या वापी दिसति जिथे नयनी ।
स्वर्णिम पद्मपरागसुगंधे गंधित पुष्करिणी ॥
स्थल भासे सलिलासम भासे सलिल जिथे भूमिसे ।
अनर्घ्य रत्नांची ही किमया सुज्ञा लावी पिसे ॥
सुवर्ण सिंहासनी विराजित जिथे धर्मनंदन ।
स्वर्णिम वेदीवरी विराजित दिसे हव्यवाहन ॥
(चाल) विजितामर नगरी दिव्य असे ती सभा ।
मेरुच्या परी उन्मेषपूर्ण तत्प्रभा ।
अर्पिती तपाची मुनिहि तिथे दिव्य भा ।
वीणापाणी यदृच्छया ये तेथे मुनि भास्कर ।
पाषाणांचा ०

टीप — "कृष्णार्जुनांनी अग्नीला खांडववन खाण्याची परवानगी देऊन संरक्षणाची हमी दिली. त्या वनातील पशु, पक्षी होरपळत असताना मय नांवाचा दैत्य अर्जुनाच्या दयेने त्यातून सुटला."

# सभापर्व

(श्लोक) वीणा ज्यांची डुलवित दिशा घे वहावा वहावा ।
पायी ज्यांच्या वरि जडविल्या चांदण्या त्या खडावा ॥
(साकी) तच्चरण प्रक्षाळुनि, चिंतिति पर महर्षि तें पाणी ।
सेवुनि जोडी जोडी गुरुकुल केतु परमानंदे पाणी ॥
वर्तत आले जैसे पूर्वज साधु भीष्मपर्यंत ।
वर्तसि तसेच की तू करिसी सद्यशोर्थ अयंत ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद १०२ वे

वदले नारद तुझ्या सभेहुनि पांच वरिष्ठा सभा ।
पाहिल्या ज्यांचो अति दिव्यभा ॥ धृ. ॥
शक्र वरुण यम गुह्यक पतिच्या सभांत मी राहिलो ।
पितामह सभा सुखी रंगलो ॥
मूर्तिमंत वेदराशि शास्त्रे ब्रह्मरूप सुरमुनी ॥
शोभती पितामह सभांगणी ॥
राजर्षि ब्रह्मर्षी सर्वहि यमसभेत नांदती ।
भेटला पिता तुझा मजप्रती ॥
सभेत राया देवेन्द्राच्या एकचि बा नरपति ।
नांदतो हरिश्चंद्र संप्रति ॥
(चाल) आश्चर्ये बोले धर्म मुने हे कसे ?
त्या राजर्षीचे कर्म कोणते असे ?
हे भाग्य पित्याला माझ्या कैसे नसे ?
एकचि भूषवि नरपति कैसा देवेन्द्राची सभा ।
पाहिल्या ०

टीप—" मयासुराने प्राणरक्षणाच्या मोबदल्यांत एक अपूर्व सभा बांधून दिली. त्या मयसभेत धर्मराज विराजमान असता एक दिवस नारदमुनि आले. त्यांनी ह्या सभेहून मोठ्या अशा पांच सभांचे वर्णन केले.

(साकी) हा राजसूय महिमा याची सिद्धि दुर्घट स्पष्ट ।
बहुविघ्नक्षत्रक्षयकर्ता बहुत पावतो कष्ट ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद १०३ वे

पुसे धर्मसुत ऋत्विग् बंधू आप्तसचिव परिजना ।
न वाटे समाधान परि मना ॥ धृ. ॥
यदृच्छया ये राजमंदिरी कृष्णद्वैपायन ।
करी तै नरेंद्र पदवंदन ॥
विनये बोले " ज्ञानभास्करा दर्शन झाले तमी ।
करावा राजसूय काय मी ? ॥
प्रत्युत्तर दे मंदस्मितयुत सत्यवतीनंदन ।
साक्ष दे काय बा तुझे मन ॥
(चाल) संग्राम घोरतर यज्ञी अंतर्हित ।
होतील वंश शूरांचे अपमानित ।
तव ऋजु स्वभावा हे गमेल का हित ।
विजिगीषु तेजस्वी क्षत्रांच्या यज्ञ रुचे हा मना ।
न वाटे ०

---

टीप—" इतर सर्व राजे यमसभेत असता हरिश्चंद्र मात्र देवेन्द्राच्या सभेत बसतो याचे आश्चर्य वाटून त्याचे कारण युधिष्ठिरांनी नारदांना विचारले. राजसूय यज्ञाचा हा महिमा आहे असे सांगून पंडू राजाची भेट होऊन त्याने धर्मराजांना राजसूय करण्याबद्दलचा सांगितलेला निरोप नारदमुनींनी सांगितला. "

धर्मराजांनी अकल्पित आलेल्या व्यास महर्षींचा राजसूयासंबंधांत विचार घेतला.

(साकी) तो इन्द्रसेन दूत नव्हे परि शुद्धभाव रायाचा ।
तद्भक्तिवधू हार जणू श्रीवल्लभा वरायाचा ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद १०४ वे

श्रीकृष्ण वदे । आकांक्षा क्षत्रोचित ही ।
परि जिंकावी । लागेल रत्नगर्भा ही ॥ धृ. ।

वाटे न मला । हे सहज साध्य नरनाथा ।
पाहिले न तू । विक्रमार्क मागधनाथा ॥
वधिता कंसा । तो होय आमुचा वैरी ।
मद्वधकामे संग्राम करी तो भारी ॥
तद्भये नृपा । सोडुनिया मथुरा नगरी ।
द्वारका वसविली । जाण अब्धिच्या उदरी ॥
भारतात जे । दिसताति नृपोत्तम साचे ।
ते असतो राया । दास जरासंधाचे ॥

(चाल) स्वाधीन भीष्म विक्रमे कौरव ।
श्रीसंकर्षण विक्रमे यादव ।
दचकती अन्य ऐकता पदरव ।
धाके त्याच्या । निर्वीर्य गमे पृथ्वी ही ।
परि जिंकावी ०

---

टीप – " धर्मराजांनी श्रीकृष्णाचा सल्ला घेण्याकरिता इन्द्रसेन नांवाचा दूत कृष्णांना आणण्याकरिता द्वारकेला पाठवला. श्रीकृष्णांनी तत्कालीन राजकीय परिस्थितीची कल्पना देऊन मगधेश्वर जरासंधासारख्या अति पराक्रमी राजाचा वध केल्याशिवाय राजसूय यज्ञ करणे शक्य होणार नाही असा सल्ला दिला. "

## पद १०५ वे

अनपत्यत्वे दुःखी राजा मगधेश्वर निज मनी ।
चंड कौशिकाख्य सेवी मुनी ।। धृ. ।।
वरदेश्वर तो आम्रतरुतळी परमेश्वर चिंतनी ।
सदा ध्यानस्थ दिसे लोचनी ।।
नृप सेवेने प्रसन्न झाला आम्रफल तयास दे ।
भास्वर सुत होईल हे वदे ।।
राज्ञीद्वय समभाग भक्षिते शकलें द्वय जन्मली ।
चत्वरी आणुनिया टाकिली ।।
जरा राक्षसी भक्षाया ती सांधी जो सत्वर ।
झाला कुमार अति भास्वर ।।
(चाल) प्रार्थना करी नरनाथ जरा दे तया ।
संबोधन करिती जरासंघ सर्व या ।
सामर्थ्य ऋषीचे रक्षी विश्वी तया ।
पराक्रमे सम्राट जाण तो आज जगी नरमणी ।
चंड कौशिकाख्य ०
(साकी) कूट नीतिचा प्रयोग करूनी वधिले मी ते समयी ।
लूनपक्ष गरुडासम राजा जरासंघ या समयी ।।
न्यास मला हे भीमार्जुन दे करीन वध कार्याते ।
अर्पितील भीमसेन बाहु विजयश्री आर्याते ।
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ।।

---

टीप – "मगधेश्वर बृहद्रथ राजाला दोन स्त्रिया असूनही त्याला मुलगा नव्हता. गौतम ऋषींचे पुत्र महातपस्वी चंडकौशिक मुनींनी राजा बृहद्रथाच्या सेवेने संतुष्ट होऊन एक फळ दिले. तो हा जरासंध. ह्याला मारण्याकरिता भीमार्जुनांची सोबत श्रीकृष्णांनी धर्मराजाला मागितली."

(साकी) कुंत्याशी धर्माज्ञा घेउनि वरुनि विप्रता राया ।
सत्वर निघतो मगधेन्द्राते ते कवि प्रताराया ।।
ऐका श्री भारता वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ।।

मराठी ग्रंथ संग्रहालय १०१ ठाणे ९८८५३ संदर्भ शाखा (स्थल)

## पद १०६ वे

भुज प्रहारे शृंग भंगुनी अद्वारे श्रीहरी।
जाय दोघांसह मागध पुरी ॥
वेषे स्नातक विप्र मानुनी मगधेश्वर हर्षित।
तयांचे करी तदा स्वागत ॥
वदे श्रीहरी " राया असती मौनव्रत हे मुनी।
निशीथी वदतिल व्रत सारुनि।
अग्निमंदिरी वसवुनि त्यांते रात्री मगधेश्वर।
भेटला त्यांते बलसागर ॥
वदे दुंदुमिध्वंस कशास्तव अमार्ग कां घेतला।
वेष विप्रांचा कां घेतला।
(चाल) ज्या किण दिसतो कैसे मणिबंधावरी।
स्नातकव्रती पुष्पा न कधी स्वीकरी ॥
सत्कार आमुचा कां न घेतला परी।
विप्र तुम्ही अथवा क्षत्राधम सत्य वदा वैखरी।
जाय दोघांसह०

---

टीप"—श्रीकृष्ण व भीमार्जुन तिघेजण स्नातक ब्राह्मणांचा वेष घेऊन मगध देशांत आले. नगरद्वारावरील नौबदी फोडून चैत्यक प्राकाराचे शिखर फोडून अशा रीतीने राजद्वारातून प्रवेश न करता जरासंधाजवळ येऊन पोहोचले. त्यांचे जरासंधाने स्वागत केले, पण बाह्य लक्षणांवरून ते ब्राह्मण नाहीत हे ओळखून त्या ढोंगी लोकांचा त्याने धिक्कार केला.

(साकी) मागध बोले 'हो ! विप्रांचा शत्रु मी नसे भक्त।
तुम्हां पाहिले न कधी कैसी शत्रुता वदा व्यक्त ॥
ऐसे कोणीहि कधी केले नाहीच कर्म मागे।
व्हावे या दुष्कर्मे देवासह भस्मचि हे मागे ॥
ऐका श्री भारत वार्ता।
जी तोषद भवदावार्ता ॥

## पद १०७ वे

हे करू नये नरवीरा। अति नृशंस दारुण कर्म।
मूर्धाभिषिक्त पशुसे कां। यज्ञांत होमिणे धर्म।
राक्षसी क्रियेने राया। लाभेल तुला कां शर्म।

(चाल) मग तुज यूपी बांधाया।
पशुसे तव हनन कराया।
तव मांसे हवन कराया।
जरि सज्ज जाहलो आम्ही। होईल न तें दुष्कर्म॥

(साकी) तोडावे बंध सकळ सोडुनि भूप हात जोडावे।
राजानें रक्षावे अथवा धर्मसेतु मोडावे॥
ऐका श्री भारत वार्ता।
जी तोषद भवदावार्ता॥

---

टीप – "आडमार्गाने येण्याचे कारण जरासंधाने त्यांना विचारले तेव्हां कृष्णांनी शत्रुगृही आडमार्गाने आणि मित्रगृही राजमार्गाने जावे या राजनीतीचे स्मरण करून दिले. जरासंधाला ब्राह्मणांच्याविषयी प्रेम असल्यामुळे त्याला शत्रुत्वाचा अर्थ उलगडेना. रुद्रदेवतेला संतुष्ट करण्याकरिता मूर्धाभिषिक्त राजांचा बलि देऊन नरयज्ञ करावयाचा जरासंधाचा विचार इष्ट नसून घातक आणि राक्षसी आहे असे श्रीकृष्णांनी त्याला सांगितले."

(साकी) मागध म्हणे मखार्थ प्रोक्षित पशु भये न सोडीन।
कर ईश्वरासि तद्रूपी वा ब्राह्मणासि जोडीन॥
ऐका श्री भारत वार्ता।
जी तोषद रणदावार्ता॥

## पद १०८ वे

नरसिंह गर्जना करिती। दिक्कोन निनादित साचे।
अम्बरी अप्सरा संघ। निज लाभेच्छेने नाचे।
ते तेरा दिन अविराम। चालले युद्ध दोघांचे।

(चाल) मागधा पाहुनी क्लांत।
तै वदे रुक्मिणीकांत।
भीमाते वधसंकेत।
दुर्लभ हा क्षण कौन्तेया। बल दावी वायुसुताचे।

(दिंडी) तुम्हा अर्पी जो नव्या जीवनातें।
करा वंदन त्या ज्येष्ठ पांडवाते॥
राजसूया करणार धर्मराज।
तया साह्य करा हेच पुण्यकाज॥
वदति गद्गद नृप वंदुनी पदास।
धर्मराजाचे आम्ही क्रीतदास॥
आम्हा लाभावा धर्म चक्रवर्ती।
हीच अभिलाषा जाण चित्तवर्ती॥

---

टीप—" बळी देण्याकरिता आणलेल्या राजांना मुक्त करून त्यांची क्षमा माग किंवा आमच्याशी युद्ध करून यमसदनी जा असे श्रीकृष्णांनी म्हणताच जरासंध भीमाबरोबर युद्धास तयार झाला. दोघांचेही अविश्रांतपणे तेरा दिवस अहोरात्र युद्ध झाले. चौदाव्या दिवशी थकलेल्या जरासंधाला ठार करून त्याच्या बंदीतील राजांना कृष्णांनी सोडविले व साम्राज्यपदासाठी यत्न करणाऱ्या व राजसूय यज्ञ करण्याची इच्छा करणाऱ्या युधिष्ठिरास मनोभावे साह्य करावे असा त्यांना आदेश दिला."

## पद १०९ वे

अभय देउनि सहदेवाते। वदे घननीळ तदा त्याते।
शत्रुता केवळ पापाशी। न बा कोणाहि मानवाशी।
वधिला पिता पापराशी। पाहु पुत्रापरि तुजशी।
करी अभिषेक मुदे त्याते। वदे०
घेउनी मागधकृत पूजा। भेटला देव धर्मराजा।
वदे गद्गदस्वरे राजा। करी हा भीम महत्काजा।
गौरविल इतिहासहि याते। वदे०

(साकी) करुनि चतुर्दिग्जय द्रविणाचे अमित राशि जोडूनी ।
स्वपुरा आले विजित नृपांचे मन न अल्प मोडूनी ॥
धर्म म्हणे दीक्षा तुज साजे प्रभो मज न यज्ञाची ।
हो सम्राट् सर्वेषा तृप्ति होईल नयज्ञांची ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जो तोषद भवदावार्ता ॥

---

टीप– "जरासंधाचा मुलगा सहदेव याला श्रीकृष्णांनी मगधाधिपति म्हणून अभिषेक केला व त्याच्या पूजेचा स्वीकार करून श्रीकृष्ण भीमार्जुनासहित इंद्रप्रस्थास आले. पुढे पांडवांनी चारी दिशांना महान् विजय संपादन करून अपार धन मिळविले आणि जिंकलेल्या राजांना अभय देऊन आपले अनुपम यश प्रसृत केले. ह्या धनाचा विनियोग अग्नीच्या व ब्राह्मणांच्या संतोषाकरिता व्हावा म्हणून राजसूय यज्ञ करण्याचा आपला मानस असल्याचे युधिष्ठिरांनी श्रीकृष्णांना सांगितले व त्यांनीच यज्ञाची दीक्षा घ्यावी म्हणून आग्रह केला."

## पद ११० वे

भक्तगुणोत्कर्षार्थ रमापति न करावे ते करी ।
वरी निज दासाची नौकरी ॥ धृ. ॥

बा जिंकविल्या दिशा अमित वसु धर्मपुरी भरविले ।
विमत नरपतिचे मद जिरविले ॥
नारदादि ऋषि नृप विट् शूद्रहि तदनुकूल करविले ।
याग नृप करितो हे ठरविले ॥
कामे नेमुनि दिली यथोचित न्हाणुनिया मिरविले ।
सुकंकण यज्ञाचे धरविले ॥

(चाल) यज्ञांत भरविला सुज्ञांचा आपण ।
घेतले विप्रपद धावन ते आपण ।
उच्छिष्टे काढिन मीच करी हा पण ।
जेवण कृष्णेकडे सोपवी सर्वांचे श्रीहरी ।
वरी निज ०

(साकी) जेथे साहित्या श्री भीष्म द्रोण विदुर बहु जपती ।
क्षण न विसरती गुणी अपत्या वृद्ध जेवि मनुजपती ।
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

---

टीप – "तूच सार्वभौम नृपति म्हणून यज्ञ करण्यास योग्य आहेस असे युधिष्ठिरांना म्हणून श्रीकृष्णांनी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, व शूद्र या चतुर्वर्णांचे लोक यज्ञार्थ बोलावले. यज्ञदीक्षा घेतलेल्या धर्मराजाने सर्वांची यथायोग्य अधिकारावर नेमणूक केली. श्रीकृष्णांनी मात्र स्वतःकडे ब्राह्मणांचे पाय धुण्याचे व त्यांची उष्टी काढण्याचे काम घेतले."

## पद १११ वे

त्या पाहोनि समाजाते । वदे गंगासुत रायाते ॥
नभा नक्षत्रे भूषविती । तसे हे तव मख शोभविती ।
समाजा या पाहुनि चित्ती । माझ्या हर्षोर्मी उठती ।
यथोचित करि सत्काराते । वदे ०

## पद ११२ वे

पार्थिता असे । तो वरगुण कुंतीतनय ।
दे प्रत्युत्तर । मेधावी गंगातनय ॥ धृ- ॥
या सभांतरी । घ्यावया अग्र सन्मान ।
श्रीकृष्णाविण अधिकारी आहे कोण ।
नभि नक्षत्रे । निस्तेज गभस्तीपुढती
श्रेष्ठही जगांतील तैसे कृष्णापुढती ॥
तेजोबल विक्रम । धैर्य तपस्या ज्ञान
या सर्वांचे श्रीकृष्ण । बा अधिष्ठान ।
(चाल) यच्चरणामृत शिरि धरी शंकर ।
ब्रह्माहि पदी ठेवितो नित शिर ।

यत्स्मरणे मुक्तासही गहिवर ।
या पूजेने विश्वाची पूजा होय ।
दे प्रत्युत्तर ०

---

टीप – "राजसूय यज्ञ यशस्वी रीतीने पार पडला. महान् महान् सुसंपन्न पुरुषांनी यज्ञमंडप सुशोभित झालेला पाहून पितामह भीष्मांनी पूजार्ह अशा आचार्य, ऋत्विज, आप्त, स्नातक, मित्र व नृप यांची यथोचित पूजा करण्याची युधिष्ठिरास सूचना दिली. यांत अग्रपूजा कुणाची करावी ह्या युधिष्ठिरांच्या प्रश्नाला भीष्मांनी वृष्णिकुलोत्पन्न श्रीकृष्ण असा आपला अभिप्राय दिला."

## पद ११३ वे

सावळे तदा परब्रह्म बाहोनी ।
अभिषेकी प्रेमाश्रूंनी ॥ ध्रृ. ॥
हसुनिया तदा मंदमंद घननीळ ।
पातला आसनाजवळ ॥
स्वर्णासनि त्या इन्द्रनील मणिकांत ॥
बैसला रुक्मिणीकांत ॥
सहदेव करी पूजा देववराची ।
वरवस्त्र भूषणे साची ॥
(चाल) पुष्पवृष्टि करिती देव ।
करिती गायन गंधर्व ।
जयकार गर्जती सर्व ।
तल्लीन दिसे आनंदे देवमुनी ।
अभिषेकी ०
(साकी) नारद भीष्मादिक साधूंच्या होय दृष्टिलाभा जी ।
भांजी मूर्त श्याम प्रभुची चैद्य दृष्टिला भाजी ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जो तोषद भवदावार्ता ॥

---

टीप – "भीष्मांचे अनुमोदन मिळताच सहदेवाने श्रीकृष्णांची यथाविधि पूजा केली आणि श्रीकृष्णांनीही तिचा सानंद स्वीकार केला. सर्वांनाच अतीव हर्ष झाला.

(घनाक्षरी) नवा ऋत्विज आचार्य । नवा नृपसत्तम आर्य ।
मनश्छंदेच अनार्य । अर्चनीय मानिता ।
हविर्भाग श्वानास । जरी अर्पिणे तुम्हांस ।
तरी येथे राजांस । कशास्तव निमंत्रिले ।

**पद ११४ वे**

यादवकुलपांसना तुला वाटे न लाज कां मना ।
कशी तू घेसी अग्रार्चना ।। धृ. ।।
अवमानास्तव निमंत्रुनी नरनाथ धर्मपालक ।
अर्चिता काय गोपबालक ।।
तुझी अर्चना जाण माधवा षंढविवाहापरी ।
गमे उपहासास्पद अंतरी ।।
एक तरी धर्मयुद्ध करुनी गाजविले कां रण ।
पिशुनता हेच तुझे जीवन ।
(चाल) कपटे भोजाधिप सभांगणी मारिला ।
कालाख्य यवन कपटेच तुवा निवटिला ।
कपटेच तुवा राज्यापहार साधिला ।
धर्मात्मा मगधेश्वर वधिता कपटे तुज लाज ना ।
कशी तू घेशी अग्रार्चना ।।

टीप – "श्रीकृष्णांची सहदेवाने अग्रपूजा केली ही गोष्ट शिशुपालास मात्र सहन झाली नाही. जास्त योग्यतेचे पुरुष उपस्थित असता श्रीकृष्णासारख्या नगण्य पुरुषाची पूजा केल्याबद्दल पांडवांना त्याने दोष दिलाच. पण श्रीकृष्णाकडे वळून त्यांनाही अग्रपूजा स्वीकारली म्हणून निर्लज्ज ठरविले."

(दिंडी) तदा धावे संभ्रमे धर्मराज ।
भुजांतरी कवळी सुदृढ चेदिराज ।।
वदे मृदुस्वरे क्रोध हा कशाला ।
काय शोभे हा क्षोभ लोकपाळा ।।
कोण भीष्मापरि अन्य धर्मवेत्ता ।
आपणाहुनि तो वासुदेववेत्ता ।।
वचन त्याचे मानिले बा :प्रमाण ।
न या पूजेचे प्रेम हे प्रमाण ।।

## पद ११५ वे

ज्ञानतपोवृद्धांची केली उपासना मी नृपा ।
मिळविली दिव्य दृष्टिची कृपा ॥
कथितो त्या दृष्टिच्या बळे हा केशव जगदीश्वर ।
चैद्य जाणे न तया पामर ॥
ज्ञानवृद्ध विप्राहुनि वरगुण क्षत्राहुनि हा बळे ।
व्यक्त हे कोणासहि आकळे ।
दानदक्षता शौर्यकीर्ति ही प्रज्ञेचे भाजन ।
तयाचे कां न करू पूजन ॥
संबंधी बांधव यास्तव केशवा न बा पूजितो ॥
सद्गुणास्तव सर्वा पूजितो ।
(चाल) सर्वा समक्ष देवदेव हा पूजिला ।
हे सहन होय ज्याच्या न दुष्ट वृत्तिला ।
मात्सर्ये ज्याच्या सद्वृत्ती जाळिल्या ।
देतो त्या आव्हान कराया प्रतिकारा मी नृपा ।
मिळविली ०

---

टीप– " जळफळाट करून शिशुपाल यज्ञमंडपांतून बाहेर जाऊ लागला तेव्हा धर्मराजाने त्याच्या मागून धावून जाऊन त्याचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला. त्याचे सांत्वन करणे व्यर्थ आहे असे धर्मराजास सांगून भीष्मांनी श्रीकृष्णांच्या अग्रपूजेचे कारण त्याचा नातेसंबंध नसून त्यांची सर्वज्ञता, त्यांचे बळ हेच आहे असे प्रतिपादन केले व ज्यांना तरीही हे मान्य नसेल त्यांनी मनास वाटेल ते करावे असे आव्हान केले."

(घनाक्षरी) तदा बोले सहदेव भूमिराया ।
अग्रपूजा अर्पिली देवराया ।
विरोधक शीर्षी वामपाद माझा ।
या विरोधा हा खड्‌ग सज्ज माझा ॥

## पद ११६ वे

मूर्धाभिषिक्त भूपांचा । हा घोर असे अपमान ।
त्या भ्रष्टबुद्धि भीष्माचा । राखिता कशास्तव मान ।
जय मद्यपान करुनीया । हा धर्म विसरला भान ।
(चाल) घोर युद्ध आरंभू या ।
हा राजसूय उधळू या ।
या श्रीकृष्णास वधू या ।
हे साधन एकचि जाणा । राहिल जेणे सन्मान ।
अनुयायी मगधेन्द्राचे । ते घोर गर्जना करिती ।
धर्माच्या नव साम्राज्या । ते नष्ट करू या वदती ।
वृष्णीसह पांडुसुतांच्या । नाशार्थ योजना करिती ।
(चाल) नेता झाला शिशुपाल ।
कळले परि यादव पाल ।
मौनव्रत घे घननीळ ।
त्या मौनाच्या अर्थाचे । भीष्मासचि होते ज्ञान ।

---

टीप – " सहदेवाने तर अग्रपूजेच्या विरोधी राजांच्या मस्तकावर मी आपला पाय ठेवीत आहे असे म्हटले आणि सर्व सत्पात्र पुरुषांची पूजा केली. त्याच्या या कृतीने शिशुपाल अधिकच क्रोधाविष्ट झाला आणि यादवपांडवांशी युद्ध करण्याची, राजसूय यज्ञाचा विध्वंस करण्याची आणि श्रीकृष्णांचाच वध करण्याची गर्जना करू लागला."

---

## पद ११७ वे

असो धिक्कार तुला स्थविरा ।
म्हणसी देव गोपकुमरा ॥ धृ. ॥
ब्रह्मचारी म्हणताति तुला ।
षंढ तू परि कळले मजला ॥
निम्नगासुतत्व योग्य तुला ।
भाट तू गोपाचा झाला ॥

शिणविसी व्यर्थ कशास गिरा ।
म्हणसी देव ०
कृष्ण हा स्त्रीगोद्विजहन्ता ।
करी स्वामीच्या हा घाता ।।
या स्वामीद्रोह्या स्तविता ।
वाटे लाज न तव चित्ता ।।
म्हणति शस्त्रे तुजचि विदारा ।
म्हणसी देव ०
अन्यकामा कन्या हरिली ।
तिची धुळधाण तुवा केली ।
वेल वंशाची करपविली ।
कुरुकुलशुद्धी भ्रष्टविली ।।
सधर्मा तूं कृष्णास खरा ।
म्हणसी देव ०
धर्मात्मा मागध धन्य ।
दे न या दासाते जन्य ।।
तद्वधी मार्ग तो जघन्य ।
वरिल या कृष्णाविण नान्य ।।
परि न टिकेल आज नखरा ।
म्हणसी देव ०

---

टीप– "खवळलेला राजसमूह पाहून युधिष्ठिरांनी भीष्मांना त्यावरील उपाय विचारले. भीष्म म्हणाले, 'काळजी करू नकोस. कृष्ण ज्याचा नाश करावयाचे मनांत आणतो त्याची बुद्धि अशीच व्हावते.' भीष्मांचे भाषण ऐकून शिशुपालाने त्यांच्यावरही तोंडसुख घेतले."

(साकी) वदला चेदिप उपहासे या येऊ दे भीमाते ।
मागध सम्राटाचे करितो तर्पण याच्या रक्ते ।
ऐका श्री भारतवार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ।।

## पद ११८ वे

चेदिपवंशीं त्र्यक्ष चतुर्भुज भीमा हा जन्मला ।
जन्मता रासभ रव गर्जला ॥
अमंगलाचा त्याग कराया राजा सजला मनी ।
उमटली वाणी गगनांगणी ॥
त्यजू नको हा पुत्र बलाधिक तव हा वंशांकुर ।
वधिल याते कुणि बलसागर ॥
प्रार्थी माता अशरीर गिरा कोण वधिल या सुता ।
कळावे हे मजसी तत्त्वता ॥
वदली वाणी यत्स्पर्शे भुजनेत्र अधिक लोपती ।
वधक तो याचा गे निश्चिती ।

(चाल) ती येणाऱ्यांच्या सुत दे अंकावरी ।
एकदा पातले संकर्षण श्रीहरी ।
ती श्रीकृष्णाच्या सुत दे अंकावरी ।
अंकस्पर्शे भुज गळले तो अधिक नेत्र लोपला ।
जन्मता ०

---

टीप– "मर्मभेदक असे शिशुपालाचे भाषण ऐकून महापराक्रमी भीमसेन क्रुद्ध झाला व शिशुपालाच्या अंगावर धावला. भीष्मांनी त्याला आवरले. शिशुपालाला त्याची मुळीच भीति वाटली नाही. तो भीमाच्या रक्ताने जरासंधाचे तर्पण करू इच्छीत होता. भीष्मांनी भीमाला शिशुपालाची जन्मकथा सांगितली."

(श्लोक) तन्माता करि प्रार्थना यदुपते मारू नको बंधुला ।
बोले कृष्ण पितृष्वसे वचन मी देतो विचारे तुला ॥
मी साहीन शतापराध जरि हा होईल पापाधिक ।
तो होता परि मी स्वये वधिन हा सद्धर्मविध्वंसक ॥

(साकी) वैतालिक व्हायाचे तुज जरि स्तवन करी राजांचे ।
कर्ण शल्य भगदत्त पराक्रम कां न स्तविसी साचे ॥
राजांच्या अपमानास्तव वध तुझा सर्वथा व्हावा ।
परि करुणा आमुची म्हणे हा अवलिप्त परि जगावा ॥

ऐका श्री भारतवार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

(दिंडी) तदा झाले संक्रुद्ध भूमिपाल ।
गर्जना करिती नेत्र होति लाल ॥
क्षमायोग्य नव्हे हा मदांध भीष्म ।
सदा संतापद जसा जना ग्रीष्म ॥
यज्ञपशुपरि बुकलुनी हा वधावा ।
तप्त तैलांतरि फेकुनिया द्यावा ॥
अग्निमाजी या करा शीघ्र दग्ध ।
कसे या नीचा म्हणति जन विदग्ध ॥

---

टीप – " शिशुपालाचा मृत्यु श्रीकृष्णाच्या हातून होणार हे जाणून त्याच्या आईला दुःख झाले. तिच्या मागणीनुसार त्याच्या शंभर अपराधांची क्षमा करण्याचें श्रीकृष्णांनी मान्य केले. भीष्म आपली जन्मकथा सांगताना ऐकूनही शिशुपालाचा क्रोध पुन्हा उसळून आला व तो भीष्मांना अद्वातद्वा बोलू लागला. "

## पद ११९ वे

ते गर्जित ते भर्त्सित परिसुनि त्या भीषण तर्जना ।
स्वर्गंगेचा पुत्र वदे आरक्त करुनि लोचना ॥ धृ. ॥
दुरुत्तरांना सीमा नच या भुवनी मी पाहिली ।
अपशब्दे रसना न विटाळिन आण असे वाहिली ॥
तप्त तैल परिपूर्ण कटाही मज जे फेकावया ।
सजले दहनी जाळाया वा पशुसम मारावया ॥
वामपाद मस्तकी ठेवितो त्या सर्व नृपांचिया ।
उत्तर वदता तत्क्षणीच शर सज्ज त्या वधावया ॥
(चाल) हा चक्र गदाधर असे इथे आसनी ।
आव्हान तया द्वंद्वाचे द्यावे कुणी ।
मरणेच्छा ज्याच्या त्वरा करितसे मनी ।
रणमर्दांचा मार्ग असे हा व्यर्थ काय वल्गना ।
स्वर्गंगेचा पुत्र०

टीप– "त्यावर भीष्म म्हणाले, 'मी या सर्व राजांची किंमत कस्पटासमान समजतो.' या त्यांच्या भाषणावर सर्वच राजे खवळले, व भीष्मांना बकऱ्याप्रमाणे कापून काढा, उकळत्या तेलाच्या कढईत टाका असे ते बोलू लागले. परंतु ह्या दुरुत्तरांना प्रत्युत्तर देत न बसता भीष्मांनी निश्चितपणे सांगितले की, माझा तर पाय तुमच्या मस्तकावर आहेच, पण ज्याची बुद्धि मरणाकडे धाव घेत असेल त्याने ह्या अग्रपूजित श्रीकृष्णाला युद्धार्थ आव्हान करावे."

## पद १२० वे

युद्धाचे आव्हान शब्द हे विरती जो गगनी ।
उभे राहिले यादवेन्द्र ते सुवर्ण सिंहासनी ॥ धृ. ॥
मौनव्रत भंगुनी मृदुस्वर राजा संबोधुनी ।
वदले सुटलो वचनाच्या मी नृपहो पाशातुनी ॥
बंधुरूप शत्रू हा अमुचा पापाचे भाजन ।
प्राग्ज्योतिषि असता मी लावी द्वारकेस दहन ॥
रैवतकाहुनि भोजराज परिवार पळवुनि वधी ।
अश्वमेध हय मम जनकाचा पळवुनी ने मंदधी ॥
विवाहिता बभ्रूची भार्या हरी कामकीटक ।
मातुलकन्या भ्रष्ट करी हा मूर्त असे पातक ॥
(चाल) निजपितृभगिनीस्तव मी सारे साहिले ।
ते अपराधांचे शतक पूर्ण जाहले ।
यापुढे पाप हे पाहिजे न राहिले ।
समूळ उत्पाटीन शल्य हे सलते जे सन्मनी ।
उभे राहिले ०

## पद १२१ वे

ते सभा प्रपूरित होय । जयसूचक शंखनिनादे ।
कोंदले पांचजन्याच्या । ते विश्व घोरतर नादे ।
उमटती दुंदुभिध्वनि । जयघोषक मंगलवाद्ये ।

(चाल) वर्षती प्रसूने देव ।
जयघोष करिति भूदेव ।
करिती वंदन नरदेव ।
नाचती साधुजन मोदे । जयसूचक ०

टीप– "यावर शिशुपालाने श्रीकृष्णांना युद्धाचे आव्हान केले आणि पांडवासहित त्यांच्या वधाची प्रतिज्ञा केली. तेव्हा इतका वेळ मौन धारण केलेले श्रीकृष्ण उभे राहून मधुर वाणीने म्हणाले, 'आत्याबाईंना दिलेल्या वचनांतून आज मी सुटलो. असे म्हणून त्यांनी शिशुपालाच्या अपराधांचे स्वरूप सभेत विशद करून सांगितले, आणि सर्व राजे पहात असता आपल्या सुदर्शन चक्राने शिशुपालाचे मस्तक उडविले."


(साकी) करुणाब्धि धर्मराज करवी उत्तरक्रिया त्याची ।
अभय देउनी तत्सुतास दे सूत्रे तद्राज्याची ॥
ऐका श्री भारतवार्ता ।
जी तोषद भवदावार्ता

(चौपाई) शुक जोगीन्द्र एक दिन आवे ।
हरिकरगलित अन्नरस खावे ।
न हि आचार बिचार जगावे ।
ब्रह्मभाव संदेह भगावे ॥
हरिके भक्तनके जस गावे ।
तब सुरघंटा सतत बजावे ।
घंटाधुनि धर्मको फसावे ।
तब संदेह गुपालन सावे ॥

(कटाव) जातिमात्र विप्राहुनि शतगुण ।
वैदिक त्याहुनि तज्ज्ञ विचक्षण ।
त्याहुनि इंद्रिय जेता ब्राह्मण ।
त्याहुन सगुण भक्तिपर मोठा ।
वरता त्याहुनि निर्गुण निष्ठा ।
पाहु चला त्या आज वरिष्ठा ।
नमन करू ठेवुनि सन्निष्ठा ।

टीप– "आपल्या भावांकडून शिशुपालाची उत्तरक्रिया करवून धर्मराज युधिष्ठिरांनी त्याच्या मुलाला चेदि देशाचा राजा म्हणून राज्याभिषेक केला."

एक दिवस धर्मराजाच्या महाद्वारावरील घंटा सातत्याने वाजू लागली.



शुकभोजन

(ओवी) लक्ष उमटे एक शब्द । आता अखंड घंटानाद ।
कृष्ण म्हणे ब्रह्मविद । आला असेल एखादा ।
धर्मराज श्रीकृष्ण दोन्ही । बाहिर आले हात धरोनी ।
उच्छिष्ट पत्रावळी भवनी । शुकाचार्य देखिला ।

---

टीप– "वास्तविक घंटेचा संकेत असा होता की, लक्ष ब्राह्मण जेवले म्हणजे ती एक नाद करीत असे. धर्मराजांनी अखंड घंटानादाचे रहस्य श्रीकृष्णांना विचारले. ते म्हणाले, एखादा ब्रह्मज्ञ आला असेल. दोघेही त्याला पहाण्याकरिता बाहेर आले. तो श्रीकृष्णांनी टाकलेल्या उष्टया पत्रावळीतील शितें खात असलेला पोपट त्यांनी पाहिला."

## पद १२२ वे

गोपाल तदा नमन करी भक्ताला ।
तो प्रकट करी रूपाला ॥ धृ. ॥

वदला देवा भक्त सदा उपवासी ।
राहो कां इच्छा तुजसी ॥
प्रार्थना करी धर्मराज शुकदेवा ।
मज घडो आपुली सेवा ॥
श्रीकृष्ण तया कांचनमय पात्रांत ।
भोजन स्वये वितरीत ॥
(चाल) दे मान कृष्णवचनास ।
स्पर्श जो करी अन्नास ।
वर्षती देव सुमनास ।
श्रीहरी वदे याग पूर्ण हा झाला ।
तो प्रकट ०

(दिंडी) धन्य झाला कुरुवंश अध्वरे या ।
मीहि झालो कृतकृत्य भूमिराया ।
करा रक्षण लाविले धर्मरोप ।
द्या मला जाया भूमिपा निरोप ।
ऐकता हे दाटला कंठ भारी ।
लोचनांतुनि वाहिले प्रेमवारी ।
वदे हे सारे फळ तुझ्या कृपेचे ।
कसे साहू मी दुःख वियोगाचे ।

टीप – "श्रीकृष्णांनी नमन करताच शुकाचार्य प्रगट झाले. धर्मराजांनी त्यांना सुवर्णपात्रांत भोजन दिले. श्रीकृष्ण म्हणाले, आज खरा तुझा यज्ञ सांग परिपूर्ण झाला. ह्या धर्मसाम्राज्याचे रक्षण करायला सांगून श्रीकृष्णांनी सर्वांचा निरोप घेतला व द्वारकेस गमन केले."

## पद १२३ वे

मग कुंतीचा घे निरोप वनमाली ।
वदला मंदस्मित शाली ।। धृ. ।।
मिळविले तुझ्या पुत्रांनी साम्राज्य ।
उद्धरिले हे कुलराज्य ।।
वंदन करिती कृष्णा आणि सुभद्रा ।
प्रभु आलिंगी सौभद्रा ।।
वदला भावी अनर्थास जाणोनी ।
धर्मासि यदूत्तम वाणी ।।
(चाल) सावधान नित्य रहावे ।
पुत्रापरि जन रक्षावे ।
मोहांत कधी न फसावे ।
वागावे जे सांगतील मतिशाली ।
वदला मंदस्मित शाली ।।
(घनाक्षरी) तुला रात्री स्वप्नांत । वा दिसेल उमाकांत ।
पाहता तो दिक्प्रांत । जो कृतान्त अधिष्ठी ।
ईश्वरेच्छा हो जाण । तिथे नसे दुजे त्राण ।
परी साधु परित्राण । त्याविणे न होय वा ।
(साकी) क्षत्रक्षयी कुरुपते धर्मा तुजनिमित्त जो कर्ता ।
स्वप्नांत निजसुदुर्लभदर्शन देईल जगद्भर्ता ।।
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ।।

---

टीप — “ राजसूय यज्ञ झाल्यावर एक दिवस व्यास महर्षि धर्मराजाच्या सभेत आले. त्यांची पूजा करून धर्मराजाने विचारले की, चेदिपालाच्या मृत्यूने स्वर्ग, आकाश, पृथ्वी ह्या ठिकाणी होणाऱ्या उत्पातांचे अरिष्ट संपले नाही काय ? व्यासांनी सांगितले, “ त्याचे फळ तेरा वर्षे अनिष्ट भोगावे लागेल. तू कारणीभूत होऊन क्षत्रियांचा फडशा पडेल. एका पहाटे तुला स्वप्नांत वृषभध्वज नीलकंठ दर्शन होईल. पण भिऊ नकोस. ”

(दिंडी) व्यास गेल्यावरि वदे धर्मराज ।
बंधुजनहो वाचुनी काय काज ।
विश्वहंता म्हणतील लोक माते ।
नष्ट करणे या योग्य जीविताते ।
तदा बोले गांडीवधर तयाते ।
आचरावे जी योग्य उपायाते ।
आत्महत्या क्षत्रिया घोर पाप ।
तिने इहलोकी परत्रीहि ताप ।

(साकी) मानुनि जळ स्थळाला वस्त्रा आवरी करे वाटे ।
कोठे पडे जळी तो जळ न स्थळचि ते खरे वाटे ।।
ऐका श्री भारत वार्ता
जी तोषद भवदावार्ता ।।

---

टीप— "व्यास महर्षींच्या कथनाचा राजा युधिष्ठिराच्या मनावर विपरीत परिणाम झाला. वंशक्षयाला आपण एकटे कारणीभूत होण्यापेक्षा देहत्याग करावा असे त्यास वाटू लागले. बंधूंनी त्याचे निवारण केले. तेव्हा धर्मराज व त्याचे बंधू यांनी सर्वांशी मृदु बोलण्याची प्रतिज्ञा केली."

"धर्मराज बंधूसहवर्तमान आपल्या नगरांत प्रविष्ट झाला. पण दुर्योधन व शकुनि मात्र मयसभेमध्येच राहिले. तेथील चमत्कारामुळे त्यांची ठिकठिकाणी फजिती होऊ लागली."

## पद १२४ वे

पाहुनिया तो अंधसुताचा मतिभ्रंश तेधवा ।
सभांतरि पिके हास्यरस नवा ।। धृ. ।।

करुणार्णव परि युधिष्ठिराच्या दया उपजली मनी ।
वदले भीमा संबोधुनी ।
मार्ग दावी निजबंधूते भीमा जा तू स्वये ।
करी तत्साह्य ऊठ शीघ्र ये ।।
ज्येष्ठ बंधुची आज्ञा होता उठे भीम सत्वर ।
पडत्या अंधसुता दे कर ।।

(चाल) बोले त्याते अन्वर्थ गमे हे मना ।
उतरला पित्याचा गुण हा दुर्योधना।
हे साम्य आजवरि दिसे न या लोचना ।
अंधत्वाचा चक्षुष्मंता लाभ गमे हा नवा ।
सभांतरि पिके ०

(साकी) पराक्रमे वश झाले धर्मा उन्मत्तही भूनेंते ।
आतें नव्हेत नरशरीरधर सर्व देव शकुने तें ॥
ऐका भारत रणवार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

---

टीप– " भिंत आहे तिथे दरवाजा समजून व पाणी आहे तिथे जमीन समजून दुर्योधन जाऊ लागला तेव्हा तो पडला. सभाजन हसू लागले. भीमाने तर आंधळ्याचाच मुलगा तो असे म्हटले. दुर्योधनाचा जळफळाट झाला. शिवाय पांडवांची संपत्ति व मोठमोठे राजे त्यांना वश झालेले पाहूनही त्याचे चित्त व्यग्र झाले. अंगाची लाही लाही झाली."

## पद १२५ वे

होय कां स्मरण तुज शकुने ।
त्या दारुणतर घटनेचे ।
सारेच पराक्रमशाली ।
कर्णादि उपस्थित साचे ।
एकही न धिक्काराचा ।
उच्चार करी बा वाचे ।
केसरीपरी श्रीकृष्ण ।
जैं कृन्तन करि चैद्याचे ।

(चाल) तो अनाथसा भूपाल ।
सर्वांसमक्ष गोपाल ।
वधि जैसा सिंह शृगाल ।
पांडवकृपेचे दान । वाटे जीवित राजांचे ।

(साकी) श्री कीर्ति भूति महिमा शक्ती वा युधिष्ठिरी भूपी ।
जल जैसे सागरी तसे बा केवि असावे कूपी ।
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

---

टीप—" शिशुपालाचा श्रीकृष्णाने भरसभेत वध केला तरीही कुणी त्याचा धिक्कार केला नाही, याचे तर दुर्योधनाला अतिशयच आश्चर्य वाटले. युधिष्ठिराला पाण्यासारखी संपत्ति मिळालेली पाहून तर त्याच्या तळव्याची आग मस्तकासच पोहोचली. "

(साकी) घेउनि दे गुर्वाज्ञा मज अग्नीत काय होमाया ।
दुःखद जो स्वपराला त्याची ज्ञात्यासि काय माया ।
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ।

(घनाक्षरी) वदे गांधार तयास । तू न अप्रिय धात्यास ।
ते न आवडते त्यास । व्यर्थ शोक कासया ॥
कर्मफल दाता देव । मिळे ज्याचे जे दैव ।
प्राक्तनाचाचि प्रभाव । जो सदैव तुज दिसे ॥

(साकी) यत्न तदुच्छेदी शत केले परि कवे न शकलास ।
उडु जिंकी पूर्णेंदु काय ज्या जिंकवे न शकलास ।
ऐका श्री भारत वार्ता
जी तोषद भवदावार्ता ।

---

टीप— " कुंतीपुत्रांचा उत्कर्ष सहन न होऊन आपले शरीराला बणवा लावून घ्यावा असे दुर्योधनाला वाटू लागले. शकुनीने त्याचे सांत्वन केले."

(साकी) शकुनि म्हणे पाण्डव पांचाल पतत्सहाय कंसारी ।
यासि भुजबळे जिंकी ऐसा कोण असे संसारी ।
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ।

(घनाक्षरी) तुला करितिल बा रोध ।
रणा भीष्मादि सुयोध ।
एकही न दिसे योध ।
क्रोध सफल व्हावया ।
(साकी) शकुनि वदे राजा हा झाला दुर्योधन कृश हरिण ।
क्षणहि स्वस्थ नसे व्याघ्रवनी जेवि काय शिशुहरिण ।
ऐका श्री भारतवार्ता ।
जी तोषद भवदावार्ता

टीप—"पांडवांचा पराजय करून सारी संपत्ति आणि ती मयसभा आपलीशी करावी असा एक विचार दुर्योधनाने शकुनीसमोर मांडला. पांडवांशी युद्ध करायला भीष्म वगैरे थोर लोक विरोध करतील असे सांगून थोर लोकांना धक्का न लावता युधिष्ठिरांना जिंकण्यासाठी द्यूत हा उपाय शकुनीने सुचविला, व त्याच्या पित्याच्या कानावर त्याची अस्वस्थता घातली."

## पद १२६ वे

बोले तो कलिपुरुष पाहुनी शत्रूंचे वैभव ।
वाटे व्यर्थ आपुला भव ॥
देवेन्द्राहुनि मानवेन्द्र हा तळपे अधिकचि नृपा ।
नृपांचे जीवित त्याची कृपा ॥
सुवर्णमुद्रा त्रिखर्व द्याया द्वारि उभे भूमिप ।
तयाते वारिति तद्वारप ॥
मयसभेत उपहास होय जी माझा अति दारुण ।
तयाचे उत्तर रण दारुण ॥
(चाल) मी पडता करितो भीम मर्मकृन्तन ।
शोभलासि तू धृतराष्ट्राचा नंदन ।
या वाक्यशरे जळते अपमानित मन ।
प्रयत्नेहि पावे न उपशमा चित्तोचे ताण्डव । वाटे व्यर्थ०

(साकी) आप्तांनी विदुराला कपटद्यूत मंत्र जाणविला ।
मग धृतराष्ट्रे बुद्धिसुधेचा तो समुद्र आणविला ॥
ऐका श्री भारतवार्ता ।
जो तोषद भवदावार्ता ।

टीप – "दुर्योधनानेही धृतराष्ट्राजवळ आपली मनोव्यथा प्रगट केली आणि युधिष्ठिराशी द्यूत खेळण्याकरिता शकुनीला अनुज्ञा द्यावी अशी विनंती केली. बुद्धिमान् अशा विदुराचा विचार घेऊन निर्णय द्यावा म्हणून धृतराष्ट्राने विदुराला बोलावण्याकरिता दूत पाठविले."

## पद १२७ वे

यत्नशते संरक्षण होय न दैव जरी नाचवी ।
हरिच गजवरद तदा वाचवी ॥ धृ. ॥
विदुराचा हितबोध न रुचला अंध नृपाच्या मना ।
रमली द्यूति तद्वासना ॥
वदे नदीसुत मी तू असता अनिष्ट न च होईल ।
न सीमाभंग कधी होईल ॥
बंधूंच्या या द्यूतविनोदा रस घेऊ आपण ।
क्षत्रिया हे रंजन साधन ॥
(चाल) जा राजाज्ञेने इंद्रप्रस्थाप्रती ।
आशीर्वच कळवी अमुचे धर्माप्रती ।
सांग मी भुकेला तत्सहवासाप्रती ।
वृद्धहृदय हे आगमने तू अपुल्या आनंदवी ।
हरिच गजवरद ०

टीप – "भवितव्यता टळत नाही हेच खरे ! विदुरांनी 'हे कलहाचे मूळ आहे, हे मृत्यूचे द्वार आहे असे सांगून पाहिले. परंतु मी आरंभिलेल्या कृत्याला तू नांवे ठेवू नकोस तर वायुवेगाने जाऊन खांडवप्रस्थाहून युधिष्ठिरास घेऊन ये असे धृतराष्ट्राने विदुरास सांगितले."

## पद १२८ वे

भयकंपित शब्दबोध करि धृतराष्ट्र निजसुता परी।
होय निष्फळ ती नृप वैखरी ॥ धृ ॥

मुक्ताफळ भोजन हंसांचे रुचे काय वायसा।
पर्युषित मांसी घे तो रसा ॥

द्यूता वा मान्यता आत्महत्येस तरी द्या असे।
सुताचे वाक्य लात्रि त्या पिसे ॥

दुर्दैवा लावुनी बोल विदुरास वदे अंध तो।
काल हा वंशनाश इच्छितो ॥

(चाल) जाऊनि नवसभा निरीक्षणा मंत्रण।
दे धर्माते वळवीं बा त्याचे मन।
ईशेच्छेपुढती कोण असू आपण।
पुत्राच्या मोहे या दिसतो नाश मलाही परी। होय निष्फळ०

(घनाक्षरी) कुशल तात पाद काय। आणि गांधारी माय।
बंधु दुर्योधन राय। काय विहरतो सुखे।
तुम्ही दिसता कां म्लान। चित्त केवि अप्रसन्न।
काय तुमचा सन्मान। राखिती न उद्धत।

---

टीप – " विदुरांच्या विचारांचा अंदाज घेऊन अन् त्याला धर्मराजाकडे पाठवल्यावरही धृतराष्ट्राने दुर्योधनाला द्यूतापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु 'एक तर द्यूताला अनुज्ञा द्या किंवा मी प्राणत्याग करतो' असे दुर्योधनाने म्हटल्यामुळे बुद्धीला भ्रंश झालेल्या त्या धृतराष्ट्राने द्यूतासाठी तोरणस्फटिका नांवाचे सभागृह बांधण्याची आज्ञा कारागिरांना केली."

इकडे धर्मराजा विदुरांच्या म्लान झालेल्या मुखाकडे पाहून सर्वांचे कुशल विचारू लागला.

(घनाक्षरी) पुसे धर्म असे काय ?। कथा खरा अभिप्राय।
सदा आपुलेचि पाय। काय रक्षिताति हे।
वदे विदुर तदा व्यास। तुला लावाया फास।
कितव एकत्रित खास। निजपुरास आणिले।

तुला द्यूता आव्हान । तिथे देतिल तें जाण ।
स्वहित जाणुनी प्रमाण । न जाणेच योग्य वा ।
(साकी) युद्धास द्यूतासहि जावे नाही म्हणो न ये ही ।
माझी असे प्रतिज्ञा वाटे परीक्षाच संप्रति ही ।
ऐका श्री भारत वार्ता
जो तोषद भद्रावार्ता ।

---

## पद १२९ वे

दुसरे दिवशी सभादर्शन व्याजे ते कपटी ।
निजनाशाते धर्माग्नी ते नेती झाकुनि पटी ॥
कुशल प्रश्नानंतर पाण्डव सभासनी आस्थित ।
वदला धर्मा शकुनी जाणुनि कुरुपति हृदयस्थित ॥
सम्राटा द्यूतक्रीडेस्तव करितो आवाहन ।
रसरंगा या रंग भराया लावावा जी पण ॥
(चाल) तैं धर्म वदे द्यूत हे पाप दारुण ।
सद्धर्म विनाशक नीतिमार्ग दारण ।
विक्रमी क्षत्रिया न च ते आकर्षण ।
रुचे तया हा खेळ जयांचे अंतरंग कपटी ।
निजनाशाते ०

---

टीप – " विदुरांनी धर्मराजाला धृतराष्ट्राचा निरोप सांगून त्यांनी द्यूतास जाऊ नये असा सल्ला दिला. पण वडिलांची आज्ञा म्हणून चार बंधू व पत्नी द्रौपदीसहित युधिष्ठिर हस्तिनापुरास गेले. त्या दिवशीच्या विश्रांतीनंतर दुसऱ्या दिवशी सभा दाखविण्याकरिता त्यांना दुर्योधनाने सभेत आणले. आणि शकुनीकडून धर्मराजास द्यूताचे आव्हान दिले."

(साकी) धर्म म्हणे अन्याय असे हा विषम मार्ग हा वाटे ।
ऐसेहि असो, परिणामी भय सोडिता सुनय वाटे ॥ ऐका०
मद्वाक्य तुला न रुचे मरणाऱ्यासि अगदसे बापा ।
सुत म्हणुनी या नरकी ने त्या आलिंगिसि कां पापा ॥

ऐसे विदुरवचन ऐकुनिही अंधभूप तो न वळे ।
दुर्योधन पचाक्षरि मंत्रे उग्रभूतसा खवळे ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

(घनाक्षरी) अस्मदाश्रित त्वत्काय । स्तविसि शत्रूते काय ? ।
तुझा पोषक हा राय । काय निंदिसी तया ।
कृतघ्ना तुज परलोक । असे केवळ यमलोक ।
अम्हा कोकिळात काक । तू अशुद्ध केवळ ।

---

टीप— "धर्मराजांनी पापाला कारणीभूत असलेले द्यूत टाळण्याचा प्रयत्न केला. पण शेवटी दैव बलवत्तर आहे असे म्हणून मोठमोठ्या वस्तू पणाला लावून द्यूताला आरंभ झाला. दुर्योधनाच्या वतीने अर्थातच शकुनि खेळत होता. कपटाचे डाव टाकून शकुनीने पांडवांच्या सर्वस्वापहाराचीच तयारी चालविली होती. ते पाहून विदुरांनी धृतराष्ट्राला अक्षद्यूताने धुंद झालेल्या दुर्योधनाचा बंदोबस्त करून पुढचा अनर्थ टाळण्यास सांगितले. ह्यावर दुर्योधन खूप संतापला आणि विदुरावर त्याने हवे तसे तोंड सोडले."

## पद १३० वे

काळ न खड्ग करी घेउनि करि शिरच्छेद बा कधी ।
विपरीतार्थी यथार्थ मानी काळविक्रमे सुधी ॥ धृ. ॥

सपरिवार साम्राज्य हरुनिया तृप्त न झाले मन ।
पणी लावितो देव विजेत्या बंधूंचे जीवन ॥

दास होय द्यूतांत कुरूंचा स्वये धर्मनंदन ।
अद्भुत बोले पण तो व्यसनी करी धर्मकंदन ॥

शरदुत्पलपत्राक्षी देवी शरदुत्पलगन्धा ।
उपमा त्रैलोक्यांत न दुसरी जिच्या पुण्यगन्धा ॥

संबोधी निज भगिनी ऐसे जिला कंजलोचन ।
पणी लावितो वदे परी तै आर्द्र होति लोचन ॥

(चाल) कौशल्य अंगुलीचे दावित तैं जना ।
फासे फेकुनि तो पाप करीं गर्जना ।
जिंकिले सभ्यहो या मी अद्भुत पणा ।
विश्वाचे सम्राट दास तव हे पांडव मंदधी ।
विपरीतार्था यथार्थ ०

(ओवी) याकरिता सत्वर विदुरा । जावोनि प्रबोधी पांडवदारा ।
आमुची दासी आमुच्या घरा । सामोपचारे पाठवावी ॥

(साकी) सिंहाच्या मर्मी नख द्याया साहस करिसी शशका ।
यश काय पक्षिपतिचे येईल चार करुनि तुज मशका ।
ऐका श्री भारतवार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

---

टीप– " सर्व साम्राज्य गमावूनही धर्मराजाची तृप्ति झाली नाही तेव्हा त्यांनी बंधूच एकामागून एक पणाला लावले आणि तेही हरल्यावर त्यांनी द्रौपदी पणाला लावली. तीही डाव शकुनीने जिंकला, तेव्हा दुर्योधनाने तिला सभेत आणण्याची विदुराला आज्ञा दिली. विदुरांना अत्यंत संताप आला."

(दिंडी) अरे सूता तू जाय म्हणे वेगे ।
द्रौपदी म्यां जिंकिली सभारंगे ।
अंधतनयाचें वचन परिसुनीया ।
सूत गेला दौपदीनिकट राया ॥

(ओवी) प्रलयवीज तडके शिरी । की डोंगर कोसळे अंगावरी ।
तैसी ऐकोनी घाबरी । पांडव पत्नी ते काली ॥

(साकी) सूत म्हणे आधी श्री मग ती बंधुमंडळी धर्मे ।
हारविली निजमूर्ति स्त्रीहि शेवटी अनुचित कर्मे ॥
ऐका श्री भारतवार्ता ॥
जी तोषद भवदावार्ता ।

(ओवी) आणिक ऐके सारथीपुत्रा । रजस्वला मी एकवस्त्रा ।
सभानायका परमपवित्रा । भीष्मद्रोणा आणवी ॥

(साकी) सूत सभेत विचारी धर्मा की पुसे असे आर्या ।
राजेन्द्रा हारविली प्रथम द्यूतीं मूर्ति कि भार्या ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

---

टीप – " विदुरांनी दुर्योधनाचो निर्भर्त्सना करून नकार दिला तेव्हा दुर्योधनाने विदुरांचा धिक्कार करून प्रातिकामीला द्रौपदीला आणायला पाठवले. त्याने द्यूताची हकीकत व दुर्योधनाचा निरोप तिला सांगितला, तेव्हा मस्तकावर वीज कोसळावी तसे तिला झाले."

(ओवी) दुर्योधन म्हणे हा नपुंसकू । वाहे पांडवांचा धाकू ।
न धरी तमोगुणाचा तवकू । दुःशासना पाचारिले ॥
(साकी) कोपे म्हणे सुयोधन भीतो भीमासि सूत भितरा ।
दुःशासना स्वये जा द्रुतगति कर्म हे नव्हे इतरा ॥
दुष्टोक्ति श्रवणे धर्माची संकटी पडे जाया ।
रक्षणार्थ धावे कुरुपतिच्या राज्ञीसमीप जाया ॥
ऐका श्री भारतवार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

(ओवी) द्रौपदी म्हणे दुःशासना । मी पतिव्रता पांडवांगना ।
रजस्वला आणि एकवसना ।

(साकी) देवी म्हणे अनार्या नाहो त्वन्मनांत पापदर ।
ओढु नको फरफरा घेउ दे सावरूनि हा पदर ॥
ऐका श्री भारतवार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

---

टीप – " प्रातिकामी द्रौपदीचा नुसता निरोपच घेऊन आला असे पाहून रागावलेल्या दुर्योधनाने तिला सभेत आणण्याकरिता दुःशासनाला पाठविले. त्याची दुष्टोक्ति ऐकून द्रौपदीने गांधारीकडे धाव घेतली. तेव्हा दुःशासनाने तिच्या लांबसडक केसांना धरून ओढायला सुरवात केली. तिने आपली असहाय स्थिति निवेदन केली पण व्यर्थ ! "




द्रौपदी वस्त्राहरण

(ओवी) निर्दय म्हणे वो वाचाळे । चाल सत्वर सांडी चाळे ।
टाकोनि आले जे कपाळे । भोगिल्याविण सुटेना ॥

(दिंडी) अहा दैवा हे काय गति केली ।
अशा दुष्टासी गांठि पाडियेली ।
कोण जन्मी म्या काय पाप केले ।
म्हणुनि संकटउदधीत बुडवीले ॥

(श्लोक) जशी व्याघ्रे धेनू सहज धरिली एकटि वनी ।
तशी वेणी दुःशासन कवळिता भोड न मनी ।
निराशा सर्वांची मुख किउलवाणे करुनिया ।
म्हणे श्री गोविंदाविण कवण पावेल ऋणि या ॥

(ओवी) सभे आणिता याज्ञसेनी । अश्रुपात सकळा नयनी ।
शकुनी दुर्योधना मनी । परमानंद साठे ॥

नेत्रांतुनि वाहवीत पाणी । वदली भीष्मा पांडवराणी ।
समयीं बोला यथार्थवाणी । मी दासी काय ?
दास होउनी पणी लाविले । अनधिकार हे कृत्य जाहले ।
संशय निरसा अपुल्या बोले । मी दासी काय ?

टीप– "द्रौपदी परमेश्वराचा धावा करीत सभेत आली. तिची वेणी आणि वस्त्रे अस्ताव्यस्त झाली होती. पांडव अधोवदन झाले. स्वत: प्रथम हरल्यावर मला पणाला लावली असता मी दासी झाले काय असा प्रश्न तिने सभासदांना विचारला."

(ओवी) राज्य हानी ऐश्वर्य हानी । हे खेद नाही माझिये मनी ।
परी द्रौपदीते अवलोकुनी । हृदय झाले दुखंड ॥

(साकी) हे काय बरे गुरुघाते रिपु परम मुदित होतील ।
स्वमुखी विष, व्याळमुखी अमृत कोण सुज्ञ ओतील ।
ऐका श्री भारतवार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

(ओवी) हे पाहोनी वीर विकर्ण । गर्जोनि बोले कोपायमान ।
सदसी आणोनि सतीलागुन । जिता कैसी वदतसा ॥

## पद १३१ वे

मृगया, स्त्री, मद्यपान, दुर्देवन या व्यसनाप्रती ।
सर्वथा शास्त्रकार निंदिती ॥
या व्यसनी संसक्त नराते साधुजनहि निंदिती ।
धर्मविच्युत ऐसे बोलती ॥
या धर्मच्युत युधिष्ठिराच्या बुद्धिभ्रंशांतुनी ।
लाविली पांचाली ही पणी ॥

(चाल) निष्पाप सती ती कौरव दासी नसे ।
लाविता विजेता केवळ पापी दिसे ।
बुद्धिनाश मज तो द्वार मृत्युचे दिसे ।
राजसभा ही केवि म्हणावी जेथे छळिती सती ।
सर्वथा शास्त्रकार ०

टीप– द्रौपदीची ती अवस्था पाहून भीम संतापला. त्याने द्यूत खेळणारे धर्मराजाचे हात जाळून टाकण्याकरिता अग्नि आणण्याची सहदेवाला आज्ञा केली.

त्याचे ते अपशब्द ऐकून अर्जुन म्हणाला, ह्या कृतीने तू शत्रूचा उद्देश मात्र सफल करशील, तेव्हा सद्धर्माने वाग. पांडवांची विव्हलता आणि द्रौपदीची विटंबना पाहून धृतराष्ट्रपुत्र विकर्णाने मात्र न्यायाचे भाषण केले.

(ओवी) न्याये बोलता विकर्ण । अत्यंत कोपा चढला कर्ण ।
म्हणे वदसी सती म्हणून । जिता असून अजिता कैसी ।

(साकी) दुःशासना न याच्या बोला ऐकावे हा बाळ ।
गीष्पतिपुढे मिरवितो दाउनि साक्षरता गा बाळ ॥

ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

(श्लोक) माझा मानगजेन्द्र अंधकुमरे नक्रे जळी ओढिला ।
आप्ताही पतिचा विचार करिता म्या भरंवसा सोडिला ।
ये तू चक्रधरा स्वचक्रनिकरे दुश्चक्र हे संहरी ।
बंधो ये अरिबिंदु सिंधु गमला ये दीनबंधो हरी ।

पतितोद्धरणा जगदाभरणा ।
करुणा करणा मुरसंहरणा ।
नमिते चरणा शरणा हरि ये ।
हरि ये हरि ये हरि ये हरि ये ।

---

टीप– "द्रौपदी दासी नाही हे विकर्णाचे न्यायाचे बोलणे ऐकून कर्ण संतापला आणि म्हणाला हा पोर आहे. दुःशासना, दास झालेल्या पांडवांची आणि द्रौपदीची वस्त्रे फेड. आणि दुःशासनाने द्रौपदीच्या वस्त्राला निःशंकपणे हात घातला. पांच पति असलेली द्रौपदी भक्तकैवारी भगवान श्रीकृष्णांचा धावा करू लागली, "

(साकी) बोले दुर्योधन धर्माते भीमादि बंधु चवघे ।
हा अनीश खोटा म्हणतो तरि तू मुक्तिसुधा चव घे । ऐका ०
भीमार्जुन धर्मराज यम हे दास जाण गे अवघे ।
न तुझे पति दासी तू कृष्णे समर्थ दुसरा धव घे ॥ ऐका ०

(घनाक्षरी) गदा घाते मी तूर्ण । करिन उरू हे चूर्ण ।
प्रतिज्ञाही निस्तीर्ण । रणी होय ना जरी ।
तरी घोर नरकवास । घडो या कौन्तेयास ।
करिन मत्त मस्तकास । पदाघात मी रणी ॥

(साकी) तेव्हा धृतराष्ट्रा गांधारी विदुर अशुभ कळवीती ।
अति प्रयासे बोध करुनिया त्या अंधा वळवीती ॥ ऐका ०

---

टीप– "दुर्योधन धर्मराजाला म्हणाला, तुझे चार भाऊ तुझ्या आज्ञेत आहेत. द्रौपदीला आम्ही जिंकली नाही असे तुला वाटत असेल तर तसे तिच्या

प्रश्नाचे उत्तर दे." एवढे बोलून त्याने आपली डावी मांडी भर सभेत उघडी केली आणि द्रौपदीकडे पाहून तो ती थोपटू लागला. तेव्हा भीम क्रोधाने प्रतिज्ञा करता झाला की घनघोर रणकंदनांत ही मांडी माझ्या गदेने फोडून टाकीन.

आंत घोर अपशकुन व्हायला लागले. तेव्हा ते अरिष्ट समजून गांधारी व विदुर यांनी धृतराष्ट्राला कळविले."

## पद १३२ वे

विनविले तदा । भयकंपित तनु नरपाळें ।
पांचाली करि मज । क्षमा स्नुषे स्नेहाळे ।। धृ. ।।
मत्पुत्र न हे कुरुकुळ कोटरिचे नाग ।
वंशक्षयार्थ लाविली तयांनी आग ।।
या अग्नीते । उपशमावयाते साचो ।
गे समर्थ एकचि वर्षा तुझ्या कृपेची ।।
इच्छिशील ते । देईन तुला पांचाली ।
निज मातृत्वाची । दुष्टा पखरण घाली ।।
(चाल) ती वदे असो धर्म हे दास न ।
तो वदे दिले वर दुजा देइन ।
माग जे इच्छिते स्नुषे तव मन ।
वदली पांचाली । सायुध पाण्डव सगळे ।
व्हावेत मुक्त लाभले यांत मज सगळे ।
(घनाक्षरी) वदे तिसरे वरदान । तुला पांचाली जाण ।
वदे देवी कल्याण । असो या वरद्वये ।।
(साकी) कळले श्रेष्ठत्व मला तुमचे जा स्वराज्य संभाळा ।
बुडलो असदनुसरणे आला दोष दैवहत भाळा ।।
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ।।

---

टीप– ' भ्यालेल्या धृतराष्ट्राने आपल्या मुलांचें कल्याण व्हावें म्हणून द्रौपदीचें सांत्वन केले आणि तिला वर देऊ केले. एका वराने तिने पांडवांची दास्यत्वांतून मुक्तता केली आणि दुसऱ्याने त्यांचे रथ व धनुष्य मागून घेतले. धृतराष्ट्र आणखी वर द्यायला तयार होता. पण ती धर्मज्ञ मानिनी द्रौपदी म्हणाली 'माझे पति संकटातून मुक्त झाले एवढेच पुरे. ते आपल्या पवित्राचरणाने भाग्याला चढतील. लोभ हा धर्माचा नाश करतो.' धृतराष्ट्राने पांडवांना आपल्या नगरीस जाण्याची अनुज्ञा दिली."

# वनवास व अज्ञात वासानंतर

एवढ्यावर महाभारत संपले नाही. धृतराष्ट्राची अनुज्ञा घेऊन चार बंधू व द्रौपदी यांसह धर्मराज युधिष्ठिर इंद्रप्रस्थास जाण्यासाठी रथांत बसून निघाले. मोठ्या कष्टाने जुळवून आणलेला सारा घाट आपल्याच पित्याने ढासळून पाडला आणि सर्वच मिळविलेले द्रव्य व शत्रूही हातचे दवडले हे पाहून दुर्योधन, कर्ण, शकुनि आणि दुःशासन घाबरले. ते एकत्र जमले आणि धृतराष्ट्राकडे जाऊन पुन्हा आपल्या मोहक भाषणांनी जाळे पसरायला त्यांनी सुरवात केली. वनवासाचा पण लावून पुन्हा द्यूत खेळण्याची संमति त्यांनी धृतराष्ट्राकडून मिळविली. ह्या द्यूतांत ज्याचा पराभव होईल त्यांनी अजिने परिधान करून घोर अरण्यांत जावे, बारा वर्षे वनांत राहून तेरावे वर्ष कुणाला ओळखू न येता अज्ञातवासात काढावे आणि त्या वर्षाच्या अवधीत कोणी ओळखले तर पुन्हा बारा वर्षे वनांत जावे अशी अट ठरली. भीष्म, द्रोणाचार्य, कृपाचार्य, अश्वत्थामा, विकर्ण यांनी पुन्हा द्यूत खेळू नये म्हणून त्यांना सांगून पाहिले पण त्याचा काही उपयोग झाला नाही. गांधारीने धृतराष्ट्राची विनवणी करून शेवटचा प्रयत्न केला, पण तोही व्यर्थ ठरला.

पांडव हस्तिनापुरापासून बऱ्याच अंतरावर गेले होते. तेथे जाऊन प्रातिकामी नांवाच्या सारथ्याने धृतराष्ट्राचा पुनरपि द्यूत खेळण्याचा निरोप धर्मराजास सांगितला. "दैवयोग कुणालाच टाळता येत नाही, विनाशकाल आला म्हणजे पुरुषाच्या बुद्धीला विपर्यास होतो" असे बोलत बोलत युधिष्ठिर बंधूंसह परत फिरले आणि शकुनीचे कपट जाणत असूनही पुनः द्यूताकडे वळले. शकुनीने पुन्हा पणाचा उच्चार केला. धर्मराजाने तो मान्य केला. शकुनीने फासा टाकला. तो त्याच्या हातचा खेळ होता. फासा त्यालाच अनुकूल पडला. "जिंकले" एवढेच शब्द त्याने उच्चारिले. पराजित झालेले पांडव वनांत जाण्यास निघाले. त्यांनी अजिने परिधान केली.

# विराटपर्व

## पद १३३ वे

वदे कृष्णसख चारचक्षु निर्दय जी दुर्योधन ।
कराया सजेल अन्वेषण ॥ धृ. ॥
नैसर्गिक ते सुदूर जातिल राज्य पाहु या असे ।
निकट जे कुरु राज्याच्या वसे ॥
चेदि मत्स्य पांचालराज वा दाशार्णादिक नृपा ।
करावी द्वारकेवरी कृपा ॥
सुखे राहुया श्रीकृष्णाच्या विजितामरपुर पुरी ।
रुचे विचार हा अंतरी ॥
(चाल) हासले राजनीतिज्ञ धर्म तेधवा ।
भिद्यते मंत्र षट्कर्ण पाठ हा नवा ।
या प्रौढपणी कां धनंजया तुज हवा ।
अत्युत्कट प्रेम या क्षणी वा होइल नव बंधन । कराया ०
(साकी) आर्यपाद मानितील कैसे शर्म दास्य नरकांत ।
विपदेतहि सूर्यपदाघाता साहे न सूर्यकांत ॥
वदे कौन्तेय न पाषाण ।
अम्ही वळवू अंतःकरण ॥

---

टीप – "बारा वर्षेपर्यंत राज्यभ्रष्ट होऊन वनवास भोगल्यावर तेरावे अज्ञातवासाचे वर्षी कुठे वास्तव्य करावे म्हणजे आपणांस कोणी ओळखणार नाही, यासाठी राजे युधिष्ठिर यांनी भावांसमोर विचार मांडला. अर्जुन म्हणाला, आपण खूप दूर जाऊ अशी दुर्योधनाची कल्पना असेल; तेव्हा आपण जवळच्या देशांत राहू किंवा कृष्णाच्या नगरीतच राहू."

विचारांती मत्स्यदेशचा राजा विराट याच्या नगरीत रहावे असे ठरले. परंतु धर्मराजांनी दुसऱ्याचे दास्य करावे ही कल्पनासुद्धा अर्जुनाला असह्य झाली.

(साकी) कंक नाम होइन राजाचा अक्षज्ञ सभास्तार ।
वदे वृकोदर पौरोगव मी होईन सूपकार ॥
वदे मी ग्रंथिक तै नकुल ।
वदे सहदेव तंतिपाल ॥

## पद १३४ वे

तैं धर्म वदे। करुनी संबोधन भीमा।
हा अनुज तुझा बळपौरुष विक्रमसीमा ॥ धृ. ॥

अज्ञातपणे राहील केवि हा तरणी।
झाकावा कैसा कार्पासपटे तरणी ॥ १ ॥

क्षात्र या जगी अर्जुना नोळखे कोण।
ज्याघातांकित बाहू कथितिल हा कोण ॥ २ ॥

एकाकी तर्पी जो खांडववन दहना।
देवेन्द्रसहित भंगुनि वृंदारक पृतना ॥ ३ ॥

एकाकी वरिली पुरुषवराची भगिनी।
वैनतेय ज्यापरि सुधा देव जिंकूनी ॥ ४ ॥

(चाल) वदला विनये तेधवा अर्जुन।
जाणाया कोणी मला शक्त न।
परिवेष असा नरवरा घेइन।
मी बृहन्नला होईन क्लीबगुणधामा ।

हा अनुज०

---

टीप – "विराट राजाकडे गेल्यावर युधिष्ठिरांनी सभास्तार होऊन द्यूत खेळून राजाला संतुष्ट करायचे, भीमाने बल्लवाचार्यांचें काम करायचें, नकुलाने अश्वबंधाचे व सहदेवाने गोशाळेतील काम करायचे असे ठरले. अर्जुनाचा पराक्रम आठवून युधिष्ठिरांना त्याच्या गुप्त राहण्याची चिंता वाटली. तेव्हा बृहन्नलेच्या रूपाने राहण्याची अर्जुनाने प्रतिज्ञा केली."

भाग्याने भगवत्प्रसाद मिळता देवेन्द्र दे दर्शन।
ने स्वर्गात करावयास्तव मला दिव्यास्त्रसंपादन।
संगीतादि कला मला शिकविली श्री चित्रसेने नृपा।
दिव्यज्ञान कलादि जाणत असे मी ही महेन्द्रकृपा ॥

## पद १३५ वे

नारायण वामांक संभवा वंशाची जननी ।
स्वर्ग नृत्य पीठावरि राया अवलोकिलि नयनी ।।
लावण्याचा दिव्य असा आर्या आविष्कार ।
अनन्य ज्याचा जगन्नियंता स्वये शिल्पकार ।
अनिमिष नेत्री तिला पाहता झाला अपसमज ।
प्रार्थाया ती स्वये पातली रम्य निशीथी मज ।
वदे चित्रसेंने देवेन्द्राकरवी अनुशासन ।
दिले आणि माझेही पार्था आतुरले रे मन ।।

(चाल) वदलो हे जननी बाळ तुझा पार्थ मी ।
मानितो तुला गे जननीहुनि पूज्य मी ।
वंशाच्या माते पाय तुझे मी नमी ।
वांछाभंगे रक्तिमा तिच्या ये राया नयनी ।
षंढ हो असा शाप दे मला रागेजुनिया मनी ।।

---

टीप – " भगवंताच्या कृपेने इंद्रपुरीला गेलो असता सर्व कला संपादन कशा केल्या आणि ऊर्वशीचा शाप झाला ती पूर्वकथा अर्जुनाने सांगितली."

(साकी) उपाध्याय तें धौम्य करिती उपदेश दासधर्माचा ।
त्याते वंदुनि दे निरोप सप्रेम पुत्र धर्माचा ।।
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ।।

(घनाक्षरी) वदे विजयाते धर्म । हेति देति न ह्या शर्म ।
पाहता ह्या भय धर्म । श्रेष्ठ वर्म भिजविती ।।
तुझे कार्मुक त्रिकराल । करी भयकंपित काल ।
पाहताच मत्स्यपाल । ओळखील बा तुला ।।

(साकी) या पितृकाननि शमी वृक्ष वाटे पांडवसख मजला ।
विश्वसुनी यावरी ठेउ या आर्या निज शस्त्राला ।।

## पद १३६ वे

दंडकमंडलु मण्डितकर तो नूतन यति चालला ।
पहाया लोकसंघ लोटला ॥
अंतरिचा सतप्त भाव तद्हृदयि न सामावला ।
म्हणुनि वरुनी गोचर जाहला ॥
नामस्मरणी दावाया रति अधरस्फुरण पावला ।
वेष अनुरूप असे साधला ॥
शोभविती चरणा सुरम्य नव पादुका ।
तो पूज्य खरा वाटला मनी भाविका ।
वाटला सत्त्वसिंधु तो परी आणिका ।
संसदि अवचित अवलोकुनि नृप मानसि आनंदला ।
नमुनि उच्चासनि यति बसविला ॥

---

टीप – " धौम्य ऋषींनीं पांडवांना व द्रौपदीला दासधर्माचा उपदेश केला व निरोप दिला. विराट नगरीला येईपर्यंत त्यांची शस्त्रे त्यांच्याजवळ होती. ती त्यांनी नगराबाहेरच विशाल अशा शमीवृक्षावर ठेवली. कालाचा महिमा अगाध आहे. राजा युधिष्ठिर ब्राह्मणवेश धारण करून राजा विराटाकडे आला. त्याच्या दिव्य तेजामुळे राजाने त्याचे स्वागतच केले."

## पद १३७ वे

सस्मित बोले । तैं पार्थ धरानाथाते ।
जिंकाया विश्वी शक्त कोण दैवाते ॥ धृ. ॥
विश्वसृष्टा । छिन्नशीर्ष कां झाला ।
शक्त्यभिन्न शंभू । विरही कां सापडला ॥ १ ॥
शीलनिधी नल कां । दुःखगर्ति वा पडले ।
दमयंतीचे जीवन कां उजाड झाले ॥ २ ॥
मर्यादा पुरुषोत्तम ऐसे कां म्हणती ।
दुःखानुभवार्थचि माझी जीवनज्योति ॥ ३ ॥
धर्म हेच ज्यांचे शर्म पांडवाग्रज ते ।
केले अपमानित दुर्दैवाने पुरते ।

(चाल) भीमार्जुन इद्रापरि भास्वर ।
झाले मशकांचे नृपा किंकर ।
दैव हेच विश्वी गमे ईश्वर ।
त्या दुर्दैवे षंढना वरुनिया माते ।
करि शाश्वत राया हास्यास्पद बा पुरते ॥

(श्लोक) तो त्या मल्लमहोत्सवी अतिशया जीमूत नामा कुणी ।
जीमूतापरि गर्जुनी वदतसे सर्वांस आव्हानुनी ।
मिष्टान्ने बहुले स्वदेह शठ हो कां व्यर्थ रे पोशिला ।
या मत्स्येन्द्रपुरीत मल्ल न दिसे कोणीच कैसा भला ।

(घनाक्षरी) वदे गर्वोद्धत मल्ल । तदा फुगवुनि निजगल्ल ।
असे एकचि प्रतिमल्ल । मल्लमुकुट पाण्डव ।
करी तो मागधहनन । यदा केले मी श्रवण ।
तदापासुनि हे नयन । क्षुधित पाहण्या तया ।
तया जिंकुनी पददास । करावा ही मनि आस ॥
परी हाय कालपाश । वशीभूत तो गमे ॥

---

टीप— " विराट नगरीत चार महिने घालविल्यावर तेथे ब्रह्मोत्सवाचा समय आला. त्या उत्सवासाठी देशोदेशाहून अनेक मल्ल आले. रंगसभेत सर्वजण बसले असता जीमूत नांवाच्या एका अति बलाढ्य मल्लाने इतर मल्लांना आव्हान केले. त्याला फक्त जरासंधाचा वधक भीमच आपल्याबरोबराचा वाटत होता."

## पद १३८ वे

परवशतेचा पाश जयांच्या असे गळा लागला ।
तया प्रत्यक्ष नरक लाभला ॥ धृ. ॥
कुबेरास लाजवी जयांचा दान कीर्ति संचय ।
करिति ते अन्नवस्त्र विक्रय ॥ १ ॥
दक्षपणे ते विनिमय करिता हृदयसिंधुभीतरी ।
उठति दुःखोर्मी वरचेवरी ॥ २ ॥

भावी आशेवरी रोखुनी दृष्टि आवरूनि मन ।
करिति ते निजजीवन यापन ॥ ३ ॥
(चाल) गेले मासद्वय वीरांचे यापरी।
त्या यत्नशते ओळखू न शकला अरी ।
गुप्तपणे त्याते संरक्षी श्रीहरी ।
विराट नगरी ब्रह्म महोत्सव समय तोच पातला ।
तया प्रत्यक्ष ०
(साकी) भीम करी हरिसी पुरवाया राजदार कामरण ।
कृष्णा म्हणे न देशी का मज श्रीकृष्णा तू मरण ॥

टीप—"पारतंत्र्याचा काळ मोठा कठीण ! पांचही पांडव आपल्या चाकरीत मिळणारी वस्तु कोणाच्या लक्षात येणार नाही अशा रीतीने एकमेकांना देत. सर्व-जण सती द्रौपदीचे उत्तम प्रकारे रक्षण करीत."

## पद १३९ वे

सिद्ध होय तो पाळाया धर्माचे अनुशासन ।
परि अप्रसन्न होते मन ॥ धृ. ॥
प्रगट करावे वीर्य आपुले मल्लयुद्ध या तरी ।
ओळखिल मत्स्यप मज अंतरी ॥ १ ॥
शंकाकुल या भये वायुसुत तो रंगी उतरला
तोच तो देहभान विसरला ॥ २ ॥
गर्जनेस सर्जना प्रहारा प्रहार दे उत्तर ।
प्रेक्षका होय हर्ष अतितर ॥ ३ ॥
(चाल) जीमूत वज्रमुष्टिने श्रांत पाहुनी ।
तज्जीवितान्तकर विचार आणुनि मनी ।
धावला वृकोदर प्रलयंकर गर्जुनी ।
सिंहे गजसा कवळ घालिता करि तो आक्रंदन ।
परी अप्रसन्न ०
(साकी) फिरवुनि शतदा पिष्ट करी क्षितिवरि सलील आपटुनी ।
युद्धामृत प्राशिले नयन वदने करुनी आपटुनी ॥

टीप – " सभेतील सर्व मल्ल खिन्न झालेले पाहून राजा विराटाने नवीन आचाऱ्यास त्या जीमूताबरोबर युद्ध करावयास लावले. भीमाच्या मनांत नव्हते. पण उघड रीतीने राजाज्ञेचा अवमान करणेही त्याला शक्य नव्हते. दोघेही एक-मेकावर जय मिळविण्याच्या इच्छेने लढले. तो थकलेला पाहून भीमाने शंभर वेळा त्याला गरगर फिरवून आपटून मारले. हा सर्व प्रकार पाहून द्रौपदी मात्र तळमळू लागली."

(ओवी) सुदेष्णेचे संनिधानी । दुःख ते सुख मानूनि मनी ।
वर्तत असता याज्ञसेनी । काही विपरीत वर्तले ।
विराटाचा सेनापति । सुदेष्णेचा बंधु कुमति ।
कीचकनामा पापमूर्ति । भगिनीगृहा पातला ।
ईचे झाले अवलोकन । नेत्रद्वारे मदिरापान ।
चढले म्हणून आठवण । शरीराची विसरली ।
इचे अधरामृताचे पाने । पीनपयोधरालिंगने ।
शरीर भोग भोजने । भाऊबीज मज करी ।
(साकी) परदारा मत्पति गंधर्व प्रबळ उग्र शिवशील ।
सेनाधिपते वध होइल जरि बळे मला शिवशील ॥

## पद १४० वे

देवयज्ञकन्या न जरी तू कुवलायत लोचने ।
भग्न समाधि होइल ब्रह्मा केवळ तव वीक्षणे ॥ धृ. ॥
ब्रह्म्याच्या सृष्टींत केवि हा रूपाविष्कार ।
लावण्या या तो जड कैचा होय शिल्पकार ॥ १ ॥
घोर महेश्वर भयकंपित तनु रक्षाया प्राण ।
वाटे स्त्रीरूपे या सजला स्वये पंचबाण ॥ २ ॥
दग्ध मदनतनुला द्याया का पुनश्च संजीवन ।
सजले धन्वंतरी कराया औषध संजीवन ॥ ३ ॥
(चाल) शशिकला कौमुदी वस्त्रगाळ घोळुनी ।
ती आर्द्र करुनिया स्वये सुधासेचनी ।
घडविली मूर्ति लावण्यमया सुखखनी ।

शूरांचे स्वामित्व असे लावण्या मृगलोचने ।
भग्न समाधी ०

टीप—" विराट नगरीत पांडवांचे दहा महिने गुप्तपणे निघून गेले. एक दिवस विराटाचा सेनापति व सुदेष्णेचा बंधु कीचक याचे लक्ष अतीव सुंदर अशा द्रौपदीकडे गेले आणि मदनशरांनी विव्हल झालेला तो तिच्या प्राप्तीची बहिणी-जवळ याचना करू लागला. द्रौपदीची गाठ घेऊन तिचे मन वळविण्यासाठी तिची मनधरणी करू लागला."

(साकी) ती तीस म्हणे कीचक सदना आण जाउनी ह्याला ।
धाडी बळे वृकाच्या घालुनि आण मृगी गेह्याला ॥

## पद १४१ वे

नारी असुनी शीलाचे का रुचे विडम्बन मना ।
सांगता होति न कां यातना ॥ धृ. ॥
महिषी पट्टाभिषिक्त कैसे कर्तव्या विसरता ।
स्त्रीप्रजा काय न अपुली सुता ॥ १ ॥
पापसिंधु तो बंधू लंपट हे आपण जाणता ।
गमन तत्सदनी कां सांगता ॥ २ ॥
तुंग गिरिशृंगाहुनि माझा कडेलोट जी करा ।
करा वा गरल द्यावया त्वरा ।
(चाल) स्वामिनी काय चारित्र्यधना लुटविती ।
अपराध काय या जगी राहणे सती ।
विटसदनी जाईल पतिव्रता कोणती ।
स्त्रीत्वाचा हा अधःपात दे मना अमित यातना ।
सांगता होति ०

टीप—" द्रौपदीने कीचकाचा धिक्कार केला. तेव्हा पुन्हा त्याने सुदेष्णेला द्रौपदी वश होईल असा उपाय विचारला. तिने पर्वणीच्या दिवशी दारू आणायला द्रौपदीला कीचकाच्या घरी पाठवावे असे ठरले. नियोजित दिवशी स्वतःसाठी दारू आणण्याची आज्ञा दिली. द्रौपदीच्या विनवणीचा काही उपयोग झाला नाही."

## पद १४२ वे

जी अभिषिक्ता साम्राज्ञी विश्वाची ।
प्रिय भगिनी परमेशाची ॥ धृ. ॥
घे दुर्भाग्ये करकमली मदिरापात्रा ।
चालली मंद मृदुगात्रा ॥ १ ॥
नेत्रांतुनि तै अश्रुसरी ओघळती ।
धैर्यबंध सारे तुटती ॥ २ ॥
आठवी मनी तै दीनाचा बंधू ।
चक्रपाणी करुणासिंधू ॥ ३ ॥
(चाल) हा विपाक मम कर्माचा ।
कोणत्या श्रीहरी साचा ।
जाईल बळी शीलाचा ।
कां न ये घडी याहुनी प्राणनाशाची ।
प्रिय भगिनी ०

---

टीप—"द्रौपदी भीत भीत, रडत रडत, दैवावर भार टाकून आणि भगवंताचे मनांत स्मरण करीत मदिरापात्र घेऊन कीचकाच्या घरी जाण्यासाठी निघाली."

## पद १४३ वे

मृदुपदपल्लवसंस्पर्शें तव भवन धन्य झाले ।
त्वदपांगाचा विषय होउनी शरीर मोहरले ॥ धृ ॥
आगमने नत गात्रि तुझ्या हा धन्य होय वासर ।
करी पिपासा शांत मम तुझे लावण्याचे सर ॥ १ ॥
व्यर्थ देव गंधर्वाचे कां उच्चारिशि नाम ।
धर्मोल्लंघन कार्यी त्यांचा सदा दक्ष काम ॥ २ ॥
क्षीण ज्योत्स्ना सुधाकराची पुन्हा वर्धमान ।
गेलेले ते यौवन येते पुन्हा न परतून ॥ ३ ॥
(चाल) का कंपित ही तव सुतनू तनुवल्लरी ।
गंधर्वांची कां भीति हृदयांतरी ।

व्यर्थ तू तद्भये होसि देवि बावरी ।
मद्दृष्टिपुढे जाण मृत्युचे ते अतिथी जाहले ।
त्वदपांगाचा ०
(साकी) करकर रद चावुनी उठे जो सूतपुत्र वधकाम ।
प्रलयवन्हिसम भीम निवारी धर्मज विमुक्तिकाम ॥

---

टीप – " कीचकाने तिचे स्वागत केले आणि तिला जवळ घेण्यासाठी तिचा हात धरला. झटक्याने हात सोडवून द्रौपदी पळू लागली. तेव्हा त्याने तिचा पदर पकडला. तोही सोडवून तिने राजसभेकडे धाव घेतली. तेव्हा कीचकाने तिची वेणी धरली आणि राजा विराट व युधिष्ठिर यांच्या समक्ष लाथ मारून तिला खाली पाडले. द्रौपदीची अप्रतिष्ठा सहन न होऊन सभेत बसलेला भीम कीचकाच्या वधाच्या इच्छेने दातओठ चावू लागला."

(साकी) काष्ठास्तव हे राजसभेचे वृक्ष पाहसी काय ? ।
वनतरु काष्ठे युक्त बल्लवा अरसिकत्व हे काय ? ॥

## पद १४४ वे

कल्पनेतही रिपुत्व ज्यांचे वीरा थरकापवी ।
भंगितिल प्रत्याघाते पवी ॥ धृ. ॥
सत्यसंध ब्रह्मण्यदेव जे दानी नच याचक ।
दान्त तेजस्वी भयहारक ॥ १ ॥
ज्याघोषे दुंदुभि निर्घोषे गर्जविती जे दिशा ।
पाहति न कां ते माझी दशा ॥ २ ॥
पदप्रहारे सूताच्या तज्जाया ही मानिनी ।
तुडविली वर्षति न का लोचनी ॥ ३ ॥
(चाल) सूत हा दुरात्मा वधिति कां न विक्रमे ।
सोडिले तयांना काय तेज विक्रमे ।
स्वाभिमान वन्ही विझला त्यांचा गमे ।
गुप्तंचरता काय तयांचा स्वाभिमान लोपवी ।
भंगितिल ०

(साकी) गंधर्व त्वत्पति सुसमर्थहि देशकाल समयज्ञ ।
तेहि जाणती अन्य न जगती श्रितरक्षण समयज्ञ ।

---

टीप — "आपण ओळखले जाऊ या भीतीने युधिष्ठिरांनी भीमाला परावृत्त केले. तो वृक्षांकडे पाहू लागला तेव्हा अन्योक्तीने त्याला वळविले. सभाद्वारी रडत असलेली द्रौपदी, अज्ञातवासाची प्रतिज्ञा शेवटास जाण्यासाठी आपले खरे स्वरूप प्रगट होऊ नये म्हणून जपत असलेल्या पतींकडे पाहून खिन्न झाली."

(श्लोक) कुठे जाऊ ध्याऊ चरण कवणाचे नच कळे ।
अनाथा पाहोनी हृदय कवणाचे कळवळे ।
कशी माझी लज्जा म्हणि यदुपते रक्षिसि बरे ।
विधे झाली सीमा अजुनि तव कां खेळ न सरे ॥

## पद १४५ वे

घनतमी निघे मूर्तिमती ती करुणा ।
चिंतित बक मागध मरणा ॥ धृ. ॥
अवमानाचा स्त्रीत्वाच्या प्रतिशोध ।
घेईल वायुसुत योध ॥ १ ॥
या आशेचा दीप मनी पाजळुनी ।
वाहवीत अश्रू नयनी ॥ २ ॥
तो महानसी निद्रिस्त पाहिले भीमा ।
संक्रुद्ध होय ती वामा ॥ ३ ॥
(चाल) पाहिला घोर अपमान ।
तरि भीमहि निद्राधीन ।
पति कैसे लज्जाहीन ।
हे परमेशा ! दे मृत्यूच्या मज दाना ।
चिंतित ०

---

टीप – "संतापलेली ती द्रौपदी डोळ्यांत पाणी आणून विराट राजाची निर्भर्त्सना करू लागली. तेव्हा धर्मराज युधिष्ठिरांनी तिला सुदेष्णेच्या महालात

जाण्यास सांगितले. तिच्या तोंडून झालेला प्रकार ऐकून कीचकाला मी चांगली शिक्षा करीन असे सुदेष्णा म्हणाली, पण 'ज्यांचा त्याने खरा अपराध केला तेच त्याचा वध करतील' असे स्वाभिमानपूर्ण उत्तर देऊन ती भीमाकडे पाकशाळेत जाण्यास निघाली."

## पद १४६ वे

परमेशाची ठेव राज्य दुर्द्यूत पणी लाविता ।
जाय कोठे त्वद्धर्मज्ञता ॥ धृ. ॥
धर्मे चार्थे च असे वदता तीस लाविता पणी ।
म्हणविता धर्मनिष्ठ सद्गुणी ॥ १ ॥
व्यसनाच्या अग्नीत जाळिला धर्म न्याय आपण ।
सुटेना नादही क्षण ॥ २ ॥
चक्रवर्ति हा झणी रंजवी विदूषकाच्या परी ।
मोद मानू हा का अंतरी ॥ ३ ॥
(चाल) झालांत चंडपौरुष बल्लव आपण ।
तो षंढ होय देवाधिराजनंदन ।
नर्तने करी उदरार्थ राजरंजन ।
मोदाचा लवलेश तरी या भाग्यी कां दाविता ।
जाय कोठे ०

टीप — "भीमसेन मृगराजाप्रमाणे घोरत असलेला तिने पाहिला मात्र. तिचा संताप झाला. तिने भीमाला जागे केले आणि युधिष्ठिर, अर्जुन यांच्यासंबंधी ती विलाप करू लागली."

## पद १४७ वे

हे चारुगात्रि कल्याणि कमलदलनयने ।
चिंता न करी विधुवदने ॥ धृ. ॥
द्रौपदी शत्रुचे हनन करुनि रुधिराने ।
मी न्हाणिन तुज प्रेमाने ॥ १ ॥




कीचकवध

शत्रुला आप्तबांधवांसहित गुणसदने ।
संहरिन तरि न व्यर्थ जिणे ॥ २ ॥
कल्याणि अवधि न च उरलि बंध तुटण्याची ।
शृंखला पारतंत्र्याची ॥ ३ ॥
ज्योति गे उडत ये अधिक दीप्ति दीपाची ।
परि सुचवि संधि मरणाची ॥ ४ ॥
(साकी) त्या शिखरे भासेसे शिक्षित सस्मित स्वये वदली ।
परि थरकांपे तत्तनु जेशी मंद मारुते कदली ॥
ऐका श्री भारत वार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥

टीप – "द्रौपदीने चंदन उगाळून घट्टे पडलेले हात भीमाला दाखविले. तेव्हा ते हात आपल्या हातात घेऊन भीमही रडू लागला. त्याने स्वतःच्या बाहुबलाचा धिक्कार केला. तिचे परोपरीने सांत्वन केले आणि रात्रीतून बंधूसह कीचकाला ठार मारण्याची घोर प्रतिज्ञा केली. त्यासाठी त्याने कीचकाला नृत्यशाळेत अंधारात समागमासाठी बोलाव असे द्रौपदीस सांगितले."

(ओवी) पुढे करूनिया वदना । करू पाहे मुखचुंबना ।
भीम मारूनि चडकणा । दंतपंक्ती पाडिल्या ॥ १ ॥
मग म्हणे रे कोण धीट । येरू म्हणे गंधर्वश्रेष्ठ ।
सैरन्ध्रीचा भाग स्वादिष्ट । चाखावया पातलो ॥ २ ॥

(साकी) धरितोसि जीविताशा गरलप मंद नीच काशाला ।
रक्तमांसकर्दमे पहा तव भरेल नर्तनशाला ॥

## पद १४८ वें

कंठावरि टेकुनी जानु त्या देत अमित यातना ।
वायुसुत करी घोर गर्जना ॥ ध्रु. ॥

झाले जगही नीच घोटिती जे नीतीचा गळा ।
परी तू सर्वांहुनि आगळा ॥ १ ॥
सती कुंतला कर्षणि रतला हाच तुझा ना कर ।
वदत हे उपटितो सत्वर ॥ २ ॥
पदाघात केलास ना असे संबोधुनि तोडुनी ।
तयाचे चरण देत फेकुनी ॥ ३ ॥
आर्त स्वर जै करी तो पदे कंठा अवमर्दुनी ।
वधी त्या भीम घोर गर्जुनी ॥ ४ ॥

(चाल) एकेक काढुनी अस्थि शरीरांतुनी ।
शिरपादाद्यवयव शरीरात घालुनी ।
मांसगोल तो क्रोधें टाकी तुडवुनी ।
वदे द्रौपदी आर्यांचे हे उत्तर स्त्रीतर्जना ॥
वायुसुत ०

टीप – " कीचकाशी नियोजित संकेत करून द्रौपदीने भीमाला ती वार्ता कळविली. भीम आधीच नृत्यशाळेत जाऊन अंधारात दडून बसला. काममोहित झालेला कीचकही समागमाच्या मनोराज्यांत चाचपडत तिथे आला. द्रौपदी समजून कीचकाने भीमास स्पर्श करताच दोघांचे भयंकर युद्ध जुंपले. भीमाने कीचकास ठार केले."

## पद १४९ वे

सजले पापी पुरुषवरांची जाया ।
कीचकासवे जाळाया ॥ ध्रु. ॥
राजाज्ञेने पांचाली क्रूरांनी ।
कीचकासवे बांधोनी ॥ १ ॥
पितृवनमार्गी नेता आक्रंदुनी ।
हाकारी करुणावाणी ॥ २ ॥
पांचालीचा करुणनाद ऐकुनिया ।
वेदना तीव्र जनहृदया ॥ ३ ॥
तो नाद भीमहृदयांत ।
वाटे जणु वज्रप्रपात ।
करि परिवर्तन वेषांत ।
धावे वेगे पितृवनांतरी जाया ।
कीचकासवे ०

---

टीप – " कीचक मेल्याचे त्याच्या भावांना कळले. त्याचा दहनसंस्कार करण्याच्या तयारीस ते लागले. तेवढ्यात द्रौपदी त्यांच्या नजरेस पडली. तिच्यावर लुब्ध झाल्यामुळेच त्याचा मृत्यु झाला, तेव्हा त्याची शेवटची इच्छा पूर्ण करण्यासाठी त्याच्याबरोबर तिचेही दहन करायचे त्यांनी ठरविले. राजानेही ह्या कृत्यास अनुज्ञा दिली. तिला त्यांनी तिरडीवर घट्ट बांधले आणि स्मशानाकडे ते घेऊन चालले. ती पतिव्रता रक्षणार्थ मोठ्याने आक्रोश करू लागली. तेव्हा पुन्हा भीम धावून आला."

## पद १५० वे

वृक्षाघाते अनुकीचकशत वधी शौर्यसागर ।
भये तै पळति सर्व नागर ॥ धृ. ॥
मृत्युमंचकावरुनि सोडवी सती वायुनंदन ।
वदे हे होय अमर पितृवन ॥ १ ॥
पांचाली जा सुखे यापुढे करि न कोणि धर्षण ।
स्मरतिल हे सूडाचे क्षण ॥ २ ॥
लावण्याची पार्श्वभूमि हा विक्रम स्मरता मनी ।
होतिल लंपटही सद्‌गुणी ॥ ३ ॥
(चाल) दंड हाच देवी न्याय जगाचा असे ।
धर्मन्याया तद्विना प्रतिष्ठा नसे ।
सामर्थ्यें ईश्वर विश्व चालवीतसे ।
चक्रपाणि हरि त्रिशूलधारी म्हणुनि पूज्य शंकर ।
भये तै ०

टीप – "अनुकीचकांना मारण्यासाठी हत्यार म्हणून भीमाने स्मशानातील एक मोठा वृक्ष फांद्यांसहित उपटून घेतला आणि तो त्यांच्या अंगावर धावून गेला. ते भिऊन द्रौपदीला टाकून पळून जाऊ लागले, तेव्हा भीमाने पाठलाग करून त्या वृक्षाने झोडपूनच त्या सर्वांना यमसदनास पाठविले."

## पद १५१ वे

दग्ध होति गंधर्वांच्या तै कीचक कोपानळी ।
पसरे वार्ता भूमंडळी ॥ धृ. ॥
जे पांडव शोधार्थ हिंडती अंधसुताचे चर ।
येति ते सांगाया सत्वर ॥ १ ॥
नर मर्यादातीत हननकांड जे सकल वर्तले ।
त्यांनी रायाप्रति वर्णिले ॥ २ ॥
ऐकताच ते गुप्तसभेमाझारि वदे मातुल ।
ऐकिले की कीचक अतिबल ॥ ३ ॥

(चाल) जरि गंधर्वांची वार्ता मिथ्या असे ।
हे कर्म अमानुष राया मज गमतसे ।
अद्वितीय पौरुष गंधर्वांचे दिसे ।
द्वितीय पांडव भीमसेन मानवांत एकचि बळी ।
पसरे वार्ता भूमंडळी

(घनाक्षरी) वदे अग्रज भीमास । कवच हो तू भूपास ।
नृप शशीचा या ग्रास । शत्रु राहू करितसे ॥
परी अमानवी कर्म । न देइल अंती शर्म ।
आंगि लेवुनिया वर्म । कार्मुकेच रण करी ॥

टीप – "अनुजांसह कीचकाचा नाश झाला ही वार्ता देशोदेशी पसरली. दुर्योधनाच्या हेरांनीही ही वार्ता त्यास सांगितली. एकांतात शकुनि दुर्योधनास म्हणाला की, गंधर्वांची गोष्ट जर खोटी ठरली तर हे अमानुष कृत्य करण्याचे सामर्थ्य एका भीमाचेच आहे."

(साकी) तो राजगृही ये रायाच्या उत्तराख्य तनयाते ।
नमुनि म्हणे नेतो दुर्योधन धेनु करुनि अनयाते ॥
ऐसे बहुतचि बोले बालिश बोल बायकामाजी ।
चित्र कटकसे येतिल ते शिशुबोल काय कामा जी ॥

(घनाक्षरी) वदे सैरंध्रिस पार्थ । संधि हो न ही अपार्थ ।
धनंजयाभिधा सार्थ । हो मदर्थ साधा हा ॥
मत्स्यनगरी रिपु सर्व । येति कर्णादि सगर्व ।
करिन भुजमद मी खर्व । समरपर्व साधुनी ॥

(साकी) तुज उत्साह नसे तरि करितो धनु घेउनि मी रण हो ।
मज मेघासी शरवृष्टीस्तव साह्य तू समीरण हो ॥

टीप – "कीचक मेल्याचे ऐकून त्रिगर्तांचा राजा सुशर्मा याला फार आनंद झाला. त्याने विराट नगरीवर स्वारी करून त्याच्या लक्ष गाई पळविल्या. त्या परत आणण्यासाठी राजा विराट बंधूना घेऊन गेला असता ही संधि साधून कौरवांनीही मत्स्य देशात येऊन विराट राजाच्या गौळवाड्याची धुळधाण करून बलात्काराने त्याच्या साठ हजार गाई पळविल्या. या वेळी फक्त विराटपुत्र उत्तर राज्यात होता. चांगला सारथी असता तर मी युद्ध केले असते असे तो बडबडू लागला. अर्जुनाला प्रगट होण्याकरिता ही संधि फार चांगली वाटली. त्याने द्रौपदीच्या मध्यस्थीने आपण सारथ्य करू शकतो असे उत्तराला कळविले."




उत्तर गोग्रहण

## पद १५२ वे

हे गुणधामा । मी भूमिजय नृपपुत्र ।
नमितो व्हाया । त्वत्कृपाकटाक्षा पात्र ॥
बलसागर हा । गोष्पदापरी मज वाटे ।
त्वद्विक्रम कुंभज । बाणाच मनी आटे ॥
कार्मुक ठरले । महेन्द्र संरक्षक जे ।
करिलचि समरी या । निश्चित रक्षण माझे ॥
प्रतिभट ज्याचा । महारुद्र या जगती ।
त्यापुढे मशक हे । कौरव सेनाधिपती ॥

(चाल) ब्रह्मा रुद्राचा जसा सारथी ।
तेवि मी पार्थ आपुला सारथी ।

इतिहास घडे जी नवा या रथी ।
होतील गमे हे भीष्मादि त्रपापात्र ।
नमितो व्हाया०

(साकी) व्यर्थचि गर्जन करितें तव मुख जेवि शारदाभ्र महा ।
बडबडसी जे अमित निरर्थक वाग्विशारदा भ्रम हा ।

---

टीप — "बृहन्नलेच्या वेषातील अर्जुनाने उत्तराचा रथ कुरुसैन्यासमोर आणून उभा केला. ते अवाढव्य सैन्य पाहून उत्तर भ्याला आणि पळून जाऊ लागला. तेव्हा अर्जुनाने त्याला चुचकारून स्वतः लढण्याची तयारी दाखविली आणि त्याला सारथ्य करण्याची विनंती केली. त्यासाठी त्याच्याच हातून शमी वृक्षावरील आपली आयुधे काढून घेतली. आपण स्वतः अर्जुन असल्याचा परिचय करून दिला. तेव्हा उत्तराची भीति दूर झाली आणि त्याने आनंदाने आणि उत्साहाने सारथ्य करण्याचे मान्य केले."

## पद १५३ वे

अंबांकस्थित शिशु शशी कवळाया इच्छी मृषा ।
तेवि तव पार्थनिवारण वृषा ॥ धृ. ॥

प्रेतमांसमत्त जंबूके सिंहाव्हान न वृथा ।
तेवि तव अर्जुन वारण कथा ॥

विषोल्बण अही जागा करिशी काष्ठे कां टोचुनी ।
कंपन फूत्कारे तव मनी ॥

(चाल) मंडूक तू कसा मेघाशी स्पर्धिसी ।
कां दीपशिखा तेजे लाजवितें शशी ।
इंद्रिया राम जिकील काय गावशी ।
गमे मुमूर्षो मृत्युजलाची तुला लागली तृषा ।
तेवि तव ०

## पद १५४ वे

ती अनुशासनबद्ध सुयंत्रित द्विधा वाहिनी ।
श्वेतवाहन बोले पाहुनी ॥ धृ. ॥
द्रोण कर्ण कृप अश्वत्थामा टाळुनि दुर्योधना ।
गांठरे पुरवाया कामना ॥
कुरु सेनापति सव्य घालुनी कवळाया कुरुपती ।
धावला नागा जणु खगपती ॥
(चाल) तै द्रोण कर्ण धावती स्थान सोडुनी ।
सुनियंत्रण गेले सेनेचे भंगुनी ।
हासला पार्थ दृश्य ते पाहुनी मनी ।
वदे उत्तरा कुठे व्यूह ही शकलित बघ वाहिनी ।
श्वेतवाहन ०

---

टीप – "अर्जुनाने केलेला गांडीव धनुष्याचा टणत्कार आणि देवदत्ताचा नाद ऐकून कौरव सैन्यात चर्चा सुरू झाली. अर्जुनाशी लढायचे ह्या कल्पनेने सैनिकांची पाचावर धारण बसली. तेव्हा कर्ण एकट्यानेच लढण्याची बढाई मारू लागला. कृपाचार्यांनी त्याचा विचार अहितकर असल्याचे सुचविले. त्यांनी गाई घेऊन दुर्योधनाला देशात पाठविले. तेव्हा सर्व सैन्य सोडून अर्जुनाने आपला रथ त्याच्याकडेच वळविला."

## पद १५५ वे

घोरा भयवर्धिनी खळखळा तै शोणितवाहिनी ।
श्वेताश्वहिमाचलोद्भवा धावे सागरगामिनी ॥ धृ. ॥
इतस्तता धावत्या चमूने बहुल उडविले रज ।
खळखळत्या शोणितार्णवी त्या द्वीप भासती गज ॥
मांसकर्दमी फुलली बहुविध शिरकमले अभिनव ।
व्रणभ्रमर त्यावरी विराजति रक्तवर्ण जणु नव ॥
कुंतल शैवालांकित विभ्रम महावर्तशालिनी ।
आभूषणमय मुख विस्तारित मकरदंतशालिनी ।

(चाल) ते गांडीव न ज्वालामुखि तो पेटता ।
अति तप्तरसा संगरी होय फेकता ।
तत्तेजे तेजोभास्कर थरकापता ।
स्वर्गाचा सोपान होय ती क्षात्ररक्तवाहिनी ।
श्वेताश्व ०

(साकी) षंढवर्णने राजसुताची निंदा करिसी काय ? ।
असे वदुनि अक्षे ताडी त्या भाळी विराट हाय ॥
रक्त धरी भावज्ञा कृष्णा ते सुवर्णपात्रात ।
वदे धर्म त्या बृहन्नलेला येउ न द्यावे आत ॥

---

टीप – "अर्जुन दुर्योधनाकडे वळलेला पाहून सर्वांनीच आपले रथ तिकडे वळविले. अर्जुनाने घनघोर युद्ध करून रक्ताची नदी वाहविली. भीष्म, द्रोण, कर्ण आणि सर्वच कौरवांनी अक्षरशः पलायन केले. गाई जिंकून अर्जुन व उत्तर विराट नगराला आले.

आपल्या पुत्राचा पराक्रम ऐकून विराट प्रसन्न झाला आणि त्याची स्तुति करू लागला. तेव्हा युधिष्ठिर म्हणाले, 'ज्याचा सारथी बृहन्नला तो जिंकणारच.' षंढाची स्तुति करतो म्हणून राजाने युधिष्ठिरांना फासा फेकून मारला. द्रौपदीने त्याच्या नाकातून वाहणारे रक्त तस्तात् धरले. अर्जुनाला ते दिसू नये याची युधिष्ठिरांनी काळजी घेतली."

(साकी) क्रोधे उपहासे मत्स्यपती वदे सभासद कंका ।
भद्रासनी बसाया मूढा वाटे न कशी शंका ॥

## पद १५६ वे

केला राया कन्येचा स्वीकार ।
मी स्नुषा म्हणुनि साकार ॥ धृ. ॥
अमरा वरो सौभद्र तुझी बाळा ।
कल्याणद हेच नृपाळा ॥
भागिनेय तो श्रीकृष्णाचे रूप ।
कन्यावर तव अनुरूप ॥

कन्येसम जो विश्वस्त मजवरी राया ।
ती काय करू मी जाया ॥

(चाल) हा जाण ऋषींचा देश ।
त्याचा एकचि संदेश ।
रक्षावे चारित्र्यास ।
चारित्र्याचा प्राण जाण आचार ।
स्नुषा म्हणुनि ०

---

टीप – " तिसऱ्या दिवशी पांडवांनी शुचिर्भूत होऊन वस्त्रालंकार घालून राजसभेत प्रवेश केला. ते सर्व राजासनांवर बसले. विराटाला राग येऊन त्याने युधिष्ठिराची निर्भर्त्सना केली. तेव्हा अर्जुनाने सहाही जणांचा परिचय करून दिला आणि एक वर्षाच्या सुखद वास्तव्यासाठी कृतज्ञता व्यक्त केली.

युधिष्ठिराला अपकार केल्याबद्दल विराटाला वाईट वाटले आणि त्याची कृपा संपादन करण्यासाठी त्याने उत्तरा अर्जुनाला देण्याची इच्छा प्रकट केली. परंतु अर्जुनाने तिचा स्नुषा म्हणून स्वीकार केला. लवकरच अभिमन्यू उत्तरा विवाह संपन्न झाला."

# श्रीकृष्ण साह्ययाचना




श्रीकृष्ण साह्ययाचना

अंगी सर्व पृथ्वी जिंकण्याचे सामर्थ्य असूनही पांडव, केलेल्या प्रतिज्ञेला स्मरून आपले वडिलार्जित राज्य आपल्याला मिळावे एवढ्यासाठी बारा वर्षे वनवासात राहिले आणि शेवटचे वर्ष लपून, दुसऱ्याचे दास होऊन अतीव क्लेश सोसून त्यांनी विराटाकडे काढले. तेरावे वर्ष संपून पांडव प्रकट झाले. अभिमन्यु उत्तरेच्या विवाहासाठी श्रीकृष्ण बलरामासहित विराट नगरीला आले. विवाह संपन्न झाल्यावर तेथेच सभा भरवून, विवाहासाठी जमलेल्या सर्वही राजेलोकांचा विचार घेऊन पांडवांचे अर्धे राज्य दुर्योधनाकडून मिळवून देण्यासाठी कोणीतरी दूत पाठवावा असे श्रीकृष्णांनी प्रास्ताविक केले. त्याप्रमाणे द्रुपद राजाचा पुरोहित हस्तिनापुरी पाठवून श्रीकृष्ण द्वारकेला गेले. इकडे पांडव व विराट राजा मिळून संग्रामाची सिद्धता करू लागले. श्रीकृष्णांचे साह्यासाठी स्वतः अर्जुन व त्याच वेळी हस्तिनापुराहून दुर्योधनही द्वारकेस गेले. अर्जुनाने निःशस्त्र श्रीकृष्णाचा स्वीकार केला व दुर्योधन त्यांचे लढाऊ सैन्य घेऊन गेला. युद्धात श्रीकृष्णाने अर्जुनाचे सारथ्य करावे असे ठरले.




श्रीकृष्ण शिष्टाई

द्रुपदपुरोहिताच्या मध्यस्थीला उत्तर देण्याकरिता धृतराष्ट्राने संजयाला पांडवांच्याकडे उपप्लव्य नगरात पाठविले. संजयाजवळ धर्मराजांनी केवळ इंद्रप्रस्थाची मागणी केली. तेव्हा संजय म्हणाला, जीवित अशाश्वत आहे, तेव्हा कौरव जर युद्धावाचून तुझी मागणी पूर्ण करीत नाहीसे झालेच तर तू अंधक व वृष्णि यांच्या राज्यांत भिक्षा मागून बंधूंसह निर्वाह कर. पण युद्धाने कुलक्षय करून राज्योपभोग घेऊ नयेस. संजयाने धर्मराजाला केलेला हा उपदेश ऐकून श्रीकृष्णांनी द्यूतसमयीच्या कौरवांच्या दुर्भाषणाचे संजयास स्मरण करून दिले व उभयपक्षांत शम व्हावा म्हणून स्वतः कौरवांकडे जाण्याचा आपला मानस त्यास सांगितला. त्याप्रमाणे हस्तिनापुरास जाऊन कौरवसभेत श्रीकृष्णांनी अर्थपूर्ण, शांतियुक्त, धर्म व राजनीति यांस धरून भाषण केले. पण त्यावर दुर्योधनाने असे उत्तर दिले की, "अर्ध राज्य, पांच गावेच काय पण सुईच्या तीक्ष्ण अग्रावर बसेल एवढी जमीनही मी पांडवांना देणार नाही."

# उद्योगपर्व

## पद १५७ वे

(लावणी) विफल मनोरथ गजपुर सोडुनि माधवजी परतले ।
उपप्लव्यासि शीघ्र पातले ॥
त्या समवेतचि भाग्यलक्ष्मिही कौरवगृह सोडुनी ।
सती ये पतिदेवामागुनी ॥
केशव नच हा कृतान्त परते निजपाशी बांधुनी ।
कौरवकुलजीवन तत्क्षणी ॥
मृत्युंजय ही कौरवपतिच्या संरक्षण साधनी ।
समर्थ न "हा" म्हणेल निजमनी ॥
(चाल) भीष्मादि कापले परततांचि श्रीहरी ।
की बाहुबलाश्रित विजयश्री हा हरी ।
होईल गतधवा मया सर्व गजपुरी ।
इच्छामरणो ईशापुढती बाळचि केवळ बळे ।
उपप्लव्यासि ०

---

टीप—" कौरव पांडवांच्यामध्ये समझोता व्हावा म्हणून शिष्टाईसाठी हस्तिनापूरला गेलेले श्रीकृष्ण अयशस्वी होऊन उपप्लव्य नगराला आले. कवि म्हणतात, परत फिरले ते श्रीकृष्ण नव्हते तर यमराजा कौरवकुलाचे आयुष्य आपल्या पाशाला बांधून परतला होता. श्रीकृष्णांच्याच बरोबर कौरव कुलाची लक्ष्मीही गेली. आता त्यांना वाचवायला कोण समर्थ होता."

श्रीकृष्णांनी सभेतील सर्व वृत्तान्त धर्मराजांना सांगितला,

(साकी) भीष्म द्रोण विदुर उपदेशिति परि न वळे दुर्जन तो ।
अंध करी सद्बोध असा की बंधू वत्सल मज तो ।
त्याचे राज्य तया द्यावे ।
रत्ननिभ सद्यश जोडावे ॥
(घनाक्षरी) म्हणे गांधारी माय । बाळ रक्षी निज काय ?
धाय मोकलुनी काय । या वयांत रडावे ? ॥

(साकी) भेदुनि होतो देउनि सकलहि राज्य करुनि वर्णन गा ।
परि अणुमात्रहि धैर्यधुरंधर ढळला तो कर्ण न गा ॥
तशा मी यत्नलवे जाण ।
मेरुमांदारहि ढळवीन ॥ १ ॥
जो मी हितार्थ गेलो दुःखी भग्न ससुत अंध न हो ।
त्या मज सजला करावयाते दुर्योधन बंधन हो ॥
अता युद्धार्थ सज्ज व्हावे ।
क्षात्रधर्मास अनुसरावे ॥ २ ॥
अभिषेकिती मग धृष्टद्युम्ना भगवदनुमते वीर ।
रणोत्साहपूरित चित्ताने करिती जयजयकार ॥
जिकडे चिन्मय भगवंत ।
ते होणार विजयवंत ॥ ३ ॥

---

टीप – "भीष्म द्रोण विदुरांनी केलेल्या उपदेशाने दुर्योधन वळेना. धृतराष्ट्राने तर सांगितले की, न्यायाने राज्याचा अधिकारी युधिष्ठिरच आहे. गांधारीने तर एका सुतळीच्या तोडचावरही तुझा हक्क नाही असे दुर्योधनास सांगितले. पण तो जेव्हा उमजेना तेव्हा सामोपचाराने तो वळत नाही म्हणून कर्ण व दुर्योधन यांच्यांत भेद पाडून कर्णाला पांडवांकडे वळविण्याचा श्रीकृष्णांनी प्रयत्न केला. त्यांचा तोही यत्न फसला. तेव्हा अर्ध राज्याऐवजी पांच गांवे त्यांनी पांडवांसाठी मागितली. पण सुईच्या अग्रावर बसेल एवढीही जमीन मी देणार नाही असे दुर्योधन म्हणाला. त्याने कृष्णांना बांधण्याचाही प्रयत्न केला. श्रीकृष्णांनी युद्धाशिवाय दुसरा उपाय नाही असा युधिष्ठिरांना सल्ला दिला. युद्धाचा निर्णय घेऊन श्रीकृष्णांच्या मतानुसार धृष्टद्युम्नाला सेनापतिपदाचा अभिषेक केला."

## पद १५८ वे

विनवी विनयनत विगतनयनसुत सुरतटिनीसंभवाजी ।
सुमान्य आपण भवाजी ॥ १ ॥
करांगुलि स्पर्शे नवयौवन विगतवया अर्पिताजी ।
शंतनु अपुला पिताजी ॥ २ ॥
वृंदारकगणवंदितपदयुग नारायण नंदिनी जी ।
जननी मंदाकिनी जी ॥ ३ ॥

बृहद्व्रतधरा भास्कर विगतभ व्रतप्रभेने पुरा जी ।
कोण तुल्य नरवरा जी ॥ ४ ॥
इच्छामरणी सुर नर दानव नाग न टिकती रणी जी ।
काय तिथे नरमणी जी ॥ ५ ॥
जामदग्न्य जयकरा तरणि व्हा शरणागत पंकजी जी ।
शरण चरण पंकजी जी ॥ ६ ॥

(साकी) ज्यासी युद्ध करावे महिवरि कोण वीरवर मान्य ? ।
की सद्गुरुचा प्रसाद मजवरि निभ्रांत असामान्य ॥
सद्गुरु भार्गवराम मला ।
भास्वर विद्या दे विमला ॥

(घनाक्षरी) परी अधिरथी जाण । सदा मजसि स्पर्धमान ।
अहंकाराची खाण । यासमान कोणती ॥

टीप – "दुर्योधनानेही आपल्या सैन्याची व्यवस्था करून भीष्माचार्यांना सेनापति होण्यासाठी नम्रपणे विनंती केली. भीष्म म्हणाले, " मला जसे तुम्ही तसेच पांडवही प्रिय आहेत. तुझ्याकरिता त्यांच्याशी लढण्यात मी अंतर करणार नाही. पण त्यांच्या कल्याणाची गोष्ट सांगणे हे माझे कर्तव्य आहे आणि ते मी बजावीन. देव, दैत्य, राक्षस यांसह सर्व जगत् नष्ट करण्याचे सामर्थ्य माझ्या ठिकाणी आहे; पण मी पंडुपुत्रांचा उच्छेद मात्र करणार नाही, ही माझी एक अट आणि दुसरी अट अशी की, सूतपुत्र कर्ण नेहमी माझ्याशी स्पर्धा करतो. म्हणून प्रथम कर्णाने किंवा मी एकट्याने युद्ध करावे. कर्ण तत्काळ म्हणाला, भीष्म जिवंत आहेत तोपर्यंत मी लढणारच नाही."

## पद १५९ वे

होय अभिषिक्त तदा भीष्म । शत्रुसेना हिमनग ग्रीष्म ।
वदे तै हरिसख एकरणी । मत्स्यपरिपुष्वान्त तरणी ।
जयाते शर्वहि वाखाणी । की सद्गुणगणखाणी ।
परि न प्रकट करील रण । की मजसी इच्छामरण ।
पराक्रम प्रगटवील भीष्म । शत्रुसेना हिमनग ग्रीष्म ।

(साकी) पांडव वध न घडेल अग्नितहि शुचि सुबोध नांवाचे ।
व्हायाते ऋणमुक्त अयुत मी वधिन योधना वाचे ॥
जे श्रीकृष्ण वर्मयुक्त ।
मृत्युभीपासुनि ते मुक्त ॥

टीप—" कर्णाने याप्रमाणे निक्षून सांगितल्यामुळे दुर्योधनाने भीष्माचार्यांना सेनापतिपदाचा अभिषेक केला. त्यांना पुढे करून सैनिकांनी परिवेष्टित असा दुर्योधन बंधूंसह कुरुक्षेत्राला गेला."

पांडवांनीही आपल्या सात अक्षौहिणी सैन्याची रचना केली.

## पद १६० वे

हलधर वदला अजातरिपुला योग्य न संघर्ष हा ।
परी श्रीकृष्ण नायके पहा ॥ १ ॥
धनंजय प्रिय करावयास्तव केशव कलहप्रिय ।
मज नच अन्य तयाविण प्रिय ॥ २ ॥
प्रेमबळे निजतनुमन विक्रय केशव करि पांडवा ।
चेतवी कलहरूप वाडवा ॥ ३ ॥
(चाल) संबंधिवध न पाहवे मला क्षणभरी ।
घेईन शस्त्र युद्धांत न या मत्करी ।
यात्राव्याजे मी जातो देशांतरी ।
विजयी व्हा, भेटाल पुन्हा, व्हा विपदर्णव पार हा ।
परी श्रीकृष्ण ०
(साकी) प्रभुसमक्ष गर्वे तो वदला " रे पार्था साधिन हो ।
लीलेने शत्रुमदा जिरवुनि सर्व कार्य साधिन हो ।
रविसुत भीष्म द्रोण शिरा ।
उडविन सोडुनि शर निकरा ॥

---

टीप— "श्रीकृष्णांचे वडील बंधु बलराम पांडवाच्या शिबिरांत आले, आणि युधिष्ठिरांना म्हणाले, कौरव आणि पांडव दोघेही आम्हांला सारखेच आप्त असल्यामुळे कौरवांनाही आपण सहाय्य करावे असे मी श्रीकृष्णाला सांगितले पण तो ऐकत नाही. एका अर्जुनावर लक्ष देऊन त्याने आपले सर्वस्व तुम्हांस अर्पण केले आहे आणि मला तर कृष्णाशिवाय कुणीच प्रिय नाही. युद्ध अटळ आहे. मला मात्र हा आप्तसंहार पाहवणार नाही. म्हणून मी तीर्थास जातो."

बलराम जात नाहीत तोच रुक्मी पांडवांकडे ससैन्य आला. त्याच्याजवळ इंद्राचे विजय धनुष्य होते. पांडवांचा सत्कार घेतल्यावर तो अर्जुनाला म्हणाला, " तुला भीति वाटत असली तर मी तुझ्या पाठीशी उभा आहे. मी एकटा सर्व शत्रूंचा निःपात करून सर्व पृथ्वी तुला जिंकून देतो. "

(दिंडी) कर्णकृपभीष्मद्रोणशल्य वीर ।
मजसि द्या अथवा सर्व सैन्यभार ॥
पळे वधुनी स्थापीन पदी धर्म ।
मत्कृपेने भोगाल सुयश शर्म ॥
कौरवांच्या कटकांत जै शिरेन ।
वीरदेही राहतील ती शिरे न ॥
चित्ररथ गायिल मत्पराक्रमाते ।
लाजविन समरी स्कंदविक्रमाते ॥

(साकी) भीति कशाची । शुद्ध क्षत्रिय द्रोणशिष्य हरदास ।
जगदंबेच्या महाभयावह उखडिन सिंहरदास ।
सुरासुररण खांडवि केले ।
कोणते साह्य कुणी केले ॥

(घनाक्षरी) मत्स्यनगरी हे सर्व । येति कर्णादि सगर्व ।
करुनि भुजमद मी सर्व । समरपर्व जिंकिले ।
तेथे आचार्य द्रोण । भीष्मकृपकर्णहि तूर्ण ।
अग्निमय समरी बाण । प्राणहरण टाकिती ।
तेथे सारथ्यी बाळ । मज परिज राजबाळ ।
परी झालो मी काळ । कटकजाळ जिंकुनी ।
वीर पळति वस्त्रहीन । रणी टिकती पळही न ।
करी आच्छादुनि वदन । कुपित रदन घाशिती ॥

---

टीप – "रुक्मीची वल्गना ऐकून अर्जुन हसून म्हणाला, 'घोषयात्रेच्या वेळी, निवातकवचाशी लढताना, खांडववनात देवदानवांशी लढताना, विराट नगरीत गोग्रहणाच्या वेळी मी लढाया जिंकल्या तेव्हा मला कुणाचे साह्य होते? मला भीति कुणाचीच नाही. तुला वाटले तर इकडे रहा किंवा तिकडे गेलास तरी चिंता नाही. रुक्मी आपले सैन्य घेऊन दुर्योधनाकडे गेला. तिथेही त्याचा पाण-उताराच झाला, तेव्हा तो बाजूला सरला."

(साकी) धर्माकडे उलूकाभिध मग दूत नृपे पाठविला ।
ग्राम्यपणे दुर्जनमत सांगुनि क्रोध मात्र वाढविला ॥

## पद १६१ वे

(लावणी) पुसे अंधसुत गंगातनया जोडुनिया पाणी ।
विनयपूर्वक योजुन वाणी ॥ धृ. ॥
रथ अतिरथ किति इकडे तिकडे सांगा आजोबा ।
म्हणति जे हे रण गाजो बा ॥ १ ॥
भीष्म म्हणे कुरुराजा कथिल न गरुडवेग केतू ।
तेवि मी निजविक्रम केतू ॥ २ ॥
रथयूथप यूथांचा जाणा यूथपती द्रोण ।
तयासम पराक्रमी कोण ॥ ३ ॥
अतिरथ कृपशल्यकृतवर्मा बाल्हिक हे मान्य ।
द्वैरथचि सिंधुराजन्य ॥ ४ ॥

(चाल) रथ शकुनि आणि सानुज तू दुर्योधना ।
हा भगदत्त भिडे पुरा रणी अर्जुना ।
सारुनिया सख्य थांबवी शक्र त्या रणा ।
हा द्रौणी गमे द्रोणापरि करिता रणा ॥
परि न महारथि रथही आयुष्काम लक्ष्य प्राणी ।
विनयपूर्वक ०

---

टीप– हिरण्वती नदीचे काठी कौरव पांडवाचे तळ पडले, छावण्या घातल्या गेल्या. दुर्योधनाने कर्ण, दुःशासन व शकुनी यांच्यासह एकांतात मसलत करून उलूक नांवाच्या दूताबरोबर पांडव व श्रीकृष्ण यांच्यासाठी एक निरोप पाठविला. त्यांतील शब्दयोजना अत्यंत मर्मभेदक होती. त्यांत धर्मराजाला शमदमाचा आणि अजातशत्रुत्वाचा आव आणलेला संधिसाधु बोका म्हटले होते; श्रीकृष्णांना बहुरूपी कपटी, मायावी, गोकुळातील पोरीबाळींचे मर्दन करणारा, अर्जुनाला पराक्रमहीन षंढ म्हटले असून सर्वांनीच आपापल्या प्रतिज्ञारूप वल्गना खऱ्या करून दाखविण्यासाठी आव्हान केले होते. उलूकाने निरोप सर्वांसमक्ष शब्दशः सांगितला. आधीच चवताळलेल्या सर्पाला काडीने डिवचावे तसे झाले. सर्वांचेच नेत्र लाल झाले ते फुस्कारू लागले. त्यांनीही "तू म्हणतो तसेच होईल" असा निरोप पाठविला.

(घनाक्षरी) कवचकुंडलबलहीन । गुरु ब्रह्मशापदहन ।
करी सद्विक्रम दहन । यास गणन कासया ॥

हा न रथ अतिरथ जाण । असे अर्धरथचि कर्ण ।
बाण ओढुनि आकर्ण । पार्थ तूर्ण वधिल या ॥
करुनि साधूंशी रोध । ज्याबळे तू अवरुद्ध ।
मेरुनग फोडुनि क्रुद्ध । वधिल विजय त्या रणी ॥

## पद १६२ वे

म्हणे तै कर्ण आपगेया । ईर्ष्याऽसूया ननु हेया ॥
बुडविसि कां या कुगुणे तूं । सकळ सद्‌गुणगणमय केतू ॥
करिसि मत्तेजोवध नित्य । खंडिन इतर शिरा सत्य ॥
काळिज शब्दशरी चिरिसि । समरोत्साह सर्व हरिसी ॥
साहतो नृपार्थ अपराधा । करी उपदेश मला राधा ॥
वृद्ध तू बाळचि गांगेया । ईर्ष्याऽसूया ननु हेया ॥ १ ॥
वृद्ध तरुवाक्कुसुमालागी । लेवुनि मिरवी तू अंगी ॥
मन्मते अनाप्तसा जाण । गरल दिग्धाग्र मूर्त बाण ॥
बंदिसाधन जया वाणी । मूर्त हा कृतघ्नता खाणी ॥
धर्माधर्म न वृद्धा या । ईर्ष्याऽसूया ननु हेया ॥ २ ॥
(साकी) गुरुसहि नाही भ्यालो बहुदिन करिताना समरा मी ।
होते जरि सामर्थ्य भयानक मृत्युंजयसम रामी ॥
होय मन्निधन काम राम ।
शेवटी पूर्ण विफलकाम ॥

---

टीप – " दुर्योधनाने स्वपरपक्षाकडील रथी व अतिरथी जाणून घेण्याची इच्छा सेनापति भीष्मांच्याजवळ व्यक्त केली. कौरवांकडील सहस्रावधि रथि अतिरथ्यांपैकी निवडक निवडक नांवे त्यांच्या वैशिष्टयांसह वर्णन करून भीष्म म्हणाले, " तुझा विशेष कृपापात्र मित्र, उपदेष्टा असा कर्ण त्याला मात्र मी रथीही म्हणायला तयार नाही. त्याला मी अर्धरथी म्हणेन. अर्जुन याला रणांत ठार करील." भीष्मांच्या ह्या विधानाला द्रोणाचार्यांनीही संमति दर्शविली. तेव्हा कर्णाने क्रोधाने भीष्माचार्यांच्यावर शब्दांचे कोरडे ओढायला सुरवात केली, आणि शेवटी म्हणाला की, हा म्हातारा जिवंत आहे तोपर्यंत मी लढणार नाही, पालथा पडला म्हणजे लढेन."

(साकी) सर्व रथाहुनि अधिक अष्टगुण बाहुबळे मज गमतो।
दुःशासन शोणितपानाची आस उरी जो धरितो ॥
द्रुपदजा मानभंगदहन ।
जयाचे चित्त करी दहन ॥

(श्लोक) या विश्वात न अर्जुनासम कुणी झालाच वीराग्रणी।
नाही संप्रति यापुढेहि न गमे होईल ऐसा कुणी।
हा तो वीररसौघ गांडिव धनुर्धारी दुजा अंतक।
युद्धाची विधिने प्रसन्न करि जो श्रीरुद्र कालांतक॥

(घनाक्षरी) करी धरुनि धनुर्बाण । स्वये मी अथवा द्रोण।
जाउ जिष्णूवरि जाण । अन्य गणन कासया।

(दिंडी) द्रुपदकन्येचे द्रुपद पांच वीर। अपर पांडवची समरमखी धीर।
महारथ म्हणुनी ख्यात यशःसद्म। नित्य ज्यांचे विकसले वदनपद्म
द्रुपदमत्स्यप हे स्थविरही नृपाला। महारथ करितिल दिव्य विक्रमाला।
पांडवांचे हे आप्त निकटवर्ती। रणी झटतिल व्हावया कामपूर्ती॥

(साकी) द्रोणांतक हा धृष्टद्युम्न न असे वीर सामान्य।
अतिरथ सत्तम अयोनिसंभव जो द्रोणासहि मान्य।
रथी पांचाल्य दुजा गाजे।
शिखंडी नाम जया साजे॥

(घनाक्षरी) असे वाटे नयनास। कुंदरदनमंदहास।
कंजनाभचि हा खास। षोडशाब्द जाहला॥

(साकी) रथातिरथ संख्यान करुनिया गांगेय वदे वाणी।
हा स्त्रीपूर्व शिखंडी राया विधीन न मी बाणी।
विशुद्ध क्षत्रिय मी जाण।
प्रतिज्ञेस्तव अर्पिन प्राण।

---

टीप— "भीष्म व कर्ण यांच्यामधील तंटा मिटवून दुर्योधनाने पांडवांकडील सैन्यांतील रथी महारथींचा परिचय करून देण्यासाठी भीष्मांना विनंती केली. भीष्मांनी तो करून देऊन सांगितले की, द्रुपदपुत्र शिखंडी हा स्त्रीपूर्व असल्यामुळे त्याच्याशी मात्र मी लढणार नाही."

(साकी) जाता स्वर्गी पिता शंतनू शोकसागरी बुडता ।
बंधू चित्रांगद तन्नामे गंधर्वे संहरिता ॥
पाणी आणुनिया नयनी ।
वदली सत्यवती जननी ॥

(श्लोक) माझा बाळ विचित्रवीर्य चरणी वत्सा तुझ्या अर्पिते ।
गांगेया परिरक्षिणे शिकविणे जे या कुळी शोभतें ॥
तें सारेच तुझ्याकडे, न कुळ हे जावो लया पावन ।
रक्षो घोर धनू तुझे भयाहरा साम्राज्यसिंहासन ।

## पद १६३ वे

(लावणी) तनुजांसम अनुजांस नरवरा सदैव प्रतिपाळिले ।
पित्याचे सिंहासन अर्पिले ॥ धृ. ॥
मत्कार्मुक कौरवेश्वराच्या राज्यासनरक्षणी ।
धाकले वाढुनिया नरमणी ॥
शैशव उल्लंघुनी बंधु ये भूपाळा यौवनी ।
विवाहा उत्सुकलो मी मनी ॥
वार्ता आली काशिपुराधिप स्वयंवरोत्सव करी ।
कन्या तीन तया सुंदरी ॥

(चाल) मी अनाहूत जाउनि तै दुर्योधना ।
लावण्यसिंधुच्या उर्मी त्या अंगना ।
रोधिल्या करुनि भूपती मानखंडना ।
युद्धेच्छूंच्या शरीरपुष्पा रणचंडिस अर्पिले ।
पित्याचे ०

---

टीप— "शिखंडी हा शत्रु आहे आणि सोमकांसह पाचालांस मारण्याची आपली प्रतिज्ञा आहे असे असता आपण असे कां म्हणता असे दुर्योधनाने भीष्माचार्यांना विचारले. तेव्हा शंतनूच्या मृत्यूपासून आपला पूर्वोतिहास सर्वासमक्ष सांगण्यास भीष्मांनी सुरवात केली. मातेच्या आज्ञेनुसार आणि आपल्या प्रतिज्ञेला संभाळून चित्रांगदाला त्यांनी राज्यावर बसवले. चित्रांगद व विचित्रवीर्य विवाहास योग्य झाले असे पाहून काशीराजाच्या तीन कन्या अंबा, अंबिका व अंबालिका यांना, विरोधाला आलेल्या सर्व राजांचा प्रतिकार करून स्वयंवरांतून भीष्मांनी उचलून आणले."

(साकी) मंत्री पाचारिले पुरोहित, वृत्त कथियले राया ।
निर्णय करिती त्वरे "कन्यका शाल्वमंदिरी जाया ॥
कन्यका अन्यासक्तमना ।
कुरुकुलं ही लाविल दहना ॥

## पद १६४ वे

स्वच्छंदपणे काशिपुराधिप दुहिता ।
अवमानुनि नरपति सविता ॥
मानुनि शाल्वा शशांक औत्सुक्याने ।
कुमुदिनी जाय वेगाने ॥
परि वेडीला कळे न भीरुहृदय ते ।
अजुनी थरकापत होते ॥
कार्मुकनादा भीष्माच्या आठवुनी ।
थरथरे भीरु तो स्वमनी ॥
(चाल) लोचनी पाहता तिजला ।
मृत्यूच मानुनी आला ।
तो कांपित वाक्तति वदला ।
तू जा वेगे संरक्षी गे स्वहिता ।
अवमानुनि ०

---

टीप – "राजधानीत आल्यावर मातेच्या संमतीने विवाहाची तयारी चालू असता ज्येष्ठ काशीराजकन्या अंबा म्हणाली, "भीष्मा, आपण धर्मज्ञ व सत्य-प्रतिज्ञ आहात. मी शाल्वराजाला मनानेच वरिले आहे आणि त्यानेही माझ्या विनंतीला एकांतात मान दिला आहे. तरी त्याजकडे जाण्याची आपण मला आज्ञा द्यावी." माता, मंत्री, ऋत्विज यांच्या संमतीने त्या अन्यमनस्क अंबेला शाल्वाकडे सुरक्षित पाठविण्याची भीष्माचार्यांनी व्यवस्था केली. अंबेने शाल्वाला स्वतःचा स्वीकार करण्यासाठी विनंती केली. तो म्हणाला एका परपुरुषाने अन्य पुरुषा-प्रीत्यर्थ तुझा एकदा हात धरला असल्यामुळे हा उष्टा घास मला नको."

( साकी) विनवी अंबा अश्रू ढाळुनि चरणी ठेवुनि भाळ ।
धृतकार्मुक मन्मूर्ती परि त्या प्रत्यक्ष गमे काळ ॥

वदे तो मूढ तिला याही ।
या स्थळी तुला स्थान नाही ॥

## पद १६५ वे

मुक्तकेशा ती । तपोवना जाय । दुःखाग्नी जाळो काय ॥
सरी अश्रूंच्या । नयनांतुनि गळती । पाहुनी मुनिजन विरघळती ॥
वदे भीष्मगजे । ही उपटुनि नलिनी । मारिली चरणी निर्दळुनी ॥
विनविते चरणा । पसरुनि मी पदरा । कराजी दुहिता विगतदरा ॥
दीन ही दुहिता । माहेर न काय । दीनजनकल्पद्रुम पाय ॥

(दिंडी) यती संन्यासी राहताति शर्मे ।
सदा वागुनि ज्या सत्त्वनिष्ठ धर्मे ॥
मला उपदेशा तोचि शीघ्र धर्म ।
तोच होइल या संकटात वर्म ॥
वदन पुरुषांचे मज नको पहाया ।
वनज दुःखाते सज्ज मी सहाया ॥
असे वदुनी आकांत फार केला ।
धैर्यनग त्यांचा तिने भग्न केला ॥

---

टीप – " अंबेने रडून काकुळतीने शाल्वाची मनधरणी केली. पण तिच्या विलापाचा, विनवण्यांचा त्याच्यावर काहीच परिणाम झाला नाही. तो म्हणाला, " मला भीष्मांची भीति वाटते, तेव्हा तू चालती हो."

अत्यंत दुःखित होऊन अंबा नगराबाहेर पडली. ती वनांत तापस ऋषींच्या आश्रमांत गेली. तिने आपला सविस्तर वृत्तांत त्यांना सांगितला. माहेरी न जाण्याचा आपला दृढ मनोदय कळवून तपोधर्माचा उपदेश देण्याकरिता ऋषींना तिने विनंती केली."

(श्लोक) तो पितामह वदे तिला मुली ।
जाय तू शरण याच पावली ।
जामदग्न्य चरणास वंदुनी ।
हो कृतार्थ निजवृत्त सांगुनी ॥

शेष क्षत्रिय संहरी सकलही जो लागता न क्षण ।
तताचे करि जो स्वशत्रुरुधिरे अत्युष्णशा तर्पण ॥
पृथ्वी जिंकुनिया वदान्य करि जो श्रीकश्यपा अर्पण ।
तू त्या भार्गववंशभास्करपदा जा माग संरक्षण ॥

---

## पद १६६ वे

(लावणी) विश्वपतीची तमोमयी ती प्रत्यक्षा मूर्ती ।
करिल का मनःकामपूर्ती ॥ धृ. ॥
मातृशिरच्छेदनास धावे यत्कुठार दारुण ।
करुणा त्या येइल कां क्षण ॥
क्षत्रियवंशोच्छेदन त्यांच्या पूर्ण वाणले मनी ।
पितामह मी क्षत्रियनंदिनी ॥
ऐकियले की जनन्युदरगत गर्भ न संरक्षिले ।
क्षत्रवन दग्ध करुनि टाकिलें ॥

(चाल) तो भगवान् भार्गवराम मला आश्रय ।
देउनी केवि सर्वथा करिल निर्भय ।
ऐकिले सर्वदा जामदग्य निर्दय ।
तपोवीर्यमय स्मरता भार्गव झाले थरथरती ।
करिल कां ०

---

टीप – " सर्व तापसांनी मिळून तिला तपस्येचा विचार सोडून पित्याकडे जाण्यास सुचविले. पण ती आग्रह सोडीना. इतक्यात तेथे अंबेचा मातामह तपोधन राजर्षि होत्रवाहन आला. त्याने तिचे सर्व सविस्तर वृत्त ऐकले आणि तिला जमदग्निपुत्र परशुरामाकडे जाण्याचा सल्ला दिला. आपले मनोवांछित परशुराम पुरवितील काय असे तिला वाटले."

(साकी) रामशिष्य अकृतव्रण सहसा तेथे येत रहाया ।
सांगे येईल उद्या सखा तुज भार्गवराम पहाया ।
यत्पदरेणुहि संसारी ।
भवभयभ्रांता होय तरी ॥

(श्लोक) ती सांगे अकृतव्रणा निजकथा कारुण्यमूर्ती मुखे ।
भीष्मे मत्तमतंगजे निवटिली या पद्मिनीची सुखे ।
आता काय करू कुठे शरण मी जाऊ मला आश्रय ।
द्याया कोण समर्थ जी प्रभुवरा व्हावे कसे निर्भय ॥

(अंजनीगीत) दुज्या दिनी ये भार्गवराम ।
राजर्षी त्या करी प्रणाम ।
दिव्य तपस्येचे ते धाम ।
मोदे त्या कवळी ॥

(साकी) ही शरणागत संरक्षावी भगवंता तव नात ।
ऐसे प्रार्थुनी अंजलि जोडी तद्यशगुणगण गात ।
तुला जे दीन शरण येती ।
सर्वदा सत्पद ते वरिती ॥

---

टीप – "होत्रवाहन आपल्या नातीला याप्रमाणे निरोप देत आहेत एवढ्यात परशुरामांचा अनुचर अकृतव्रण नावाचा तेथे आला. त्याने परशुराम आपल्याच भेटीसाठी उत्सुक आहेत आणि ते उद्याच येथे येतील असे सांगितले. ठरल्याप्रमाणे जटावल्कलधारी, परशुखड्गपाणि राम त्या ठिकाणी आले. त्यांना वंदन करून अंबेने आपली सर्व हकीकत त्यांना सांगितली व ज्यांच्यामुळे मला हे दुःख प्राप्त झाले त्या भीष्मांचा प्रतिकार करा अशी विनंती केली"

(साकी) बुधवचना वाचुनी न धरिन धनु ऐसी असे प्रतिज्ञा ।
ब्राह्मणकार्यावाचुनि वत्से भंगू कशी प्रतिज्ञा ॥
तपस्या विलया पावेल ।
सत्यवृक्षाची ती वेल ॥

(श्लोक) तेव्हा सस्मित जामदग्न्य वदले मच्छिष्य गंगासुत ।
वत्से वंदिल पादपद्म तव तो मद्वाक्य मानी हित ।
जोडू दुर्यश कां मुली वद प्रतिज्ञातास मी भंगुनी ।
होता दुर्वच हा असत्य वचनी साहु कसे ते मनी ॥

(साकी) काश्या वदे वधा उद्घोषू द्यावा त्या 'निर्जित मी' ।
वदता तो उन्मत्त भीष्म हे शांतकोप होइन मी ॥
छात्र न माजो बाहुबळे ।
निंदितिल आचार्या सगळे ॥

(श्लोक) राजा त्या अकृतव्रणेंहि कथिले श्रीजामदन्याप्रती ।
भीष्माचा वध हाच एक गमतो सद्धर्मजी संप्रती ।
माझा या परि तो अकारण रिपू बोले तदा भार्गव ।
पृच्छा त्यास करी असत्यवचनी सद्धर्म कैसा लव ॥

---

टीप– "परशुराम तिला म्हणाले, 'ब्रह्मवेत्त्या ब्राह्मणाचे कार्याशिवाय अन्य कोणत्याही कारणाने मी शस्त्रग्रहण करीत नाही आणि विप्राज्ञेव्यतिरिक्तही शस्त्रग्रहण करणार नाही अशीही माझी प्रतिज्ञा आहे. भीष्म व शाल्व दोघेही मी सांगेन तसे वागतील. त्यासाठी शस्त्र घेण्याची आवश्यकता नाही." परंतु अंबा हट्ट सोडीना. अकृतव्रणानेही तिच्या मागणीलाच दुजोरा दिला. आणि रामांना त्यांच्या दोन प्रतिज्ञांची आठवण करून दिली. त्यांत शरणागताचा परित्याग न करता त्याचे रक्षण आणि समस्त क्षत्रियांना रणांत जिंकणारा कोणी तेजस्वी वीर आढळला तर त्याचा वध करीन ह्या प्रतिज्ञा होत्या."

(साकी) भार्गव म्हणे विसरलो होतो मीहि त्या प्रतिज्ञाता ।
वत्सा तुज आधी धन्य म्हणो मजसी नंतर ज्ञाता ॥
संगर होऊ द्या घोर ।
त्या जलदो मन्मन मोर ॥

(दिंडी) असे वदुनी प्रस्थान शीघ्र साधी ।
सवे कृत्या अम्बाहि घे उपाधी ।
मुनी नक्षत्री युक्त पूर्णचंद्र ।
गजपुरी ये तो भूपते मुनीन्द्र ॥

## पद १६७ वे

(लावणी) कशी अहंता पिशाचिनीची बाधा जन नाचवी ।
विडम्बी भार्गवराम हा कवी ॥ धृ. ॥
स्वीयचरणपंकजी पाहुनी शिष्यशीर्ष तो मुनी ।
तयाते बोले उच्छेदुनी ॥
स्वयंवरी ही राजनंदिनी का तू हरिली बले ।
ब्रह्मचर्यव्रत का भंगिले ॥

शिरीष पुष्पापरी मृदू या जीवनपुष्पा तरी ।
टाकिले चुरगळुनी कां परी ॥

(चाल) उन्मत्ता निजबळे तूं गंगानंदना ।
युद्धी समर्थ तव वाटे बलभंग ना ।
ही आचवली सर्वस्व दीन अंगना ।
कां दिधले तू दुर्दैवाच्या श्वानमुखी हे हवी ।
विडम्बो०

---

टीप— " सामोपचाराने भीष्म ऐकणार नाही तर त्याला मी निश्चितपणे ठार मारीन असे बोलून आणि अंबेला सोबत घेऊन परशुराम कुरुक्षेत्री आले. भीष्मांना बोलावणे पाठविले व त्यांना परशुराम म्हणाले, "तुझ्याच कृतीमुळे ही दुःखात पडली आहे, तेव्हा माझ्या आज्ञेवरून तू हिचा स्वीकार कर. असे न करशील तर मात्र मी तुला स्वस्थ बसू देणार नाही."

(साकी) राम म्हणे शाल्वसिंह मानी परदत्ता गजा न वरी ।
आज्ञेने मम त्वदीय भ्रात्या ही लाभावी नवरी ॥

स्त्रीतनु पतिविण संसारी ।
कर्णधाराविण जाण तरी ॥

(श्लोक) जामदग्न्य वदले मजला ते । स्वीकरी निजगुरू वचना ते ।
यांत पुण्यसुखकीर्ति साठली । शिष्यभक्ति मज यात पावली ॥
(पद) तपमंत्राधर्मदमसदन । विद्याबल अस्त्रनिधान । या जगी ॥
वेदांचा प्रत्यक्षार्थ । अवतरे खलप्रशमार्थ । या जगी ॥
शिष्यास । ते अकार्यास । बळे करण्यास । लाविती धन्य ॥
लाविती धन्य । बलविद्याअस्त्रानिधान । या जगी ॥

(साकी) वधिले क्षितितळवर्ती क्षत्रिय एकवीसदा जाण ।
प्रलयंकरसम मद्दनांतकसम घेईन तुझा प्राण ।

विकारी वश होउनि राम ।
या परी बोले गुणधाम ॥

टीप—"आपण निर्दोष असल्याचे सांगून भीष्मांनी परशुरामांची योग्य शब्दांनी वारंवार मनधरणी केली आणि समजूत घालण्याचा प्रयत्न केला. 'मी आपला शिष्य आहे. आपणच मला चतुर्विध धनुर्वेद पढविला. तेव्हा माझ्यासारख्या लहानाबरोबर आपण युद्ध करणे इष्ट नाही,' असे म्हटले. तेव्हा तर क्रोधाने परशुराम म्हणाले, "तोंडाने शिष्य म्हणवितोस अन् गुरुवचन मात्र मानीत नाहीस. माझ्या अवज्ञेचे प्रायश्चित्त म्हणून मी तुला तुझ्या साहृयकर्त्यांसह युद्धात ठार मारीन."

## पद १६८ वे

(लावणी) गंगानंदन–जामदग्न्य तो वाद परम पावन।
ऐकता चित्त करी पावन ॥
धर्मन्यायाविरुद्ध शक्ती पाशवी न चालते।
यांत ही बोधसुधा लाभते ॥
भीष्म वदे अनघवधी कैंचे यश तुम्हा लाभते।
व्यर्थ मन पापाचरणी रते ॥
न्यायनिष्ठ जनघाती धर्म न दुष्कीर्ती होइल।
वीर्यमद रणी भग्न होइल ॥

(चाल) सद्विद्या मज कां दिधली विसरावया।
कां नीति शिकविली कुल हे बुडवावया।
धर्म कां पढविला दुष्कीर्ती व्हावया।
सन्मार्गावरि राहे न स्थिर वाटे चळले मन।
ऐकता चित्त करी पावन।

(साकी) बुडविशील शोकी सत्यवती गंगेसि रडविशील।
या कुरुजांगल प्रजाजनां तू निर्नायक करिशील।
मारिले तव पूर्वजपूर्वी।
कुठारे याच समर पर्वी ॥

(घनाक्षरी) नयनकंज करुनि शोण। वदे उत्तर अति तीक्ष्ण।
करि धरुनि धनुर्बाण। कुरुप्राण मुख्य तै।

(चाल) हनुमंते सिंधूत तसा मी बघुनि गर्वनग रामी ।
वंदुनि येतो ऐसे बोलुनि आलो मग नगरा मी ॥

झाले राया दुःख मना ।
भयाचा संस्पर्श परीना ॥

---

टीप – "भीष्म म्हणाले, 'गुरुदेव, आपण हा आग्रह सोडून द्यावा. काही झाले तरी मी हिचा स्वीकार कालत्रयीही करणार नाही.' तेव्हा परशुराम म्हणाले, 'मग युद्धाला तयार हो. माझ्या बाणांनी गतप्राण होऊन तू भूमीवर पडलास म्हणजे तुझी आई जान्हवी अन् सत्यवती ढसढसा रडतील ते मीच पाहीन.'

## पद १६९ वे

पुत्रस्नेहे मज वाराया स्वर्गाहुनि धावुनि ।
पातली माता मन्दाकिनी ॥
मुख कुरवाळुनि धरुनि हनु पाणी आणी नयनी ।
वाकलो मी तत्पदनमनी ॥
मजसि वदे या क्षत्रिय कुलशशि राहूच्या हाते ।
कां रणी वरिसी मरणाते ॥
सद्विद्या कां वत्सा शिकला आचार्य वधाया ।
विश्वी दुष्कीर्ती व्हाया ॥

(चाल) ऊठ जा शरण जामदग्न्य पदपंकजा ।
स्तविती हरिहर सद्गुरूचरण पंकजा ।
षड्विकार पळती पाहुनिया पंक ज्या ।
वत्सा गांगेया न धरावा अहंकार त्वन्मनी ।
पातली ०

(साकी) सुतजीवदान मागे गंगा पसरूनि नता पदर ।
नमुनि म्हणे शरणागत दीन न पावताति तापदर ॥
कां धजता निष्ठुर व्हाया ।
सजता बाळक कापाया ॥

(श्लोक) माते येत पुनश्च बोध करण्या तै माय मन्दाकिनी ।
विश्वोद्धारक रक्षिण्या स्वतनया भागेल ती कां मनी ।
ती बोलें " जननी तुझी करितसे ती ऐक वा प्रार्थना ।
वत्सा काळमुखी न जाउनि करी कष्टी मदीया मना ॥

(साकी) बैसा रथी कवच घ्या म्हणता म्हणे तै उणे काय ?
पूर्ण असे माझ्या चिंतामणि कोटिगुरुगुणे काय ?
काय हा भीष्म मंत्रमय । सर्वदा पळवी पापभय ॥

---

टीप – " शस्त्रसज्ज होऊन दोघेही रणस्थानी आले. रणवाद्ये वाजू लागली. एवढ्यात मूर्तिमती गंगादेवी त्या स्थळी येऊन गुरुशी युद्ध करण्यापासून भीष्मांना परावृत्त करण्याचा प्रयत्न करू लागली. नंतर तिने परशुरामांची पदर पसरून विनवणी केली. दोघेही ऐकेनात."

## पद १७० वे

हे भृगुकुल भास्करा । चरणी तव रेणकासुता ही प्रणतिततो भयहरा ।
नतचातकजलधरा । धरावनकरा कुठारायुधावरकार्मुकशरधरा ।
जमदग्नीनंदना । छात्रचकोराऽमृतस्यन्दिशीतांशो तव वंदना ।
प्रभो विश्वमंगला । रणरंगीवर द्या वरदा मज व्हाया सन्मंगला ।
शंतनुनंदनगिरा । ही भव्या परिसता डोलवी कुपित रामहो शिरा ।

(दिंडी) तदा मोदे रेणुकापुत्र हासे ।
काय जिंकाया फेकिलेस फांसे ।
कौरवा येता न तूं वंदनाते ।
दिला असता मी घोर शाप तूते ॥

(साकी) नमुनि रथी बैसुनि वदलो भो हार न हा न नवा पाहो ।
तुमच्या ब्राह्मण्या श्रुतिवृंदा न प्रहार स्तुत पाहो ॥
प्रभो लंघोन न मर्यादा । तीच संसारी सत्फलदा ॥
रणयज्ञारंभी सद्गुरुचे पंकजभ सदाचरण ।
अवसानी मी वंदित होतो की रुचे सदाचरण ।
नमनी संतोषुनि राम । नित्य हे वद मज अभिराम ।

टीप – "युद्धार्थ सज्ज होऊन परशुरामांनी भीष्मांना आव्हान केले. मनानेच त्यांनी उत्तम रथ निर्माण केला. अकृतव्रणाने सारथ्य स्वीकारले. रामांचा रथ जवळ आल्यावर भीष्म अनवाणी रथापर्यंत गेले आणि त्यांना अभिवंदन करून म्हणाले की, 'आपण धर्मशील आहात, ह्या आपल्या शिष्याचा रणात जय व्हावा असा आशीर्वाद द्या.' परशुराम संतुष्ट झाले. परस्पर विजयाकांक्षेने युद्धाला प्रारंभ झाला."

(कटाव) जामदग्न्य टाकी शर शंभर । नदीज मोडी त्याची कंबर ।
की जे श्रेष्ठ करच्युत होते । त्याची ही दुरवस्था होते ।
वदे राम भीष्मा काही पण । गाजो प्रथम दिनीच दिव्यरण ।
नदीज सोडी तैं शर दारुण । तोडी भार्गवराम धनुर्गुण ।
कोपुनि कार्तवीर्य प्रतिमल्ले । शिष्योरस्थलभेदन भल्ले ।
करिता वाक्तति पूरित गल्ले । स्तविती मुनिवृंदे अतिपुल्ले ।
गर्जनाच मेला कुरुपति हा । राया पळवी द्रुत मन्मोहा ।
दुज्या दिनी गुरु अस्त्रे योजी । वदलो खंडुनि नूतन योजी ।
मग मी अभिनव तीक्ष्ण शरांनी । मर्मी मर्मी तीव्र विंधुनी ।
त्या कल्पांतभानुसम रामा । मूर्च्छित केले जलदश्यामा ।
रथातुनी भूतळी पाडिता । अकृतव्रण झाला सावरिता ॥

(श्लोक) मग चतुर्थदिनी मुनि भार्गव । शर शरासनि योजुनिया नव ।
त्वरित सारथि मस्तक तोडुनी । मजहि विद्ध करी उरि ताडुनी ।

(दिंडी) न भी भीष्मा तव असो स्वस्ति वीरा ।
सावरी मूर्च्छा शीघ्र समरधीरा ।
तुझे संरक्षण करू स्नेहभावे ।
न तू अन्याया नदीजा नमावे ॥

---

उभय गुरुशिष्यांच्यामध्ये तुंबळ युद्ध माजले एकाने सोडलेली अस्त्रे दुसरा प्रत्यस्त्रांनी हाणून पाडी. बाणांचा तर नुसता वर्षाव करीत. अस्त्रांचाही पाड लागत नाही असे पाहून परशुरामांनी अत्यंत दुर्धर अशा शक्तीची योजना केली. अग्निज्वालातुल्य दीप्त अत्युग्र शक्तीने भीष्मांना वेढले पण व्हावा तसा परिणाम होत नाहीसा पाहून रामांनी एक मृत्युतुल्य बाण भीष्मांच्या छातीच्या रोखाने मारला. त्यासरशी ते मूर्च्छा येऊन भूमीवर पडले. निश्चेष्ट अवस्थेत त्यांना आठ तेजःपुंज ब्राह्मण दिसले, ते भीष्मांना सावध करीत होते आणि भिऊ नकोस, भिऊ नकोस असे म्हणून धीरही देत होते."

## पद १७१ वे

श्रीनारायण चरणसंभवे जननी मंदाकिनी ।
त्वन्नामे अधमाधम अघभंजन होते सुरधुनी ॥ धृ. ॥
दे मज आशो; कवच चराचर वंद्यपदे जान्हवी ।
तुरगगुण स्वकरे स्वीकारुनि न रणी मज लाजवी ॥
सुरांगना समवेत उपस्थित स्वर्यानी राहुनी ।
कार्तिकेयसम मम रणताण्डव बघ माते लोचनी ॥

(चाल) तव कृपाकटाक्षे मी निर्भय बालक ।
म्हणवीन आपणा धर्मनीतिपालक ।
देईल मला यश विश्वसूत्रचालक ।
कातरता आणी न लोचनी पाणी चिंता मनी ।
त्वन्नामे ०

(साकी) पुत्रप्रेमे शोक अनावर होय नृपा मातेचा ।
मज आलिंगी पूर लोचनी वाहे तैं अश्रूंचा ।
घालिता शपथ रथावरुनी ।
उतरे अश्रू आवरुनी ॥

---

टीप—"ब्राह्मणांच्या शीतल उपचारांनी भीष्म सावध झाले; तो त्यांना असे दिसले की, सारथी मरण पावल्यामुळे रिकाम्या झालेल्या त्याच्या जागेवर आपली माता घोड्यांचे लगाम धरून बसली आहे. भीष्मांनी उठून तिचे व ब्राह्मणांचे पाय धरले व त्यांना स्वस्थानी जाण्याची विनंती केली. आणि ते गेल्यावर स्वतःच घोडे सावरून पुन्हा युद्धास सुरवात केली."

## पद १७२ वे

(लावणी) चिंताव्याकुल प्रार्थित असता शयनी पितृदेवता ।
येती स्वप्नी द्विजदेवता ॥ धृ. ॥

वदती त्या भीष्मा न भयाचा स्पर्श वरो त्वन्मना ।
होईल सिद्ध तुझी कामना ॥

माध्यान्ही रणरंगी तुजला स्मरेल प्रस्वापन ।
गुरुवधा सिद्ध असू दे मन ॥
प्रस्वापे त्या निद्रा येइल तो मृत्यू जाण बा ।
तयातुनि संरक्षिल कोण बा ॥
(चाल) मग शांतनवा दिव्यास्त्रे संबोधने ।
दे जीवदान आचार्या संबोधने ।
मज हर्षनगशिरी त्यांचा हा बोध ने ।
वाटे दुःखसमुद्री तारी राया कुलदेवता ।
येती स्वप्नी द्विजदेवता ॥
(साकी) वर्णावा सदनुग्रह किति तो होय मनास विसावा ।
जागा झालो समराचा ये दिवस तै चोविसावा ॥

---

टीप– "शेवटल्या दिवशी भीष्म शय्येवर पडले होते. मनात रामांच्या पराजय कसा होईल हा एकच विचार होता. तोच विप्रश्रेष्ठ त्यांच्या स्वप्नात आले. त्यांनी भीष्मांना परशुरामांच्या पराजयाचे साधन सांगितले. ते म्हणाले, "प्रस्वाप अस्त्राचे ज्ञान प्रत्यक्ष परशुरामांनाही नाही. तुला ते मागच्या जन्मी होते. आमच्या आशीर्वादाने तुला त्याचे स्फुरण होईल. या अस्त्राच्या प्रयोगाने ते निश्चेष्ट पडतील. काही वेळाने अस्त्राचा उपसहार कर आणि सर्वांसमक्ष हाक मारून त्यांना उठव की तू जिंकलेस."

(श्लोक) रामाच्या विधिने ललाटपटली जी अक्षरे रेखिली ।
की हा क्षत्रवनास जाळुनि सदा राहील युद्धी बळी ।
त्याते मी पुसण्या ललाटपटली दिव्या शरा हाणुनी ।
रामाच्या मुखपंकजासि रुधिरे तै टाकिले न्हाणुनी ।
गुरु तदा धरणीवरि कोसळे । करगकार्मुकमार्गणही गळे ।
करिति सावध त्यास परोपरी । जपुनि मंत्र मुनी वरचेवरी ।
(साकी) मोह हरुनि देउनी कर अकृतव्रण त्यास रथी चढवी ।
योजुनिया ब्रह्मास्त्र वदे हा गंगानंदन खपवी ॥
योजिले ब्रह्मास्त्रा राया । भार्गवे मज भस्म कराया ॥
(श्लोक) तै माते स्फुरले मनी नरवरा दिव्यास्त्र प्रस्वापन ।
केले योजुनि गार्धपत्र समरी मी सिद्ध बाणासन ।

मंत्रोपक्रम रामतेजतपनी राहू तसा भासला ।
आकाशी करिती सुरर्षभभये तै दुःख कोलाहला ॥

---

टीप– "याप्रमाणे तेवीस दिवस युद्ध झाले. दोघेही महाबलाढ्य आणि अतुलवीर्य असल्याने कोणीच कोणाचा पराजय करू शकले नाही. कोणत्याही अस्त्राचा वा शस्त्राचा भीष्मावर उपयोग होत नाहीसे पाहून रामांचा कोप अनावर झाला. आणि त्यांनी हट्टास पेटून भीष्मांना भस्म करण्याकरिता त्यांच्यावर ब्रह्मास्त्राचा प्रयोग केला. भीष्मांनी फेकलेली शक्ति व ब्रह्मास्त्र दोन्हींची अंतराळात टक्कर होऊन त्यांनी पेट घेतला. चोहोकडे हाहाकार माजला. यावेळी भीष्मांना ब्राह्मणांनी सांगितलेल्या प्रस्वाप अस्त्राची स्फूर्ति झाली. परशुराम चिरंजीव असल्यामुळे त्यांना मृत्यु तर येणार नव्हताच, पण या अस्त्राने ते निश्चेष्ट पडले असते म्हणजे त्यांना जिकल्यासारखेच होते. भीष्म प्रस्वापास्त्राचा प्रयोग करणार एवढ्यात –

## पद १७३ वे

(लावणी) वीणापाणी व्योमग ये तै भवजलनिधिवारद ।
मजसी बोधाया नारद ॥ धृ. ॥
वंदुनि चरणी पाणी जोडुनि वदलो पद्मजभवा ।
चरण हे दूर करिती जो भवा ॥
वदले मज कां क्षोभलासि तू सुरतटिनीसंभवा ।
योग्य कां विकार हा तुज नवा ॥
गुरुघाती तू प्रवर्तता तव दुष्कीर्ती होइल ।
धवल यश कज्जलनिभ होइल ॥
(चाल) अस्त्र न योजी तू हे नवप्रस्वापन ।
आचार्यास रणी योग्य तुला स्वापन ।
गुरुवधक तुला विश्वी न म्हणो सज्जन ।
जामदग्न्यपदपंकज तुजला हे अस्त्रज्ञानद । मजसी ०
(साकी) ऐकुनि केले ब्रह्मास्त्राचे म्या पुनः प्रदीपन गा ।
गुरुस भासलो कल्पांतीचा मी जसा नदीप नगा ।
दिसे विप्रभ भार्गवराम । होय तै पूर्ण भग्नकाम ॥

(दिंडी) तदा जमदग्नि प्रमुख मुनी रामा ।
वोध करिती तपमंत्रयशोधामा ।
सोड अनुचित हे क्षात्रकर्म घोर ।
ब्राह्मविधुचा हो भार्गवा चकोर ॥
(साकी) वदलो क्षत्रिय कां परतेन प्रथम धर्म सोडूनी ।
राम वदे शिष्ये की घ्यावी मीच हार जोडूनी ॥

टीप—"नारद भीष्मापुढे येऊन उभे राहिले आणि त्यांनी प्रस्वापाच्या प्रयोगापासून भीष्मांना परावृत्त केले. भीष्मांनी प्रस्वाप थांवविले आणि ब्रह्मास्त्राचा प्रयोग ते करू लागले. तेव्हा परशुरामांचे पितर त्यांना व देव भीष्माना युद्धापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करू लागले. दोघेही माघार घेण्यास तयार होईनात.

## पद १७४ वे

धन्य धन्य जान्हवीनंदना मद्‌हृदयानंदना ।
फुल्लकीर्तिवल्लरी सुगंधित सद्‌गुणगणनंदना ॥ धृ. ॥
अभिनवकार्मुकधरा नरेशा तरणितेजहरणा ।
वत्सा तू प्रलयंकर शंकरसम गाजविले रणा ॥
अपरिमेय वल पराक्रमी तू एकमात्र भूवरी ।
रामविजेतृत्वाची वरिली तू कीर्ती नोवरी ॥
(चाल) त्वद्यशोगायने विश्व भरो सर्वदा ।
धर्मीच रतो यापरी हृदय सर्वदा ।
मी तुज देतो आशीः कल्याणप्रदा ।
करोत वीराग्रगण्य सारे वत्सा पदवंदना ।
फुल्लकीर्ति ०
(साकी) ती वदली जाईन वनी मी शरण या न भीष्माते ।
तप करुनी वरदाने याच्या करिन देहपाताते ॥
राया तपोवना गेली । उपशम कल्पना न रुचली ।
(पद) ती जाय वना नलिनीदलायतनेत्रा । ग्रस्तोपराम शशिवक्त्रा ।
दुःखाश्रूंचा पूर लोचनी वाहे । अंतरी उमाधव बाहे ।

मद्वधकामा कामांतक आराधी । निर्वात दीपिकासम धी ।
केवळ विपिनी स्वल्प पवन ती सेवी । कर्पूरगौरपद सेवी ।
(चाल) तत्तपे होय संतुष्ट ।
ये तेथे देव वरिष्ठ ।
पुरवाया ते तदभीष्ट ।
पाहुनि हर्षे गिरिजाधवा त्रिनेत्रा । ती बोले विकसितवक्त्रा ।
(साकी) देव वदे स्त्रीपूर्व पुरुष तू वत्से होशिल जागे ।
मी निज बिरुदरक्षणी तेवि न वृंदारकनग जागे ।
मला हे चारमुखे कळले । परी चित्त न व्याकुळ झाले ।

---

टीप—"मुनिगणांसह येऊन गंगेने मध्यस्थी केली तेव्हा दोघांनीही शस्त्रे खाली ठेवली. भीष्मांनी परशुरामांना वंदन केले. रामांनी आशीर्वाद दिले. अंबेकडे वळून म्हणाले, तू भीष्माचा पराक्रम पाहिला आहे तेव्हा तू त्याला शरण जा." परंतु तपाचा संकल्प करून ती वनांत जाऊन शंकराला प्रसन्न करण्याकरिता उग्र तपश्चर्या करू लागली.

## पद १७५ वे

(लावणी) मद्वधकामे पंचालाधिप आराधी शंकरा ।
चरणनख विनतशीर्ष शंकरा ॥धृ.॥
आशुतोष त्या प्रसन्न होउनि दे ईप्सिततम वर ।
की तो नतजनवरदेश्वर ॥
दिला पुत्र स्त्रीपूर्व तुला तव पुरवाया कामना ।
वधाया सुरतटिनीनंदना ॥
इच्छामरणी उग्रकार्मुका भीष्मापुढती रणी ।
टिकती पुरुष न वीराग्रणी ॥
(चाल) प्रसवली तयाची भार्या तै कन्यका ।
हे गुप्त ठेवि तो स्मरुनी वरदायका ।
परि कळले हे श्रीनारायणगायका ।
देवमुनी वृत्त हेचि मजला कथी कौरवेश्वरा । चरण०

(साकी) धात्रीस म्हणे हित होते जरि तात कापिता मान ।
मानस म्हणते मज की न अशा घातका पिता मान ॥
दुर्दशा जन्माची झाली । मत्प्रसू कां मजसी व्याली ।

(दिंडी) तदा भ्याला पंचाल म्हणे देवा । कसा मिथ्या वर दिला देवदेवा
बुडाले सत्कुल या दशार्णडोही । गती मरणावाचून अन्य नाही ॥

(साकी) तो जाउनि विजनवनी निजनवनीत मृदुल तनु सुकवी ।
की तपसंकट चुकवी ऐसे करिती वर्णन सुकवी ॥
आठवी गिरिजारमणाते । भक्तपरिभवतमतरणी ते ॥

(साकी) द्रुपद नृपतिहृदयीच्या दुःसह चिंतामय सांगे ते ।
होय अयश्चुंवक यक्षवरे प्राप्त पुंस्त्व सांगते ।
वदे पांचाल पारखा या । मग या युद्ध गाजवाया ॥

(श्लोक) लज्जानम्र दशार्ण भूप द्रुपदा जोडोनिया अंजली ।
बोले मी चुकलो क्षमापयपदी वाहोन पुष्पांजलि ।
तेव्हा त्या द्रुपदे तयास हृदयी आलिंगुना अंतरी ।
गौरीवल्लभ गायिला नतजना दुःखार्णवो जो तरी ॥

## पद १७६ वे

(लावणी) गिरिजावल्लभसख ये दैवे यक्षवनी तो तया ।
न ये तो अनुचर भेटावया ॥
पुसता सेवकतती सांगती कुवृत्त धनदेश्वरा ।
राग तै आला यक्षेश्वरा ॥
स्त्रीत्व असो यावज्जीवन या कुबुद्धिच्या लेकरा ।
असे तो शापी निजकिंकरा ॥
नटविटगायकरूपजीवि हे प्रांतप्रभु राहणे ।
गमे त्या त्र्यंवकसखया उणे ॥

(चाल) पुनरपि प्रसादा विनविति अतिकिंकर ।
माथा ठेवुनिया चरणी जोडुनि कर ।
वाचवा म्हणति जी धनी दीनचाकर ।
उपजे पोटी यक्षपतीच्या अंधसुता तै दया । न ये तो ०

(साकी) यक्ष म्हणे राजसुते यावज्जीव तू अशीच रहा ।
मत्स्वामीने वा त्वद्दैवे दिधला गे तुज वर हा ॥
ऐकता हर्ष मनी झाला । दु:खाग्नी सारा विझला ॥

---

टीप— "शंकर अंबेला प्रसन्न झाले. पुढच्या जन्मी प्रथम स्त्री व नंतर पुरुष होऊन तू भीष्मांचा वध करशील असा त्यांनी तिला वर दिला. अंबेने चिता पेटवून आपल्या या देहाचा नाश केला. या वेळी द्रुपदराजा भीष्मांच्या वधासाठी पुत्राची याचना करण्यासाठी उग्र तपश्चर्या करीत होता. त्यालाही शंकरांनी इच्छित वर दिला. पण प्रथम कन्या होऊन नंतर तिचाच पुत्र होईल असे सांगितले. म्हणून मुलगी होऊनही त्याचे नांव शिखंडी ठेवून तिला सर्व संस्कार मुलाचेच केले. इतकेच नव्हे तर तिचे दाशार्णकन्येशी लग्नही लावून दिले. एकांतात त्या कन्येच्या लक्षांत आले की आपला पति एक स्त्री आहे. तिने दासीकडून आपल्या पित्याला ही वार्ता कळविली. आपल्या मुलीचा द्रुपदाने घात केला म्हणून दशार्ण राजा द्रुपदावर चाल करून आला. इकडे आपल्यामुळे आपले वडील संकटात सापडले म्हणून द्रुपदकन्या एकटीच वनांत निघून गेली. वनांत तिची कुबेराचा अनुचर स्थूणाकर्ण याच्याशी गाठ पडली. त्याला तिचे वृत्त ऐकून तिची कीव आली. त्याने आपले पुरुषत्व काही काळाकरिता देऊन तिचे स्त्रीत्व स्वत: घेतले. शिखंडीने घरी येऊन सर्व वृत्तान्त पित्याला सांगितला. द्रुपदाने दशार्णाला निरोप पाठविला की, आपण माझ्या मुलाची परीक्षा घ्यावी, त्याने काही सुंदर स्त्रिया पाठवून खात्री करून घेतली आणि द्रुपदाची क्षमा मागितली.

इकडे कुबेर हिंडता हिंडता स्थूणाकर्णाच्या भेटीस आला असता तो स्त्रीरूपात असल्यामुळे लाजून स्वागताला आला नाही. कुबेराला राग येऊन त्याने त्यास शाप दिला की तू नेहमीकरिता स्त्रीच राहशील. कुबेराची यक्षांनी विनवणी करून उ:शाप मागितला. तेव्हा शिखंडीचा मृत्यु झाल्यावर तू पुन्हा पुरुष होशील असा त्यांनी उ:शाप दिला.

आपल्या राज्यावरील संकट टळल्यामुळे ठरल्याप्रमाणे शिखंडी स्थूणाकर्णाकडे आला. पण त्याने मध्यंतरी घडलेली हकिकत सांगून त्याला आशीर्वाद देऊन परत पाठविले. शिखंडीला हर्ष झाला.

भीष्म म्हणतात, दुर्योधना, असे हे शिखंडीचे वृत्त आहे. मी स्त्रीवर, पूर्वी स्त्री असलेल्या पुरुषावर किंवा स्त्रीनामधारी किंवा वेषधारी पुरुषावरही बाण सोडणार नाही."

# भीष्मपर्व

(श्लोक) जेथे भार्गवराम भग्न करुनी राजन्यशीर्षावलि ।
तर्पाया जनका समर्पण करी तद्रक्तपूर्णांजली ॥
त्या क्षेत्री कुरुपांडवीय जमले वीरौघ युद्धास्तव ।
की प्राणान्तक घोर संगर गमे वीरां नवा उत्सव ॥
(साकी) शुद्ध करुनिया युद्ध करू संपादन स्वर्लोकाते ।
ऐसे बोलुनि सेनापति पति करिती रणनियमाते ॥
की संगर धारातीर्थ ।
कराया पूर्णत्वे सार्थ ॥

---

टीप – " पांडवांनी कौरवांबरोबर साम करण्याचा केलेला सर्व उद्योग विफल झाला. गोष्ट युद्धावर येऊन ठेपली. कौरव युद्धोत्सुक होतेच, निरुपायास्तव पांडवांनीही युद्धाची तयारी केली. पवित्र अशा कुरुक्षेत्री आपापल्या सैन्यानिशी कुरुपांडव प्राप्त झाले. त्यांनी आपापल्या सैन्याची रचना केली. सर्वांनी आपापले शंख फुंकल्यामुळे वीरांना स्फुरण चढले. सेना एकत्र केल्यावर उभय पक्षांच्या नेत्यांनी युद्धाचे नियम ठरविले. ते असे की, उभय पक्षांचा विरोध केवळ प्राप्त युद्धकालीच असावा. युद्ध संपताच पूर्ववत् स्नेहभाव असावा. प्रतिद्वंद्वी जोडीस जोड असावे. रथ्याने रथ्याशी, गजारोहीने गजारोहीशी, पदातीने पदातीशीच लढावे."

## पद १७७ वे

अचतुर्वदन ब्रह्मदेव वा दो हातांचा हरी ।
दर्शने अघनगचय संहरी ॥ धृ. ॥
अभाललोचन नीलकण्ठ वा केवळ ज्योतिर्मय ।
करी जो भवभीता निर्भय ॥
शाखांच्या विस्तरे स्वयंभू वेदतरू बहरवी ।
सदा जो पुरुषार्थ ज्ञानवी ।
कृष्णद्वैपायन तो जननी वंशक्षय चिंतुनी ।
शीघ्र ये गजनगरी धावुनी ॥

(चाल) की निजसंभवमग्न हो न शोकार्णवी।
ही अनुकंपा ते भव्य हृदय हालवी।
त्या धैर्यनगा वात्सल्यभाव डोलवी।
तत्स्वागत करण्यास्तव संभ्रम होय राजमंदिरी। दर्शने ०

(श्लोक) पाराशर्य वदे न संतहि नृपा प्रारब्ध कर्माप्रती।
जाळायास समर्थ केवळ जगी भोगेच ती संपती।
हे चित्तात सदैव वागवुनिया शोका न थारा मनी।
जे देतील जगांत ते मिळविती साफल्य या जीवनी॥

टीप– "कुलघातक व घोर रणकंदन माजणार हे जाणून व्यास महर्षि दु:खीकष्टी झालेल्या धृतराष्ट्राकडे आले, आणि म्हणाले, "युद्धांत सर्वच मृत्यु पावणार ही गोष्ट आता अटळ आहे. हे सर्वभक्षक काळाचे चेष्टित आहे. शोक करू नकोस."

(श्लोक) दुश्चिन्हे मज सांगती नृपवरा होणार वंशक्षय।
गृध्रश्येन रणांगणी विहरती वृक्षावरी निर्भय।
सायान्ही नितसे प्रभातसमयी श्रीभानुबिंबाप्रती।
प्रेते वेढुनि छिन्नमस्तक किती पृथ्वीश्वरा नाचती॥

## पद १७८ वे

या रवीभवती। खळे त्रिवर्णाचे। सुचवी भय उत्पाताचे।
सदा दिन रात्री। रवि शशि नक्षत्रे। तळपता पाहियली नेत्रे।
मज अहोरात्री। क्षयतिथियोग दिसे। भानु शशि संगम नित्य असे॥
देवतायतनी। देवांच्या मूर्ती। मुखाने रुधिर फेन वमिती॥
कंप किति त्यांना। भूमीवर पडती। हसती स्फुंदुनिया रडती॥
वाटते ईशे। धर्मा स्थापाया। अधर्माते उच्छेदाया॥
माजले क्षत्र। सारे निवटाया। योजिले राया या समया॥

(साकी) युद्ध पहावे ऐसे जरि तुज वाटत असेल बा हे।
दिव्य दृष्टि देतो मज किमपिहि कठिण नसे बा पाहे॥
पहा हा संगरमख घोर।
शस्त्रहतभटशोणितपूर॥




संजयास दिव्य दृष्टि

(श्लोक) हा कृपेस मम संजय पात्र । यास दिव्यगुण देइन नेत्र ।
सर्व जाणिल न हा वध पावे । बुद्धिमांद्यहि न याजसि यावे ।

---

टीप— "व्यास म्हणाले, 'राजा तुझ्या सर्व ज्ञातिबांधवांचा फडशा उडणार याची सूचक दुश्चिन्हे सर्वत्र दिसत आहेत. तथापि हा युद्धरूप अनर्थ अदृष्टानेच पूर्वसंकेतित असल्याने याचे नियमन करणे अशक्य आहे. तुला युद्धकौतुक पहावे असे वाटत असेल तर तुला मी डोळे देतो.' धृतराष्ट्र म्हणाला, 'मला डोळे नको. पण संग्रामाची इत्थंभूत वार्ता मला बसल्या ठिकाणी कानी येईल अशी व्यवस्था करावी.' तेव्हा व्यासमहर्षींनी संजयाला दिव्य चक्षु दिले.

## पद १७९ वे

श्री व्यासा जोडुनि पाणी । प्रज्ञाचक्षु वदे वाणी ॥ धृ. ॥
अंतिम विजयश्री कोणा । वरिल हे स्वमुखे वाखाणा ॥
सागर सैन्याब्धीस उणा । आमुच्या ते निर्झर जाणा ॥
कोण करी भीष्म विजयबाणी । प्रज्ञाचक्षु वदे वाणी ॥
स्वार्थवश होउनिया ताता । न केली सुकृताची वार्ता ॥
लाभे संशय ये चित्ता । कां भौतिक वैभव हाता ॥
काय सुत राज्यश्री आणी । प्रज्ञाचक्षु वदे वाणी ॥

(श्लोक) बोले व्यास सपुत्र बांधव तुझा निर्वंश होईल रे ।
चक्रा घेउनि रुक्मिणीश समरी सन्नद्ध राया करे ॥
पावे नाश अधर्म धर्म विजयी होईल या संगरी ।
शस्त्रा सावरुनी नदीज तरि कां जिंकील देवा करी ॥

(साकी) शुद्धात्मा न वधील शिखंडी स्त्रीपूर्वत्वे जाण ।
संधी साधुनि दक्ष राहुनि हरा तयाचा प्राण ॥
न वधो वृक हा हर्यक्षा । नदीजा दक्षपणे रक्षा ॥
तर्कित होतो निजपर भट विधु की गभस्ति ऐसे ज्या ।
त्वन्नंदन सेनाग्री होता गंगासुत अति तेजा ॥
क्षत्रियांतक जेणे राम । केला विफल मनःकाम ॥

---

टीप– "या युद्धांत अंतिम विजय कुणाचा होईल असे धृतराष्ट्राने विचारले असता " जिकडे धर्म तिकडे जय " असे व्यासांनी सांगितले, आणि व्यास महर्षि निघून गेले. धृतराष्ट्राच्या पृच्छेवरून संजय त्याला युद्धाचे वृत्त सांगतो. शिखंडी हा पूर्ववयात स्त्री असल्यामुळे मी रणांत त्याजवर प्रहार करणार नाही असे भीष्मांनी सांगितले असल्यामुळे दुर्योधन प्रथमच दुःशासनाला सांगतो की, 'भीष्मांची काळजी घ्या आणि शिखंडीला प्रथम ठार करा म्हणजे आपण निर्भय होतो."

(घनाक्षरी) शिरोभूषण ज्या धवल । कवच देहावरि ज्या धवल ।
रथी अश्व योजि धवल । अलक धवल वृद्ध तो ॥
परी लांछन हृदयांत । कुजन रक्षणमय घेत ।
निशाकांत तेवि कांत । तुझा तात भासला ॥

## पद १८० वे

(लावणी) देवव्रत अधिनायक रिपुबल पाहुनिया धाकला ।
पांडवाग्रज अति थरकापला ॥
वदे पाहिला धनंजया का हा परबलसागर ।
द्रोणमुखनक्रांचा आकर ॥
पाहिलेस कां पितामहाचे क्रोधोत्कंपित मुख ।
कैचा सफल होय रणमख ॥
ही तालध्वज सिंहगर्जना कर्णी आकर्णिता ।
जयाशा भग्न होय तत्त्वता ॥
(चाल) की गंगासुतजय शक्य नसे भूवरी ।
या केसरीपुढे कृतांत केवळ करी ।
व्यर्थ मी क्षत्रिया देत मृत्युच्या करी ।
कौंतेया वाटते आमुचा भाग्यरवी लोपला ।
पांडवाग्रज०

---

टीप – " संजय रणभूमीवरील वृत्त धृतराष्ट्राला सांगू लागला. कौरवांकडील अकरा अक्षौहिणी सैन्याच्या आघाडीस भीष्म उभे राहिले. त्यांचे शिरोभूषण, अश्व, कवच सर्वच शुभ्र होते.

भीष्मांच्या आधिपत्याखाली सज्ज झालेली अवाढव्य सेना पाहून धर्मराजाला चिंता उत्पन्न झाली. तो अर्जुनाला म्हणाला, " असल्या ह्या व्यूहापुढे आपल्याला जय कसा मिळेल ?"

(अर्जुन म्हणाला, सत्य, दया, धर्म या साधनांनी जयेच्छूंना यश येते. ते संख्याधिक्याने किंवा बलवीर्याने येत नाही. जिकडे धर्म तिकडे जय ! जिकडे कृष्ण तिकडे जय हे निश्चित.)

(घनाक्षरी) असे उत्तेजनपूर्ण । बोल तापविती कर्ण ।
सज्ज करुनि धनुर्बाण । शोणनयन भूपती ॥
येति रणचत्वरि तूर्ण । परी वैकर्तन कर्ण ।
न्यस्त दिव्य धनुर्बाण । रणत्याग स्वीकरी ॥
शब्दशर तद्हृदयास । देति भीष्माचे त्रास ।
मनी भीष्माचा नाश । हीच आस लागली ॥

(साकी) स्यंदन संत्यागुनी धनंजय भवप्रिया वाखाणी ।
मंत्रोच्चारण करी मुखे ते भावे जोडुनि पाणी ॥
की समरी सद्यश यावे । शत्रुसामर्थ्य लया जावे ॥

## पद १८१ वे

भगवति हरिवल्लभे । अंबिके । विधिहरिहरसंस्तुते ।
चरणाप्रति मी शरण आलो करि करुणा उदयोऽस्तु ते ॥ धृ ॥
पदनतजनपालवो । वत्सले । अगाध तूझी क्षमा ।
एकमुखे मी किति वर्णावी मन्मति बहु अक्षमा ॥
मधुकैटभखलशुंभनिशुंभादिक बहु दनुजाधमा ।
मारुनि भक्तासाठी केली निष्कंटक ही क्षमा ॥
अतर्क्य महिमा तुझ्या गुणांचा न कळे निगमागमा ।
स्वीय जनास्तव धरिसि युगायुगि मूर्ती हृदयंगमा ॥
(चाल) गिरिसुता विधिस्त्री रमा ।
ह्या मूर्ति तुझ्या निरुपमा ।
ज्या हरिति साधुच्या श्रमा गे ।
अष्टादशभुज विधृत गदादिक विविधायुध मंडिते ।
विष्णुदास मी संतत मजला रक्षी कुलदैवते ॥

---

टीप— "अर्जुनाच्या भाषणाने धर्मराज उत्साहित झाले. उभय सैन्यांतील सर्व राजे युद्धोत्सुक होऊन पुढे सरसावले. कर्ण, त्याचे अमात्य आणि बंधु यांनी मात्र रणत्याग केला. अर्जुनाचे कल्याण व्हावे म्हणून श्रीकृष्णांनी त्याला प्रारंभी दुर्गादेवीचे स्तवन करण्यास सांगितले. त्यानुसार रथाखाली उतरून अर्जुनाने हात जोडून दुर्गेचे स्तोत्र म्हटले."

# पद १८२ वे




अर्जुन विषाद

तुरगगुणाकर्षणमग्ना तै योगिजनानन्दना ।
वदला पार्थ नंदनंदना ॥ धृ. ॥
सैन्यमध्यभागी ने स्यंदन यादवकुलवर्धना ।
पाहु दे रिपुगण या लोचना ॥
या जिंकाया भवप्रतिभटा कोण समरचत्वरी ।
ठाकले धनु घेउनिया परी ॥
सखया जाया कृतान्त सदना कोण अतिथि पातले ।
जयांचे जीवनधन संपले ॥

(चाल) आरंभशूर हे कौरव जगजीवना ।
परि चित्ती यांच्या लवमात्रहि धैर्य ना ।
पळताना यांच्या शिवे मना लाज ना ।
उत्तर गोग्रहणी हे पळती पाहुनिया कंदना ।
वदला ०

---

टीप – "अर्जुनाच्या स्तुतीने देवी प्रसन्न झाली. तिने अंतरिक्षात उभे राहून "विजयी हो" असा त्याला वर दिला. आपण विजयी झालोच असे अर्जुन मानू लागला. अर्जुन श्रीकृष्णाला म्हणाला, "कृष्णा, माझा रथ दोन्ही सैन्यांच्यामध्ये उभा कर. कुणाबरोबर मला लढायचे आहे ते मला पाहू दे."

(श्लोक) ज्याच्या अंकाश्रये मी यदुकुलतिलका पाहिले या जगाते ।
जेणे वात्सल्यभावे मजसि शिशुपणी जेववीले स्वहाते ।
तो हा मत्ताततात प्रथितपृथुयशा वीर गांगेय हाते ।
या युद्धी मी वधू का नरक तरि कसा स्थान देईल माते ॥

(साकी) भीम पार्थ यम यदुकुल भूषण चालति राया मागे ।
पुढे युधिष्ठिर प्रार्थवे ज्या नम्रपणे हे मागे ॥
अज्ञाने कौरव त्यास । निंदिती, करिती उपहास ॥

(दिंडी) चंद्रवंशीय क्षात्रकुलांगार । चरण वंदुनि ढाळूनि अश्रुपूर ॥
गमे गांगेया शरण जाउनीया । यत्न करितो हा जीव वाचवाया ॥
बंधु असता विख्यात विश्ववीर । चक्रधारी श्रीकृष्ण समरधीर ॥
कशी याते भी उपजली मनांत । दुर्योधन समर धीरवंत ॥

(घनाक्षरी) असो याते धिक्कार । असा करिती चित्कार ।
न शब्दाचा उच्चार । परी धीर तो करी ॥

(साकी) भीष्म म्हणे मज जिंकी ऐसा वीर आढळे ना गा ।
वृद्धहि सिंह महामदमत्ता काय ढळेगा ना गा ॥
पाकशासनहि न टिके रणी । समज मज रिपुध्वांत तरणी ॥

टीप – "युद्धोत्सुक समोर उभे असलेले सारेच स्वजन आणि हितकर्ते आहेत हे पाहून अर्जुन खिन्न झाला, तो करुणेने पीडित झाला. त्याच्या सर्वांगाला कंप सुटला. कुलक्षयामुळे लागणारे पाप करण्याला त्याचे चित्त धजेना. युद्धापासून निवृत्त होण्याच्या तो गोष्टी करू लागला. श्रीकृष्णांनी त्याला गीतोपदेश करून क्षात्रधर्माला त्याला प्रवृत्त केले. अर्जुनाने पुन्हा आपले गांडीव धनुष्य व बाण सज्ज केलेले पाहून

सर्वच महारथ्यांनी आनंदाने आरोळया ठोकल्या, शंख फुंकले. अशा वेळी राजा युधि-ष्ठिर कवच उतरून, आयुधे टाकून पायी भीष्मांच्याकडे जाऊ लागला. कौरव तो भ्याला म्हणून त्याचा उपहास करू लागले."

## पद १८३ वे

मग शांतनवा नमुनि धर्मशमसदन ।
तोही निघे हात जोडून ॥ धृ. ॥
सैन्यामधुनी रुक्मरथाच्या जवळी ।
येवोनी पदांबुज कवळी ॥
त्या करी रथा प्रदक्षिणा सुखसदन ।
की तिथे तपस्याज्वलन ॥
ब्राह्मी शोभा चाप भयंकर हाती ।
घेवोनी विलसत होती ॥
(चाल) निजगुरु द्रोणपद नमुनी । अश्रू आणुन तै नयनी ।
वदला करयुग जोडोनी ।
आचार्यवपू दारुण शर सोडून । केसे विंधू मतिसदन ॥
(साकी) धर्म म्हणें नमुनि तुम्हा पुसतो तुमचाचि वधोपाय ।
द्याया कुठर कल्पद्रुमसे मला हे बघो पाय ।
असाध्य न साधूंना काही । मोहममता किमपिहि नाही ॥
(साकी) असते मरण कपाळी राया कथितो यद्यश होते ।
परि नाही काय करू वृद्धा त्या दोघा वश होते ।
कर्मवश युधिष्ठिरा देह । शास्त्रासिद्धान्त न संदेह ॥
(श्लोक) त्वरित मद्रपती चरणावरी । नमन भूमिप जाउनिया करी ।
मजसि युद्ध कराल करावया । वरद, द्या वर सद्यश यावया ॥

---

टीप—"चारही पांडव व श्रीकृष्णही त्यांच्यामागून गेले. भीष्मांना वंदन करून त्यांनी त्यांची युद्धासाठी अनुज्ञा व विजयासाठी आशीर्वाद मागितले. भीष्म सुखावले व म्हणाले, तुझा जय होईल. पण युद्धाखेरीज आणखी काही मागून घे. धर्माने भीष्मांना युद्धात जिंकण्याचा उपाय विचारला. असेच गुरु द्रोण, कृपाचार्य व शल्य यांची अनुज्ञा, आशीर्वाद आणि त्यांच्या पराभवाचे उपाय विचारून राजा युधिष्ठिर बंधूसह आपल्या रथावर आला."

(साकी) परते ऐसे भीष्मद्रोण प्रसाद तो साधुनी ।
धर्ममहात्मा स्तविला अतितर नारदादि साधूनी ॥
ऐका भारत रणवार्ता जी तोखद भवदावार्ता ॥

## पद १८४ वे

स्पर्शिता सूर्यकांताते । वन्हीचे वन्हिच मिळते । उत्तर ॥
चय न काय पाषाणाचे । स्पर्शिती न कां त्या साचे । रविकर ॥
पादाहतिने अनिवार । करि न कां दंशफूत्कार । फणिवर ॥
वपुवित्त जीव वाचाया । सजले जे हृदय कराया । तृणतर ॥
(चाल) धिक्कार । तया साचार । निंदिती फार । अधम म्हणवूनि ।
अधम म्हणवूनि । तेजाचो योग्य न हानी । नरवरा ॥

## पद १८५ वें

(लावणी) वृंदारकगणवंदित पदयुग कुंदरदन श्रीहरी ।
बोलता सूर्यसुता यापरी ॥
भेदनीतिचा तो अद्भुततम संप्रयोग ऐकून ।
करी मंदस्मित वैकर्तन ॥
वदे नंदनंदना दर्शने तनुमन आनंदले ।
सकलही हे जीवन धवळले ॥
काय परीक्षा घ्याया आपण ही युक्ती योजिता ।
धर्म मी सोडिन कां तत्त्वता ॥
(चाल) विश्वासघात कां रुचेल जी या मनी ।
वीरास काय तदधिकरुचि जी जीवनी ।
दावावे निजमुख कसे या पुढे जनी ।
व्यक्तिद्वेषे पक्षद्रोहा कोण अधम स्वीकरी ।
बोलता सूर्यसुता यापरी ॥

टीप– "श्रीकृष्ण मात्र त्या संग्रामस्थलीच कर्णाला गांठून म्हणाले, 'कर्णा, तुझे व भीष्मांचे वितुष्ट आले आहे; तेव्हा ते आहेत तोपर्यंत पांडवांच्या बाजूने युद्ध कर अन् भीष्म संपले म्हणजे पुन्हा दुर्योधनाला साह्य कर.' पण श्रीकृष्णांची ही युक्ति सफळ झाली नाही."

(साकी) कर्ण म्हणे विप्रिय अल्प घडो या सुयोधनाचे न ।
श्रीकृष्णा कां दारोदारीं मी सुयोध नाचेन ॥
नटसा कां लज्जाहीन । करिता मज तेजोहीन ॥

## पद १८६ वे

मग कर्णाते कवळुनिया निजहृदयी । प्रभु गाढालिंगन देई ॥
तव धन्य वदे कर्णा नृपनिष्ठा ही । जी सदैव अविचल राही ॥
हा धन्य परी कांचनाश्म संयोग । विधिसंकेताचा योग ॥
मृण्मयपात्रा अमृतलाभ हा जाण । चुकवी विधिलिखिता कोण ॥
(चाल) येतो मी ऐसे वदुनी ।
तत्कृत वंदन घेवोनी ।
सैन्याब्धी उल्लंघूनी ।
पांडवकटकी वेगे श्रीहरि येई । प्रभु ०
(साकी) भेटे युयुत्सु धर्मा, त्यजुनी ज्येष्ठ दुरात्म्या भ्रात्या ।
जैसा साधु बिभीषण भेटे महादयाभ्रासी त्या ।
ऐका भारत रणवार्ता ।
जी तोषद भवदावार्ता ॥
(पद) म्हणति हा धन्य धन्य भूपाल ॥ धृ. ॥
दया क्षमा नय विनय आचरो योग्य पाहुनी काल ॥ १ ॥
अधर्म तिमिराचे हा भास्कर सकलहि निवटिल जाल ॥ २ ॥
पदयुगवंदन करितो ज्याचे सुमुनिवंद्य गोपाल ॥ ३ ॥

---

टीप– "धर्मराज सैन्याचे मध्यभागी उभे राहून म्हणाले, 'जो कोणी आम्हांला साहाय्य करण्यास्तव आमच्या बाजूला येईल त्याचा मी आपला म्हणून स्वीकार करीन.' तेव्हा धृतराष्ट्राचा दासीपुत्र युयुत्सु सर्व कौरवबंधूंना सोडून नगारे वाजवीत पांडवसेनेला येऊन मिळाला. पांडवांचा हा सर्वच थोरपणा पाहून सर्वांनीच त्यांची वाहवा केली."

(साकी) भीमाचा सिंहध्वनि कोणा आयको न दे वाद्ये।
शिर डोलविले समाधि सोडुनि आकर्णुनि देवाद्ये ॥
ऐका भारत रणवार्ता।
जी तोषद भवदावार्ता ॥

(कटाव) प्रवर्तले तै शरीरकर्तन ॥ रणचण्डीचे भीषण नर्तन।
समर्थ कोण कराया वर्णन। भीरु भयावह ते आकर्णन।
विंधी तनया पिता मार्गणे। बंधुमित्रसुहृदादि न जाणे।
द्वंद्वे होती किती भयंकर। परस्परा हाणिताति खरशर।
धनंजयावरि ये गांगेय। श्रीकृष्णासहि यद्यश गेय।
ताडि द्रोणात्मजा शिखंडी। तत्कराल धनु भल्ले खंडी।
शिनिप्रवीरावरि कृतवर्मा। धावुनि विद्ध करी तन्मर्मा।
ये द्रोणावरि धृष्टद्युम्न। करावयाते तद्यश निम्न ॥
सुयोधनावरि वीर वृकोदर। गदाघात करुनी करि जर्जर।
सूर्यमंडला समर धुरंधर। भेदुनि जाती अमित वीरवर।

(साकी) शोणित गंधे जिकडे तिकडे समस्त भट तै भुललें।
स्वपर क्षतजोक्षित मधुसमयी पलाश तरुसे फुलले ॥
धन्य ते संगर मखपर्व। करी जे वीरा गतगर्व ॥

(श्लोक) संग्रामी अपराह्णकालसमयी मद्राधिपा उत्तर।
दे आव्हान यदूत्तम प्रतिभटा संप्रेरुनी कुंजर।
शुंडा खंडुनि कुंजरास वधुनी त्याते महाशक्तिनें।
मद्राधीश तदा कृतांतसदना हांसोनिया शीघ्र नें।

टीप – "आनंदभराने सर्वही वीरांनी शंख फुंकले. भीमाने डरकाळी फोडली. त्याच्या त्या ध्वनीने वाद्यांच्या आवाजाला मागे टाकले आणि रणचंडीचे नर्तनास प्रारंभ झाला."

(साकी) बंधुवधे लोचनांतुनी तो वीर वाहवी नीर।
क्रोधे रिपुगण मस्तक खंडुनि रक्ताचाहि पूर ॥
भये थरकापविले सैन्य। आमुचे प्रगट होय दैन्य ॥

(दिंडी) तदा त्याते गांगेय वदे धन्य।
तेज वत्सा दाविले जगन्मान्य।

तुझे पाहुनि चापल्य चित्त धाले।
नेत्र माझे त्वद्विक्रमे निवाले ॥
तया मूढा परि प्रशंसा तयाची।
भीष्म करि वाटे भयानेच साची ॥
वदे रागे अश्लाघ्य तया बोल।
आत्मनाशा जणु चित्त होय लोल ॥

(श्लोक) वृद्धा का स्तवने मला रिझविसी होवोनि वैतालिक।
हे शय्यागृह काय? संगर असे घे घे करी कार्मुक।
जेव्हा मार्गण हे कृतांतसदना नेतील भीष्मा तुला।
तेव्हा मत्स्तव ऐकवी सुरगणा घे घे करी हेतिला ॥

(साकी) सिंहनाद करिती पांडव तै मोदपूर्ण चित्ताने।
की गंधद्विप आज बुडाला गोष्पदात-दैवाने ॥
ऐका भारत रणवार्ता। जी तोषद भवदावार्ता ॥

---

टीप — "जोडीजोडीने वीर लढत होते. विराटपुत्र उत्तर शल्यावर धावला. शल्याने उत्तराच्या हत्तीची सोंड कापून त्याला आणि महाशक्ति सोडून उत्तराला ठार केले. बंधुवधाने चवताळून श्वेत नांवाचा विराटाचा दुसरा पुत्र शल्यावर तुटून पडला. भीष्मांनी शल्याला संरक्षण दिले. श्वेत आणि भीष्म असा संग्राम सुरू झाला. श्वेताचे युद्धचापल्य पाहून भीष्मांनी त्याची वाखाणणी केली. पण तो ते समजू शकला नाही."

(घनाक्षरी) तदा होऊनि अतितप्त। सोडितो मार्गण सप्त।
अरी विरथ करी दृप्त। भीष्मदीप्त तेज तै ॥

(साकी) क्रोधे श्वेत गदाघाते तै भीष्मरथ करी चूर्ण।
हसत आरूढोनि रथावरि अन्य नदीसुत तूर्ण।
करी घे तै कार्मुक घोर। वधाया रणी मत्स्यवीर।
ब्रह्मास्त्रे दग्ध करी श्वेता गंगासुत अति तेजा।
शलभ कसा जिंकील पौरुषे प्रलयवह्निच्या तेजा।
ऐका भारत रणवार्ता। जी तोषद भवदावार्ता ॥

## पद १८७ वे

श्वेतकंदने अजातरिपुच्या ये नयनी पाणी ।
वदे कंसकंदना मुकुंदा तो जोडुनि पाणी ॥
नको राज्यसुख वनांतरी मी प्रभुराया जातो ।
तृणपर्णाशिन करुनि मंत्रजप शमसाधन तपतो ॥
स्वार्थसाधनास्तव हे क्षत्रिय भीष्माच्या हाते ।
समरी मारावे हे गमते अति अनुचित माते ॥

(चाल) द्या आज्ञा मजसी वनांतरी जावया ।
रक्षावे आपण सदैव अनुजांस या ।
निवसू द्या सदनी सुखे क्षत्रियांस या ।
वनी जाउनी तुष्ट करिन मी तपे शूलपाणी ।
वदे कंसकंदना मुकुंदा तो जोडुनि पाणी ।

टीप – " भीष्मांनी ब्रह्मास्त्राचा प्रयोग करून सोडलेल्या बाणाने श्वेताचा बळी घेतला. पांडवाकडील सर्वांनाच आणि विशेषत: युधिष्ठिरांना अतीव दु:ख झाले. उद्वेगाने श्रीकृष्णाजवळ येऊन ते म्हणाले, " ह्या सर्व राजेमंडळींना काळाच्या दाढेत देण्यापेक्षा मी पुन्हा वनातच जातो."

## पद १८८ वे

हे बोल ऐकता दीन । रक्तेक्षण यदुपति बोले ॥
ऐकताच ज्या वाक्ततिला । अहिवर चतुरानन डोले ॥
क्षत्रियकुल चूडामणि हे । निर्वीर्य न राया झाले ॥
एकाच परिभवे कैसे । तुज धैर्य सोडुनी गेले ॥
क्षत्रिये युद्ध करिताना । पाहिजे सत्पदा वरिले ॥

(चाल) संगरी अरींना वधुनी ।
निजधर्म राज्य पाळूनी ।
त्यावरी सुता बसवोनी ।
मग वनांतरा आनंदे । पाहिजे क्षत्रिये गेले ॥

(श्लोक) येता हस्तिपुराहुनी नरवरा कुंतीस वंदावया ।
जाता दे मज ती निरोप नयनी तैं नीर आणूनिया ॥
सिंहाची जननी असूनि परक्या दारी कैसे जीवन ।
कंठू हे पिचले शरीर सगळे निर्दग्ध झाले मन ॥
त्या सांग ज्येष्ठ पुत्रास । क्षत्रियास हा वनवास । दूषण ॥
न्यायार्थ शस्त्र घ्यायास । चित्ति ज्या लवहि न आस । दूषण ॥
जननी यौवन वृक्षास । कीड ही मुकुंदा खास । दूषण ॥
(चाल) पापास । कुलांगारास । क्षत्रिया खास । प्रसवली त्यास
प्रसवली त्यास । शत्रूंचा सूड जयास ॥ दूषण ॥

टीप – "श्रीकृष्णांनी धर्मराजांना स्वधर्माप्रमाणे (क्षत्रिय) वागण्याचा उपदेश केला आणि कुंतीच्या निरोपाचे स्मरण करून दिले.

(साकी) रचिला दुसरे दिवशी व्यूह क्रौंचारुण धर्माने ।
गरुडव्यूह श्रीमद्भीष्मे परमशुद्ध कर्माने ॥
मुखी श्रीकृष्णासह पार्थ । जयाचा विक्रम अनपार्थ ॥
अभिमन्युवरी उठला लक्ष्मण नंदन सुयोधनाचा ।
भागिनेय तीक्ष्ण शरे ताडी तया कंजनाभाचा ॥
जो तन्मस्तक खंडावे । तोच गांगेय शीघ्र पावे ॥
(श्लोक) धावे पार्थ सुतार्थ कौरव चमू तेजापहारा करी ।
दिव्यास्त्रे प्रलयानिलासम चमू ती जाळुनी संहरी ।
त्या गांडीव विमुक्तबाण निकरे भानुप्रभा झाकिली ।
युद्धप्रेक्षक तै निराश चढला श्रीभानु अस्ताचली ॥
(साकी) करिता झाला दुसरे दिवशी वदोनि हे अवहार ।
तो सर्वज्ञ सभा कंठीचा अतुल विमल नवहार ॥
ऐका भारत रणवार्ता । जी तोषद भवदावार्ता ॥

टीप – " उभय बाजूंची व्यूहरचना झाली. अर्जुन-भीष्म, धृष्टद्युम्न-द्रोण, कालिंग-भीम असे एकमेकावर तुटून पडले. भीम तर रुद्रासारखाच दिसत होता. अभिमन्यूवर सुयोधनाचा मुलगा लक्ष्मण चालून आला. अर्जुन अभिमन्यूच्या साहृचाला आला. कृष्णाच्या साहृयाने त्याने कौरवसैन्याची दाणादाण उडविली.

(साकी) सूत म्हणे भीमाच्या हरिच्या गजसा न निमो हाते ।
पळवुनि करि त्याच्या यत्नशते शीघ्र हानि मोहाते ॥

जाय नृप गांगेया जवळी । शीघ्र तच्चरणकंज कवळी ।।
सलील पृथुल जलजदलनिभशुभनयने तै फिरवून ।
शांतनव वदे सुयोधनाते क्रोधोर्मी जिरवून ।।
ऐका भारत रणवार्ता । जो तोषद भवदावार्ता ।।

## पद १८९ वे

जगत्सूत्रचालक परमात्मा जया करी रक्षण ।
तयाचे कोण करी मारण ।।
तव दुर्मतिचे केले आम्ही सहस्रदा वारण ।
हटें तू पेटविले हे रण ।।
त्या राजश्यालाचे कपटद्यूत हे न मोहन ।
समर हे नाशिल जीवितधन ।।
महास्त्रकोविद धनंजयाची परमास्त्रे दारुण ।
करिति भूपाल विदारण ।
(चाल) तो कंजनाभ त्या रथी पाहिलास का ।
तो प्रलयंकर कपिरुद्र पाहिलास का ।
करविधृत महद्धनु पार्थ पाहिलास का ।
भवितव्याचे कसे करावे यत्नशते वारण । तयाचे ०

---

टीप – "भीमार्जुनांच्या माऱ्याने दुर्योधनाचे सैन्य पळत सुटले. भीष्मद्रोणांनाही ते परतविता येईना. तेव्हा दुर्योधन रागावून भीष्मांना म्हणाला, "आजोबा, आपल्या मनांतून पांडवांना साह्य करावे आणि मला फशी पाडावे असे आहे. युद्धापूर्वीच आपण हे मला कां सांगितले नाही ?" यावर भीष्म हसून व नंतर क्रोधाने म्हणाले, "पांडव देवांनाही अजिक्य आहेत हे सत्य मी तुला कितीदा तरी सांगितले; पण त्याचा काय उपयोग ? आता मात्र माझी प्रतिज्ञा ऐक. आज मी एकटा ससैन्य व सबांधव पांडवांचे निवारण करीन."

(साकी) रणदुंदुभि सन्नाद भयानक आयकोनि तै कानी ।
पुसे धर्म सेनापति सांगति भीष्मप्रतिज्ञावाणी ।।
ऐकता धैर्य सकळ गळले । लोचनी नीरपूर चाले ।।

हा पौलोमन कालखंज वा देवव्रत हा जाण ।
विकळ करी भार्गवरामाचे संग्रामी जो प्राण ॥
सावध सावध रे सखया । असे हरि संबोधी सखया ॥
धनंजयाकरवीच आपणा संग्रामी जिंकीन ।
तन्मार्गणवृष्टिपुढे टिकती कसे शलभ हे दीन ॥
ऐका भारत रणवार्ता । जी तोषद भवदावार्ता ॥

## पद १९० वे

श्रीनारायणचरणसंभवा जननी मंदाकिनी ।
नामे अधमाधमअघमभंजन करिते जी सुरधुनी ॥
वृंदारकगणनुता चराचर वंद्यपदा जान्हवी ।
दग्धकाम परमेश्वर ही जी निजशीर्षी वाहवी ॥
हे यदुनंदन, तन्नंदनकीर्तिचे भाग्य लाभले ।
आजवरी तत्सलिलासम मी शील शुद्ध राखिले ॥
(चाल) शुद्ध क्षत्रिय मी शंतनुचा बालक ।
भ्रष्टप्रतिज्ञ करवीन विश्वपालक ।
डोलवील मस्तक जगत्सूत्रचालक ।
रणरंगे आजच्या धाकतिल लोकपालही मनी । नामे ०

टीप – "भीष्मप्रतिज्ञा कानी आली तेव्हा कृष्णांनी प्रतिज्ञा केली की "अर्जुनाच्याकडूनच मी भीष्मांचा पाडाव करीन." यावर भीष्मांनी पुनः प्रतिज्ञा केली की, मी शंतनु व गंगा यांचा पुत्र आहे. भगवंताला त्यांच्या प्रतिज्ञेचा भंग करायला लावीन."

(ओवी) ऐसे देवव्रते बोलोनी । चाप टणत्कारिले तये क्षणी ।
झणत्कारिल्या किंकिणी । ऐकोनि कर्णी सर्व भ्याले ॥
(साकी) हययानी कौशल्य प्रगटुनी शरप्रहारा चुकवी ।
विफल हो न कर्मसूत्र कैसा परमेश्वरही चुकवी ॥
ब्रह्माही तै रक्ते न्हाले । पा ी भीष्महि गहिवरले ॥

(घनाक्षरी) सुटति बाणावर बाण । वीर होति गतप्राण ।
हृषीकेश तनुत्राण । भीष्मबाण भेदिती ॥
(ओवी) तो आक्रांत वर्तला थोर । भीष्मे पार्थ लक्षोनि समोर ।
प्रेरिले बाण अति दुर्धर । खिळिला पार्थ सर्वांगी ।
(दिंडी) नखांगुष्ठापासोनि भीष्म बाण ।
करिती विव्हल पार्था न उरे त्राण ॥
नागदंशापरि विकल होती प्राण ।
पाहता तै धावला नतत्राण ॥

## पद १९१ वे

सात्यके धर्मचरणाते । मद्वंदन तू कळवावे ।
सांग की धनंजयसमरी । वीरोचित सद्गति पावे ।
शोकाने हृदय फुटोनी । कृष्णही तद्गति पावे ।
उदकाविण मत्स्ये केवी । जगती जीवन कंठावे ।
(चाल) लोपला यापुढे धर्म ।
विजयी झाले दुष्कर्म ।
पावतील दुर्जन शर्म ।
विधिसंकेता या जगती । कोणीहि कसे टाळावे ?

टीप – "अतुलवीर्य भीष्मांनी त्या दिवशीच्या युद्धात कहर केला. अर्जुनावर व श्रीकृष्णावरही त्यांनी बाणांची वृष्टि केली. अर्जुन तर मरण्याच्याच पंथास लागला. त्याने निराशेने धर्मराजांना निरोप पाठविला."

(साकी) तो पौरुषकारुण्य सिंधु तै पार्थाप्रति राखाया ।
गर्जे क्रोधे केसरी जसा मत्त सिंधुरा खाया ॥ ऐका ०
ब्रह्मांड भस्म व्हावे ज्याच्या दर रक्तेक्षणपाते ।
तो तू धावसी मज माराया दावुनि प्रतापाते ॥
झालो या लोकी धन्य । मिळाली कीर्ति असामान्य ॥
(घनाक्षरी) उडवि मुखवातचि ज्यास । प्रलयपवन काय त्यास ।
पळवि पक्षमपात ज्यास । त्यास गरुड कासया ॥

## पद १९२ वे

गदारिदरनंदकांबुजधरा मस्तकपुष्पाते ।
धन्यता पदपंकजपाते ॥
खंडा मस्तकपंकेरुह हे आपुल्याच हाते ।
सद्‌गती मिळेल देहाते ॥
झाले सार्थक वीरोचित जी या सत्कर्माचे ।
लाभले शाश्वत यश साचे ॥
(चाल) देवाधिदेव या त्वरा करा मारणी ।
धन्य ही क्षात्रतनु होइल समरांगणी ।
होईन पात्र वैकुंठपदारोहणी ।
चक्र कशास्तव विलया जाइन दृष्टीच्या पाते । धन्यता०

टीप— "ह्या प्रकाराने पांडवांची धडेगत नाही असे पाहून श्रीकृष्णांनी हातचे घोडे सोडून हातांत आपले वज्रतुल्य सुदर्शन चक्र घेतले आणि रथाच्या खाली उतरून ते वेगाने भीष्मावर धावून गेले. सर्व कौरव घावरले. भीष्मांना मात्र खूप आनंद झाला. त्यांनी भगवंताचे स्वागतच केले."

अर्जुनाने मात्र भगवंताला मिठी मारून मागे वळविले. दोघेही पुन्हा रथारूढ झाले व युद्धाची धुमश्चक्री सुरू झाली.

(साकी) कर्ण म्हणे करितो कार्य तुझे शक्य हे न अन्यास ।
परि भीष्माकरवी करवावा आजि शस्त्रसंन्यास ॥

## पद १९३ वे

कर्ण म्हणे की नृपा कृपाळा हाणुनि तुजसी गपा ।
वंचिले भीष्मे जयलोलुपा ॥
आंत अनुग्रह वरतो निग्रह दाउनिया पुरवितो ।
प्रतिदिनी सैन्य तुझे खपवितो ॥
कार्य तुझे हा कर्णचि साधिल साधि न हो उपरतो ।
सोडुनि धनु तो भजनी रतो ॥
धनु घालुनि धेनूसम धर्मा शरण तुला आणितो ।
आजि तव दुःख सकल खाणितो ॥

काम नृपा वृद्धाचे युद्ध न वचन तुला हे रुतो।
होता तरुणपणी मेरु तो॥
(चाल) जा आता तरि म्हातारा आणुनि घरी।
धनु हिसकुनि घेउनि जप माळा दे करी।
मग यथाशक्ति हा करिल पहा नौकरी।
फार काय बोलुनीच मत्कृति दाविल गुरुची कृपा। वंचिले०
(साकी) जरि माझ्या द्वेषे की केवळ भाग्य मंद याकरिता।
मदरीते रक्षितसा आपण अथवा करुणा करिता॥

---

टीप – "आठ दिवसपर्यंत जिवावर उदार होऊन लढत असताही पांडवांच्यावर विजय मिळविणे अशक्य आहे असे पाहून दुर्योधनाने शकुनि, कर्ण व दुःशासन यांना एकत्र बोलावून विचार मांडला. कर्ण म्हणाला, "मी तुझी इष्टसिद्धि करून देतो; पण भीष्मांना प्रथम युद्धातून हाकून लाव." दुर्योधनानेही भीष्मांच्या शिबिरांत जाऊन म्हटले की, आपल्याला पांडव जिंकता येत नसतील तर आपण कर्णाला ती संधि द्या."

(साकी) देव म्हणे सत्य प्रतिज्ञ तू भीष्म वधे हो तूर्ण।
सुहृदांची, न्यायाची, माझी करी कामना पूर्ण॥ ऐका०
(घनाक्षरी) अशा ऐकूनि वचास। कुंदरदन मंदहास।
प्रेरि विजयरथ हयास। वाहिनीस भेदुनी॥
(साकी) देव रथाते सोडुनि धावे सुरनदी विलापार्थ।
की ह्या दुस्तर शत्रुसमुद्री कासे लावी पार्थ॥

## पद १९४ वे

निशीथसमयी नीरद श्यामा वदे नीर आणुनि नयनी।
यमनंदन अतिकंपित तनुमन " जातो सोडुनि समर वनी॥
मी मूढे रणमखी निमंत्रण केले ते पळहि न टिकले।
तदंगना वदनिचे पितामह शर पुसती प्रतिदिनि टिकले।
वृथा काय जी राज्य मनोरथ करुनि क्षत्रिय निवटावे।
बाळक पाळक वध शोकी या वसुंधरेते बुडवावे॥ ३॥

भीम पराक्रम मंदाकिनिचा आत्तशस्त्र नंदन कृष्णा।
महास्त्रमंत्रित मार्गण ततिने दग्ध करी नृपपदतृष्णा।
चरणपंकजो तुझ्या अर्पुनी बंधुमित्रजन अवघे मी।
जीवनसमिधा करितो अर्पण उग्र तपस्यामय हो मी ॥

---

टीप – "दुर्योधनाचे बोलणे म्हणजे पर्यायाने आपली निर्भर्त्सनाच आहे हे ओळखून भीष्मांनी परवशतेची निंदा केली आणि नवव्या दिवशी युद्धांत अगदी कहर केला. तेव्हां श्रीकृष्णांनी विराट नगरांत संजयापुढे केलेल्या प्रतिज्ञेची अर्जुनास आठवण करून दिली आणि त्याला भीष्मांच्याबरोबर युद्ध करण्याला प्रवृत्त केले."

भीष्म जेव्हा अतिमानुष कर्म करून पांडवीयांचा फडशा पाडू लागले तेव्हा सर्वच वीर भयपीडित झाले. नवव्या दिवशी रात्री पांडव, वृष्णि आणि सृंजय पुढील मसलतीसाठी शिबिरांत एकत्र आले. तेव्हा पुन्हा धर्मराज श्रीकृष्णांना म्हणाले की, ह्या युद्धापेक्षा मी वनांत जावे हेच ठीक."

(साकी) मी आव्हान पुरस्सर वधितो गंगानंदन समरी।
अस्त्रज्ञानमदासह खंडित तन्मस्तक रणनिकरी ॥
शांतनवे समय असा केला करिन युद्ध कुरुपार्थ।
मंत्र त्वदर्थ होईल विजयद जेवि धन्वि गुरु पार्थ ॥ ऐका०

## पद १९५ वे

हे कुरुकुलभास्करा। चरणी तव सुरनदीनंदना प्रणतिततीभयहरा।
नतचातक जलधरा। तडित्कांतिवर कार्मुक मार्गणतति निर्जित रिपुवरा।
हे शंतनुनंदना स्वीयचकोराऽमृतस्यंदि शीतांशो तव वंदना ॥
जामदग्न्यजयकरा। बृहद्व्रतधरा भास्कर विगतभ व्रतप्रभेने पुरा।
प्रभो विश्वमंगला। रणरंगी वर द्या वरदा मज व्हाया सन्मंगला
ही यमनंदनगिरा। कर्णी आकर्णुनी डोलवी देवव्रतही शिरा ॥
(साकी) असता आम्ही कैचा तुज जय संगराजिरामाजी ॥
साहिल कोण भंग मदिषूंची दे याजीरामाजी।
(घनाक्षरी) चक्रपाणी यदा क्रुद्ध। स्वये करु पाहे युद्ध।
तया आश्लेषी बद्ध। करी रुद्ध पार्थ कां ? ॥

टीप – "श्रीकृष्ण म्हणाले, 'तुमची इच्छा असली तर मीच भीष्मांचा वध करतो.' पण कुणालाच श्रीकृष्णांनी आपल्या प्रतिज्ञेचा भंग करावा हे मान्य नव्हते. म्हणून असे ठरले की, रात्री भीष्मांच्या शिबिरांत सर्वांनी मिळून जाऊन त्यांचा वधोपाय विचारावा. त्याप्रमाणे धर्मराजांनी केले. भीष्मांनी, शिखंडीला पुढे करून अर्जुनाने आपल्यावर शस्त्राचा मारा करावा असे सुचविले."

(साकी) त्रिशर सोडिता भीष्म म्हणे त्या त्वा यथेष्ट हाणावे ।
आम्ही स्त्रीपूर्वा न वधू हे सत्यव्रत जाणावे ॥ ऐका ०

(श्लोक) सारे वेढुनि हाणिती खरशरा मर्मावरी विंधुनी ।
त्याते दे परि सद्गती तव पिता तन्मस्तका खंडुनी ॥
त्याच्या चापरवास ऐकुनि भये भीमादिही कांपती ।
राहे एक शिखंडि नीच समरी दैवी विचित्रा गती ॥

## पद १९६ वे

वज्रसमस्पर्श हे बाण रे गांधारीनंदना ।
देति मज मर्मान्तिक वेदना ॥
त्रिपुरांतक वपु या बाणाही विदीर्ण केले पुरा ।
पूजिले शरपुष्पी शंकरा ॥
समर्थ ठरले हेच बाण वा महेन्द्रमदखंडनी ।
तर्पिला हुतवह खांडववनी ॥
षंढाचे सामर्थ्य न त्या या बाणांच्या धारणी ।
एक या पात्र धनंजय रणी ।
(चाल) या पितामहाचे शरपुष्पे पूजन ।
करितसे दिव्य गुण तो कुंतीनंदन ।
करि मंत्रोच्चारण पहा नंदनंदन ॥
भाग्य काय याहुनी अधिकतम या गंगानंदना । देति मज ०

टीप – "दहाव्या दिवशी भीष्म प्राणावर उदार होऊन लढले. त्यांच्याच सूचनेप्रमाणे शिखंडीला पुढे करून अर्जुन त्यांच्यावर धावला. भीष्मांनी गज, रथ, अश्व हे निर्मनुष्य करून सोडले. पण ते शिखंडीवर बाण सोडीनात. शिखंडीने मात्र त्यांना बाणांनी वेढून टाकले. अर्जुनानेही त्यांच्यावर बाणांचा वर्षाव केला. भीष्मांनी येणारे बाण शिखंडीचे नसून अर्जुनाचे आहेत हे ओळखले.,

(साकी) हा हा हा हा ऐसे म्हणतचि हतशेष बळ पळाले ।
तो विजय शर विकल कुरुवरवपु रविबिंबसे गळाले ॥ऐका०

(घनाक्षरी) कसा दक्षिणायनांत । करी विबुध देहपात ।
असा कर्णी आघात । दिव्य वाक्तती करी ।

(साकी) ऐसे बोलुनि नेत्रे झाकी तो जसा सुपर्यंकी ।
किंवा बालपणी गंगेच्या तो जसा सुपर्यंकी ॥

(दिंडी) तदा देवी स्वर्नदी मुनिवराते । पाठवी त्याते बोध करायाते ॥
हंसरूपे ते बोधितो तयाते । उत्तरायणि त्वां त्यजावे तनूते ॥

## पद १९७ वे

मग बाहे तो वीर रसाविष्कार । श्रीकृष्ण शशांकचकोर ॥
तो स्फुंदत ये पितामहाच्या जवळी । तच्चरणपंकजा कवळी ॥
वत्सा शय्या दिली तसे उपधान । दे वदला धर्मनिधान ॥
मंत्रित सोडी अश्रूसह शरतीन । दे वीरोचित उपधान ॥

(चाल) गांगेय वदे तू धन्य ।
समयज्ञता असामान्य ।
त्वत्कीर्ति हो जगन्मान्य ।

वत्सा कुसवा पृथास्नुषेचा थोर । श्रीकृष्ण०

(साकी) परिखा करवुनि सेवक ठेउनि रक्षणार्थ पद नमुनी ।
स्वस्थाना गेले नृप तैसे ज्ञानकेलिसदन मुनी ॥ ऐका ०

---

टीप– "अर्जुनाच्या बाणांनी विद्ध होऊन भीष्माचार्य रथाखाली पडले. सर्वत्र हाहाकार झाला. अंगात बाण रुतुन उभे असल्यामुळे भीष्मांचे शरीर भूतलाला शिवले नाही. ते बाणशय्येवर अधांतरी राहिले. तो दिवस दक्षिणायनांत येत असल्यामुळे त्यांनी प्राण मात्र सोडले नाहीत. गंगेने महर्षीना हंसरूपाने भीष्मासन्निध पाठविले. आपापली सैन्ये आवरून कौरव पांडव भीष्मांच्या भोवती जमले. भीष्मांनी त्यांचे स्वागत करून वीरशय्येला शोभेशी उशी मागितली. अर्जुनाने ती दिली.'

(साकी) तो पानीयं ऐसे वदला नृपवरास पाहून ।
आणविती भक्ष्ये शीतल जल कलश शीघ्र वाहून ॥ ऐका ०




भीष्मांची तृषाशांति

(घनाक्षरी) तुझे बीभत्सो बाण । विकल करिती मत्प्राण ।
नसे दुजे तनुत्राण । सलिल सेवनाविणा ।।

## पद १९८ वे

तो अस्ताचल गमनोत्कंठित कुरुकुलरवि पाहुनी ।
नीर ये वैकर्तनलोचनी ।।
फेनिल जल बुद्‌बुदापरी हे वाटे त्या जीवन ।
करी तो दुःखे आक्रंदन ।।
पुण्याचे हेच काय मिळते अंती दारुण फळ ।
शुचिता कां सारी निष्फळ ।।

गमती पुष्पे शरव्रात कां घोर मर्मकृंतक ।
वेदना काय तालवृन्तक ॥

(चाल) तो धर्मध्वज यापरी जरी फाल्गुन ।
संप्रेरी त्याते जरी नंदनंदन ।
दे अनुमोदन त्या कसे धर्मनंदन ।
धर्मात्मेही स्वार्थे होती नृशंस कैसे मनी ।

---

टीप– "दुसरे दिवशी सकाळी कौरव, पांडव व सर्व राजे युद्धाचा साज उतरवून भीष्मांच्या दर्शनाला गेले. भीष्मांच्या सर्वांगास वेदना होत होत्या. तोंड कोरडे झाले होते. त्यांनी पाणी असे शब्द उच्चारिले तेव्हा सर्वांनी उत्तम प्रकारची भक्ष्ये व शीतल जलकुंभ आणले. त्यांनी ते नाकारले व अर्जुनाला हाक मारली. त्याने रथावर चढून व बाणावर पर्जन्यास्त्राचा प्रयोग करून तो धरणीवर सोडला. तेव्हा निर्मल जलाची धार उसळून ती भीष्मांच्या मुखांत पडली व त्यांची तृषा शांत झाली. सर्व राजे निघून गेल्यावर कर्ण भीष्मांच्या दर्शनार्थ आला. त्याला त्यांची अवस्था पाहून दुःख झालें.'

(साकी) नेत्रे उघडुनि रक्षक दवडुनि एकांती हनु धरुनी ।
वदे जान्हवीतनय तयाते कर कंठी घालूनी ॥

(घनाक्षरी) जगी एक तू वदान्य । कोण तुलनेसि वदान्य ।
जरासंध धीरमान्य । तो जघन्य तुजपुढे ।

(साकी) जगदीशाच्या इच्छेपुढती कर्णा तू तो अल्प ।
भार्गव मदखंडना मलाही प्राप्त होय शरतल्प ॥
कर्ण म्हणे सत्य तुझे भाषण भरतनायका सारे ।
तुज अमृताब्धिपुढे मिरवावे मी कां यशकासारे ॥

---

## पद १९९ वे

मत्सरेंधने पितामहा मी सद्‌वृत्ती जाळिली ।
धर्ममर्यादा हि न पाळिली ॥
केले निजकुल सती विडम्बन जे पाहुनि कोपला ।
विनाशा जगदीश्वर पातला ॥

तदृक्प्रेरित धनजयी मी अघवन हे जाळिन ।
करिन वैकुंठ पदारोहण ॥
दिसे मार्ग मज दुजा न याविण जी गंगानंदना ।
वरिले यास्तव या नाशना ॥

(चाल) द्या वरदा वर मज महाप्रयाणास्तव ।
ही मुक्तिरीति क्षत्रिया काय अभिनव ।
आलो पदकंजी शरण आज यास्तव ।
गत सद्वृते आजवरी मी नीतिरीति सोडिली । धर्ममर्यादा ०

(घनाक्षरी) थांब पाहू दे वदन । ज्या न म्हणसि कधी वद न ।
ऐकताच धैर्यसदन । करी रुदन कर्ण हे ॥

---

टीप – "कर्णाला एकटा पाहून भीष्मांनी त्याला उपदेश केला, पांडवांचे वैर सोडून त्यांच्याशी सख्य करण्यासाठी सुचविले. परंतु कर्ण म्हणाला, आता ते शक्य नाही."

# द्रोणपर्व

## पद २०० वे

(साकी) अंधसुताते वदे तेधवा समरधुरंधर कर्ण ।
अभिषेकी कोणी सेनापति या सेनेचा तूर्ण ॥
कर्णधारावाचुनि होना । नौका तेवि जाण सेना ॥

(लावणी) तेजोभास्कर माध्यान्हीचा ज्यासी तुळिता उणा ।
उपमा न जयाच्या गुणगणा ॥
राजन्यान्तक भृगु रामाचा शिष्य अपर राम हा ।
नतजना सदैव अभिराम हा ॥
आचार्यांचे शिष्यभूत या जमलेले क्षत्रिय ।
तयांच्या नेतृपदी तुज जय ॥
रुक्मरथा या उग्रधनू घेऊनि करी पाहता ।
पार्थमुखवर्ण होय लोपता ॥

(चाल) तो गांगेयाच्या कपट-पात-पातका ।
आठवील या द्रोणाते भिडता न का ।
शस्त्रपूत होउनि स्वर्गी जाइल निका ।
करिल आपुल्या धनुप्रभावे कंपित गांडिवगुणा । उपमा न०

---

टीप – " दहा दिवसपर्यंत कौरव सेनेचे आधिपत्य करून भीष्मांनी धारातीर्थी देह ठेवला. तेव्हा दुर्योधनाने दुसरा सेनापति कुणाला करावा म्हणून कर्णाचा सल्ला घेतला. तेव्हा कर्णाने वर्णतः श्रेष्ठत्व, उत्तम कुलांत जन्म, विद्या, वय, तपस्या, या सर्वांचा विचार करून गुरु द्रोणाचार्यांचे नांव सुचविले. दुर्योधनाने त्यानुसार द्रोणाचार्यांना सेनापतिपदाचा यथाविधि अभिषेक केला."

(साकी) नमुनि म्हणे दुर्योधन धरूनी धर्म मजकडे आणा ।
गुरुजी कोटिवरस्थानी हा वर अभीष्ट मज जाणा ।
वदे तै द्रोण धन्य धन्य । जगी या धर्मराज नान्य ।
वदिता धर्म नसे जय आम्हा परम उग्र अंतकसे ।

भीमार्जुन आम्हा सकळांचा करितिल ना अंत कसे ।
कोपता कृष्णद्वय जगती । दग्ध ते करितिल वीर तती ।
वृद्ध ब्राह्मण तरुण क्षत्रिय तो मला न आटेल ।
नदीज भार्गव समर स्मरता वचन सत्य वाटेल ।
नसता कपिप्रवर केतू । नृपा तव सिद्ध होय हेतू ।
परहित गुरु म्हणुनी मंत्राचा करी मूढ बोभाट ।
श्रुतप्रतिज्ञा स्थैर्यासाठी होय राय तो भाट ।
ऐका भारत रणवार्ता । जी तोषद भवदावार्ता ॥

(दिंडी) चारवाक्ये ते द्रोणप्रतिज्ञात । तूर्ण पांडव कटकांत होय ज्ञात ।
ऐकता चित्ती होय भीत धर्म । गमे पार्थ तया एकमात्र वर्म ।

(श्लोक) राया पुत्रा न देता मज हनु धरूनी देत सर्वास्त्र विद्या ।
माझ्यासाठी जयाच्या विलसत वदनी सर्वदा शब्द द्या द्या ॥
वत्सा पार्था जगी या करिन तुजसि मी सर्व वीराग्रगण्य ।
बोले ऐसे वधू मी गुरुवर समरी केवि योधाग्रगण्य ॥

---

टीप – "मी तुझा कोणता मनोरथ पूर्ण करू असे द्रोणाचार्यांनी दुर्योधनास विचारले. तेव्हा धर्माला जिवंत धरून आणावा अशी इच्छा त्याने प्रगट केली. त्याला आणून पुन्हा द्यूतांत जिकावे म्हणजे सर्व पांडव त्याला अनुसरून पुन्हा वनात जातील व आपला विजय होईल हा त्या मागणीच्या मागे दुर्योधनाचा हेतु होता. द्रोणाचार्यांनी तो ओळखला. अर्जुनाला युद्धापासून दूर नेल्यासच ही गोष्ट शक्य आहे अशी अट त्यांनी घातली. तरी दुर्योधन ही गोष्ट सर्वांस सांगत सुटला. पांडवसैन्यातही ही वार्ता पोचली. अर्जुनाने प्रतिज्ञा केली की, द्रोणाचार्यांचा मी वध करणार नाही, पण धर्माचा त्यागही करणार नाही."

(साकी) पाहो न शके अत्युग्रत्वे श्वेतवाह वीरा या ।
रक्तसिंधु सोमक पांचाळा वधुनि वाहवी राया ।

(श्लोक) धावे त्या गुरुला निजास्त्रविभवे सौभद्र वारावया ।
त्याते पौरवराज शीघ्रगतिने ये तै निवारावया ॥
त्याचे कार्मुक खंडुनी निजशरे तो सारथ्याते वधी ।
घे हाती विकराल खड्ग करूनी तन्मारणा सिद्धधी ॥

(साकी) सैंधवशस्त्रे खड्गे खंडुनि तै सरोजनाभाचा ।
मोही वीरा हरसा स्मरसा अप्सरोजनाभाचा ॥

(दिंडी) तया सारूनि सौभद्र बाळ दूर ।
गदा घेउनि करी भीम ये समोर ।
करी मूर्च्छित निज मातुला गदेने ।
रन्तिकृतवर्मा तया पळवुनी ने ।

(साकी) स्वबळक्षय पाहुनि करि गुरु क्षत्रियांत भार्गवसा ।
वीरासि म्हणे स्वर्गी जा शर दावितील मार्गवसा ।
ऐका भारतरणवार्ता । जी तोषद भवदावार्ता ॥

टीप – " उभय बाजूची व्यूहरचना झाली व घनघोर युद्धास प्रारंभ झाला. द्रोणाचार्यांनी आपल्या पराक्रमाने पांडव व सृंजयांनाही 'त्राहि भगवन्' करून सोडले. द्रोणांचे निवारण करण्यासाठी अभिमन्यू धावला. तेव्हा पौरव राजाने अभिमन्यूवर चढाई केली. त्याने पौरवाला रथाखाली ओढून फरफटत ओढून नेले. ते पाहून जयद्रथाने अभिमन्यूवर चाल केली. दुसऱ्या बाजूने शल्याने त्याच्यावर बाणवृष्टि करण्यास प्रारभ केला. ते पाहून भीमाने अभिमन्यूस बाजूस सारून शल्याशी लढण्यास प्रारंभ केला."

## पद २०१ वे

(लावणी) सिंधुज गरळ घटाधिक कटुशर द्रोणाचे लागता ।
कुंडलमंडित खंडित मस्तक चय झाला तत्त्वता ॥
पक्षिपपक्ष पवन संक्षोभित सागरसो ती चमू ॥
वदे द्रोण मार्गणे होउनी पवित्र स्वर्गी रमू ॥
हासत हासत भीमादि गजा शरभवनी कोंडुनी ।
युधिष्ठिराच्या रक्षक शिरतति लीलेने खंडुनी ॥
सावध सावध वत्सा ऐसे धर्मा हाकारुनी ।
खंडुनि धनु हय विरथ करी तद्रथ सारथि मारुनी ॥
(चाल) तै पळे सोडुनी समर धर्मनंदन ।
चालवी तया पाठी द्विज निजस्यंदन ।
भयभीत वीर ते करिति आक्रंदन ।
तो आक्रंदन ध्वनी धनंजय झाला आकर्णिता । कुंडलमंडित ०
(साकी) भग्नार्त भटोच्चध्वनि परिसुनि हूं हाक म्हणे पार्थ ।
संप्रेरी द्रोणानीकी तै रथ तो उपनिषदार्थ ॥

(घनाक्षरी) भुटति बाणावरि बाण । वीर होति गतप्राण ।
पलायनाविण त्राण । कुणा ना दिसे दुजे ॥
पुत्रमित्र हिती दक्ष । भजे पश्चिम दिक्कक्ष ।
सूर्य पांडवी विपक्ष । होय रक्षिण्या अम्हा ॥

टीप— "पांडवांनी कौरवसेनेची दाणादाण उडविली. मोठमोठे महारथीही पळू लागले. क्रुद्ध झालेल्या द्रोणांनी त्यांना हाकारून युधिष्ठिरावर चढाई केली. त्यांच्या संरक्षणाकरिता मध्ये आलेल्या सर्वांची शिरकमले छेदून टाकली. 'धर्मराज मेला' अशी पांडव सैन्यांत आरोळी उठली. ती ऐकून अर्जुन धर्मरक्षणार्थ धावून आला."

(दिंडी) तदा बोले भूपाळ त्रिगर्तांचा । रणी आव्हानू पुत्र महेन्द्राचा ॥
पूर्ववैरी आमुचा सव्यसाची । आस चित्ती आमुच्या तद्वधाची ॥

## पद २०२ वे

(लावणी) प्रलयंकर शंकर प्रतिभटा वधावया लागुनी ।
करी तो दृढ निश्चय निजमनी ॥
बंधुमित्रपुत्राप्तासह वन्ही प्रज्वाळुनी ।
करी संतुष्ट हव्य अर्पुनी ॥
सर्वस्वाचे दान तपस्वी विप्रांना देउनी ।
करी निजशरासने घेउनी ॥
शिखिध्वजाच्या समक्ष घेती शपथ सर्व नरमणी ।
सिद्ध होऊनि मरणमारणी ॥

(चाल) कौंतेय शौरिसह वधू रणी निश्चये ।
तत् शस्त्र ज्वलनी दग्ध होउ वा स्वये ।
परतुनी अन्यथा शिबिरा कोणी न ये ।
होता मिथ्या नरक भयानक हो आम्हालागुनी । करी तो ०

(साकी) दुसरे दिनी सुशर्मा पार्था रणयज्ञास्तव बाहे ।
पार्थ म्हणे द्या आज्ञा धर्मा शत्रु बाहती बाहे ॥

टीप – " अर्जुन साह्यास आल्यामुळे ऐनवेळी धर्मराजाला आपण धरू शकलो नाही याचे द्रोणांना वाईट वाटले. त्यांनी दुर्योधनास आपल्या म्हणण्याचा प्रत्यय आणून दिला. अर्जुनाला दूर नेल्याशिवाय धर्मराज हाती लागू शकत नाही असे ते म्हणाले. त्यांचे ते आव्हान त्रिगर्तांच्या राजाने स्वीकारले. एकतर आज पृथ्वी अर्जुनरहित होईल किंवा त्रिगर्तरहित होईल अशी त्यांनी प्रतिज्ञा केली."

## पद २०३ वे

जरि दुर्दैवे गुरुक्रोधवन्हीत । पांचाल्य हवन हा होत ।
रणचत्वरि या क्षण न रहावे राया । अपुली रक्षावी काया ।
धर्माधर्मी करू नये मन लोल । जीवन तुमचे अनमोल ।
या योगिजनध्येय शौरिचरणांची । घालितो शपथ मी साची ।
(चाल) ऐसे धर्मा विनवून ।
तत्पदी शीर्ष नमवून ।
गांडीव टणत्कारून ।
श्री पार्थ निघे देवदत्त आस्फुरित । पांचाल्य ०
(घनाक्षरी) तदा मोहनास्त्र जाल । करी वितत शत्रुकाल ।
भ्रमे परस्परां काल । होय कटकजाल ते ।
(साकी) दिव्यास्त्रे पांचाल्य दग्ध तो करी द्रोण अतितेजा ।
शलभ कसा जिंकील पौरुषे प्रलयवन्हिच्या तेजा ।

## पद २०४ वे

(लावणी) अतिहर्षित होउनी वदे तै अंधज वैकर्तना ।
गमे पुरवील द्रोण वासना ॥
चरणतरणिच्या प्रतापकिरणे या हृत्पंकज खुले ।
पहा किति शत्रुतिमिर नाशिले ॥
रुक्मरथाहुनि नदीज कर्णा पराक्रमगुणे उणा ।
वर्णु मी किति पामर गुणगणा ॥
करिल दग्ध ब्रह्मास्त्रे वाटे हा कुंतीनंदन ।
सुदर्शनसहित नंदनंदन ॥

(चाल) किर्ति पहा पळति हे वीरवर सोडुनि ।
उरले ते वरिती स्वर्ग प्राण सोडुनी ।
धैर्याची सीमा गुरु टाकी मोडूनी ।
पलायनपटू वीर अंगपा हर्षविती मन्मना । गमे०

टीप —" पंचालपुत्र सत्यजिताला धर्मराजाच्या संरक्षणासाठी ठेवून अर्जुनाने त्या संसप्तकांचे आव्हान स्वीकारले व तो समरभूमीतून दक्षिणेकडे वळला. ते पाहून दुर्योधनाचा आनंद गगनांत मावेना."

(साकी) इंद्रदत्त सुप्रतीक नामा प्रेरी गज भगदत्त ।
शुंडापादाघाते हयरथ मर्दी तो मदमत्त ॥

## पद २०५ वे

(लावणी) तुरग गुणोत्कर्षणमग्ना तै जिष्णु वदे विष्णुला ।
प्रलयघनरव का आकर्णिला ॥
महेन्द्रसख भगदत्ताचा हा अंतक भैरव करी ।
वाटते घोर गर्जना करी ॥
शरपुष्पे वाटते करावे पितृव्य पदपूजन ।
कां सदा मिळे असे भाजन ॥
शस्त्रपाणि जगदेक वीर हा नरकासुरनंदन ।
करिल अस्मत्सेनाकंदन ॥
(चाल) तै पार्थसारथी फिरवी जो स्यंदना ।
दे हाक सुशर्मा शीघ्र पृथानंदना ।
वाटे न गमन तै योग्य नंदनंदना ।
अतिथींचा या मान पाहिजे वदे प्रथम रक्षिला । प्रलयघन०
(घनाक्षरी) वदे पार्था सांभाळ । अस्मदीय वधूभाळ ।
ऐकताच नंदबाळ । भक्तपाळ हासला ॥

टीप –" इकडे पांडवांनी कुरुसेनेवर हल्ला चढविला. तेव्हा गजसैन्य घेऊन दुर्योधनाने चाल केली. त्यातही प्राग्ज्योतिषपूरचा राजा भगदत्त याने आपल्या सुप्रतीक नांवाच्या हत्तीकडून समरांगणांत कहर करून सोडला. त्याची ती गर्जना संसप्तकांशी लढत असलेल्या अर्जुनाच्या कानी पडली. त्याची मन:स्थिति द्विधा झाली."

(साकी) रक्ताचे उडता कारंजे दीप्त धनंजय झाला ।
खंडुनि धनु तनुरक्षण भंगुनि करी क्षतजार्त गजाला ॥

## पद २०६ वे

ते पाहुनिया कुंदरदन श्रीमंत । श्री राधाहृदय वसंत ॥
हृदयी घेई अस्त्र उभे राहोनी । पाठीस पार्थ घालोनी ॥
हो अस्त्राची स्पर्शताच घननीळा । आपादलम्बिनी माळा ॥
त्या कृष्ण घनावरी वीज ती झाली । परि दाहक शक्ति नुरली ॥

(चाल) तेज त्या वैष्णवास्त्राचे ।
जे दग्ध करी त्रिजगाचे ।
विष्णूंत मिळाले साचे ।
संरक्षण दे श्वेताश्वा भगवंत । श्रीराधाहृदय वसंत ॥

(साकी) वैष्णवास्त्रमंत्रित भगदत्तांकुश तुला न सोसवता ।
भिन्नपणाचा सख्या भाव कां ये तुझ्या मनी सवता ॥

(दिंडी) पार्थ आकर्णुनि देववाक्य तूर्ण । करी गंडस्थल गजाचें विदीर्ण ।
देहपंजर सोडुनी प्राण गेले । समरचत्वरि गजरत्न तें निमालें ॥

(घनाक्षरी) तदा बोले वेदार्थ । छेदि नेत्रपट्ट पार्थ ।
या नृपाच्या पातार्थ । व्यर्थ अन्य साधनें ॥

---

टीप –" श्रीकृष्णांच्या सूचनेनुसार सुशर्म्याचे आव्हान टाळून अर्जुन भगदत्तावर चाल करून आला. गजस्कंधावर बसलेल्या भगदत्ताने रथस्थ अर्जुनावर बाणवृष्टि करून त्याच्या छातीवर वैष्णवास्त्राचा प्रयोग करून अंकुश फेकला. श्रीकृष्णांनी अर्जुनास पाठीशी घालून तो आपल्या छातीवर झेलला. अर्जुनाला ते रुचले नाही. श्रीकृष्णांनी वैष्णवास्त्राची पूर्वकथा सांगून भगदत्ताला मारण्याचा उपाय सांगितला."

## पद २०७ वे

नेत्रबंध छेदिता अंध तो प्राग्ज्योतिष पाहुनी ।
पार्थी करुणा उपजे मनी ॥
गदारिधरनंदकांबुजधरा वदे सख्या श्रीहरी ।
न या भगदत्ता मी संहरी ॥
महेन्द्रसख हा पितृव्य बंदी करितो जी सत्वर ।
वधाया कंपित होतो कर ।
या अंधा वधुनिया कोणता कीर्तिलाभ होइल ।
असतें यश केवळ जाइल ॥
(चाल) अंजली जोडुनी करितो जी याचना ।
पुरवावी इतुकी मदीय मनकामना ।
परि रुचे न ते करविधृतपार्थहयगुणा
हीच काय गीता कळली तुज वदे पृथानंदना ।
(साकी) वृषकाचळ शालक तुमचे मग फार तापले रागे ।
एकेचि शरे वधिले मूषक जेवि वधावे नागे ॥
(दिंडी) बंधुशोके श्वेताश्व संहराया । अमित निर्मी तो कैतवाक्ष माया ।
तदा बोले हासोनि सव्यसाची । ही न अक्षसभा समरभूमि साची ॥
(घनाक्षरी) पार्थ पन्नगा सुपर्ण । भटा वाटे तै कर्ण ।
भये हेति हति विदीर्ण । वपू 'कर्ण' जल्पती ॥

---

टीप – "प्राग्ज्योतिषाधिपतीला अर्जुनाने त्याच्या हत्तीसहित ठार केलेले पाहून गांधार राजपुत्र वृषक व अचल यांनी अर्जुनावर दोन बाजूनी चाल केली. पण ते एका बाणाने दोघेही यमसदनास गेले. तेव्हा शकुनीने आपली माया कृष्णार्जुनास मोहित करण्यासाठी सोडली."

## पद २०८ वे

ऐकताच आक्रंदन ते । ये तरणितनय वेगाने ।
प्रतिघात करी अस्त्रांचा । पार्थाच्या आग्नेयाने ।
आव्हान तया द्वंद्वाचे । दे अभिमानी रोषाने ।

(चाल) दुर्बळा मारुनी काय ।
येथे विंधी मत्काय ।
मी दग्ध करिन तव काय ।
दर्प त्या तुझ्या अस्त्राचा । हा रामशिष्य विलया ने ॥ १ ॥
दे उत्तर या बोलाचे । श्वोताश्व शरांनी राया ।
बंधुत्रय वधुनी त्याचे । अति विद्ध करीं तत्काया ।
लागले सावळे ब्रह्म । तत्कत्थनास हासाया ।
(चाल) निजपुत्र पराजय बघुनी ।
लज्जारक्तिम होवोनी ।
अवनीते अभिशापूनी ।
अस्ताचल भागी सूर्य । वळवी स्यंदन वेगाने ।
(साकी) सगळी तिकडेचि असें तुमची इकडे कृपा न लेश ।
अन्यथा तरी कां मरता तो शक्रसख कृपालेश ।

## पद २०९ वे

प्रलयंकर शंकरनेत्रज वन्हीसम गुरु दारुण ।
करी अस्मत्सेनादारण ॥
सुदुर्भेद्य भंगुनी व्यूह आचार्या वारावया ।
संकटी पृतना तारावया ।
श्वेतवाह तू, वा त्वन्मातुल जगत्सूत्रचालक ।
शक्त तत्सुत वा रतिनायक ॥
अस्मत्कुल कमलिनी बालभास्करा व्यूहतम हरी ।
पडत्या यशोध्वजा सावरी ॥
(चाल) कळता सशौरि विजया अस्मत्भंग हा ।
उपहासा सारे भाजन होऊ पहा ।
मरणाधिक वीरा दुःसह उपहास हा ।
केवळ तूं हे व्यूह पुरस्थित कटकजाळ संहरी । पडत्या०

टीप – "अर्जुनाच्या अतिपराक्रमाने कुरुसैन्य 'कर्णा, कर्णा, आम्हांला वाचव' असा आक्रोश करू लागले. तेव्हा कर्ण अर्जुनावर तुटून पडला. अर्जुनाने त्याचे तीन भाऊ यमसदनास पाठवून त्याचाही पराभव केला. दुर्योधनाने ह्या अपयशाचे खापर आचार्य द्रोणांच्या माथी फोडले."

(साकी) ताते कथिला मज दुर्भेद्य व्यूह भेदनोपाय ।
यश देतिल चिंतामणिसम हे पुण्यशील तव पाय ॥

## पद २१० वे

(लावणी) शरभपोत संहरी कसा केसरी संघजीवनी ।
पाहु द्या हे द्रोणा लोचनी ॥
संक्षुब्धोदधि जला आटवी वडवानल सान ही ।
कळू द्या आचार्या मातही ॥
सान चरणपंकजी कसे वामनी विश्व जिंकिले ।
बळी ते पाताळी घातले ॥
सान षडानन करी केवि तारकासुराचा वध ।
कळुनि हे हो तो गुरु सावध ॥

(चाल) वरितील पलायन षड्रथ रण सोडुनी ।
पाडीन महारथ शिरकमले तोडुनी ।
कर्णादि दर्प नग टाकिन मी खंडुनी ।
अभिनव वीर रसाविष्कारा पाहो जग लोचनी ।

(साकी) मन्मातुल जगदीश धरुनि हनु ज्याते वाखाणील ।
पिता धनंजय ऐकुनि जैं आनंदाश्रू ढाळील ।
असे मी दाविन तेज रणी । म्हणतिल लोक अपरतरणी ॥

(घनाक्षरी) जराजर्जर तो द्रोण । शापदग्ध वीर्य कर्ण ।
रणी मी पळविन तूर्ण । तनुत्राण भंगुनी ।

(साकी) व्यूही गमे सुभद्रानंदन गजयूथी बाल हरी ।
त्यावरि आदळल्या सेना मंथाद्रिवरी की लहरी ॥
ऐका भारत रणवार्ता । की तोषद भवदावार्ता ॥

टीप —"एका महारथ्याच्या वधाची प्रतिज्ञा करून गुरु द्रोणांनी चक्रव्यूहाची रचना केली. अर्जुन पुन्हा संशप्तकांचे आव्हान स्वीकारून दक्षिणेकडे गेला होता. व्यूह अति दुर्भेद्य होता. अभिमन्यूला फक्त त्याचा भेद करून आत प्रवेश कसा करावा हे अर्जुनाने शिकविले होते."

(साकी) कुंडलमंडित लक्ष्मणमस्तक भल्लाघातें तोडी।
नृप दुर्योधन नेत्राश्रूसह रणभूमीवरी पाडी।

## पद २११ वे

तदा राधेय वदे द्रोणा। वंदितो रायासह चरणा।
शराहत सौभद्रे केले। अमित भट स्वर्गा अनुसरले।
सैन्य हे भयकंपित झाले। महारथ रण टाकुनि गेले।
उरले सोडितील प्राणा। वंदितो०
तुम्ही सेनाधिप असतांना। होइल क्षणे भंग पृतना।
धर्माधर्म मनी नाणा। कसे निवटावे सांगा ना।
मुहूर्ते सर्व त्यजू प्राणा। वंदितो०

## पद २१२ वे

प्राणभये त्यजुनी धर्म। त्या विरथ विशस्त्रा राया।
सजले क्षात्र कुलांगार। बाळासि रणी माराया।
करिती शरवृष्टी घोर। सुकुमार तनू दाराया।
तैं गगनग देवर्षीही। शोकाकुल झाले राया।
(चाल) परि उठे सिंहसा वीर।
तो तुच्छीकृत कुरुवीर।
घे खड्ग रणी रणधीर।
त्या षड्रथारीवरी झेप। वैनतेयसा माराया॥

टीप – "अभिमन्यू चक्रव्यूह फोडून आत शिरला. आणि थोड्याच वेळात त्याने शत्रुसैन्याची वाताहत केली. त्याचा पराक्रम पाहून प्रतापी द्रोणांना अतिशय हर्ष झाला. दुर्योधनादिकांना आपली धडगत नाही असे वाटू लागले. तेव्हा अभि-

मन्यूचे साहाय्यकांपासून त्याला दूर करण्याकरिता सिंधुपति जयद्रथ मध्ये आडवा झाला. त्याने पांडवांना अडवून धरले आणि एकट्या अभिमन्यूवर मोठमोठ्या महारथ्यांनी चोहोकडून हल्ला केला. तो सगळ्यांना पुरून उरला. पण त्याने दुर्योधनाचा मुलगा लक्ष्मण याला जेव्हा मारले, तेव्हा धर्माधर्माचा विचार न करता त्या एकाकी वीराला विरथ विशस्त्र अवस्थेत चहूकडून वेढून टाकले."

## पद २१३ वे

रथचक्र करी घेउनि तो संहारी । वाटला सुदर्शनधारी ॥
त्या चक्राचा करिति महारथ भंग । परि त्याचे धैर्य अभंग ॥
घेउन ी गदा वळे द्रौणिवरि तूर्ण । सौभद्र करी रथ चूर्ण ॥
दौःशासनि तै गदा घेउनी यावे । सौभद्र सिंहसा धावे ॥

(चाल) समर तै जाहले घोर ।
वाहवूनि शोणित पूर ।
पडले ते मूर्च्छित वीर ।
परि पार्थसुता मूर्च्छा झाली वैरी । वाटला ०

(साकी) प्रेक्षक सुर मुनि सज्जन बहु हळहळले नरसुत पाते ।
रडला बहु पाहुनि वीणाकर ब्रह्मपुत्र सुतपाते ।

## पद २१४ वे

स्वये दिला काळाच्या वदनी श्वेतवाहनंदन ।
करविले समरी तत्कंदन ॥
या भावे वाताहत कदलीकंपित यमनंदन ।
करी करुणामय आक्रंदन ॥
तो द्वैपायन कृपासिंधु ये सत्यवती नंदन ।
करी तत्शोक कंदकंदन ॥

(चाल) मरुनिही अमर जाहला वीर वत्स हा ।
तद्यशोध्वजा स्वर्गात फडकली पहा ।
उभविले कीर्तिमंदिर वत्साने महा ।
याचे वीणेवरी सुरमुनी करिल यशःकीर्तन । करविले ०

टीप – " ढाल खड्गही मोडले तेव्हा अभिमन्यूने रथाचे चाकच हातात घेतले. तेही मोडले तेव्हा गदेने तो एकाच वेळी सर्वांशी लढू लागला. दुःशासनाचा मुलगा व अभिमन्यू दोघेही लढता लढता मूच्छित झाले. प्रथम दौःशासनि सावरला. त्याने मूच्छित अभिमन्यूच्या मस्तकावर तीव्र गदाप्रहार करून त्याला ठार केले. अभिमन्यूच्या मृत्यूने सारेच हळहळले. धर्मराजाला तर ब्रह्मांडच आठवले."

(घनाक्षर) वामभुज नेत्रस्फुरण । होतं कां लक्ष्मीरमण ।
काय आचार्य द्रोण । रणी अग्रजा वधी ॥

## पद २१५ वे

नष्टमोह झाल्याचे सांगुनि भगवंता आपण ।
करी कौंतेय शोक दारुण ॥
दुस्तर माया मोह पाश भंगू न शके कोणिही ।
सुचवी शोक काय मात ही ॥
ऐकियले की आचार्यें चक्रव्यूहा निर्मिले ।
बाळ कां तद्भंगा धाडिले ॥
मी मूढे तद्भंग कथुनि निर्गमन न उपदेशिले ।
बाळ ते काळमुखी घातले ॥
रणांत असता तात तरी येती न घोर आपदा ।
असे वाटले तया कां तदा ॥

(चाल) परि वीरशिरोरत्न तो सुभद्रासुत ।
कातरता न शिरे तन्मनांत निश्चित ।
करिल तो घोर रणकर्म क्षत्रियोचित ।
अपर जनार्दन आव्हानिल तो हरा कराया रणा । करी कौन्तेय०

---

टीप – " संशप्तकांचा पाडाव करून समरांगणाकडे येणाऱ्या अर्जुनाला अपशकुन होऊ लागले. त्याला धर्मराजाचा द्रोणाचार्यांनी वध तर केला नसेल ना असे वाटले, किंवा चक्रव्यूहाचा भेद करायला अभिमन्यूला तर पाठविले नसेल ना अशी त्याला शंका आली."

## पद २१६ वे

आज वाद्यांचा । मंगलमय मधुर । ऐकू ये न कसा गजर ।
न वीणालाप । शंखतूर्यनाद । न वा रणदुंदुभि सन्नाद ।
न मंगल गीते । बंदीजन गाती । न मज सामोरे कुणि येती ।
अधोमुख होती । मज पाहूनि वीर । दिसे तन्नेत्रयुगी नीर ।
न हो जीवंत । चित्रे दुःखाची । वाटते उभारिली साची ।
सख्या श्रीकृष्णा । असेल हे काय । थरथरे जो माझे हृदय ।
(घनाक्षरी) कुठे माझा वेल्हाळ । असे अभिमन्यू बाळ ।
तयाचा मी संभाळ । दिला आपुल्या करी ।
ऐकताच पार्थवचन । होति वीर अधोवदन ।
धर्मराज धर्मसदन । साश्रुनयन होतसे ।

## पद २१७ वे

तो धनुष्य टंकारीत । कुरुपृतना नाथ विदारी ।
व्यूहांत शिरे लीलेने । गजयूथी की बालहरी ।
आदळला सेनासंघा । कालाग्निपरी संहारी ।
(चाल) धावलो तत्सहायार्थ ।
ये सिंधुप निवारणार्थ ।
चाले न अणू पुरुषार्थ ।
भीमादि शौर्यसिंहा तो । वाटला शरभसा भारी ।
मग तो क्षात्र कुलांगार । सोडूनि धर्मपथ नीति ।
एकाकी विरथ विसंज्ञा । कैतवे भ्याडसे वधिती ।
तो वीररसाविष्कार । यापरी पावला सुगती ।
(चाल) पडता ही वाक्तति कानी ।
हा वत्स असे बोलोनि ।
पडला मूर्च्छित होवोनी ।
श्रीहरी त्वरे धावूनी । तत् शीर्ष निजांकी घेती ।

---

टीप – "अभिमन्यूच्या मृत्यूची वार्ता समजली तेव्हा अर्जुनाने खूप विलाप केला. धर्मराजांनी त्याच्या पराक्रमाचे वर्णन अर्जुनाला ऐकविले."

## पद २१८ वे

हे नारायण आण वाहतो कर ठेउनि चरणी ।
वधिन जयद्रथ उद्या न अस्तंगत होता तरणी ॥
जाय भीरु तो समर सोडुनी मज मानुनि काळ ।
शरणागतवत्सल त्वच्चरणी वा ठेवी भाळ ॥
शांतिसदन वा युधिष्ठिराला शरणागत होय ।
अथवा पांडवदास म्हणे हा म्हणेल मत्काय ॥
(चाल) वाचेल असे तो करिता सिंधुपसुत ।
नातरी मदस्त्राग्नीत होय तो हुत ।
मारीन तया याविना रणी निश्चित ।
मदांधषड्रथदर्पविभंजन करिन घोर मार्गणी ।
(साकी) नरप्रतिज्ञा करिता नारायणे शंख आस्फुरिला ।
प्रलयजलद नादा लाजवुनी विश्वगोळ गर्जविला ॥

## पद २१९ वे

चारमुखे तै पार्थ प्रतिज्ञारव जो आकर्णिला । थरथरा सिंधुराज कापला
विपुल शोकसागरी दिसेना तया एकही तरी ।
जाहला तो व्याकुळ अंतरी ॥
त्वरित जाय नृपसभेत दुःखी करित पर्यदेवना ।
गमे त्या अंतरलो जीवना ॥
वदे पांडुच्या क्षेत्री कामी शक्रे जो निर्मिला ।
कुमतिपंके खल जो माखला ॥
कल्पांताग्नीपरी पेटुनी सर्वांते सोडुनी । सजला मज्जीवितनाशनी ॥
(चाल) हे पुरे जाहले वाटे मज संगर ।
कल्याण करो सर्वांचे परमेश्वर ।
जातो मी सदनी रण सोडुनि सत्वर ॥
कल्याणप्रद येतील क्षण जीव जरी वाचला । थरथरा ०
(दिंडी) सवे राजा घेऊनि सैंधवाला । नमी सुरतरु गुरुचरणपंकजाला ।
वृत्त कथुनी द्या म्हणे अभयदान । आपणाविण दीनास या गती न ॥

(साकी) किती प्रकाशित झाला तरि कां होय शशांक गभस्ति।
अमित पराक्रम पारावारा माझा पार्थ अगस्ती ॥

टीप– " उद्या सूर्यास्ताच्या आंत जयद्रथाचा वध करीन आणि तो न झाल्यास अग्नीला देह समर्पण करीन ' अशा दोन प्रतिज्ञा पुत्रशोकावेगात अर्जुनाने केल्या. ही प्रतिज्ञा ऐकून जयद्रथ भयभीत होऊन अस्वस्थ झाला."

## पद २२० वे

वदे सिद्धसंसेवित चरणारविंद तो पार्था ।
कठिण गमे तव घोर प्रतिज्ञा होणे अनपार्था ॥
मला कां न तू विचारिता अवलंबिलेस कार्य ।
अविवेके अतिभार असा घेतील काय आर्य ॥
ऐकियले चारमुखे त्या दे संरक्षण द्रोण ।
धनुर्वेदसागरा तया संतीर्ण होय कोण ॥
शकट व्यूहांतर्गत पद्‌मव्यूह कर्णिकेत ।
सिंधुराज राहील असा द्रोणांचा संकेत ॥

(चाल) उपहास न व्हावा सख्या जगी आपुला ।
होवो न प्रतिज्ञा तुझी घोर निष्फला ।
अकलंकित राहो यशोध्वजा निर्मला ।
यास्तव सर्वांसह गांभीर्यें करू मंत्र पार्था । कठिण गमे ०

(साकी) कृष्णा असोत मदधिक बळ ते कर्णादि रथ कवी न ।
कोदंडवेद पंडित मी त्या हरुनी सार थकवीन ॥

टीप– "विलाप करणाऱ्या जयद्रथाला गुरुद्रोणाचार्यांच्याकडे नेऊन दुर्योधनाने त्यास अभय मिळवून दिले. आपला पूर्वसल्ला न घेता अर्जुनाने घोर प्रतिज्ञा केली हे कृष्णास रुचले नाही. पण अर्जुनाचा स्वसामर्थ्यावरचा विश्वास अढळ होता."

(दिंडी) पार्थ बोले जाउनी सुभद्रेला । शांतवा तैसे आपुल्या सुनेला ।
न मुख दावाया मला होत धैर्य । किमपि उरले माझे न मनःस्थैर्य ॥

## पद २२१ वे

मग वनमाली लिप्तस्थंडिल शयनी । मंगलद्रव्य घालोनी ।
आयुधोत्तमा पार्थाच्या आणवुनी । विधिपूर्वक ठेवी रचुनी ।
त्र्यंबका बली द्याया पार्था प्रेरी । दे चुको न त्या कंसारी ।
परि हरपूजे करी श्रीहरी पात्र । नव्हता सावध अणुमात्र ।
(चाल) हासला मंद घननीळ ।
पार्थाच्या येउनी जवळ ।
निजवी शयनी स्नेहाळ ।
वदला सखया नीज दिसे तव नयनी । मंगलद्रव्य ०
(घनाक्षरी) आयुधे सारी सिद्ध । असो दैत्य रक्तदिग्ध ।
करी जा स्यंदन सिद्ध । स्वये युद्ध करिन मी ॥
(साकी) नाद पांचजन्याचा येता कानी तू पावकसा ।
कुरुकटका जाळीन विक्रमे स्वये तृणा पावकसा ।

टीप– " सुभद्रेचा आणि उत्तरेचा शोक दूर करायला अर्जुनाने श्रीकृष्णासच पाठविले. त्यांचे सांत्वन करून श्रीकृष्ण परतले. त्यांनी हातपाय धुऊन शुभ अशा वेदीवर दर्भाची मंगल शय्या पसरली. फुले, लाह्या व मंगलकारक सुवासिक पदार्थांनी विधिपूर्वक ती शय्या अलंकृत करून तिचे भोवती उत्तमोत्तम शस्त्रे ठेविली. अर्जुनाने स्नान केले. माधवाची प्रीतीने गंधपुष्पादिकांनी पूजा केली. उपहार व सेवकांनी तयार केलेला त्र्यंबकबली त्याला समर्पण केला. अर्जुनाला झोपायला सांगून श्रीकृष्ण स्वतःच्या शिबिरांत गेले. अर्जुनाला प्रतिज्ञेपासून वाचविण्यासाठी स्वतः युद्धाची तयारी करून श्रीकृष्णांनी दारुकाला रातोरात त्यांचा रथ व आयुधे सज्ज ठेवायला सांगितली. "

(दिंडी) शंभुचरणी लोटिला पार्थ देवे । करी स्तव तो वंदुनी भक्तिभावे ।
तदा स्तव ऐकुनी आशुतोष डोले । भक्तवात्सल्ये नेत्र होति ओले ।

(श्लोक) आणिला तरि कशास्तव पार्थ । काय शक्त न तुम्ही अवनार्थं ।
यापरीं पुसत पार्वतीपती । देत उत्तर तया रमापती ॥
(साकी) त्वत्सेवा सुरभीच्या कांसे भक्तवत्स लागावा ।
त्वत्प्रसाद सर्वांनी अनुदिन भक्तवत्सला गावा ॥
सस्मितमुख गिरिजाधव बोले पुरेल तुमचा हेत ।
चापबाण आणा जा सत्वर सुधासरी आहेत ॥

## पद २२२ वें

मग पार्थाते धरुनि करी घननीळ । ये सुधासराच्या जवळ ।
सौंदर्याचे अभिनव शोभासार । वाटले तया कासार ।
त्या शांत सरी कार्मुक वा शर काही श्वेताश्वा दिसले नाही ।
वाते सर तो कंपित झाले फार । ऐकिला घोर फूत्कार ।
(चाल) नागराज दिसती दोन ।
करिती महोग्र विष वमन ।
थरथरे पार्थ पाहून ।
दे धीर तया भक्तराज प्रतिपाळ । ये सुधासरा ०

(श्लोक) ते बाण बाणासन शंकराते । समर्पुनी वंदिति तत्पदाते ।
तो पृष्ठभागांतुनि ब्रह्मचारी । पिंगाक्ष निर्मी झणि अंधकारी ।
ते श्री शिवाचेच दुजे शरीर । ठाके उभे पंडुसुतासमोर ।
घे शीघ्र बाणासन बाण शंभू । सशैल झाली भयकंपिता भू ॥

---

टीप– अर्जुनाला झोपेत स्वप्न दिसले. श्रीकृष्णांच्या सांगण्यावरून त्याने ब्राह्ममुहूर्ती आचमन केले. ते दोघेही महामंदार पर्वतावर आशुतोष भगवान् शंकरांच्या दर्शनाला गेले. वंदनाने आणि स्तवनाने प्रसन्न करून त्यांनी भगवान् शंकरांना पाशुपतास्त्र मागितले. त्यांनी अमृतसरोवरांतून धनुष्यबाण आणण्यास सांगितले. तेथे प्रथम दोन नाग दिसले. त्यांचेच धनुष्यबाण झाले."

## पद २२३ वे

स्वर्णिम वस्त्र उषेचे पूर्वा रविप्रिया ल्याली ।
निजपतिसदनातिथिसत्कारा स्वये सिद्ध झाली ॥
सृष्टीला दे जीवन सारुनि तमा अंशुमाली ।
यास्तव दे कां तया अर्घ्य जगदीश्वर वनमाली ॥
संध्यावंदन सारुनि वंदी धर्मपदाब्जाला ।
तदा गहिवरे युधिष्ठिराचा कंठ भरुनि आला ॥
वदे पार्थ ईश्वरा करी देतो तव मत्प्राण ।
कृपाकटाक्षे तुझ्याच केवळ व्हावे तत्त्राण ॥

(चाल) गांगेय महासागरा करी शोषण ।
तो बुडो न सैंधवगोष्पदांत अर्जुन ।
तव कृपालेश हे केवळ तद्रक्षण ।
भयवाते श्रीकृष्णा कंपित हृदयलता झाली । निजपतिसदना ०

(साकी) आलिंगुनि धर्म म्हणे वत्सा अर्जुना महाबाहो ।
प्रसन्न हा श्रीकृष्ण यशस्वी तू रणांगणी बा हो ॥

(ओवी) इकडे जगद्वंद्य जगन्नाथा । तयाचे करी देऊनि पार्था ।
म्हणे तूचि माता पिता । तुज आता काय निरवावे ॥

---

टीप–"त्या नीललोहित ब्रह्मचाऱ्याने पाशुपताचा प्रयोग त्या धनुष्यबाणावर करून दाखविला. तो मंत्र व ते शरसंधान करणे वगैरे प्रयोग ग्रहण करून भगवंतास वंदन करून अर्जुन शिबिरास परतला. स्वप्न संपले. प्रभात झाली. संध्यावंदन व अग्निपूजन करून सर्व वीर सभेत आले असता अर्जुनप्रतिज्ञेला स्मरून युधिष्ठिरांनी त्याचा संभाळ श्रीकृष्णावर सोपविला. अर्जुनाला आलिंगन देऊन त्याच्या विजयाची इच्छा प्रकट केली. अर्जुनाने स्वप्नवृत्तान्त सांगितला तेव्हा सर्वांनाच आनंद झाला."

(साकी) प्रताप-रविच्या तेजे करि जो पराभूत रवितेजा ।
व्यूहमुखी टंकारी कार्मुक गुरुद्रोण अतितेजा ॥
वाटे क्षत्रांतक राम । ये व्हायास पूर्णकाम ॥

(घनाक्षरी) शिरोभूषण ज्या धवल । कवच देहावरि धवल ।
रथी अश्व योजि धवल । अलक धवल विप्र तो ॥
परी लांछन हृदयांत । कुजनरक्षणमय घेत ।
निशाकांत तेवि कांत । तो नितान्त भासला ॥

## पद २२४ वे

हे आचार्या चरण वंदितो पार्थ । व्हाया विश्वात कृतार्थ ।
पुत्राहुनिही प्रेम मजवरी आर्या । करितसा सदा गुरुवर्या ।
मज श्रीकृष्णाहुनी पूज्य हे पाय । करिती जे दूर अपाय ।
जे तातांचे प्रेम धर्मचरणांचे । मजवरी याहि पायांचे ।

(चाल) मज द्यावे आशीर्वचन ।
व्हायास सत्य मद्वचन ।
त्वत्पदी असो नितनमन ।
द्या मार्ग मला व्हाया जी अनपार्थ । व्हाया ०

(साकी) अश्वत्थामा तैसा सैंधववध पण हा राखावा ।
की मानधने मिथ्या होता अग्नि वा हिरा खावा ॥
शरपुष्पी गुरुपूजन पार्थी समरमखात घडावे ।
शिष्योत्तंसा हेच आमुचे मनःकाम पुरवावे ॥ ऐका ०

टीप—"धर्मराजाच्या संरक्षणाचा भार सात्यकीवर सोपवून सर्वच वीर युद्धभूमीवर आले. उभय बाजूंची व्यूहरचना झाली. व्यूहाच्या मागच्या भागाला जयद्रथ तर तोंडावर द्रोणाचार्य उभे होते. श्रीकृष्णांच्या अनुमतीने अर्जुनाने गुरु द्रोणांना वंदन केले आणि जयद्रथाच्या वधाची प्रतिज्ञा सिद्धीस जाण्यासाठी आशीर्वाद मागितले."

(साकी) गुरुकार्मुक खंडाया अर्जुन बाण निजगुणी जोडी ।
तोच गुरु प्रभु गांडीवाच्या गुणा खरशरे तोडी ॥

## पद २२५ वे

सिंधुज गरळ घटाधिक कटुशर निजकार्मुकि योजुनी ।
पार्थसारथी वक्ष लक्षुनी ॥
लक्ष्मीने जे हृदय कुंकुमे सदैव शृंगारिले ।
ऊर ते तीक्ष्ण शरी विंधिले ॥
रक्तांच्या धारांत हृदयमणि तेज रम्य फाकले ।
मनोरम इंद्रधनु तै खुले ॥
मर्मी मर्मी भुजंग दंशासम शर जै लागले ।
सावळे ब्रह्महि थरकापले ॥

(चाल) बोले रक्तेक्षण पार्था यदुनंदन ।
गुरुवात्सल्ये कां भरले सखया मन ।
यापरी काय होईल शत्रुकंदन ।
वात्सल्ये कां समरमखी शत्रुस कोणी जिंकिले ॥

(पद) वदे श्रीकृष्ण अर्जुनाते । वधी या विसरुनिया नाते ।
जरी हा वृष्णीचा वीर । अथवा मत्कन्या श्वशुर ।
वाहवुनि रक्ताचा पूर । घोरास्त्रे या करि ठार ।
नको विसरू निजधर्माते ॥ १ ॥
मी रणी निज मातुल वधिला चक्रे चैद्यराज चिरिला ।
बंधु तो वक्रदंत वधिला । आपपरभाव भस्म केला ।
स्थापाया सद्धर्माते ॥ २ ॥

---

टीप – "द्रोणांचे धनुष्य तोडावे असे अर्जुनाने मनात आणले तो द्रोणांनीच त्याच्या धनुष्याची दोरी तोडून सारथी श्रीकृष्णांचाही वेध घेतला. जयद्रथवधरूप पुढील अवघड कार्य लक्षात आणून श्रीकृष्णांनी द्रोणांना टाळून रथ बाजूला काढला. तो कृतवर्मा आडवा आला."

(साकी) त्या समयी पार्थ म्हणे संश्रित शुभाकरा हे वाजी ।
श्रमले श्रमशमना घडिभरि तरि रथ उभा करावा जी ॥

## पद २२६ वे

तो विरथ पाहुनी पार्थ । कुरुवीर गर्जना करिती ।
अभिमन्युपरी वेढोनी । 'हा वधा' जल्पना करिती ।
ते गंधद्विपसे वेगे । सिंहास वधाया येती ।
नरसिंह महास्त्रांनी तो । करि दग्ध शत्रुसेना ती ।
(चाल) गहिवरूनी जगदाधार ।
धन्य धन्य वदला वीर ।
तू एक जगी रणधीर ।
तुज वाखाणाया पार्था । मज नसे शब्दसंपत्ती ॥
(घनाक्षरी) नसे पार्था उदपान । अश्व इच्छिति हे स्नान ।
असे तो दयानिधान । अर्जुनास बोलिला ॥

## पद २२७ वे

गदारिदरनंदकांबुजधरा पहा दिव्य हे सर ।
निर्मितो अभिमंत्रित हा शर ॥
बोलुनि ऐसे मेदिनीस जो बाणाग्रे भेदिले ।
सरोवर रम्य दिसू लागले ॥
प्रफुल्लवर पंकजी विराजित प्रसन्न सलिलाशय ।
त्यावरी आच्छादन शरचय ॥
त्या शरभवनी भुवनवंद्यपद शिरला मग श्रीहरी ।
घेउनी पार्थ तुरंगम करी ।
(चाल) तो देवर्षी ये नारद पदवंदना ।
साष्टांग नमस्कारी त्या यदुनंदना ।
वदला गद्‌गदवच भक्तहृदयनंदना ।
या पार्थाचा प्रतापमहिमा डोलवील फणिधरा ॥

टीप – 'तुंबळ युद्ध करून श्रुतायुध, सुदक्षिण, श्रुतायु यांसारखे मोठमोठे रथी अर्जुनाने मारले. त्याच्या रथाचे घोडे खूप थकले. तृषेने व क्षुधेने व्याकुळ झाले. अर्जुन रथाखाली उतरला. तो जयाभिलाषी क्षत्रियांनी त्याच्यावर चाल केली."

(साकी) कृष्ण म्हणे कौंतेया श्रीमद् रुद्रासमोर मार।
आला पुरुषव्याघ्रा कुरुपति मूढ हा ससा मार॥

## पद २२८ वें

तो प्रलयवातसा पार्थ। कौरवेश्वरा ग्रासाया।
धावता पळाले वीर। निज जीवितधन रक्षाया।
तो वदे भर्त्सना करुनी। भूप त्या रणी वाराया।
(चाल) भ्याडसे पळुनिया काय।
अर्पावा समरी काय।
वीरास हाच सदुपाय।
क्षत्रियास धर्म हाच। कथिलासे मार्ग तराया॥

## पद २२९ वें

संपला काय या गांडीवाचा प्राण।
वा तुझे मुष्टि भुजवीर्य तो गतप्राण।
काळाचा पार्था काय उलटला फासा।
हा शशांक ठरला शक्त राहुच्या ग्रासा।
षंढा करितिल बा कटाक्षसे निष्प्राण।
ठरले या दुर्योधनावरी तव बाण।
जे वज्रस्पर्शे परशरीर दारावे।
हा खेळ जयाचा ते कां मोघ ठरावे।
(चाल) अद्वितीय अंधज पार्था जो रणी।
तृणसा जो तव भुजवीर्या ते गुणी।
दुर्दैव तुझ्या योजी या वारणी।
या विडम्बनाहुनि योग्य संपणे प्राण। संपला ०

टीप—"पाणी पिऊन ताजेतवाने झालेले घोडे अर्जुनाचा रथ जयद्रथ होता तिकडे नेऊ लागले. तो दुर्योधन मागून जाऊन अर्जुनास आडवा आला. द्रोणाचार्यांनी त्याला अभेद्य कवच दिले होते. त्यामुळे अर्जुनाने टाकलेले बाण निष्प्रभ होत. ते पाहून श्रीकृष्णांनी त्याला डिवचले आणि सिंहनादालाही मागे टाकील असा पांचजन्याचा ध्वनि केला."

## पद २३० वें

ऐकियला का प्रलयभयंकर पांचजन्य नाद हा ।
करी मन्मन हा कंपित पहा ॥
अभिमाने वाटते घेउनी स्वये चक्र श्रीहरी ।
समरीं शत्रुसैन्य संहरी ॥
उषादर्शनापासुनि लढता एकाकी अर्जुन ।
वाटते हरला जीवितधन ॥
मजसाठी हा अमित सात्यके भोगुनिया यातना ।
विटला काय पार्थ जीवना ॥
(चाल) वाटते मला पार्थाची चिंता मनी ।
ऐकता कंबुचा घननोळाच्या ध्वनी ।
प्रत्यक्ष पहा माधवा स्वयें जाउनी ।
माझी चिंता नको जाउनी नेत्री अर्जुन पहा । करी०
(घनाक्षरी) सिद्ध जिथे रक्षणास । कुंदरदन मंदहास ।
तिथे केवि पदन्यास । करि विनाश देवता ॥
(साकी) सांगावे धनपतिने निधिचे रक्षण जैसे यक्षा ।
कथिले तैसेचि तुझे पार्थे रक्षण मज रणदक्षा ॥
(दिंडी) न जाता तू देईन निजप्राण । करी मग रक्षण कलेवरा जाण ।
असे दुःखे बोलता धर्मराय । निघे यदुपति तै वंदुनिया पाय ।

---

टीप – " पांचजन्याचा ध्वनि ऐकून एकाकी अर्जुनाच्या पारिपत्याच्या कल्पनेनें शंकाकुल झालेल्या धर्मराजांनी अर्जुनाच्या साह्यासाठी सात्यकीला पाठविले. "

(साकी) हे पार्थसख्या प्रिय शिष्य तुझा पातला पहाथाते ।
या कुरुबळ वेगाते तू क्षम की हाचि सहायाते ॥
(घनाक्षरी) क्रुद्ध नाराची कंदन । करिति चावुनि ते रदन ।
दोन अर्णव खवळून । करिति गर्जना जणू ।
विरथ झाले जरि वीर । रण न टाकिति रणधीर ।
करी घेउनि तरवार । घोर दारिती वपू ॥
जणू गंधद्विप दोन । खवळविति ते रणविपिन ।
कालिकेचे वा दोन । शोण कालनयन ते ।

युद्ध पाहुनि ते घोर। वदे गोपीहृच्चोर।
सख्या वाटे रणधीर। वृष्णिवीर भागला ॥
(साकी) पाहे खड्गे सात्यकिमस्तक खंडाया तो सुकवी ।
कुलाल चक्रापरि शिर भ्रमवो खड्गपात तो चुकवी ॥

## पद २३१ वे

ते पाहुनिया कुंदरदन श्रीमंत। कळवळे मनो श्रीकांत ॥
संपला सख्या वृष्णीचा हा वीर। सिंहास शश करी ठार ॥
भोज द्रोणा करी पार लीलेने। त्या सौमदत्ति विलयाने ॥
या श्रांत रणी पाहुनि शत्रू वधिती। ही काय धर्म रणनीति ॥
(चाल) चढवी शर नव गांडीवा।
हा शिष्य तुझा वाचावा। न शशे हा सिंह वधावा ।
दक्षिण भुज दे उडवुनिया गगनांत। कळवळे ॥ ०

टीप—" मध्ये आलेला कौरव सेनासागर आपल्या पराक्रमाने पार करून सात्यकी अर्जुनाजवळ येऊन पोहोचला. पण तो थकला होता. तशातच भूरिश्रवा त्याच्यावर चाल करून आला. घोर युद्धानंतर भूरिश्रव्याने सात्यकीस उचलून आपटले, त्याच्या छातीवर लाथा मारल्या आणि तरवारीने तो त्याचे मस्तक तोडणार, तोच श्रीकृष्णांच्या सूचनेनुसार अर्जुनाने बाण मारून भूरिश्रव्याचा तो हातच छेदून टाकला."

## पद २३२ वे

जन्मुनी चंद्रवंशांत। तू अग्रगण्य नीचांत। अर्जुना।
अग्रजा वंदुनी धर्मा। कां सांगशील या धर्मा। वर्णनी ।
देवेन्द्र रुद्र वा द्रोण। शिकवी ही विद्या कोण। दारुण ।
भंगुनी द्वंद्व नियमाते। हे लांछन तू क्षत्राते। लाविले ।
(चाल) दुष्कर्म । बुडवुनी धर्म । करुनिया शर्म ।
पावला कोण। पावला कोण।
वीरांत दाविशिल वदन। केवि तू ।

(घनाक्षरी) न हे द्वंद्व समर शुद्ध । असे संकुल हे युद्ध ॥
व्यर्थ कंठशोष क्रुद्ध । करिसि बुद्ध म्हणवुनी ॥
श्रांत पाहुनि शैनेय । खंडु इच्छिसि तत्काय ॥
मरू देइल का स्वीय । वीर्यवंत या रणी ॥
स्वीय भुजरक्षण ज्यास । नसे शक्य वित्रपास ॥
कटी लावुनि खड्गास । ये कशास तो रणी ॥

## पद २३३ वे

घोर अधार्मिक काल कर्म करिता न मना यातना ।
वदतसा आज धर्म लाज ना ॥
विरथ विशस्त्र सुभद्रानंदन जया न षोडश पुरे ।
तयाते विदीर्ण केले शरे ॥
होता त्या पापांत तूहि ना सांग भूरिदक्षिणा ॥
शिवली लाज कां न त्या क्षणा ॥
मृत्यूची कां काळी छाया धर्मा दे आठव ।
पुरे तव समरी वाक्पाटव ॥

(चाल) धर्मास तुम्ही लाविली काल आग ना ।
तो धर्म आज दुर्जना तुम्हां रक्षि ना ।
धर्म हा रक्षकावनाविणा राहि ना ।
तू न बोलसी बोलति या भुजकृन्तनकृतयातना । वदतसा धर्म०

टीप—"चिडून भूरिश्रवा अर्जुनाची निंदा करू लागला. अर्जुनानेही त्याला सुयोग्य उत्तर दिले."

(साकी) विस्फारित गांडीव वदे तै श्वेतवाह देवा हूं ।
सिंधुज मस्तकपद्म दे मला रुद्रपदाब्जी वाहू ॥
हा पण की रवि अस्त न होता सिंधुराज मारावा ।
अल्पावशिष्ट वासर तोवरि धवळवाह वारावा ।
सिंधुपतीच्या जाउ न द्यावा श्वेताश्व निकट काही ।
हानि साहुनि केला निश्चय कुरुनरेशकटकाही ॥

## पद २३४ वे

क्षणोक्षणी ते समर पाहुनी होता वर्धिष्णू ॥
वदे तै जिष्णूला विष्णू ॥
हा अस्ताचल गमनोत्कंठित दिसतो मज भास्कर ।
पहा तू मावळते तत्कर ॥
षड्रथतम हे भस्म करायां जाइल बहुकाळ ।
होइल द्रुत सायंकाळ ॥
(चाल) मी निज सामर्थ्ये रविबिम्बा झाकिन ।
वाटेल रिपूंना झाले सायंतन ।
होईल शिथिल मग याचे संरक्षण ।
खलसंहरणी कुटनीतिचा आश्रय प्रभविष्णू । वदे तै०
तो विश्वाचा सूत्रधार अतितेजा । चक्रे झाकी रवितेजा ॥
वाटे सर्वां झाली सायंकाळ । वाचला सिंधु नरपाळ ॥
हा निज तनुला हविर्द्रव्य कल्पूनी । जाईल धनंजय दहनी ॥
(चाल) अंधज आनंदे फुलला ।
सूतज सोडी चिंतेला ।
सैंधव तनुभान विसरला ।
परि गहिवरला गुरुद्रोण अतितेजा । चक्रे ०

---

टीप – " आपल्या प्रतिज्ञापूर्तीसाठी अर्जुनाने जयद्रथ होता तिकडे रथ नेण्यासाठी कृष्णाला सांगितले. परंतु सूर्यास्तापर्यंतच जयद्रथाचे संरक्षण करायचे म्हणून सहा महारथी त्याला आडवे झाले. त्यांना टाळून आणि आपल्या चक्राने कृत्रिम अंधकार निर्माण करून कृष्णांनी अर्जुनास जयद्रथाला मारण्यास सुचविले.

(साकी) तडित्कांतिमय घोर योजिला अचित पार्थे बाण ।
वज्रास्त्रे अभिमंत्रित केला हरावया तत्प्राण ॥
क्षितिवरि जयद्रथाचे पाडिल शिरसरोज जो जन हो ।
शतधा त्याचेहि फुटो मस्तक श्वापदासि भोजन हो ॥

## पद २३५ वे

आकर्ण ओढुनी चाप । सोडिला बाण वेगाने ।
खंडुनी जयद्रथशिर तो । वैनतेयसा गगनी ने ।
बाणावरि योजुनी बाण । शिर चालविले वेगाने ।
(चाल) तो युद्ध कलाविष्कार ।
तो शरपात चमत्कार ।
आश्चर्ये बघती वीर ।
भासला तै धनुर्वेद । अवतरे पार्थरूपाने ॥

## पद २३६ वे

अस्तंगत भास्कर झाल्यावरि सिंधुराज मारिला ।
प्रतिज्ञा शब्द न संरक्षिला ॥
घोर अधार्मिक पृथापुत्र हा करिति गर्जना रणी ।
आधिरथिमुख कुरुपृतनामणी ॥
तोच नवंतमा आवरुनी घे घनश्याम सुंदर ।
दिसे तव आकाशी भास्कर ॥
कुरुपृतनामुखवदन कुमुदिनी रविबिंबा पाहुनी ।
नरपते गेल्या कोमेजुनी ॥
(चाल) म्हणति हा बरा वृन्दारक पतिनंदन ।
परि कपटपटू हा नीच नंदनंदन ।
याचेच करा या समरमखी कंदन ।
ऐसे गर्जुनि पार्थ रथावरि वीरसंघ धावला । प्रतिज्ञा शब्द ० ॥

टीप — "जो जयद्रथाचे मस्तक जमिनीवर पाडील त्याचे मस्तक तुटून पडेल असा जयद्रथाच्या पित्याने वर मिळविला होता. म्हणून श्रीकृष्णांच्या सूचनेप्रमाणे बाणाने चेंडूसारखे ते जयद्रथाचे मस्तक समन्तपंचकाच्या बाहेर तप करीत असलेल्या त्याच्या पित्याच्याच मांडीवर अर्जुनाने पाडले."

(साकी) संपलाचि मानुनि सूते रथ तूर्ण काढिला मागे ।
केला गुरु शोक प्रभुपाशी अर्जुने महाभागे ॥

(घनाक्षरी) रणी कर्णा आव्हान । स्वये देतो मी जाण ।
त्वरे हरितिल तत्प्राण । बाण रक्तपिपासू ॥

## पद२३७ वे

वचन मी दिले धर्माला । आणीन परत पार्थाला । निर्व्रण ।
तव तनू न्यास धर्माचा । युद्धावधि पार्था साचा । पाळिन ।
आव्हान सूतपुत्राचे । तुज होईल मारक साचे । या क्षणी ।
वासवी शक्तिने पूर्ण । काळाते निवटिल कर्ण । या क्षणी ।
(चाल) राधेय । ज्या क्षणी होय । रणी हतवीर्य ।
शक्ति जाउनी । शक्ति जाऊनी । द्वंद्वी त्या आव्हानूनीं । संपवी ॥

## पद २३८ वे

शुभ्रत्वे राजहंससंघी बका स्थान लाभता ।
घोर उन्माद चढे तत्त्वता ।
नीरक्षीरविवेकी त्याची परि संपे हंसता ।
पावे विश्वी उपहास्यता ॥
अधम सारथीपुत्र चढविला नरेन्द्रसिंहासनी ।
परी अभिजातता न ये मनी ॥
तव पराजयी आर्ये भीमे संयमास पाळिले ।
परि तुवा सभ्यतेस जाळिले ॥
(चाल) सृष्टि ही द्वंद्वमय आहे वैकर्तना ।
जय पराजयाच्या येथ काय यातना ।
जय नित्य नसे केवळ भगवंताविना ।
उपहासाचे दारुण देतो फळ मी तुज तत्त्वता । घोर उन्माद ० ॥

---

टीप – " जयद्रथ मारल्यामुळे कृपाचार्य संतप्त होऊन अर्जुनावर धावून आले, पण त्याच्या बाणांनी मूर्च्छित झाले. अर्जुन विलाप करू लागला. कर्णाशी लढण्याची अर्जुनाची तयारी होती. पण कृष्णांनी त्याला परावृत्त केले."

(साकी) वधिता सिंधुनरेन्द्र मत्त गज वीर केसरी पार्थ ।
ती वैकर्तन वीरगर्जिते होति यदा अनपार्थ ॥
राय दुर्योधन कळवळला । यशाचा संभव मावळला ॥

## पद २३९ वे

वदे दुर्योधन तै द्रोणा । वंदितो पार्थ गुरो चरणा ॥
चरणनतजीवनधनरक्षा । हीच सत्पुरुषांची दीक्षा ॥
परी या चरणी तदुपेक्षा ! होय कां ? व्रतपालनदक्षा ॥
सिंधुपे कां वरिले मरणा । वंदितो ० ॥ १ ॥
कसा व्यूहात शिरे विजय । विपक्षे कां वरिला विजय ।
भवन्मतिवरि का कुटिल नय । बोलतो सोडुनिया विनय ।
तरी द्या निजहस्ते मरणा । वंदितो ० ॥ २ ॥

(साकी) व्याकुळ करिसी खरतर हृदयी शब्दबाण हाणोनी ।
शिष्यगुरुसंबंध राज्यमदमत्ता क्षण न गणूनी ।
सजीव सावध सायुध सन्निध शूर तुम्ही सावध रे ।
असता बहुशत एक धनंजय केवि करी हा वध रे ॥
ऐका भारत रणवार्ता । जी तोषद भवदावार्ता ॥

## पद २४० वे

व्याजोक्तीने पार्थगुरू हे करिसी संबोधन । तेच परि माझे जीवितधन ।
राज्यलुब्ध कुलसती विडम्बक वंचक वपुरक्षणी । नाशिले ब्राह्मण्यहि या रणी
भ्रष्टवपू होईल परी हे धवलकीर्तिभाजन । केवळ पार्थगुरू म्हणवून ।
जगदीश्वर सारथी जयाचा अस्त्रगुरु शंकर । शिष्य तो मज विक्रम भास्कर ।

(चाल) पूर्वीच भागलो हे कथिता निशिदिन ।
की अजिंक्य केवळ कपिप्रवरकेतन ।
हे द्यूत न संगर संपवील जीवन ।
धनंजयी होईल दग्ध हे अधम क्षत्रियवन ॥ तेच परि ० ॥

टीप – "दुर्योधनाने आपल्या व्यंजक भाषणाने जयद्रथवधाचे खापर गुरु द्रोणांच्या माथी फोडले. ते ऐकून द्रोणाचार्य व्यथित झाले, आणि मोठे रण करण्याच्या उद्देशाने सैन्यात घुसले व पांडनसेनेचा विध्वंस करू लागले."

## पद २४१ वे

प्रलयंकर शंकरसा तो । विप्रेन्द्र भासला द्रोण ।
त्या घोर रात्रियुद्धात । धाकला न त्याते कोण ।
सजला ब्रह्मास्त्राग्नीत । होमाया शत्रुप्राण ।
(चाल) तिसरा रुद्राचा नेत्र ।
की दग्ध कराया क्षात्र ।
वा मृत्युदेवता वक्त्र ।
कालिकानय नवा शोण । विप्रेन्द्र०

## पद २४२ वे

विवर्णमुखवर्ण तै वदे कर्णातें संबोधुनी । घोर गांडीवनाद परिसुनी ॥
धनुर्धरा श्वेताश्वाचा हा कार्मुकरव ऐकुनी । पळति अस्मद् भट थरकापुनी ॥
मैत्रीचे हेच काय तव फळ यावे अंगाधिपा । तुझीही काय संपली कृपा ॥
विश्वसलो तव शब्दी केला संगरनिश्चय मनी । फळे तो सर्वनाश साधनी ॥
(चाल) हे जरासंध विक्रममदनगभंजना ।
आज तू वाचवी अस्मदीय जीवना ।
करि दग्ध दावसा मध्यम पांडववना ।
तूच एक नरमणे तारिशिल आणिशील जरि मनी । घोर०
(साकी) कर्ण म्हणे सामर्थ्य असे मज त्या श्रीकृष्णवधार्थ ।
या बलपौरुष मेरुनगा मग काय होय तो पार्थ ॥
(दिंडी) तुझी मित्रा राहील ताठ मान ।
असे जोवरि राधेय जीवमान ।
नको मजसी युद्धांत साह्य कोणी ।
पांडुपांचाळा दग्ध करिन बाणी ।
चक्रधर वा संहरू श्वेतवाह । सांग वा समरी सर्व सैन्यदाह ॥

टीप – "जयद्रथाला ठार करून परतलेला अर्जुन युधिष्ठिराला येऊन मिळाला. तो सात्यकी, युधिष्ठिर, भीम, नकुल, सहदेव, द्रुपद, विराट, मत्स्य, शाल्व सर्व महारथी पृथक् पृथक् सैन्य घेऊन द्रोणांवर तुटून पडले. रात्रीही युद्ध सुरूच होते. पाडवांचे निवारण अशक्य आहे असे पाहून दुर्योधनाने कर्णास चेतवले. तेव्हा तोही ईर्षेने पांडवसेनेवर तुटून पडला."

(कटाव) प्रवर्तले तैं कृतांतनर्तन । भीरुभयंकर शरीरकर्तन ।
द्वंद्वे होती किती भयंकर । परस्परा हाणिताति खरशर ।
धावे द्रोणावरि युधिष्ठिर । रोधी कृतवर्मा हाणुनि शर ।
येताना शैनेया हाणुनि । विकळ भूरि करि तोमर हाणुनि ।
धावताच सहदेवा तूर्ण । रोधी खंडुनि कान्मुक कर्ण ।
कृतांतापरी भीमा येता । झाला अंधज त्या निवारिता ।
येता शत्रुसर्प वाराया । रोधी शकुनी नकुला राया ।
उडवि शिखंडी कृप शारद्वत । प्रतिविन्ध्या दुःशासन आहत ।
घटोत्कचाते द्रौणि निवारी । कर्णपुत्र द्रुपदाते वारी ।
मद्रप मत्स्य नरपती खंडी । शतानीक चित्रसेन दंडी ।
अलंबुषे शलभे तैं धावुनि । केला रुद्ध धनंजय बाणी ।
गुरुवरि धावे धृष्टद्युम्न । करावयाते तद्यश निम्न ।
सूर्यमंडला समर धुरंधर । भेदुनि जाती अमित वीरवर ।
(घनाक्षरी) सुटति बाणावरि बाण । वीर होति गतप्राण ।
पलायनाविन त्राण । कुणा ना दिसे दुजे ।
स्वाभिधांकित तैं कर्ण । घोर शर सोडी तूर्ण ।
हृदय करुनि ते विदीर्ण । दीर्ण करिति मेदिनी ।
भयक्रांत तो विलाप । पार्थकर्णी दे ताप ।
वदे गोपीहृत्ताप । भक्तपापनाशना ॥

## पद २४३ वे

हा आक्रंदनध्वनी ऐकिला काय सख्या दारुण ।
पळति अस्मद्भट सोडुनि रण ॥
हा कार्मुकटंकार घोर गमते राधासुत करी । भार्गवास्त्रे सेना संहरी ॥
शस्त्रपाणी जगदेकवीर दुर्योधन चिंतामणी । रोधिला पाहिजेच मार्गणी ॥

(चाल) घे कर्णरथी निजस्यंदन यदुनंदना ।
भंगीन निजास्त्रे मी राधानंदना ।
अन्य न रोधाया शक्त दिसे लोचना ।
तव दृक्पाते विजयी होइन गाजवीन हे रण। पळति०

टीप – "परवीरांतक कर्णाचा पाडाव करण्याकरिता अर्जुनाने स्वतः सिद्धता दाखविली. कृष्णाने मात्र ते नाकारले."

(साकी) वत्सा घटोत्कचा ये ऐसे पुष्कराक्ष जो बाहे ।
वाहे नरनारायण चरणी स्वशिर तो उभा राहे ॥

## पद २४४ वे

"घटोत्कचा वत्सा शौर्यनिधे !" वदे जगत्पाळ ।
अस्मदीय पतमान यशोध्वज शौर्ये संभाळ ॥
प्रलयंकर शंकर नेत्रजवन्हीसम हा कर्ण ।
निजमहास्त्रवन्हीत दग्ध करि सेनाशत तूर्ण ॥
वरायुधधरा ब्रह्मास्त्रपटू साह्य तया द्रोण ।
तुझ्याविना होउनी पुरस्सर त्या वारिल कोण ॥
अस्मत्कुलकमलिनीभास्करा शत्रुतमा वारी ।
पडत्या पांडव यशोध्वजा संगरी तूच तारी ॥
(चाल) वारावी पितरांची पुत्रे आपदा ।
मी तुज देतो आशी कल्याणप्रदा ।
त्वद्यशोगायने विश्व भरो सर्वदा ।
त्वच्चरणी वीराग्रगण्य ठेवितील निज भाळ । अस्मदीय०
(घनाक्षरी) जरा जर्जर तो द्रोण । शापदग्धवीर्य कर्ण ।
रणी पळविन मी तूर्ण । तनुत्राण भंगुनी ॥
वीरशल्यादि सगर्व । बाण टाकुनि नतपर्व ।
करुनि भुजमद मी खर्व । करिन सर्व गतासू ॥

## पद २४५ वे

वदे श्रीकृष्ण भीमतनया । करी जे योग्य गमे हृदया ।
साधायास्तव स्वार्थाते । जयांनी राक्षसधर्माते ।
लावुनी कलंक वंशाते । वरिले का राक्षसनाते ।
तयास्तव मच्चित्ती न दया ।। १
नरपति पांडु रणी मरता ।
राणी आश्रयार्थ येता ।
सपुत्रा तद्धत्या चिंता ।
जाळी सतत जिथे चित्ता । काय ती राक्षसी न काया ।। २
भारताची ती सम्राज्ञी । सभे आणिती कची धरुनी ।
विवस्त्रा अंका दाखवूनी । ओढिती अंचल हातांनी ।।
काय ते राक्षस न जगी या । करी जे०

---

टीप — " श्रीकृष्णांनी कर्णाशी लढण्याचे कार्य घटोत्कचावर सोपविले."

(साकी) शत शंबरहि उणे न ज्यापुढे मय दानव मायावी ।
अत्युग्रता न भीमसूनुच्यापुढे कृतांता यावी ।।

## पद २४६ वे

तै समरधुरंधर कर्ण । नागास्त्र रणी संप्रेरी
धावलेच बद्ध कराया । तो भीमज नभोविहारी ।
परि मायावी तत्काल । अंतर्धान स्वीकारी ।
(चाल) अट्टहास ऐके कर्ण ।
धावले असंख्य सुपर्ण ।
अहि भक्षण करिती तूर्ण ।
नागपाश राधेयाचे । राक्षसमायेने वारी ।। १ ।।
तो सहस्रशिर भुज होय । पुरुषोत्तमसा आकाशी ।
घनसा वर्षे शरजाल । त्यावरी कर्ण जितकाशी ।
परि अट्टहास करुनी तो । शस्त्रास्त्रवर्ण तो भक्षी ।

(चाल) मग कज्जलपर्वत वर्ण ।
विकरालवदन तो तूर्ण ।
भक्षाया धावे कर्ण ।
संपला कर्ण या भावे । आक्रंदे सेना सारी ॥ २ ॥
परि भार्गवास्त्र संप्रेरी । मंदस्मितयुत राधेय ।
ती अस्त्रवन्हि तै व्यापी । द्रुततर सारेच विहाय ।
तै दिसे दग्ध होताना । त्या भीमसूनुचा काय ।
(चाल) शोकार्णवि भीम बुडाला ।
अश्रूंनी धर्महि न्हाला ।
दुर्योधन हर्षित झाला ।
तो पुन्हा दिसे आकाशी । गर्जना करित कर्णारि ।
(साकी) महारथा अद्भुत मायेते आता मम संभाळ ।
वितिलक या मायेने होइल सूतसद्वधूभाळ ॥

टीप – "घटोत्कच मायेच्या साहृयाने युद्ध करीत असल्यामुळे उभयपक्षी वीरांची मने जयपराजयाच्या हिंदोळ्यावर डोलत होती."

## पद २४७ वे

तै प्रलय माजला घोर । अंतरिक्ष शरवृष्टीने ।
हार्दिक्य गुरु द्रौणीच्या । धैर्यास दृश्य विलया ने ।
संधान कराया कर्णा । न दिसेच कुणी देहाने ।
(चाल) प्रेतांचा पर्वत पडला ।
रक्तार्णव तै खळखळला ।
रणभाग अग्निमय झाला ।
कल्पांत रुद्र जणु समरी । नृत्यास्तव ये वेगाने ॥ १ ॥
थरथर कापत तै सारे । लोचनी आणुनी पाणी ।
वदती वैकर्तन कर्णा । आक्रंदत जोडुनि पाणी ।
न निवारण या मृत्यूचे । होणार मंत्रमय बाणी ।
(चाल) संपली जयाची आशा ।
उरली न मनी प्राणाशा ।
परमेश्वर सजला नाशा ।
भरलें रणचत्वर सारे । मृत्यूच्या शंखरवाने ॥ २ ॥

## पद २४८ वे

त्या इंद्रदत्त शक्तीचा । होता तेजाविष्कार ।
संपलाच भीमसुताचा । तो कालघनाविष्कार ।
प्रत्यक्ष आत्ममृत्यूच्या । दर्शने कापला वीर ।

(चाल) तद्हृदय कराया दीर्ण ।
क्रोधाने भरला पूर्ण ।
मग रदन चावुनी कर्ण ।
प्रक्षेप करी शक्तीचा । गर्जना करित अनिवार ॥ १ ॥
धावली सुपर्णजवे ती । तो शत्रु कराया गीर्ण ।
धावत्या भीमतनयाचे । करि वज्रहृदय ती दीर्ण ।
तत्प्राण धावले स्वर्गी । इंद्रास कथाया तूर्ण ।

(चाल) वाचवावया त्वत्तनय ।
हैडिम्बे दिधला काय हे ।
हे असो विदित सुरराय ।
राक्षसी तनूचा झाला । ईशेच्छेने उद्धार ॥ २ ॥

---

टीप – " घटोत्कचाच्या संहारसत्राने कौरव भ्याले. पृथ्वी क्षत्रियरहित होणार की काय असे वाटून त्यांनी कर्णाची विनवणी केली. तेव्हा इन्द्राने कवचकुंडलांच्या मोबदल्यात दिलेल्या वासवी शक्तीचा प्रयोग करून कर्णाने घटोत्कचाचा बळी घेतला. "

(साको) वृत्रवधी इन्द्र जसा स्तविला सुरमहर्षि धीरांही ।
तसा घटोत्कच वधी कर्ण तै कौरवादि वीरांही ॥
घटोत्कच वधे पांडव दुस्तर शोकसागरी पडले ।
जैसे अभिमन्यु वधी तैसे सोडुनि धृतिला रडले ॥
निर्धन निधिच्या जैसा पावे विशद हर्ष लाभाने ।
तैसा तै अत्यंत हर्षला भगवान् त्यजिला भाने ॥

## पद २४९ वे

ज्ञानरवीच्या किरणे ज्या वेदांतवेद निर्मिलें।
तयां कां अज्ञाने ग्रासिले ॥
गीतोर्मी ज्या ज्ञानसिंधुची निखिल मोहनाशिनी।
घेत तो कसा मोहवारुणी ॥
शुष्क जाहला ज्ञानार्णव का ज्ञानमेरु भंगला।
विकारी पुरुषोत्तम रंगला ॥
शोकस्थानी हर्ष तयाचे अस्थानी दर्शन।
कसे हे घडे नंदनंदन ॥
(चाल) सुतरत्न आमुचे काळाने ग्रासिले।
हर्षाने तुज या क्षणी कसे ग्रासिले।
हे भगवंता तुज काय वेड लागलें।
मायातीता मायेने का तुजहि आज ग्रासिले। तया ०
(दिंडी) अमोघा त्या शक्तीस दिला घास।
राक्षसाचा तुज वाचवावयास ॥
पार्थ बोले सत्पुत्र बळी द्यावा।
पित्यासाठी हे काय उचित देवा ॥

---

टीप – " घटोत्कचाच्या वधाने कौरव सुखसागरांत अन् पांडव शोकसागरांत बुडाले. परंतु भगवान श्रीकृष्णांना मोठा हर्ष झाला. ते देहभान विसरून टाळ्या पिटू लागले. पुत्रवधाने सर्वही पांडव उद्विग्न झाले असता श्रीकृष्णाने आनंदाने नाचावे या कल्पनेने अर्जुन खिन्न झाला. त्याने कृष्णांना हर्षाचे कारण विचारलें."

## पद २५० वे

राखाया सद्धर्माते। घेतले मी अवताराते ॥ धृ ॥
आप्त रिपु मित्र नसे मजला। आपपर भाव भस्म केला।
जो आवश्यक धर्माला। तोचि मज रक्षणार्ह गमला।
तेचि पार्था माझे नाते ॥ १ ॥
रणी मी निज मातुल वधिला। प्रबल नृपसंघ भग्न केला।
धर्मराज्यार्थ यत्न केला। अधम सामर्थ्य विनाशाला।
वरिले मी कौटिल्याते ॥ २ ॥

लोकशिक्षणार्थ अवतार । तदनुगुण पार्था आचार ।
विपदा धर्मावरि घोर । करणे केवि तदुद्धार ।
दाविले या सन्मार्गाते । घेतले ०

(साकी) कर्ण न वधिता तरि मारावा लागताचि हा चक्रे ।
की ब्रह्मखद्वेष्टा वधिला जाता न रणी शक्रे ॥

## पद २५१ वे

पराक्रमाचा असेल सागर जरी शक्रनंदन ।
तया मी कुंभज वैकर्तन ॥
शत्रु यशोमंदिरस्तंभ न च वरितो कार्मुकधर ।
विक्रमे जरि भासे भास्कर ॥
सूत्रधार या संग्रामाचा कपटपटू आगळा ।
दिसे जरि शस्त्रहीन वेगळा ॥
अशस्त्र वधिला पूर्वी याने यवनाधिप मागध ।
साधिला आज पितामह वध ॥
सौमदत्ति भगदत्त सिंधुपति वधिले नरकेसरी ।
लोटिले तुला शोकसागरी ॥

(चाल) हा नृशंस घातक खरा नंदनंदन ।
म्हणवितो आपणा परि हा करुणाघन ।
साधन याचे तो कपिप्रवरकेतन ।
सहस्र वधिले पार्थ तरी लाभे न तुला जयधन । तया ०

---

टीप – "कृष्ण म्हणाले, 'सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांचा संहार हेच माझे ब्रीद आहे.' याच वेळी श्रीकृष्णांना मारल्याशिवाय विजयांत अर्थ नाही असे कौरवपक्षात बोलले जात होते."

## पद २५२ वे

सशर सकवच सखड्ग सकार्मुक वीर शत्रुतापन ।
जया दे जन्म हव्यवाहन ॥
नभांगणी उमटली जन्मता दिव्यगिरा ज्यास्तव ।
वीर हा द्रोण विनाशास्तव ॥
हे द्रोणान्तक, अंतकसा हा द्रोण सैन्य मारिता ।
पाहवे काय तुला तत्त्वता ॥
(चाल) सहदेव नकुल सात्यकी साह्य घे रणी ।
हो सिद्ध विक्रमे गुरु द्रोण मारणी ।
कार्तिकेय साहो शक्त सैन्य तारणी ।
दुष्टाश्रित विप्र गमे जैसे सर्पाश्रित चंदन । जया ०

## पद २५३ वे

गर्जता पांडु पांचाळ । विप्रसिंह रोषे वळला ।
टंकार गर्जिते तेणे । दिक्कोन निनादित केला ।
द्रुत विदीर्ण शरधारांनी । तो सैन्य शिलोच्चय केला ।
(चाल) तूणस्थ छिन्नकर होती ।
शिरकमलतती नभि उडती ।
रणि कबंधतति किति उठती ।
संगरी शोणिताचा तै । द्रोणे सागर निर्मियला ॥

टीप—"द्रोणाचार्यांनी पांडुपांचाळांचा भयंकर संहार चालविला. तेव्हा सर्वजण द्रोणाचार्यांचा वधक द्रुपदपुत्र धृष्टद्युम्नाला विनंती करू लागले."

(दिंडी) जामदग्न्याचे शिष्य धनुष्पाणी । तुम्ही दिव्यास्त्रे वर्षताचि बाणी
पलायन वाटे वरिल शार्ङ्गपाणी । मशक तेथे गांडीव चापपाणी ॥

## पद २५४ वे

वदे क्रोधान्ध अन्वतनय । सोडुनी लज्जा नय विनय ।
करिता कपटयुद्ध कळले । विनाशा मम आपण सजले ।
रक्षण रिपुपक्षा दिधले । छन्नशत्रुत्व रणी केले ।
हेच ब्राह्मण्य असे काय ? सोडुनि० ॥ १ ॥
आश्रितजन मारणदक्षा । हीच का वीरव्रतदीक्षा ।
पृथासुत जीवनधनरक्षा । घेतली आपण नव दीक्षा ।
हेच तव धर्मावन काय ? सोडुनि० ॥ २ ॥

(साकी) सलती हृदयी त्या दुष्टाचे अतितर खर वाग्बाण ।
पाहे सारा निजजीवनपट हृदयी दुःखी द्रोण ।

## पद २५५ वे

सुतमोहे निजधर्म वंचिला दुष्ट दास्य लाभले ।
काय या नरजन्मे साधले ॥
राज्यलुब्ध कुलसतीविडम्बक वंचक वपुरक्षणी ।
नाशिले ब्राह्मण्यहि या रणी ।
धर्माधर्मज्ञाननिधी मी करी धर्मवंचना ।
विकिले पुत्रास्तव जीवना ॥
या रणतीर्थी अस्त्रपूत संपवी पापजीवना ।
हीच याचना जगज्जीवना ॥

(चाल) या दुष्टे केले मदीय तनुपोषण ।
दास्यांत तयाच्या रतले मद्वपुमन ।
पाहिजे तूर्ण हे संपविले जीवन ।
त्वद्दृष्टिपुढे अंत तरी माधवा सकल साधले । काय ०

टीप—"दुर्योधनाच्या सततच्या टोचणीमुळे द्रोणाचार्यांना जीवन नकोसे झाले."

## पद २५६ वे

ती अनुशासनबद्ध सुयंत्रित द्विधा शत्रुवाहिनी ।
यादवाधिप बोले पाहुनी ॥
द्रोण कर्ण घालुनी सव्य जो कवळाया कुरुपती ॥
धावला नागा जणु खगपती ॥
(चाल) ते द्रोण कर्ण धावती स्थान सोडुनी ।
सुनियंत्रण गेले सेनेचे भंगुनी ।
हासला मनी श्रीकृष्ण दृश्य पाहुनी ।
वदे सुयंत्रित सख्या होय ही शकलित रिपुवाहिनी ।

## पद २५७ वे

मूर्च्छना पावता कर्ण । थरकापे सेना सारी ।
तो प्रलय वन्हिसा राया । तव सुत सेना संहारी ।
संक्रुद्ध केसरी पार्थ । कुरुसेनानाथ विदारी ।
(चाल) घाबरे जाहले प्राण ।
उरले न शरीरी त्राण ।
पाहे आशेने द्रोण ।
पळ टिके न तव सुत समरी ॥ १ ॥
ते वैकर्तनमुख वीर । मागुतो पुढे कुरुराय ।
जव पवनतुल्य पळताना । वरिती करिती ते हाय ।
पाहता तया दे हांक । स्मित वदन रणी गुरुराय ।
(चाल) जिंकिला काय कपिकेतू ।
संपला काय खगकेतू ।
पळशी कां रण टाकुनि तू ।
संपली काय वाचाळा । ती वीर गर्जिते सारी ॥ २ ॥

टीप—"अर्जुनाच्या पराक्रमापुढे तर कर्ण, दुर्योधन, दुःशासन सर्वच वीर हतबल झाले. ते पाहून द्रोणांना परम संतोष झाला."

(साकी) कृष्ण वदे दिवसार्ध युद्ध जरि करिल वधिल हे सैन्य ।
दैन्यद होईल कार्मुकतेजे पराक्रमे हा वैन्य ॥

## पद २५८

त्रिजगद्गुरु गीताधर्माचा जनक नंदनंदन ।
आळवी स्वये धर्मनंदन ॥
धर्माचा आचार्य पेटवी धर्म जरी संगरी ॥
तुला तत्करुणा कां अंतरी ॥
राज्यलुब्ध कुलसतीविडम्बक वंचकजनरक्षणी ।
गुरु ब्रह्मास्त्र राबवी रणी ॥
अनस्त्रज्ञसंहार करी हा दयाधर्म जाळुनी ।
तयाच्या अर्थ काय जीवनी ॥
(चाल) तू धर्मरक्षणास्तव अधर्म स्वीकरी ।
होईल पाप हे आणु नको अंतरी ।
तव अघनगचय मी संहरीन श्रीहरी ।
अश्वत्थामा सांग तया अस्तंगत तव नंदन । आळवी ०

## पद २५९

प्रलयंकर शंकरसा तो । गर्जना करित ये द्रोण ।
दे हाक रणी तै धर्मा । तू सत्यनिष्ठ बा जाण ।
अस्तंगत अश्वत्थामा । मत्पुत्र अन्य वा कोण ।
(चाल) ऐकिले जरी मी कानी ।
विश्वास न यांच्या वचनी ।
तू एकचि यथार्थ वचनी ।
ऐकता सद्गुरुवाक्य । उचलवे न त्या दृक्कोण ॥ १ ॥

टीप – "द्रोणाचार्यांच्या अखंड संहारसत्रापुढे मोठमोठ्या महारथांचाही निभाव लागेना. पांडव तर जयाविषयी निराश झाले. तेव्हा श्रीकृष्णांनी यावर अशी युक्ति सांगितली. ते म्हणाले, " हे सशस्त्र आहेत तोपर्यंत ह्यांना देवही जिंकू शकत नाहीत. शस्त्र खाली ठेवण्याकरिता त्यांचा एकुलता एक मुलगा अश्वत्थामा मेला ही वार्ता त्यांच्या कानावर घालण्याची व्यवस्था करा. भीमाने त्या नांवाच हत्ती मारला, व आरोळी ठोकली. द्रोणांचे मन शंकाकुल झाले."

## पद २६०

धिक्कार धर्म तें बोले । अंतरी होय अति दीन ॥
कां जयार्थ आचार्यासी । बोलावे मिथ्यावचन ।
तो खिन्नवदन लज्जेने । पाहे न सद्‌गुरुवदन ।
(चाल) रोमांच शरीरी आले ।
अश्रुपूर नयनी चाले ।
अंतरी दुःख बहु झाले ।
तो पुन्हा विचारी त्याते शंकाकुल मानस द्रोण ॥ २ ॥
(साकी) ज्याच्या वचनी धरिती सर्वहि सुज्ञ लोक विश्वास ।
अनृत वदेल कसा तो सोडी व्यर्थ न घे कधि श्वास ॥
(दिंडी) मर्मकृन्तन ते शब्द आयकोनी । हस्तपट दे आचार्यवर्य कानी ।
पुत्रमृत्यूचा घाव अंतरात । लूनपक्ष गमे खगपती रणांत ॥

## पद २६१ वें

सजल नेत्र आचार्य हाक दे राया दुर्योधना ।
कृपा दुःशासन वैकर्तना ॥
ज्याच्यास्तव ब्राह्मण्य भंगुनि कार्मुक धरिले करी ।
पुत्र तो परलोकाते वरी ॥
ज्याच्या तर्पणजलें न्हावया तृप्त इच्छिले मनी ।
जाय तो सुत मजला सोडुनी ॥
करिन शस्त्रसंन्यास जीविती विटलो धामी पुरा ।
मृत्यु हा एकच मज आसरा ॥
(चाल) संभाळा सावध युद्ध परम दारुण ।
मच्छिष्य धनंजय भीति तुम्हा दारुण ।
यापुढे न माझे मिळेल संरक्षण ।
करुनि पुढे संग्राम करा रामशिष्य वैकर्तना ॥ कृपा ०

टीप – "पुत्राच्या मृत्यूची वार्ता खरी की खोटी ह्याचा निर्णय करावा म्हणून द्रोणाचार्यांनी युधिष्ठिरांना विचारले. त्यांनी मोठ्या कष्टाने "नरो वा कुंजरो" असे शब्द उच्चारले. ते अप्रिय ऐकून द्रोण विव्हल व जीविताविषयी उदास झाले. त्यांची अस्त्रे प्रगट होईनात. त्यांनी शस्त्रे खाली ठेवून स्वकीयांचा निरोप घेतला."

(साकी) तो धनु ठेवुनि पार्षत धावे खड्गकर वधा त्याच्या ।
हर हर मनासि कैसे आले कर्म अशिव धात्याच्या ॥

## पद २६२ वें

गहिवरुनि घे उडी पार्थ सारूनी श्रीहरी करे ।
द्रोणरक्षणा धाव घे त्वरे ॥
वदे थांब सद्‌गुरुघात पातका न कर पार्षता ।
तुझ्यास्तव नरकहि होईल रिता ॥
विद्याधन घेतले तयाचा घात असा यापरी ।
करिता लाज न तव अंतरी ॥
जीवमान आचार्य आण तू पांडव शिबिरांतरी ।
ठेवु या मस्तक चरणावरी ॥
(चाल) सक्रोध परी पांचाल शीघ्र धावला ।
सद्‌गुरु शरीरासमीप तो पातला ।
चरचरा गुरुकंठनाल तैं कापला ।
रक्तांकित शिर फेकुनि रिपुगण करी रणी घाबरे । द्रोण०

## पद २६३ वें

रणगगन मंडपातुनी । तो तेजोभास्कर गळता ।
दुर्दैव कुंभयोनी वा । तो बलाब्धि प्राशन करिता ।
पंचाल पुत्रवृत्रे तो । विप्रेन्द्र यापरी गिळिता ।
(चाल) भयकंपित सेना झाली ।
उत्साहशक्ति मावळली ।
वीरश्री लज्जित झाली ।
की कृतज्ञता धर्माचा । वध काय जगी यापरता ॥ १ ॥
ती भयप्रदा दुर्वार्ता । आदळता वेगे कानी ।
नृप शल्य कर्ण कृप यांच्या । अश्रुपूर दाटे नयनी ।
सद्‌गदित होति तैं कंठ । अवरुद्ध होय तैं वाणी ।

(चाल) वीर तै पलायन करिती ।
हातिची टाकुनी हेती ।
पुसता नच उत्तर देती ।
धैर्यबंध ऐसा तुटता । धावे कुरुसेनातटिनी ॥ २ ॥

टीप – "धृष्टद्युम्नाने न्यस्तशस्त्र द्रोणाचार्यांचे मस्तक तरवारीने उडवून कौरवसेनेत फेकले."

## पद २६४ वे

सत्कुलवंता पराजयाहुनी मरणचि वर संगरी ।
धर्म हा जाणे मी अंतरी ॥
या रणतीर्थी शस्त्राघाते तात मरण पावता ।
दुःख नच त्याचे मज तत्त्वता ॥
परी अनाथापरी संगरी तत्केशाकर्षण ।
होय मम घोर मर्मकृन्तन ॥
मित्रद्रोही नृशंस पापी पंचाल कुलावरी ।
ध्वजा ही पार्षतरूपे खरी ॥
(चाल) गुरुघातक रक्ते आर्द्र करिन मी रण ।
पार्षतरक्ते मी करिन तात तर्पण ।
पंचालशिरे मी तत्स्मृतिला अर्पण ।
वायसगृध्रा रिपुमांसे संतृप्त करिन संगरी ॥ धर्म०
(चाल) नारायणास्त्र मज त्यापासुनि लाभले ।
जाण मी शौरिसह पांडुपुत्र जाळिले ।
जरि संरक्षण त्वा आज शंकरे दिले ।
होतिल सारे अस्त्र हुताशनि भस्म आज संगरी ॥ धर्म०

## पद २६५ वे

क्रोधे रद चावुनी कार्मुकी घोरबाण योजुनी ।
क्रुद्ध केसरीपरी द्रौणि तै वदे घोर गर्जुनी ॥

(साकी) तो धनु ठेवुनि पार्षत धावे खड्गकर वधा त्याच्या ।
हर हर मनासि कैसे आले कर्म अशिव धात्याच्या ॥

## पद २६२ वें

गहिवरुनि घे उडी पार्थ सारूनी श्रीहरी करे ।
द्रोणरक्षणा धाव घे त्वरे ॥
वदे थांब सद्गुरुघात पातका न कर पार्षता ।
तुझ्यास्तव नरकहि होईल रिता ॥
विद्याधन घेतले तयाचा घात असा यापरी ।
करिता लाज न तव अंतरी ॥
जीवमान आचार्य आण तू पांडव शिबिरांतरी ।
ठेवु या मस्तक चरणावरी ॥
(चाल) सक्रोध परी पांचाल शीघ्र धावला ।
सद्गुरु शरीरासमीप तो पातला ।
चरचरा गुरुकंठनाल तै कापला ।
रक्तांकित शिर फेकुनि रिपुगण करी रणी घाबरे । द्रोण०

## पद २६३ वें

रणगगन मंडपातुनी । तो तेजोभास्कर गळता ।
दुर्दैव कुंभयोनी वा । तो बलाब्धि प्राशन करिता ।
पंचाल पुत्रवृत्रे तो । विप्रेन्द्र यापरी गिळिता ।
(चाल) भयकंपित सेना झाली ।
उत्साहशक्ति मावळली ।
वीरश्री लज्जित झाली ।
की कृतज्ञता धर्माचा । वध काय जगी यापरता ॥ १ ॥
ती भयप्रदा दुर्वार्ता । आदळता वेगे कानी ।
नृप शल्य कर्ण कृप यांच्या । अश्रुपूर दाटे नयनी ।
सद्गदित होति तै कंठ । अवरुद्ध होय तै वाणी ।

(चाल) वीर तै पलायन वरिती।
हातिची टाकुनी हेती।
पुसता नच उत्तर देती।
धैर्यबंध ऐसा तुटता। धावे कुरुसेनातटिनी ॥ २ ॥

टीप – "धृष्टद्युम्नाने न्यस्तशस्त्र द्रोणाचार्यांचे मस्तक तरवारीने उडवून कौरवसेनेत फेकले."

## पद २६४ वे

सत्कुलवंता पराजयाहुनी मरणचि वर संगरी।
धर्म हा जाणे मी अंतरी॥
या रणतीर्थी शस्त्राघाते तात मरण पावता।
दुःख नच त्याचे मज तत्त्वता॥
परी अनाथापरी संगरी तत्केशाकर्षण।
होय मम घोर मर्मकृन्तन॥
मित्रद्रोही नृशंस पापी पंचाल कुलावरी।
ध्वजा ही पार्षतरूपे खरी॥
(चाल) गुरुघातक रक्ते आर्द्र करिन मी रण।
पार्षतरक्तें मी करिन तात तर्पण।
पंचालशिरे मी तत्स्मृतिला अर्पण।
वायसगृध्रा रिपुमांसे संतृप्त करिन संगरी॥ धर्म०
(चाल) नारायणास्त्र मज त्यापासुनि लाभले।
जाण मी शौरिसह पांडुपुत्र जाळिले।
जरि संरक्षण त्वा आज शंकरे दिले।
होतिल सारे अस्त्र हुताशनि भस्म आज संगरी॥ धर्म०

## पद २६५ वे

क्रोधे रद चावुनी कार्मुकी घोरबाण योजुनी।
क्रुद्ध केसरीपरी द्रौणि तै वदे घोर गर्जुनी॥

माध्यान्हीच्या मार्तंडासम चंड अस्त्र हे पहा ।
निष्पांडव वसुधा पाहुनि ही मोदसरी तू नहा ॥
अस्त्र मंत्रपात जो करी त्या शरी घोर द्विजवर ।
अगणित विद्युत्पुंजे भरले क्षणांत नभ चत्वर ॥

टीप – "द्रोणांचा मृत्यु झाला हे पाहून कौरवसैन्य पळू लागले. ते पाहून अश्वत्थाम्याने कृपाचार्यांना त्याचे कारण विचारले. त्यांनी सर्व वृत्त त्याला कथन केले. ते ऐकून त्याचा संताप झाला. द्रोणांचा वधक धृष्टद्युम्न व वंचक युधिष्ठिर यांच्या वधाची प्रतिज्ञा करून त्याने पांडवसेनेवर नारायणास्त्राचा प्रयोग केला. अग्निबाण वर्षाव होऊन सेना भाजून होरपळून जाऊ लागली."

## पद २६६ वे

तो पार्थाच्या रथी राहिले उभे ब्रह्म सावळे ।
सदा जे प्रेमभक्तिने वळे ॥
धर्मप्रमुखा नेतृगणा दे हाक श्यामसुंदर ।
वाहना परित्यजा सत्वर ॥
शस्त्रे टाकुनि व्हा बद्धांजलि प्रणिपात करा त्वरे ।
सुसाधन हेच संकटी खरे ॥
(चाल) लव प्रतिकाराचा विचार येता मनी ।
टाकील अस्त्र हे ब्रह्मचासहि जाळुनी ।
नम्रता शरीरी तशीच राखा मनी ।
या योगाचा घेता आश्रय अस्त्रदेवता वळे ॥ सदा०

## पद २६७ वे

रोषदीप्त अग्न्यस्त्राचे ते द्रौणि करी दीपन ।
गमे ते प्रलयवह्नि दीपन ॥
अक्षौहिणिमित वीरसंघ भस्मावशेष ते करी ।
जणू कल्पांतरुद्र संहरी ॥

ब्रह्मास्त्रे तै करी पार्थ आग्नेय नाश सत्वर ।
तयावरि योजी मग खरशर ॥
हासत हासत साठ समर्पुनि गार्धपत्र कटुतर ।
वदे त्या पार्थ विनम्रस्वर ।
परमपूज्य आचार्यांची ही विद्या गुरुनंदना ।
करिते त्वच्चरणी वंदना ॥

(चाल) मग कवच भंगुनी ध्वजस्तंभ तोडुनी ।
लीलेने तत्सारथिमस्तक खंडुनी ।
दे दुःख शरीरा बाणांनी विंधुनी ।
पळे पवनगति यम मानुनि त्या द्रौणि पृथानंदना । गमे०

---

टीप – " नारायणास्त्र शांत करण्याकरिता वाहन व शस्त्र यांचा सर्वांनीच त्याग करावा असे श्रीकृष्णांनी सुचविले. तसे करताच ते अस्त्र शांत झाले पण अश्वत्थामा मात्र उद्विग्न झाला. त्याने पुन्हा आग्नेयास्त्राचा प्रयोग केला. तेव्हा ब्रह्मास्त्राच्या प्रयोगाने अर्जुनाने तेही नष्ट केले. अश्वत्थामा पळून गेला."

[illegible library stamp]

# कर्णपर्व

(श्लोक) या घाते खचला सुयोधन मनी गा वल्गणे कायरे ।
युद्धी लाभ न हे तया अनुभवे आता कळे काय रे ।
संधी होउनि पार्थ ही सुखभरे नांदोत ही वासना ।
त्याच्या उद्भवुनी करील गमते मध्यस्थ नारायणा ॥

## पद २६८ वे

ऐकियले गृध्र कधी घृत गोरस सेवी नृवरा ।
तया मृतमांसभक्षणी त्वरा ॥
लोकजीवनद भास्करा कधी उलूक का पाहतो ।
सदा तो गाढतमी राहतो ॥
वैराग्याचा आश्रय करुनी आत्मतेज का कधी ।
इच्छितो स्त्रीलंपट कुजनधी ॥
(चाल) काक का कधी मुक्तामाला सेविल ।
जम्बूक कधी तरी मिष्टान्ना सेविल ।
त्वत्पुत्रबुद्धि कशि सन्मार्गा सेविल ।
दुर्जनसंगे मळला त्याची आत्मविनाशा त्वरा । तया०
(साकी) भीष्म द्रोण वियोगे तप्ता निजमनांत तव सेना ।
इच्छी आलिंगाया कर्णा अन्य कांत गवसेना ॥
अर्जुन मारुनि तन्मांसन मी शिवादिका भरवीन । \
चरण प्रक्षालन तोवरि मी कुरुपते न करवीन ॥
अभिषिक्त कर्ण शोभे जैसा दिव्यरूप सेनानी ।
केला जयजयकार प्रेक्षुनि तेज भूपसेनांनी ॥

---

टीप – "सर्वांच्याच मताने कर्णाला सेनापतिपदाचा अभिषेक झाला. अर्जुनाला मारीपर्यंत आपले पाय धुवून घेणार नाही अशी त्यानेही प्रतिज्ञा केली."

(साकी) द्रौणि म्हणे कौंतेया अतिथी पूज्य तुला हि न यज्ञा ।
युद्धातिथ्य मला दे संप्रति सांग करिन मी यज्ञा ।

## पद २६९ वे

हे धनुर्धरा । मी तव गुरुसुत आचार्य ।
अतिथी पूजन दे सत्वर हो कृतकार्य ॥
ऐकिले असे श्रीगयशिबिमुख राजन्य ।
याचका अर्पुनी झाले इच्छित धन्य ॥
तू जगती या । पार्था स्वनाम धन्य ।
करिशील न वाटे याञ्चाभंग जघन्य ॥
आलो वेगे शरदर्भपाणि मी पार्था ।
माझी रणरंगी हो वांछा अनपार्था ॥
(चाल) पुरवावे माझे रणी वांछित ।
जावो न विमुख हा तुझा गुरुसुत ।
तव यशोध्वजा रणमखी उन्नत ।
द्विजवर याञ्चा पुरविती अर्जुना आर्य । अतिथी०

## पद २७० वे

श्रीकृष्ण वदे । निष्कंप असो तव धैर्य ।
आणिला सखा वीराग्रगण्य हा आर्य ॥
आजवरी जे सकाम याचक आले ।
चापश्रुतीने निष्काम होउनी गेले ॥ १ ॥
करि एकाकी । द्रौणे होउनिया सिद्ध ।
त्या अचिंत्य कालांतक रुद्राशी युद्ध ॥ २ ॥
विश्वसुनी मी । याच्याच विक्रमी जाण ।
न्यस्तशस्त्र झालो असता धर्मत्राण ॥ ३ ॥
(चाल) योग्यता परी दाखवी संगरी ॥
देईल तेच दान हा नरहरी ।
कां व्यर्थ शिणविशी गड्या वैखरी ॥
रणचत्वरि या शब्देन साधते कार्य । आणिला ०

टीप –" व्यूहरचना झाली. युद्धाला तोंड फुटले. योद्धे परस्पर द्वंद्वाचे आव्हान करू लागले. अश्वत्थाम्याने अर्जुनाशी लढण्याची इच्छा प्रदर्शित केली."

## पद २७१ वे

त्या घोर द्वंद्वयुद्धांत । गुंतला पार्थ पाहूनी ।
धावले तया ग्रासाया । संसप्तक रद चावोनी ।
त्या एकाकी सिंहाते । जंबूक वेष्टिती रानी ।
(चाल) अग्रेसर गुरुसुत विंधी ।
पार्श्वी त्रिगर्तही विंधी ।
कंपित न होय परि क्षण धी ।
हासला तो धनुष्पाणी ॥ १ ॥
तो असंख्यात सैन्याते । घेउनी स्वये कुरुराय ।
धावला वदे एकाकी । हा वधा पीडुनी काय ।
ते क्रूर शस्त्रवृष्टीने । विंधिती पार्थ वपु हाय ।
(चाल) सौभद्रासम निवटा हा ।
आधार संगराचा हा ।
वधिता करितिल अरि हा हा ।
यापरी वदे तो वाणी ॥ २ ॥
(साकी) संजय वदे पराभवखिन्ना कुरुराया कर्ण म्हणे ।
कुरुनाथा धीर धरी निवटिन सर्व शत्रुराजमणे ।

टीप – "अश्वत्थामार्जुनांचे मोठे निकराचे युद्ध झाले. ते चालू असताच चोहोकडून अनेक वीरांनी अर्जुनावर चाल केली. परंतु अर्जुनाने त्या सर्वांचे पारिपत्य केले. अश्वत्थाम्यासहित सर्वजण जीव घेऊन पळाले. अर्जुनाने संशप्तकांनाही जिंकले. पहिला दिवस संपला पण विजयश्रीने दुर्योधनास माळ घातली नाही. अर्थातच तो खिन्न झाला. तेव्हा कर्णाने पुन्हा प्रतिज्ञा केली की, 'उद्या एकतर मी अर्जुनाचा वध करीन किंवा तो माझा करील."

(साकी) त्याचे माझे आयुध वीर्यहि समचि ज्या गुणे स्पष्ट ।
मी पार्थाहुनि अधिक ऐक ते स्वगुण बोलणे कष्ट ॥

## पद २७२ वे

तत्कार्मुकगुण दिव्य नरवरा अद्‌भुततम स्यंदन ।
जयाचे घडे न वा भंजन ॥
जवन पवनसम अश्व कपिध्वज करी सदा गर्जना ।
घोर जी वरगुण रिपुतर्जना ॥
कल्पांतीचे मेघ रिते होतील न भाते नृपा ।
करिति जे शरदानाची कृपा ॥
(चाल) ज्या म्हणति विचक्षण जगत्सूत्रचालक ।
गांगेय वदे ज्या सदा विश्वपालक ।
तो सारथ्यमिषे पार्थाचा रक्षक ।
वृंदारकगणवंद्य तया सारथी नंदनंदन । जयाचे ०
(साकी) अश्वांच्या हृदयाचा ज्ञाता कृष्णासम कौशल्य ।
माझे सारथ्य करो राया मद्राधीश्वर शल्य ॥

## पद २७३ वे

ससुत गुरु भीष्म कर्ण मातुल कृतवर्मा मद्रप ।
हेच आशेचे सेनाधिप ॥
या समर्थ स्कंधावरि टाकुनि विजयाचा भार हा ।
केला रणमख दारुण पहा ॥
जामदग्न्यशिष्य हा जाहला जरासंधभंजन ।
आश्रयतरु हा रविनंदन ॥
(चाल) मदमत्त पार्थ गजवधकर्मी केसरी ।
यापुढे कंप पावेल वज्रधर हरी ।
मग पांडुसुतांची का न मुखश्री हरी ।
श्रीकृष्णापरि संरक्षी तू राया अंगाधिप । हेच ०

---

टीप -- "कर्ण दुर्योधनाला म्हणतो, युद्धगुणांत अर्जुनापेक्षा मीच श्रेष्ठ आहे; पण त्याचे धनुष्य, भाते, घोडे, सारथी आणि ध्वजावरील वानर एवढे मात्र त्याचे संरक्षण करतात. शल्य माझा सारथी होईल तर मी निश्चित विजय संपादन करीन."

(साकी) करिसी बहुप्रशंसा या नृपमंडळात कर्णाची ।
सांगसि सारथ्याची पदवी मला हीन वर्णाची ॥

## पद २७४ वे

अंधत्वे राजहंससंघी बका स्थान तू दिले ।
म्हणुनि हंसत्व काय लाभले ॥
ब्रह्मक्षत्रांचे परिचारक सूत अंधनंदना ।
करिती हे अस्मत्पदवंदना ॥
प्रभातकाळी करिति नित्य जे अस्मत्गुणगायन ।
तयांचे सांगसि मज सेवन ॥
विदारीन भूशरे अब्धि शोषीन अद्रि फोडिन ।
विक्रमे वज्रधरा खंडिन ॥
(चाल) सांगसी व्हावया सूताचा सूत कां ।
अवमान राजमंडळात करिसी निका ।
बंदीसम वाखाणिसी सूत जा फुका ।
नीरक्षीरविवेकी राया तू अपात्र हे कळे । म्हणुनि ०

## पद २७५ वे

गदारिदरनंदकांबुजधरा मनी मानितो उणा ।
तुलना नच तव विक्रमगुणा ॥
मानधनाचे शिर हे न कधी आजवरी वाकले ।
तव पदी यास्तव मी ठेविले ॥
रामशिष्य राधासुत शल्या जगदेक धनुर्धर ।
अर्पितो तुझ्या करी तत्कर ॥
(चाल) सर्वदा दक्ष राहूनि नंदनंदन ।
संरक्षण करितो जेवि पांडुनंदन ।
संरक्षी त्यापरि हा राधानंदन ।
या नेत्राचा पक्ष्म हो नृपा कृष्णाधिक वरगुणा । तुलना ०

(साकी) झालो प्रसन्न तुजवर देतो, घे, करीन सारथ्य ।
पथ्यापथ्य न म्हणता परि सोसावे मदुक्त तथ्य ॥

टीप—"प्रथम शल्य रागावला; पण त्याने कर्णाचे सारथ्य करण्याचे मान्य केले."

## पद २७६ वे

परम भाग्य मद्रेशा तुज सारथ्य वरुनि लाभले ।
यश तुज मृत्युंजय लाभले ॥
कालांतक रुद्राचा प्रतिभट आज मृत्यु पावता ।
वरिल ही युद्धकथा अमरता ॥
पार्थनिहन्ता म्हणतिल जन वैकर्तन असता रथीं ।
स्वये मद्रेश होय सारथी ॥
(चाल) कौरवेश्वरा लाभली अकंटक धरा ।
जाईल धर्म दुःखे आज वनांतरा ।
की रामशिष्य हा सजला गा संगरा ।
या कुरुपतिचे भाग्य आज मद्वनुमिषे बहरले । यश०
(साकी) व्यर्थचि गर्जन करिते तव मुख जेवि शारदाभ्र महा ।
बडबडसी जे अमित निरर्थक वाग्विशारदा भ्रम हा ॥

## पद २७७ वे

श्रीनारायणचरणसंभवा जननी मंदाकिनी ।
निजनंदनवंचना पाहुनी शोक करी निशिदिनी ॥
हा आखंडलपुत्र करिल खंड खंड जे मार्गणी ।
जननी विश्वाची देइल मज अद्‌भुत वर या रणी ॥
श्री रामाच्या रथी अधिष्ठित सद्‌गुरुच्या मी अहा ।
अर्जुनमारणपरंपरा चालवीन शल्या पहा ॥
सहस्रभुज मारिला तये मी द्विभुज कां न मारिन । (अर्जुन)
तन्नामे कां भीरुपरी तव कंपित होते मन ॥

(चाल) जरि लोकपाल येतील रणी रक्षणा ।
जरि चक्रहस्त ठाकला उभा रक्षणा ।
त्यासह करितिल शर पार्थप्राणभक्षणा ।
भरतवधूंचा शोक संपविन आज घोर मार्गणी ।

टीप – "युद्धोत्सुक झालेल्या कर्णाचे हे अहंपणाचे दर्पयुक्त बोलणे शल्यास रुचेना."

## पद २७८ वे

तै शल्य वदे । कां निंदिसि गुणगणधामा ।
नरवीर पार्थ बल पौरुष विक्रम सीमा ॥
एकाकी तर्पी । जो खांडववन दहना ।
देवेन्द्रसहित भंगुनि वृंदारकपृतना ॥
एकाकी करि जो । होउनिया संक्रुद्ध ।
त्या अचिंत्य कालांतक रुद्राशी युद्ध ॥
एकाकी केले । काय आजवरि कर्णे ।
ऐकिले न माझ्या अत्युत्कंठित कर्णे ॥
(चाल) करिती प्रलपित संगरी शूर न ।
करिती स्वमुखे आपुले वर्णन ।
अधमाधम त्या मानिती सज्जन ।
ही पुरे पुरे । आत्मा विकत्थन सीमा । कां व्यर्थ निंदिसी० ॥

## पद २७९ वे

वदे मद्राधिप जे कर्णा । ते मदभंजन आकर्णा ॥
कोणत्या रणी पार्थविजय । केला भग्न न युद्धनय ॥
पलायन धरुनी शत्रुभय । हाच तव युद्धी नित्य नय ॥
याविण अन्य सांग कर्णा ॥ १ ॥

वर्णिति जीस सकळ अमरी । ती वरू जासि द्रुपदकुमरी ॥
पार्थासी तेथहि समरी । पळसि हरिसी जैशा चमरी ॥
तरिहि करिसी कत्थन कर्णा ॥ २ ॥
भीम दिग्विजयास्तव आला । तुवा संग्राम कां न केला ॥
स्वये तू करद तया झाला । कुठे तव दर्प मान गेला ॥
कर्मकर राजमखी कर्णा ॥ ३ ॥

---

टीप – "कर्णाचे मदभंजन करण्याकरिता शल्याने त्याच्या रणातील पलायन कर्मांचा त्याच्यासमोर पाढाच वाचला."

(साकी) या दृढ मदभिप्रायापासुनि करिल शक्रहि न मला ।
मर्त्यांची काय कथा प्राकृत कर्ण काय तुज गमला ॥
स्वस्थ राहुनी पाहे तू मत्कर्म नीट सावध हो ।
त्या दोषापरि तुझाहि शल्या मत्करे न बा वध हो ॥

## पद २८० वे

शत्रूंनी भेदिले असे कातराग्रगण्या तुला ।
म्हणुनि विंधिसि वाग्बाणे मला ॥
कारणत्रये वाचलासि शल्या तू या स्यंदनी ।
अन्यथा सजतो तव कंदनी ॥
पार्थवधाचे कार्य नृपाचे न्याया सिद्धीप्रती ।
तुला मी वाचवितो संप्रति ॥
(चाल) असतो मद्रेशा मूर्ख सदा बहुजन ।
वधिता तुज ते ठेवितील मज दूषण ।
अज्ञात तया तव कुटिल पापमय मन ।
असामर्थ्य जाणुनी दिले गा जीवदान मी तुला ॥ म्हणुनि०
(साकी) ध्वजशिखरी दिसतो वानरवर शत्रुधैर्य घनवात ।
न नवा तत्सम झाला लोकी करि रवेचि बळघात ।

टीप – " कर्णाने शल्याला जीवे मारण्याचाच धाक घातला तेव्हा शल्याने हसून त्याला हंसांची व उच्छिष्टपुष्ट अशा एका कावळयाची गोष्ट सांगितली. एवढयात अर्जुनाच्या रथावरील मारुतीरायाच्या गर्जनेने दिशा निनादित झाल्या. तेव्हा दुर्योधनाने मध्यस्थी करून दोघांनाही शांत केले."

(साकी) पांडवभट धर्माते रक्षिति कौरव रविपुत्राते ।
दापिति अन्योन्यबळे क्षत्रिय व्याघ्रधेनु कळपाते ॥

## पद २८१ वे

वदे तै कुंतीसुत कर्णा । नाम तव दुःखद सत्कर्णा ।
सुपुष्पित भारतकुल तरुला । कोटरस्थाग्निच तू झाला ।
सर्व क्षत्रविनाशाला । सूतजा तू कारण झाला ।
हृरिन मी तव जिवितपर्णा । नाम तव ॥ १ ॥
मत्सर सतत अर्जुनाशी । यत्न तव तज्जीवितनाशी ।
झाला तव सद्गुणराशी । जोडण्या समर्थ अघराशी ।
आला अंतसमय कर्णा । नाम तव ॥ २ ॥
(घनाक्षरी) तोडि कार्मुक रविपुत्र । दिसे विकवच यमपुत्र ।
अमित नमिति जया क्षात्र । त्रपापात्र होय तो ॥

## पद २८२ वें

मग ज्येष्ठ पांडुपुत्राते । घे खड्ग वधाया कर्ण ।
नयनांचा क्रोधे झाला । आरक्त वन्हिमय वर्ण ।
वाटले शौरियश वृक्ष । मूलोच्छेदन ते पूर्ण ।
(चाल) परि स्मरला पंकजनयन ।
जननीस दिलेले वचन ।
वाचवीन तव संतान ।
पार्थाविण तव पुत्राते । देईल अभय हा कर्ण ॥
(साकी) अरिहरिपासुनी सुटता नृपगज करि पलायन त्वरित ।
कालयवन भयभीत शौरिचे स्मरले तेव्हा चरित ॥

टीप – " व्यूहरचना होऊन अर्जुन कर्णावर चाल करून गेला. पण त्याला संशप्तकांनी आव्हान केल्यामुळे तो तिकडे गेला. तेव्हा कर्ण पांडवसैन्यात शिरून त्यांचा नाश करू लागला व युधिष्ठिरावर चाल करून गेला. कर्णाने धर्मराजाचे धनुष्य छेदून त्याचे चिलखतही भेदले. तेव्हा रक्ताने न्हालेला युधिष्ठिर युद्ध-पराङमुख होऊन पळू लागला. कर्णाने त्याचा धिक्कार केला."

## पद २८३ वे

संसप्तक बल भंगुनि गुरुपुत्रादि गर्व खंडुनी ।
परतता पार्थ वीर नरमणी ॥
भग्नार्तभटोच्चध्वनि परिसुनि वदे सख्या श्रीहरीं ।
आपुली कोण यशश्री हरी ॥
उडे धूळ अंबरी पळति अस्मद्भट सोडुनि रण ।
गमे संहार होयं दारुण ॥
हा कार्मुक टंकार घोर गमते राधासुत करी ।
अंतकसम सेना संहरी ॥
(चाल) स्यंदन आर्याचा दिसे न बा लोचना ।
तज्जीवित चिंता आर्त करी मन्मना ।
तद्दर्शनकांक्षा मनी पद्मलोचना ।
दिसती भीमादिक परि न दिसे धर्मराज कां रणी । परतता०
(साकी) पार्थ म्हणे श्रीकृष्णा रामे भार्गवास्त्र जे कथिले ।
त्याचा प्रयोग कर्णे केला सैन्य आमुचे मथिले ॥
वारंवार मजकडे पाहे कर्ण उग्र अंतकसा ।
माझ्या हस्ते याचा युद्धी होय आज अंत कसा ॥
वेगे तो पावला पार्थरथ त्या रणकेन्द्रावरी ।
जिथे पार्थाग्रज संगर करी ॥
(चाल) प्रणिपात करी भीमसेनचरणाम्बुजा ।
करि अवघ्राण तो अनुज शिरःपंकजा ।
श्वेताश्व वदे पाहिलेस का अग्रजा ।
तद्दर्शन जा चिंता दे मज तीव्र दुःख अंतरी । जिथे ०

(साकी) पार्थ म्हणे आर्या त्वा द्रुततर नृपति पहाया जावे ।
तिमिरलयी रविने विधु तैसे मला रणी योजावे ॥

टीप–" कर्णशरांनी घायाळ झालेले धर्मराज स्वशिबिराला जाऊन पर्यंकांवर पहुडले. इकडे भीमाने कर्णावर त्वेषाने चाल केली. अर्जुन संशप्तकाचा पाडाव करून परतला तो त्याला रणक्षेत्रावर धर्मराजांचा रथ कोठे दिसेना."

(साकी) नमिले कृष्णे धनंजये मग वंद्य पाद रायाचे ।
धर्मे आदरिले प्राणाहुनि अधिक आदरायाचे ॥
बा कृष्णा बा पार्था वाचा वर्षशताधिक क्षेमी ।
वधिला कर्ण बहु बरे न वदा जाणतो परिक्षे मी ॥
आर्या अवलोकाया आलो आधी तव पदपद्म ।
हेचि असे जीवनांत माझे समाधान सुखसद्म ॥
कातराग्रणे वृथा पृथा कुक्षिमाजि तू आलासी ।
क्लीबा विन्मुख राधापुत्रा रणांगणी झालासी ॥

(श्लोक) होतो द्वैतवनांत चिंतित रणी कर्णा वधावे कसे ।
तेव्हा तू वदलासि संहरिन मी वृत्रा बिडौजा तसे ॥
गेला आज कुठे पलायनपरा क्लीबा तुझा तो पण ।
झाला त्वत्पुरुषार्थ दग्ध सगळे निःसत्त्व रे मार्गण ॥

## पद २८४ वे

जगत्सूत्रचालक परमात्मा सूत तुला लाभला ।
असे का तव सद्भाग्या तुला ।
सामर्थ्याच्या कवचे करितो देव तुझे रक्षण ॥
कृपण करी देव निधि रक्षण ॥
क्लीबा वरिले तरी पलायन समरांगण चत्वरी ।
वरिले कां न मरण त्यापरी ॥
श्रीकृष्णाच्या करी करी गांडीव धनू अर्पण ।
करिल तो मद् वांछा तर्पण ॥

(चाल) तो बृहन्नला परिवेश तुला शोभला ।
कासया नटापरि या वेषे पातला ।
सारथ्य वरी पद योग्य तेच बा तुला ।
सेनापति होईल यापुढे चक्रपाणी हा भला । असे ०

टीप – " कर्णाला मारून ती शुभवार्ता कळवायला कृष्णार्जुन शिबिरात आले ह्या कल्पनेने धर्मराजाने त्यांचे हर्षोत्फुल्ल होऊन स्वागत केले. पण अर्जुनाने सत्य काय ते सांगताच त्याचा भित्रा, षंढ या शब्दांनी धिक्कार करून गांडीव देऊन टाक असे त्यांनी म्हटले."

## पद २८५ वे

शांतीच्या क्षीरसिंधुतुनि ते काळकूट जन्मता ।
हर्षली मनी नाशदेवता ॥
गरलदिग्ध वाग्बाण विदारिति पार्थहृदय दारुण ।
करिति ते विनय कवच दारण ॥
हृदयसूत्रधार तो विसरला निकटवर्ति श्रीहरी ।
क्रोध तै तद्वदनश्री हरी ॥
क्रोधवन्हि वर्षती नेत्र पार्थाचे धर्मावरी ।
वधाया करि निश्चय अंतरी ॥
(चाल) निःश्वास धनंजय सोडी अति दारुण ।
निज करी नग्न करवाल करी धारण ।
तै पूज्य निजाग्रज वपु करण्या दारण ।
होती सद्भाग्याने तेथे परि करुणा देवता । हर्षली ०

## पद २८६ वे

ते पाहुनिया करुणाघन कळवळला ।
आसन त्यागुनी वळला ॥
करवालधरा धरुनि पार्थहस्ताला ।
श्रीमंत वदे वाणीला ।

शिबिर हे सख्या राहिले रणांगण दूर ।
नच शत्रु दृष्टिसमोर ॥
आर्यांते या प्रणिपात कराया आलो ।
वंदने सुपावन झालो ॥

(चाल) कासया नग्न करवाल ।
नेत्र कां होति तव लाल ।
झाले कां मानस लोल ।
अस्थानी कां क्रोध अर्जुना वळला । आसन ०

(साकी) श्वेताश्वा करणार कुणावरि तू प्रहार काशाला ।
नग्न करिसि असिला उपसावा खड्ग शत्रुनाशाला ॥

---

टीप– " युधिष्ठिरांचे भाषण ऐकून क्रोधायमान होऊन अर्जुनाने त्यांना ठार मारण्याकरिता खड्ग उपसले. श्रीकृष्णांनी वरचेवर तो हात धरून असे करण्याचे कारण त्याला विचारले."

(साकी) गुप्तव्रत गांडीव शरासन प्राप्तिपासुनी आहे ।
वदला नृप हे सत्यच्युतिला दास हा न लव साहे ॥

## पद २८७ वे

ऐकुनि पार्थवचन कानी । हासला मंद चक्रपाणी ।
वदे या घोर प्रतिज्ञेचे । प्रयोजन काय असे साचे ।
जगी प्रस्थापन धर्माचे । कारण काय विनाशाचे ।
फळ तव धर्माचे हानी । हासला० ॥ १ ॥
सत्यधर्माचा अवतार । राय हा रामापरि थोर ।
तत्प्राणांचा अपहार । इहपरलोक नाश घोर ।
तू सख्या केवळ अज्ञानी । हासला० ॥ २ ॥
सख्या तू पढतमूर्ख जाण । शब्दपांडित्याची खाण ।
सेविता वृद्धांचे चरण । परिचित होय ज्ञानकिरण ।
हसतिल तुज सत्यज्ञानी । हासला० ॥ ३ ॥

(साकी) सत्याचा वक्ता तो साधुचि यांत संशय न काही ।
पूज्य सत्यवादी त्रिजगी त्या उपमान नसे काही ॥
ऐसे असता भ्राता तोहि ज्येष्ठ त्यातही राजा ।
तत्रापि धर्मकोविद मानी ज्यासि शांतनव आजा ॥
(घनाक्षरी) मान्य पावे जरि मान । तरी वदती सप्राण ।
परी होता अपमान । मृतचि जीवमानही ॥
देहवध न श्रेष्ठास । गमे मृत्यू हृदयास ।
परी मानभंग त्यास । मूर्त नाश भासतो ॥
तुम्ही भीमादिक सर्व । मानिता याते शर्व ।
सदा राहुनि गतगर्व । सर्व यास अर्पिता ॥

टीप – "दुसऱ्याला गांडीव दे ' म्हणणाऱ्याचे मस्तक उडवायचे असा माझा गुप्त नियम आहे असे अर्जुनाने कारण सांगितले. तेव्हा श्रीकृष्णांनी त्याला धर्माधर्माची सूक्ष्म तत्त्वे समजावून सांगितली. आणि त्यानुसार सन्मान्य पुरुषाचा अपमान करणे म्हणजेच त्याला मारणे होय असे सांगितले."

(साकी) जो भुजबळसंपन्न क्षत्रिय तोचि प्रसिद्ध लोकी ।
वाग्बळ तो ब्राह्मण तू वाग्बळ वेद सर्वदा घोकी ॥

## पद २८८ वे

अस्मत्कार्मुक विक्रम अर्पी चक्रवर्ति पद तुला ।
वंदिती नरवर तव केतुला ॥
कितवापरि ते कपटद्यूती सर्व पणी लाविता ।
जाय तव कैसी धर्मज्ञता ॥
नखाग्र न जिचे सर्वसाक्षिपरि पाहू शकला रवी ।
वर्णिती यद्सद्गुणगण कवी ॥
यज्ञाग्नीची कन्या ती लाविली पणी तूच ना ।
स्मरण ते हृदयी दे यातना ॥
(चाल) लाविला तूच अंगार सौख्यमंदिरी ।
या धडधडल्या तज्ज्वाला पृथ्वीवरी ।
कर्माचे फळ हे घोर पहा ना तरी ।
वाखाणावे काय तुझ्या बा शांतिसौख्य हेतुला । वंदिती ०

(साकी) अर्जुन वदे प्रभो गुरुनिंदक मज न देचि सुख काय ।
करितो स्ववध स्वकरे दावू मी जनात मुख काय ॥

टीप—"अर्जुन असे कठोर व हृदयभेदक शब्द धर्मराजाला बोलला खरा; पण त्याचा त्याला खेद होऊन ह्या दुष्कर्माबद्दल आत्मवधासाठी त्याने तरवार उपसली. कारण धर्मराजाचा जो वध करील त्याला ठार करण्याची त्याची दुसरी प्रतिज्ञा होती. यावर श्रीकृष्णांनी आत्मस्तुति हा उपाय सांगितला."

(साकी) केला दिग्विजयबळे नृपजन करद कुबेरहि केले ।
अति दुष्कर राजसूय मखपति मीच सिद्धिला नेले ॥

(श्लोक) आहे जगी कवण गा झगडा कराया ।
गेलो महेन्द्रपद साह्य रणांत व्हाया ।
मी कालखंज वधुनी रण घोर केले ।
हर्षाश्रुनेत्र परिपूरित देव केले ॥

## पद २८९ वे

क्षत्रियांतकर रामहि ज्याच्या धनुते थरकापला ।
विक्रमा ज्याच्या न जगी तुला ॥
त्या कौरवकुल पितामहाते षंढ शिखंडी रणी ।
वधिता सांग काय मार्गणी ॥
गांडीवाच्या दिव्य शरांचा घोर घात संगरी ।
होता तो शरशय्या वरी ॥
या बाहूंच्या दिव्य प्रतापे विमथुनि नरकेसरी ।
वधिला सिंधुराज संगरी ॥

(चाल) थकल्या अश्वाते जलपान करावया ।
शरभवन निर्मिले हरि हर्षित व्हावया ॥
निर्मनुष्य मंडल आघात न व्हावया ।
गांगेय तृप्त्यर्थ भेदिले बाणे वसुधातला । विक्रमा ०

## पद २९० वे

यापरी बोलुनी पार्थ । धर्म पदी ठेवी भाळ ।
वदला हे राजमहेन्द्रा । हा बाळ तुझा संभाळ ।
कधिही न आजवरि झालो । यापरी नृपा वाचाळ ।
(चाल) तीक्ष्ण शब्द माझे राया ।
झोंबती जरी तव हृदया ।
ते खरे परी बा सदया ।
कारण या औद्धत्याचे । तुज कळेल येता काळ ।

---

टीप— "श्रीकृष्णाच्या सूचनेप्रमाणे अर्जुनाने आत्मस्तवन केले. पण त्यानेही तो अस्वस्थ झाला. त्याने धर्मराजाच्या पायावर डोके ठेवून झाल्या प्रकाराबद्दल क्षमा मागितली. श्रीकृष्णांनीही वंदन करून उचित बोलून धर्मराजांना शांत केले."

(साकी) अर्जुन म्हणे प्रभो कर्णाते आजि निश्चये मथितो ।
भीमाच्या तुझिया पायांची शपथ सत्य हे करितो ॥

## पद २९१ वे

तै प्रलय धनंजय पेटे । हो त्यास वायु कंसारी ।
गांडीवमुक्त बाणांनी । कुरुपृतनानाथ विदारी ।
उसळती भयद समरांत । तैं रक्तसिंधुच्या लहरी ।
(चाल) की प्रलय समय ओढवला ।
प्रेतांचा पर्वत पडला ।
तै रक्तसिंधु खळखळला ।
करि मुदित नृत्य त्रिपुरारि । हो त्यास०
(कटाव) शतानीक कर्णावरि धावे । सत्वर कृतांत सदना पावे ।
क्रोधे धावे तै सुत सोम । जैसा राहु गिळाल्या सोम ।
हासुनि विशिखततींनी तूर्ण । लोम न त्याचा उरु दे कर्ण ।
आला कैकयतनय विशोक । वदे करिन पार्थास विशोक ।
परी मार्गणे एके कर्ण । खंडी मस्तक सुवर्णवर्ण ।

विरथ करूनि पळवी युयुधाना । शिखंडीस दे घोर यातना ।
हाहाकारे ते रणचत्वर । भरले पळती अमित वीरवर ।
(साकी) कृष्ण वदे पांचाळहीन हे विश्व करितसे कर्ण ।
दिसता वीर ध्वजधनुमस्तक खंडिति तच्छर तूर्ण ॥
ऐका भारत रणवार्ता । जी तोषद भवदावार्ता ।

टीप – "कर्णवधाची प्रतिज्ञा करून अर्जुन निघाला तो जेथे पांडवसृंजय व कौरव यांचे घनघोर युद्ध चालले होते तेथे शिरला. बाणांचा पाऊस पाडीत त्याने कौरवसेनेची त्रेधा उडवली."

## पद २९२ वे

पृष्ठपार्श्वरक्षकाविना तो असुरक्षित चालला ।
पाहुनी भीमसेन धावला ॥
पांडुकुळाचे वैभव वाटे पार्थ तयाला मनी ।
प्रेम तद्हृदयी प्राणाहुनी ॥
येताना अग्रजा पाहुनी वदे सख्या श्रीहरी ।
पहा वात्सल्य आर्य जे करी ॥
(चाल) विपदर्णव सेतू सदा आर्यपाद हे ।
संकटनगभंजन जनी वनी नित्य हे ।
स्वशरीरा मानिति सदा कःपदार्थ हे ।
पृष्ठ रक्षकाविना पाहता ये तन्मनि कळवळा ॥ पाहुनी ०

## पद २९३ वे

पाहता कुरुकुलांगार । पेटला हुताशन हृदयी ।
दृष्टीसमोर ये मूर्ती । पांचालीची शोकमयी ।
ते दारुण दृश्य सभेचे । चित्रित झाले तद्हृदयी ।
(चाल) ते केशाकर्षण क्रूर । ते वस्त्राकर्षण घोर ।
अपशब्द शरांचे वार । आठवता तै भीमाच्या ।

(घनाक्षरी) वदे भीमा मतिमंद । रणी गर्वभरे धुंद ।
मंद मत्स्यराजसूद । रणविमर्द कां करी ।
पाकशाळा ही काय । सूद समजे अतिकाय ।
मूर्ख अज्ञाने काय । व्यर्थ काय नाशवी ।

---

टीप – "अर्जुनाने आपला रथ कर्णाकडे घेण्यास श्रीकृष्णास सांगितले. पृष्ठरक्षक कोणी नाही असे पाहून भीम अर्जुनाकडे धावला. तसा दुःशासनही कर्णाच्यामागे आला. त्याला समोरासमोर पाहिल्याबरोबर भीमाच्या डोळ्यापुढे द्रौपदीचे केशाकर्षण आणि वस्त्रहरण उभे राहिले. दोघेही परस्परांवर धावून गेले."

(साकी) पत्नीचा केशग्रह स्मरला तेवि निजप्रतिज्ञा ते ।
आठवि म्हणे म्हणोत न मिथ्याचार मज प्रतिज्ञाते ॥

## पद २९४ वे

खड्गाचे भिडवुनी टोक कंठास, करी गर्जना ।
करी रे नीच आज वल्गना ॥
हा तव बंधू, राधेयहि हा पहा नीट लोचनी ।
रणी तुज संरक्षिल ना कुणी ॥
झाले जगती नीच घोटिती जे नीतीचा गळा ।
परी तू सर्वाहुनि आगळा ॥
वधिन तुला जो करी कुलवधूचैलाचे कर्षण ।
करिन गृध्रांचे संतर्पण ॥
(चाल) दावितो तुझा नेत्रास हात सत्वर ।
जो पांचालीचे कर्षण करि अम्बर ।
जो म्हणे तुला निजनाशी मूढ त्वर ।
क्रोधे पृच्छा करी पीडुनी लत्तेने रिपु उर ॥
(घनाक्षरी) सांग कवण करे चैल । केले त्या सतिचे सैल ।
(साकी) मथित दुग्ध, दधि, घृत, मधु, मद्यहि सुधारसादिक अन्य ।
दिव्य सरित्सलिलहि मातेचे सर्व रसवर स्तन्य ॥
जे जे असती रसलोकी त्यांची न माधुरी थोडी ।
परि अरिच्या रक्तरसी मज त्याहूनि लागली गोडी ॥

टीप — "भीमाने गदेच्या प्रहाराने दु:शासनाचा पाडाव केला. तो रथातून खाली पडला तेव्हा भीमाने क्रूर मुद्रेने त्याच्याकडे पाहून त्याच्या नरडीवर पाय दिला आणि द्रौपदीचे केस ओढणारा कोणता तो हात असे म्हणून त्याचा हात उपटून फेकून दिला. त्याचे वक्ष:स्थळ फोडून भीमसेन त्यांतील उष्ण रक्त सर्वांसमोर ओंजळीने प्याला आणि खड्गाचा वार करून दु:शासनाचे मस्तक त्याने धडापासून वेगळे केले."

## पद २९५ वे

पाहताच शब्दातीत । ते नृशंस दारुण कर्म ।
थरकाप होय सर्वांचा । भयकृन्तन करि हृन्मर्म ।
म्हणती फळले हे काय । या नीचाचे दुष्कर्म ।
(चाल) रणपंडित जरि ते थोर ।
साहतेच घोर प्रहार ।
पाहते हननही घोर ।
परि नरमर्यादातीत । ते नृशंस दारुण कर्म ॥ १ ॥
दिङमूढ महारथ झाले । कांही न सुचे कोणाला ।
धनु गळले राधेयाचे । गुरु कृपही स्तंभित झाला ।
पांडव वीरांचा संघ । चित्रसाच समरी ठेला ।
(चाल) हातिची गळली शस्त्रे ।
नाठवती चित्ती अस्त्रे ।
झाकिति निजवदना वस्त्रे ।
पाहिले न कधिही कोणी । ते नृशंस दारुण कर्म ॥ २ ॥
(साकी) म्हणति मनुष्य नव्हे हा राक्षस काळ हा खवळला हो ।
अस्मद्देहा भस्म करा या प्रलयाग्नी वळला हो ॥
भीम पुन्हा दु:शासनरक्ते अंजलि भरोनि डोले ।
मिटक्या देउनि कर्ण सुयोधन मुख पाहुनिया बोले ॥

## पद २९६ वे

म्हणतिल कोणी जगी मला या कर्मे नरराक्षस ।
बनविले कोणी मज राक्षस ।।
हिमाचलातुनि येता अंधा मानित होतो पिता ।
बंधु हे वाटति मज तत्त्वता ।
या बंधूंनी तीर्थस्थानी विषभोजन मज दिले ।
वरी विषधर मर्मी डसविले ।।
लाक्षाभवनी मातेसह हे जाळाया धावले ।
बंधु सौहार्द तदा संपले ।।
(चाल) कां बंधुस्त्री वस्त्रहीन करिती कुणी ।
द्यूतात काय बंधूस नागवी कुणी ।
बंधुला न सूच्यग्रस्थितही दे कुणी ।
वृत्तीची राक्षसी असे ही प्रतिक्रिया राक्षस । बनविले०

## पद २९७ वे

विवर्ण तव वीराग्रगण्य कां वदनवर्ण भासतो ।
शस्त्रयुत बाहू थरकापतो ।।
दारुण हे राक्षसापरि पाहुनी कर्म कां तुला ।
उबग या युद्धाचा वाटला ।।
परी पचवुनी दुःख घालुनी अश्रूंना आवर ।।
पडता पक्षध्वज सावर ।।
भयार्दिता ही सेना सेनापाळ पहा धावती ।
कर्णा तूच तया ना गती ।।
(चाल) भार्गवास्त्रा तेजे रिपुसेना संहरी ।
सूड घे नृपानुज हननाचा सत्वरी ।
दे समाधान नरपाळा रणचत्वरी ।
विजयश्रीचा वास तुझ्या कार्मुकी राय पाहतो । शस्त्रयुत०
(साकी) वृकोदरावरि तोच धावले दहा पुत्र तव राया ।
शलभांचो वन्हीवरि जाता दग्ध न हो कां काया ।।

(घनाक्षरी) वदे उपहासे नकुल । तुझे योद्धयाचे न कुल ।
काय कार्मुक करवाल । सूत कुलज साधने ॥
सदा राजाचे स्तवन । धर्म सूतांचा जाण ।
कासया हे धनुबाण । जे तुला ना शोभती ॥
(साकी) शल्य वदे तव पुत्रचंद्रमा धावे ग्रास कराया ।
नकुल राहु हा कर्णा सत्वर चाल तया वाराया ।

टीप – "अंतकाप्रमाणे कौरवसैन्याचा संहार करीत सुटलेल्या भीमाला पाहून कर्णही घाबरला. त्याची शूर मुद्रा भयाने काळवंडली. तेव्हा शल्याने कालास अनुसरून भाषण करून त्याला पुन्हा युद्धास उद्युक्त केले. आपला पिता मोहापन्न झालेला पाहून कर्णपुत्र वृषसेन क्रोधाने पांडवांच्यावर चालून गेला. नकुलाने त्याला अडविले."

## पद २९८ वे

उपहासाचे बोल परिसुनी वदे कर्णनंदन ।
तू पृथा कुसव्याचे लांछन ॥
ऐकियले पांडूचे नंदन शस्त्राने बोलती ।
बोलकी केवळ त्यांची कृती ॥
शब्दपंडिता बाणे देतो उपहासा उत्तर ।
सहा तू धैर्ये हे खरशर ॥
पलायनी अग्रगण्य तू हे रणपंडित जाणती ।
सदा रणधीर तुला निंदिती ॥
(चाल) यापरी बोलुनी कोदंडा सावरी ।
तोडुनी ध्वजस्तंभास पाडि भूवरी ।
हो नकुलदृष्टि पाहताच तै बावरी ।
विरथ करुनि त्या क्षणांत हासे वैकर्तननंदन ॥ तू पृथा ०
(साकी) खड्ग खंडुनी कवच तोडुनी कर्तन करी शरीर ।
रक्ताचे कारंजे तेथे प्रवर्तले शतधार ॥

## पद २९९ वे

हे कुलवंता । संग्राम टाकुनी पळसी ।
कां लाजविसी क्षत्राणीच्या कुसव्यासी ॥
सूतज आम्ही । स्तुतिपाठक राजांचे ।
कां स्तवन करावे बा तव पलायनाचे ॥
यापरी रणी । बोलुनी पलायन काय ?
त्याहुनी योग्य हे नाश पावणे काय ॥
सत्कीर्तिहुनी । जीवनास दे जो मान ।
तो अधमाधम नरकांत न त्याचे स्थान ॥
(चाल) क्लीव तू न यावे पुढे संगरी ।
खड्गबाण ना शोभती तव करो ।
अंतःपुरशय्याच बा तुज बरो ।
जा सुखे वधिल का कर्णपुत्र भ्याडासी ती ॥ कां लाजविसी ०

टीप – " वाक्प्रहाराबरोबरच शरप्रहारांनी ताडन करून वृषसेनाने नकुलाला पराजित केले."

## पद ३०० वे

मग त्या संकुल युद्धात । कर्णपुत्र अंतक झाला ।
मथुनि त्या वीरसंघाते । वाहवी रक्तपूराला ।
खंडुनी शत्रुशिरपद्मा । तो पूजी रणचंडीला ।
शैनेय वृकोदर पळती । कोण घे तिथे झुंजीला ।
(चाल) प्रलयंकर ते पाहूनी । विस्मये सुदर्शनपाणी ।
पार्थास वदे बाहूनी । दे मान उचित या काला ।
(साकी) अभिमन्यूपरि पराक्रमी हा केवि वधावा बाळ ।
देव वदे सान काय रक्षिति जाणते जगी व्याळ ॥

## पद ३०१ वे

एकाकी विरथ विशस्त्र । संहरिला माझा बाळ ॥
कपटी क्षात्र कुलांगार । झालात तुम्ही त्या काळ ॥
अधमा तू त्यांचा नेता । होतास परी संभाळ ॥

(चाल) हा तुझा पुत्र वृषसेन । तुजसमक्ष मी निवटीन ।
संरक्षी पुत्रप्राण । घे शस्त्र अंगनरपाळ ॥ १ ॥
यापरि बोलुनी पार्थ । निज बाणासन टंकारी ॥
कुरुवीरांना रोधाया । निजविशिखजाल विस्तारी ॥
विंधिले कटाक्षे कर्णा । मदनास जेवि त्रिपुरारी ॥

(चाल) पुत्रार्थ धावता कर्ण ।
ओढुनी चाप आकर्ण ।
सोडुनी चतुष्टय बाण ।
*शिरभुजपद वृषसेनाचे । तै होति गगनसंचारी ॥ २ ॥

---

टीप – " कर्णपुत्राच्या पराक्रमाने पांडवांच्या सैन्याची दाणादाण केलेली पाहून श्रीकृष्णांनी अर्जुनाचे लक्ष तिकडे वेधले. प्रथम अर्जुनाला लहान मुलाला कसे मारू असे वाटले. पण त्याला अभिमन्यूचे स्मरण झाले. त्याने कर्णाला आणि दुर्योधनादिकांना आव्हानपूर्वक निक्षून सांगून वृषसेनाचा वध केला.

(साकी) श्वेताश्वा श्वेताश्व शल्य सारथी पातला रथ हा ।
मेरुशिरी शंभुसा ज्यावरी शोभे वैकर्तन हा ॥

(श्लोक) झाला सत्पुत्रनाशे व्यथितमन परि वीर सामान्य हा न ।
अब्दे तेरा जयाची स्मृति हृदयगता स्वाप धर्मास दे न ।
विद्या कोदंडपाणी निजहृदयगता दे जया विप्र राम ।
त्या कर्णाते वधी तू समरमखि सख्या रावणा जेवि राम ॥

## पद ३०२ वे

रणयज्ञी नरसिंह उभे ते द्वंद्वास्तव पाहता ।
कौतुके येति नभी देवता ॥
सिद्ध साध्य विद्याधर सुरमुनि म्हणती गायक जन ।
जयश्री वरिल रणी अर्जुन ॥
दितिज दनुज सद्गुरु शुक्र तै बोले उपहासुनी ॥
कर्णशर वधिल पार्थ या रणी ॥

(चाल) देवेन्द्र वदे कर्णा निवटिल मत्सुत ।
गांडीव शराग्नीमाजि होय तो हुत ।
तै बोले भास्कर इन्द्रा उपहासत ।
विदीर्ण होइल हृदय महेन्द्रा कर्णबाण पाहता । कौतुके ०

(साकी) नयनसायके शल्या ताडी कृष्ण, तोहि त्या हरिते ।
निरीक्षणचि ते परि त्या मद्रपधैर्या झाले हरिते ॥

---

टीप— "पुत्रवधाने खवळलेला कर्ण अर्जुनावर गर्जना करीत चालून आला. श्रीकृष्णांनी कर्णाच्या योग्यतेची जाणीव करून दिली. ते दोघेही महारथी परस्परा भिमुख झाले. त्यांचे रथ एकमेकाशी भिडले. उर्वरित सर्व वीर त्यांच्या भोवती जमून त्या समबल महायोद्धयांच्या यशापयशाचे अंदाज बांधीत होते. आकाशांत देवदानवांची युद्ध पाहण्यासाठी गर्दी झाली. तेही आपसात चर्चा करीत होते. त्यांच्यातही एकमत न होता दोन तट पडले."

## पद ३०३ वे

हे मद्रपते । मारीन निश्चये पार्थ ।
होईल राय दुर्योधन हा अनपार्थ ॥
परि सत्य गमे । वदतात सदा जे आर्य ।
पौरुषे न बा दैवेच साधते कार्य ॥
अन्यथा कसा । तो इच्छामरणी आर्य ।
संपवी शिखंडीपुढती जीवितकार्य ॥
प्रतिपक्षी हा । त्रिजगदेक कोदंडी ।
लीलया देवगंधर्व विक्रमे खंडी ॥

(चाल) मद्रपा जाणसी न मी कातर ।
परि शंका ये मानसी दृढतर ।
नियतिला कोण हारवी बा नर ।
दैवे मजहो । वधिल हा रणी कां पार्थ ॥ होईल ०

(साकी) कर्ण म्हणे मारिल जरि हरिसख तरि करिशिल तू काय ?
शल्य म्हणे कृष्णद्वय मारिन खर्चुनिही निज काय ?
उचित मैत्रीस हेचि जाणी । वचन भलतेच वदति मानी ॥

टीप–"नरशार्दूल कर्णार्जुनांचे द्वैरथ युद्ध सुरू झाले. त्यापूर्वी उभयतांच्या रथावरील ध्वजाच लढू लागल्या. अर्जुनरथावरील मारुतीने कर्णरथावरील हस्तिकक्षेला फाडून टाकले. नंतर दोन्ही रथांचे घोडे एकमेकांवर खेकसू लागले. नंतर दोन्ही सारथी एकमेकाकडे डोळे फाडून पाहू लागले. कृष्णांनी दृष्टिपातानेच शल्यास जिंकले. नंतर कर्णार्जुनांनी एकमेकांकडे क्रुद्ध होऊन पाहिले.

कर्णाला दैवापुढे पराक्रम हार खाईल असे वाटायले लागले. म्हणूनच त्याने शल्याला प्रश्न केला."

(श्लोक) रामप्रदत्त धनु टंकृति घोर कानी ।
आकर्णुनी नर वदे स्मितपूर्व वाणी ।
सर्वेश्वरा गमत होय अपूर्व आजी ।
मी कर्ण हा परि रणी निवटीन आजी ॥

## पद ३०४ वे

वैकुंठपते । परि द्यूत म्हणति समराते ।
निश्चये त्यात पावेल कोण विजयाते ॥
जरि म्हणतो मी । मारीन रणी कर्णा ते ।
प्रत्यस्त्र नसे जगती मत्पाशुपताते ॥
परि भाग्याचा । उलटा पडुनी पाश ।
पावलो मीच या कर्णाघाते नाश ।
करिशील सख्या । सांग तू काय श्रीकृष्णा ।
पुरवी माझ्या हृदयाची प्रश्नतृष्णा ॥
(चाल) येवढेच गा मत्सख्या तू करी ।
भुजसेच मान बंधु हे श्रीहरी ।
प्रेमाने मत्सम तया स्वीकरी ।
येवढेच दे मज दान कृपापात्राते ॥ निश्चये ०
(साकी) शुष्क उदधि, शीत अनळ होईल जरी भास्करा पात ।
तरि बा कर्णापासुनि नाही होणार तुझा घात ॥

टीप–"समजा मी संपलोच तर तू काय करशील हा प्रश्न अर्जुनानेही श्रीकृष्णांना विचारलाच. शिवाय आपल्या बंधूंचा संभाळही श्रीकृष्णांच्यावर सोपविला. श्रीकृष्णांना मात्र अर्जुनाच्या विजयाची खात्री होती. तरीही कृष्ण म्हणाले, 'तू म्हणतोस तसे झालेच तर मी शल्यासहित कर्णाचे माझ्या भुजबलाने भस्म करीन."

## पद ३०५ वे

मध्यस्थत्वे भीष्म विदुर सद्गुरु मातृदेवता ।
करिति मज धर्मबोध तत्त्वता ॥
मेघ श्यामल स्वये पातला संधीस्तव श्रीहरी ।
निमिषपाते जो जग संहरी ॥
त्याच अवसरी होता संधी मान सुखे राहता ।
अनादर केला परि गुरुसुता ॥
सामास्तव हा अवसर नोहे म्हणतिल मज कातर ।
त्याहुनी गमेल मरणहि वर ॥
(चाल) हा ज्वालामाली वैराचा पेटला ।
क्षात्रवंश त्याते इंधनसा जाहला ।
भगदत्त भीष्म सद्गुरू दग्ध जाहला ।
आहुतिने मत्प्राणांच्या हा शम पावे तत्त्वता ॥ करिति ०
(साकी) जाणो न दग्धुकाम प्रेमे निजगुरुपुत्रास रणी ।
आलिंगी अग्नि, सदा दे कर ज्या तमनाशा तरणी ॥
चोळुनि कर कोपे भीम म्हणे अर्जुना अहाहा रे ।
व्यर्थ म्हणत होतो की मदनुज संगरी न हा हारे ॥

---

टीप – " कर्णार्जुनांचा घनघोर संग्राम सुरू झाला तेव्हा अश्वत्थाम्याने कुरुपांडवांच्यामधील हा कलह मिटावा म्हणून पुन्हा एकदा दुर्योधनाजवळ प्रयत्न करून पाहिला. तो म्हणाला, " अर्जुन माझे ऐकेल. कृष्ण आणि धर्मराज हे तर शांतिप्रिय आहेत, आणि बाकीचे भाऊ त्यांच्या आज्ञेत आहेत. तू तयार झालास की मी कर्णाचे मन वळवितो,' पण दुर्योधनाने सांगितले की, 'साम करण्याची वेळ मागे निघून गेली, ती वेळ ही नव्हे.' आणि त्याने सैनिकांना ईर्षेने लढण्यासाठी आज्ञा केली."

अर्जुनाच्या सर्वच अस्त्रांचा कर्णाकडून प्रतिकार होऊ लागला तेव्हा भीमाने अर्जुनास चेतविले."

## पद ३०६ वे

कोपे रद चावुनी वदे तै चक्रपाणि श्रीहरी ।
कर्ण तव आज मुखश्री हरी ॥

पराक्रमे तू माध्यान्हीचा सख्या चंडभास्कर।
इतर रथ नक्षत्रे पामर ॥
मूर्त धनुर्वेद विप्र भारद्वाज अर्पि जो तुला।
काय तो विद्यागिरी भंगला ॥
स्वप्नीहि न मानवा प्राप्य ती दिव्यास्त्रे सोडुनी।
जाय वा प्रज्ञा तुज सोडुनी।
(चाल) दे तुला भवानीनाथ सख्या सुरवर।
ते काय होय बा महास्त्र अति भास्वर।
काजवा पार्थ तू कर्ण दिसे भास्कर।
श्वान दिसे सिंहसा त्यापुढे गजसा तू केसरी। कर्ण०
(साकी) पार्थ म्हणे श्रीकृष्णा रामे भार्गवास्त्र जे कथिले।
त्याचा प्रयोग कर्णे केला सैन्य आमुचे मथिले ॥
वारंवार मजकडे पाहे कर्ण उग्र अंतकसा।
माझ्या हस्ते याचा युद्धी आज होय अंत कसा ॥

---

## पद ३०७ वे

हे वीरवरा। चिंता करिसी तू काय।
विक्रमार्क तू खद्योत जाण राधेय ॥
धनुटंकारे। ज्या थरथरती दिक्पाळ।
नरमणी वंदिती नयने होता लाल ॥
संहाराची। देवताहि कवळी हृदयी।
हृदयिचे आपुल्या अर्पी रहस्य हृदयी ॥
जो देवांचा। रक्षिता म्हणुनि विख्यात।
त्यापुढे गर्जना करिल काय बा सूत ॥
(चाल) कोणत्या रणी अपजय जाहला।
त्वद्‌भंग कधी सूतजे साधिला।
मुखशशी म्लान का तुझा जाहला।
संपला तुझा आत्मप्रत्यय काय ? विक्रमार्क ०

---

टीप – "श्रीकृष्णांनीही अर्जुनाला उत्साहित केले."

## पद ३०८ वे

तै प्रलय धनंजय पेटे । हो त्यास वायु कंसारी ।
गांडीवमुक्त बाणांनी । कुरुपृतना नाथ विदारी ।
उसळती भयद समरांत । तै रक्तसिंधुच्या लहरी ।
(चाल) तै रक्तसिंधु खळखळला प्रेतांचा पर्वत पडला ।
की प्रलयसमय ओढवला । करि मुदित नृत्य त्रिपुरारी ॥ १ ॥
तो असंख्यात सैन्याते । घेउनी स्वये कुरुराय ।
धावला वदे एकाकी । हा वधा पीडुनी काय ।
ते क्रूर शस्त्रवृष्टीने । विंधिती पार्थवपु हाय ।
(चाल) सौभद्रासम निवटा हा । आधार संगराचा हा ।
वधिता करितिल अरि हा हा ॥ गर्जली वाहिनी सारी ॥ २ ॥
(साकी) भाग्ये धैर्यकरे सावरिला प्राणसंकटी कर्ण ।
गळते वपु अन्यथा तरुचे वातहत जसे पर्ण ॥

## पद ३०९ वे

तो कवळाया कंठ जिष्णुचा व्याळ । ये कृष्णवर्ण की काळ ।
संपला गमे त्रैलोक्यवीर तै जिष्णू । संरक्षण दे परि विष्णू ।
श्रीमंत कसा घनश्याम परमात्मा । नोळखे कपट जगदात्मा ।
विश्वंभर तै टाळाया अहित । रथचक्र घुसवी पृथ्वीत ।
(चाल) त्राण जो गजेन्द्रा झाला । भक्तास्तव साकृति झाला ।
तो उपेक्षील पार्थाला ।
हे केवि घडे तो अयशस्वी हो व्याळ ॥ ये कृष्णवर्ण ०

टीप – " कर्णार्जुनांचे तुंबळ युद्ध होत असता अर्जुनाने कर्णास बाणवृष्टीने जर्जर केले. तेव्हा कर्णाने फार दिवसापासून, पूजा करून राखून ठेवलेला एक निर्वाणीचा बाण अर्जुनाचा कंठवेध करून सोडला. त्या बाणांत अश्वसेन नाग योगबलाने येऊन बसला होता. श्रीकृष्णांनी दोन्ही गोष्टी जाणून अर्जुनाचा रथ पायांनी दाबून थोडासा भूमीत रोवला. त्यामुळे मस्तकाऐवजी अर्जुनाचा किरीट मात्र उडाला."

(साकी) भूमग्नस्यंदन उद्धरिला भगवंते बाहूंनी ।
क्षिति उद्धरिली लब्ध होय सागरजा ज्या पाहूनी ॥
रत्नकुंडले खंडुनि कवचाचेहि खंडखंड करी ।
कर्ण व्याकुळ सिंहे जैसा नखरभग्न गंड करी ।
तेव्हा कृष्ण म्हणे हित कथितो मी अयुक्त न गमो हे ।
व्यसनी रिपु मारावा भाग्ये विकळ धैर्यनग मोहे ॥

## पद ३१० वे

भद्रेश्वर तैं वदे विस्मये हे राधानंदन ।
न चाले पद एकही स्यंदन ॥
जवन पवन हे अश्व लाविति सामर्थ्या सर्वथा ।
परि ते सर्व होतसे वृथा ॥
विषम रणक्षेत्र हे न झाले काय कळे ना मला ।
कुणी रथचक्रमार्ग रोधिला ॥
(चाल) दचकला ऐकता बोल सूर्यनंदन ।
तद्दृष्टिपुढे ये उग्र विप्रलोचन ।
घुमती कर्णी ते शापबोल दारुण ।
थरकापे त्या धैर्यनगाचे तत्स्मृतिने तनुमन ॥ न चाले ०
(साकी) यापरि खरनरशर सर्प तसे क्रूर झोंवता मर्मा ।
कर्ण व्याकुळ झाला चित्ती निंदी क्षत्रियधर्मा ॥
कर्ण उद्धरू पाहे स्वकरे भूमिगिलित चक्राचे ।
परि पृथ्वी सोडीना की व्रत घेतलेचि नक्राचे ॥

---

टीप – " अर्जुनाने कर्णाचे शिरोभूषण व रत्नखचित कुंडले पाडून कवचाचे तुकडे केले. अर्जुनाच्या बाणांनी कर्ण घायाळ होऊन रथात मूर्च्छित पडला. त्याच्या ह्या विपन्नावस्थेत त्याच्यावर वार करणे अर्जुनाला इष्ट वाटले नाही; पण श्रीकृष्णांनी मात्र सांगितले की, शत्रु दुर्बल असला म्हणजे विलंब न लावता त्याचा नाश करावा.' एवढ्यात सावध झालेल्या कर्णास रथाचे चाक फसल्याचे शल्याने सांगितले."

# पद ३११ वे




कर्णाच्या रथाचे चाक पृथ्वीने गिळले

तै कर्ण वदे । हे अगणित गुणगणधामा ।
वदताति पार्थबल पौरुष विक्रम सीमा ॥
हे शीलधना । प्रार्थना करित मी कर्ण ।
श्रुति शास्त्राज्ञा धनु ओढु नको आकर्ण ॥
हे धनुर्धरा । जे परिचित तव वीर्याते ।
द्विभुजे हारविले म्हणति कार्तवीर्याते ॥
हे शीलनिधे । राजहंस तव कीर्तीचा ।
एकेचि पदन्यासे जेता स्वर्गाचा ॥

(चाल) भीतो न तुला हरिस वा मी रणी ।
अपकीर्तिपात्र परि न हो नरमणी ।
हो धर्मवध न वा तुझ्या मार्गणी ।
कुलजें धर्माची संरक्षावी सीमा ॥ वदताति ०

## पद ३१२ वे

ऐकुनि वैकर्तन वाक्पाटव पार्थ हात आवरी ।
परी संक्रुद्ध होय श्रीहरी ॥
क्रोधे त्याते संबोधुनि तै वदे नंदनंदन ।
करिति सुरमुनि यत्पदवंदन ॥
घोर अधार्मिक सतत कर्म करिता न मना यातना ।
वदतसा आज धर्म लाज ना ॥
मृत्यूची का काळी छाया धर्मा दे आठव ।
पुरे तव समरी वाक्पाटव ॥
(चाल) धर्मास तुम्ही लाविली सदा आग ना ।
तो धर्म आज दुर्जना तुम्हा रक्षिना ।
धर्म हा रक्षकावनाविणा राहिना ।
मृत्युभये धर्मवर्णनी कां शिणली तव वैखरी ॥ परी ०

टीप – "कर्ण व्याकूळ झाला. त्याला ब्राह्मणाच्या शापाचे स्मरण झाले. त्याला परशुरामांनी दिलेले अस्त्रही आठवेना. तो धर्माची निंदा करू लागला. त्याने पृथ्वीमध्ये रुतलेलं रथाचे चाक काढीपर्यंत बाण न मारण्याची प्रार्थना केली. तेव्हा श्रीकृष्णांनीच उत्तर दिले"

## पद ३१३ वे

पांचालीचे दु:शासन जै केशाकर्षण करी ।
न वदे धर्म तुझी वैखरी ॥
जिता काय मी दासी वदली साम्राज्ञी जेधवा ।
नाठवे धर्म तुला तेधवा ॥
महासतीला अन्यपरिग्रह नीचापरि सांगता ।
नाठवे धर्म तुला तत्त्वता ॥

बंधकीसही वस्त्रहीन करिती न समाजी कुणी ।
धर्म स्त्रीत्वाच्या संरक्षणी ॥
सती वस्त्रहरणी हे नीचा केली आज्ञा यदा ।
नाठवे धर्ममूल्य कां तदा ॥
(चाल) ज्या षंढ म्हणुनि तू सभेत उपहासिले ।
तद्वीर्य तुला वर्णनीय कां वाटले ॥
जे दुष्कर्मी ते धैर्य रणी संपलें ।
हे धर्मध्वज नीच नराधम कां शिणविसि वैखरी ॥ न वदे ०
शिरीष पुष्पाहुनी मृदू आठवे काय तुज मनी ।
बाळ तो लावण्याची खनी ॥
सान करी तो कुमार कर्णा बाणासन घेउनी ।
जाय चक्रव्यूहा भेदुनी ॥
अधृतायुध तो विरथ देखिला काय न बा लोचनी ।
स्फुरला धर्म कां न तव मनी ॥
एकाकी तो शरी विंधिला अग्रेसर होउनी ।
करुणा शिरली कां तव मनी ॥
(चाल) मूर्च्छित होता तो कर्णा समरांगणी ।
तैं गदाघात केलात डाव साधुनी ।
राक्षसापरी वधिला निर्घृण होउनी ।
धर्म वदसि तज्जनका कर्णा तू निर्लज्जापरी ॥ न वदे ०

टीप – "कृष्णांनी कर्णाला सांगितले, 'धर्माच्या नांवाने आता कंठशोष करून काय उपयोग ? धर्म तेव्हा आठवायला पाहिजे होता.''

## पद ३१४ वे

हे आधिरथे । पाहुनि घे हा लोक ।
यापुढे सिद्ध हो वरावया परलोक ॥
जे आजवरी । राधेया केले पाप ।
ते धारातीर्थी क्षाळुनि हो निष्पाप ॥

शस्त्रपूत हा । व्हाया जरि अवसर ये न ।
शाश्वत होते नरकांत तुझे बा स्थान ॥
परि पार्थाचा । वरुनि बाण सोपान ।
जा करण्या स्वर्गी पाप्या अमृतपान ॥
(चाल) क्रव्याद पहा घोर हे भोवती ।
तव सुतनूवरि दृष्टि हे रोविती ।
तव मांस भक्षणार्थ हे नाचती ।
यापुढे तुला दिसे न हा आलोक ॥ यापुढे ०

टीप – "असे म्हणून श्रीकृष्णांनी अर्जुनाला कर्ण पुन्हा रथावर आरूढ झाला नाही तोपर्यंतच त्याचे मस्तक उडव असे सांगितले. अर्जुनाने प्रथम त्याच्या ध्वजाच्या रूपाने त्याचे यश, दर्प, त्याचे उद्दिष्ट आणि कार्य सर्वच भग्न केले आणि प्रखर अशा आंजलिक बाणावर कर्णवधाचा संकल्प सोडून कर्णाचे मस्तक तोडून खाली पाडले. यज्ञाची समाप्ति झाली ! अग्नि शांत झाला ! पांडव सैन्यात आनंदाने वाद्यघोष होऊ लागला."

कर्णाचा वध झाल्यावर दुर्योधनाने शल्याला सेनापतिपदाचा अभिषेक केला व उर्वरित राजांसहित तो पांडवांशी युद्ध करण्यास सिद्ध झाला. शल्याने मध्यान्हकालपर्यंत भयंकर कंदन केले, परंतु धर्मराजाने शेवटी त्याला सर्व सैन्यासहित ठार केले. सेनाहीन व बंधुहीन झालेला दुर्योधन रणांगणातून पळाला आणि शत्रूच्या भयाने घोर ह्रदांत दडून बसला. मग त्याच दिवशी तिसरे प्रहरी भीमसेनाने दुर्योधनाला युद्धार्थ आव्हान देऊन ह्रदाच्या बाहेर बोलावले आणि त्याच्याशी घोर युद्ध करून त्यात त्यास ठार मारले. ह्याप्रमाणे कौरवाधीश महाधनुर्धर दुर्योधन भीमसेनाच्या हस्ते भूमीवर पतन पावताच कृप, कृतवर्मा व अश्वत्थामा हे तिघे कौरवांकडील अवशिष्ट योद्धे रात्रीच्या वेळी मोठ्या त्वेषाने निघाले व त्यांनी पंचाल सोमकांचा संहार उडविला. ह्याप्रमाणे कौरव पांडवांचा घोर संग्राम होऊन फक्त पांडवांकडील सात वीर व कौरवांकडील तीन वीर काय ते जगले. असो.

# स्फुट काव्य

## काव्यनिर्मितीपूर्वी भगवंतास मागणे

(आर्या)

कविराया प्रतिभेच्या कलिकेचा मुकुल पावला पहिला ।
पुढती उन्मेष तिचा चिंतित मधुसौरभे ठरो पहिला ॥
कमलालया जशी तुज जन्मादारभ्य दे कृपादान ।
श्री राजहंसवहना देवो तैशीच मंदिरी मान ॥
त्वत्प्रतिभेचा संगम विद्वत्तेशी तसा निपुणतेशी ।
होवो फुलेल कविता रसोद्गमी माधवी लता तैशी ।
पंकी दास्याच्या ही भारत भू माय आपुली फसली ।
उद्धार तिचा व्हाया तळमळ ना, भावना तरी कसली ॥
तव जन्मभू जशी तुज आवडते, आवडो तशी आर्या ।
श्रीभारतमाताहो झाली जी कल्पनग समा आर्या ॥
मंगलमय परमेश्वर देवो यश आयु कीर्ति दान तुला ।
ज्याच्या प्रेमलतेते तोविण दुसरी नसे जगात तुला ॥

# हिंदुराष्ट्र ध्वजवंदना

## प्रार्थना (भगव्या ध्वजाची)

नमस्ते सदा हिन्दुराष्ट्रप्रतीका ।
प्रभो दिव्यधारा कृपाणांकितस्त्वम् ।
तथा कुंडलिन्यन्वितश्चासि मूर्तम् ।
समुत्कर्षनिःश्रेयसोस्सन्निधानम् ।
त्वदीयं यशो नेतुमेते दिगन्तम् ।
विजेतुं तथा संस्कृतिं चासुरीम् ।
परं वैभवं हिन्दुराष्ट्रं च नेतुम् ।
वयं बद्धकक्षा नमस्ते नमस्ते ॥ १ ॥
इयं पितृभूः पुण्यभूर्याऽस्मदीया ।
वरीवर्ति सर्वानहो भूविभागान् ।
सुमांगल्यमाधुर्यसौंदर्यसीमाम् ।
निरीक्ष्यैव यस्या नरीनर्ति चेतः ।

तदुद्धारणे प्रज्वलद्यज्ञकुण्डे ।
हवि जीवनं दातुमेते वयम् ।
भवामः समेतास्समर्था इतीयम् ।
त्वदीयाऽशिषा प्रार्थना ते पुरस्तात् ॥ २ ॥

## श्री कांची कामकोटि पीठाधिपति श्रीमत् स्वामी श्री चन्द्रशेखर सरस्वती सद्गुरुनाथांची आरती

पदाभ्यां नमोऽस्तु भगवन् ते ।
चन्द्रशेखर सद्गुरुमूर्ते ॥ धृ. ॥
कलियुगदोषनिरासार्थं । तेजसा प्रभवति योऽत्यर्थम् ।
नतान्बोधयितुं पुरुषार्थं । हर्तुं मोहाख्यमनर्थम् ।
प्रयतते जगदुद्धारार्थम् ।
(चाल) श्री सद्गुरुवर ।
वराभयदकर ।
मोहादुद्धर ।
जय जय जय करुणामूर्ते । चन्द्रशेखर० ॥ १ ॥
काञ्ची कामकोटिपीठं । योऽध्यास्ते शांकरपीठम् ।
यदाम्ना तत्कलिकीटम् । समर्थं संहर्तुं पीठम् ।
बुधैरभ्यर्चितपदपीठम् ।
(चाल) करुणासागर ।
विद्यामंदिर ।
साक्षात्शंकर ।
जय जय सिद्धार्चितमूर्ते । चन्द्रशेखर० ॥ २ ॥
स्नेहतैलेन हि संसिक्तं । पदश्रद्धावर्त्या युक्तम् ।
हृदयपात्रे विमले निहितं । समर्पितमार्तिक्यं दीप्तम् ।
स्वीकुरु कृपया विश्वगुरो ।
(चाल) बालशास्त्रि हरदासाह्वोऽयं ।
मन्द्रप्रज्ञः कृपाभाजनं ।
कर्तव्यः सद्गुरमूर्ते । पाहि मां पदयोः पतितं ते ॥ ३ ॥
पदाभ्यां नमोऽस्तु भगवन् ते । चन्द्रशेखरसद्गुरुमूर्ते ॥

## श्रीमत् सद्गुरु श्री चन्द्रशेखर सरस्वत्यष्टकम्।

तपो दानं ध्यानं स्वहितशतहन्तुर्जडधियः।
कुतो मे वैराग्यं यमनियमजश्चात्मविजयः।
दृढो मे विश्वासः सकृदपि कृता त्वपदनतिः।
समुद्धर्तुं शक्ता गुरवरजनं मादृशमपि ॥ १ ॥
क्व मे संसारित्वं क्व च यतिवरेण्योऽखिलगुरुः।
क्व मे भोगासक्तिः क्व च शिवतमातीव विरतिः।
कथन्नु स्वीकार्यो वरद गुरुवर्याहमभवम्।
दया सीमातीता खलु सहजधर्मो हि महताम् ॥ २ ॥
विशालाभ्यां लब्धं मम तु नयनाभ्यामिह फलम्।
यतो दृष्टा गौरीरमणरमणीया तव तनुः।
अहो मौनव्याख्या प्रकटितरहस्यं शिवतमम्।
न को वा मन्येत प्रभुवर भवन्त शिवसमम् ॥ ३ ॥
नञार्थे वीप्सायां विरमति हि यत्र श्रुतिशिरः।
यतन्तस्सिद्धेशाः कथमपि विजानन्ति न च यत्।
कथं ज्ञातुं शक्यं जगति जडजीवैस्तदमृतम्।
विना यस्य ज्ञानाद् भवति हि मोक्षाय न परम् ॥ ४ ॥
तदाऽनिर्मोक्षः स्यादिति विपदमन्वीक्ष्य मुनिराट्।
शुकः स्वीयं शिष्यं नरपतिवरेण्यार्चितपदम्।
उषा चाहोग्रस्ते कलिविषधरेणात्र सकले।
महत्सेवामार्गो जगति खलु मोक्षस्य सुलभः ॥ ५ ॥
निधायैतां चित्ते भवदहनतप्ते शुकगिरम्।
निधानं धर्माणाममितसुकृतानां नवगृहम्।
तिरोधानं मूर्तं चरमयुगशक्तेर्हितकरम्।
शरण्यं हित्वा कं तव पदयुगं यामि शरणम् ॥ ६ ॥
विभूषितं भस्मविलेपनेन कण्ठे दधानं स्फटिकाक्षमालाम्।
दण्ड कराभ्यां च कमण्डलुं च दधानमाचार्यवरं नमामि ॥ ७ ॥
काञ्चीशांकरपीठस्थं वन्देऽहं भास्वरं महः।
चन्द्रशेखरनाम्ना यत् विख्यातं जगतीतले ॥ ८ ॥
हरदासो बालशास्त्री ह्यहं त्वामभिवादये।
मालां च श्लोकपुष्पाणां सद्गुरो ते समर्पये ॥

## मकरसंक्रमणम्

आर्यं कार्यमशेषविश्वमिति या व्यक्ताऽभवत् भारते ।
कां हीनां गणयन्ति संस्कृतिमहो पाश्चात्यविद्याजडाः ।
काले संक्रमणस्य संप्रति वयं जाड्यं निरस्याखिलम् ।
धीरं प्राणसमिद्भिरार्य धरणेर्भर्गः समिन्धीमहि ॥
असकृदवतरत्परात्स्वधाम्नो ।
निगमसमुद्धतये स्वयं धरण्याम् ।
श्रुतिविहितपथं प्रवर्तयद्भ्यो ।
वितरतु शं भगवान्स शास्त्रयोनिः ॥

## समस्यापूर्तयः

मदोन्मत्तान्क्रूरान् यवननृपतीन्यो विजितवान् ।
कुले तस्मिन्जाताः कुमतिसदना भ्रष्टगतयः ।
दृढं सेवन्ते तं प्रतिदिनमहो ह्यांग्लनृपतिम् ।
कुले कश्चिद्धन्यः प्रभवति नरः श्लाघ्यमहिमा ॥ १ ॥
नृपश्रेष्ठा जाता ह्यजरघुदिलीपप्रभृतयः ।
परं नैकः सौरो दशरथमहाभागसदृशः ।
अहो जातो लक्ष्मीहृदयरमणो यस्य तनयः ।
कुले कश्चिद्धन्यः प्रभवति नरः श्लाघ्यमहिमा ॥ २ ॥
विषमविषयपाशध्वंसने सुक्षमापि ।
निखिलमुनिजनाली लीलया येन जिग्ये ।
सकलमपि जगद्यद्वशे वर्तते च ।
जयति तरुणयोषिल्लोचनानां विलासः ॥ ३ ॥
चिति जगदिदं श्रुत्या साक्षाद्विवर्त इतीरितम् ।
यदि हि परमक्लेशध्वंसं परं नर मन्यसे ।
गरमिव सखे भोगानाशु त्यजेति जरद्गवो ।
वदति मधुरं किं वाऽन्यत् स्यात् प्रियारदनच्छदात् ॥ ४ ॥
पुण्यश्लोकनृपाग्रणीर्मतिमतां मान्यो विदग्धानुगः ।
दाता दीनजनाऽवनेऽतिकुशलस्सक्तः प्रजापालने ।
रक्तां भीमवने मृणालमृदुलां भैमीं परित्यक्तवान् ।
हा दैवेन विडम्बितोऽयमधुना किं किं न कुर्यान्नलः ॥ ५ ॥

गाण्डीवे गलितें शरे विगलिते पार्थेऽपि मूर्छायिते ।
क्रोधान्धे निजसैन्यदारणपरे भीष्मे धनुः धुन्वति ।
विस्मृत्याऽथ निजं वचः कवलयन्हस्तेन चक्रं पुनः ।
भक्तार्थे निजकीर्तिहारणपटुर्धावन्हरिः पातु वः ॥ ६ ॥
नित्यं शुद्धं बुद्धमुक्तस्वभावम् ।
सच्चिन्मात्रं केवलं निर्विशेषम् ।
कल्याणार्थं विग्रहेणाप्रतीणम् ।
कारुण्याब्धिं दक्षिणामूर्तिमीडे ॥ ७ ॥

## प्रातःस्मरणम्

रावणान्तकरं रामं मर्यादापुरुषोत्तमम् ।
राष्ट्रकार्यार्थसिद्ध्यर्थं ध्यायेत्सर्वगतं विभुम् ॥ १ ॥
येन पूर्णावतारेण निमित्तीकृत्य पाण्डवम् ।
वर्तता युगसंध्यायां गीताधर्मः प्रवर्तितः ॥ २ ॥
भूमिर्दृप्तनृपव्याजदैत्यानीकभराऽसहा ।
मोचिता येन कारुण्यात् स कृष्णोऽस्तु शिवाय नः ॥ ३ ॥
गाण्डीवे सशरे कराद्विगलिते पार्थेऽपि मूर्च्छान्विते ।
क्रोधान्धे निजसैन्यदारणपरे भीष्मे धनुर्धन्वति ।
हित्वा पार्थरथं जवेन कलयन्हस्ते रथाङ्गं पुनः ।
भक्तार्थं निजकीर्तिहारणपटुर्धावन्हरिः पातु नः ॥ ४ ॥
येनार्थशास्त्रं निर्माय नन्दराजगता मही ।
अमर्षेणोद्धृता तस्मै चाणक्याय नमो नमः ॥ ५ ॥
निजखड्गप्रतापेन मायिनः कूटयोधिनः ।
यवनान्यो विनिर्जित्य चन्द्रगुप्तः प्रतापवान् ॥ ६ ॥
कन्यारत्नं च रत्नानां निचयं चैव लब्धवान् ।
तं राष्ट्रभूषणं मौर्यं मूर्धन्यं कोऽहि विस्मरेत् ॥ ७ ॥
यस्तिग्महेतिना वीरस्संहरन्परसैनिकान् ।
आजहाराश्वमेधांस्त्रीन्कलिकाले महाक्रतून् ॥ ८ ॥
विद्यानां सदनं मूर्तं कलानां मणिमंदिरम् ।
समुद्रगुप्तं गुप्तानां विनतिर्वंशभूषणम् ॥ ९ ॥
यः पौरुषेण समरे दुर्मदानाततायिनः ।
क्रूरान्शकान्विनिर्जित्य मोचयामास भारतम् ॥ १० ॥

राजा स जयति श्रेष्ठो विक्रमार्को गुणाकरः ।
निहन्ता यश्च हूणानां यशोधर्मा प्रतापवान् ॥ ११ ॥
अगणितबलपुंजैरायया हर्षनामा ।
सुगतनयनिगीर्णोऽस्मिन् महाराष्ट्रदेशे ।
खरतरकरवाले नास्य भङ्गं विधाता ।
जयति स पुलकेशीवीरयूथाग्रयायी ॥ १२ ॥
मूर्तिमान्वीरधर्मो यः पृथ्वीराजोऽस्तु नो हृदि ।
यवनैर्घातितः क्षुद्रैर्कृतघ्नैः कपटेन यः ॥ १३ ॥
यः क्षात्रधर्मस्य नवावतारस्सेहे न भङ्गं निजगौरवस्य ।
वव्रे नियुद्धं निजजीवितान्तं भेजे वनं राज्यसुखं विहाय ॥ १४ ॥
अभिमानधनेन येन मूर्धा नमितो यवनेश पादयोर्न ।
चलितं न विपत्सु यस्य चेतस्स जयति धैर्यनगः प्रतापसिंहः ॥ १५ ॥
दूषिता यज्ञभूर्म्लेच्छैरतस्तेगबहादुरः ।
तस्या विशुद्धिमन्विच्छन् चक्रे स्वात्मार्पणं गुरुः ॥ १६ ॥
म्लेच्छैर्निकृन्तमानोऽपि ज्ञानी तानवदद्धसन् ।
वर्धतां हिंदुधर्मोऽयं शरीरस्यात्र का कथा ॥ १७ ॥
तस्य पुत्रोऽतितेजस्वी खालसामार्गभास्करः ।
स्वकीयानात्मजानिद्धे रणयज्ञे जुहाव यः ॥ १८ ॥
शस्त्रेण रक्ष्यतां धर्ममिति चाध्यापयत्स्वकान् ।
गुरुर्गोविंदसिंहश्च स्मर्तव्यौ भूतिमिच्छता ॥ १९ ॥
निकृन्तमाने यवनैश्शरीरे निहन्यमाने तनयेऽपि वीरः ।
तन्मांसखण्डे वदने प्रसह्य निपात्यमाने निजगाद वाक्यम् ॥ २० ॥
"न हिंदुधर्मः कुणपात्मवादी शरीरनाशेन न मे विनाशः ।
बन्दा स चाध्यात्मविदां वरिष्ठो मलीमसं नाशयतु प्ररूढम् ॥ २१ ॥
आक्रान्तेऽवनिमण्डलेऽथ यवनैरासेतुहैमाचलम् ।
घोरे गोद्विजदेवताबिदलने संजायमानेऽनिशम् ॥
निश्चक्रं विदधौ द्विषद्विपासनं राष्ट्रं समुज्जीवयन् ।
अव्याच्छत्रपतिः शिवस्सकलयन्दिव्यां भवानीं करे ॥ २२ ॥
टंकार इव चापस्य राष्ट्रमुत्तेजयन्मुहुः ।
दास्यव्यालग्रहे यस्य बोधोऽभूत्गरुडोपमः ॥ २३ ॥
समर्थं रामदासं तं हिंदुराष्ट्रगुरुं परम् ।
संस्मरेत्ध्यायतां नित्यं पापपुंजविनाशनम् ॥ २४ ॥
मूर्धाभिषिक्तोऽपि ददौ स्वमूर्धा धर्मगुप्तये ।
श्रीमच्छत्रपतिश्शंभुस्सदा तिष्ठतु मानसे ॥ २५ ॥

राजारामोऽथ राजर्षिः खंडेरायश्च धैर्यवान् ।
संताजी च धनाजी च युधि विख्यातपौरुषौ ॥ २६ ॥
स्मर्तव्यः सचिवोत्तंसो बाजीरायः पराक्रमी ।
सदाशिवश्च सततं म्लेच्छकुंजर केसरी ॥ २७ ॥
विश्वासो माधवश्चैव मल्हारी च महादजी ।
वीरश्रेष्ठोऽथ जनको बलवन्तस्तथारिजित् ॥ २८ ॥
मेधाविनामग्रगण्यस्सभानुकुलभूषणः ।
नानाख्यः प्रज्ञया यस्य श्वेताविन्धा च कम्पिरे ॥ २९ ॥
नानाख्यः पेशवा भूपो कमारोऽद्भुतविक्रमः ।
टोपे सेनाधिनाथश्च मंगलश्चारिमर्दनः ॥ ३० ॥
एते चान्ये च बहवस्तपस्तेपुस्सुदारुणम् ।
हिंदुराष्ट्रस्य भूत्यर्थं कार्या तेभ्यो नतिस्सदा ॥ ३१ ॥
" मातर्मास्तु भयं तवेति " जगतीं व्याहृत्य दैवीं गिरम् ।
श्वेताविंधबलार्णवे निपनिता या वाडवार्चिस्स्वयम् ॥
या साक्षाद्रणदेवतेव शुशुभे शंपेव या निर्ययौ ।
स्वातंत्र्यामृतवर्षिणी निवसतां लक्ष्मीस्सदा मानसे ॥ ३२ ॥
कुका श्री रामसिंहश्च वासुदेवस्तु वीर्यवान् ।
दामोदरो बालकृष्णो रानडे हैमदा तथा ॥ ३३ ॥
लोकमान्यश्च तिलको ब्रह्मर्षिः पटवर्धनः ।
अरविन्दः कृष्णवर्मा खुदिरामश्च बालकः ॥ ३४ ॥
प्रफुल्लः पांडुरंगश्च सत्येन्द्रो दत्त एव च ।
नलिनी च यतीन्द्रश्च प्रसादस्सोहनस्तथा ॥ ३५ ॥
बसुर्हरदयालश्च शचीन्द्रश्चंद्रशेखरः ।
मुकुन्दः परमानन्दो गणेशो मदनस्तथा ॥ ३६ ॥
विष्णुः कर्तारसिंहश्च कान्हेरेऽमितविक्रमः ।
केशवो राष्ट्रजनकः शिवरामोऽरिसूदनः ॥ ३७ ॥
सुखदेवो भगतसिंहः कर्वे पंजाबकेसरी ।
बालकृष्णश्च मेधावी सुभाषश्च महायशाः ॥ ३८ ॥
रामचन्द्रो महेन्द्रश्च वीरेन्द्रस्सूफिरेव च ।
जतीनश्चामीरचन्दो भानसिंहोऽजितस्तथा ॥ ३९ ॥
चित्तप्रियः प्रबोधश्च विश्वासश्चावधोऽतुलः ।
मेवासिंहः काशिरामो गंधा बंता च लक्ष्मणः ॥ ४० ॥
उत्तमो ज्योतिषश्चैव हरनामोऽथ दीक्षितः ॥
रामसिंहश्च कपिले मोहनो बिशनस्तथा ॥ ४१ ॥

धन्ना ज्वालाच बर्यामः राजू श्रीराम एव च ।
मित्रः प्रमोदोऽथधर्मः विमलस्तारकेश्वरः ॥ ४२ ॥
दिनेशो विनयः शुक्लः प्रद्योतो सेन एव च ।
कालीपदो सूर्यसेनः तारकः मथुरा तथा ॥ ४३॥
चक्रवर्ती प्रागकृष्णो भट्टाचार्यश्च वीर्यवान् ।
सरोजो भूषणश्चैव ऊधमो नरकेसरी ॥ ४४ ॥
एते चान्ये च बहवस्स्मर्तव्याः क्रांतिकारकाः ।
येषां कृत्यैर्हि भूमाता पुत्रिणीति विराजते ॥ ४५ ॥
येन शास्त्रं च तन्त्रं च प्रणीतं राष्ट्रगुप्तये ।
कृतं सेनाधिपत्यं च तपस्तप्तं सुदारुणम् ॥ ४६ ॥
नायकं हिन्दुराष्ट्रस्य वीरश्रेष्ठं विनायकम् ।
क्रांतितन्त्रप्रणेतारं संस्मरेत्सर्वदा हृदि ॥ ४७ ॥
मैथिली रुक्मिणी कुंती विदुला द्रौपदी सती ।
जिजा वीरमती दुर्गा पद्मिनी राजनंदिनी ॥ ४८ ॥
रमाऽहल्या रूपमती लक्ष्मीः श्रीरामरक्षिता ।
येसू च यमुना चैव वीणा वंगविभूषणा ॥ ४९॥
शांतिस्सुशीतिस्सुशिला ज्योती काना तथैव च ।
उज्वला कल्पना प्रीतिर्दुर्गा वसुमतिस्तथा ॥ ५० ॥
एताश्चान्याश्च बहवस्स्मर्तव्या भूतिमिच्छता ।
शीलादिगुणसंपत्त्या यासां राष्ट्रमिदं ततम् ॥ ५१ ॥
य एतत्प्रातरुत्थाय पठेद्विमलभावतः ।
राष्ट्रधर्मरहस्यं तत्करगं निश्चितं भवेत् ॥ ५२ ॥
सत्यभामासुतेनैतद्रचितं बालशास्त्रिणा ।
भव्यानां स्मरणं भूयाद् भव्यकार्यविधायकम् ॥ ५३ ॥

## श्री गणेशाला मागणें

ऋद्धिसिद्धि रमण तुझे चरण कवळु दे ।
हृदयासनि मूर्ति तुझी नित्य वसू दे ॥ धृ. ॥

अज्ञानाच्या विपिनी । मोहाच्या काटयातूनि ।
श्रमलो अतिशय धावुनि । धीर मला दे ॥ १ ॥

जय हे मंगलमूर्ति । भक्तकामनापूर्ति ।
सुलभ तया भवमुक्ती । नाम जो वदे ॥ २ ॥

बाळ सत्यभामेचा । दुर्वांकुर चरणीचा ।
मानुनि तव हा साचा । आश्रय मज दे ॥ ३ ॥

## पद त्रिपुरसुंदरीचे

वंदन साष्टांग तुला त्रिपुरसुंदरी जननी ।
दिव्य रूप माते का पाहिन तव मी नयनी ॥ धृ. ॥
श्री लक्ष्मी हैमवती सावित्री सरस्वती ।
राधामाधुर्यमूर्ति तूच विनटली भुवनी ॥ १ ॥ वंदन
रूपेही भिन्न भिन्न शक्तितत्त्व परि अभिन्न ।
ते न होय परिछिन्न नामे रूपे जननी ॥ २ ॥ वंदन
शिवशक्ती एकरूप तद्‌भिन्न न जगी रूप ।
हे जाणे तोचि तापपापमुक्त या अवनी ॥ ३ ॥ वंदन
माते हरदास बाळ ठेवी तव पदी भाळ ।
सांभाळी तुझे मूल दे आश्रय गे चरणी ॥ ४ ॥
वंदन साष्टांग तुला त्रिपुरसुंदरी जननी ।

## माउलीची महात्मता

गंगोत्रीची अतितर दिसे सान ही तोयधारा ।
ती वर्धिष्णू जलमय करी उत्तरप्रांत सारा ।
आळंदीपाचळ चरणजा ज्ञानसद्‌भक्ति धारा ।
व्यापी स्रोते अमृतमधुरे सप्तसिंधूहि सारा ॥ १ ॥
दैवे झाली हतपतित ही सत्प्रजा उद्धरावी ।
यासाठी या कलियुगतमी जन्म घे ज्ञानदेवी ।
नामा एका सतत वदला श्री तुका जीस आई ।
ठेवी प्रेमे पदयुगि जिच्या हा महाराष्ट्र डोई ॥ २ ॥
आहे स्तन्यामृत मधुरिमा माउलीचा अजोड ।
या संसारा गरल बहुला जो करी शीघ्र गोड ।
ज्याच्या स्पर्शे क्षणि हृदयिचे दुःखदारिद्र्य जाई ।
ज्याच्या पाने नित अमरता साधका प्राप्त होई ॥ ३ ॥

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या २८ मे १९५४ ला
साजऱ्या झालेल्या बहात्तराव्या जयंतीच्या निमित्तानें

## स्वीकरी मूक भाववंदना

शत शत तोफा करितिल उद्या त्वत्स्मरणी गर्जना ।
उपेक्षिता आज ही स्वीकरी, मूक भाववंदना ॥ धृ. ॥
सर्वा आधी स्वातंत्र्याचे तू मंत्रोच्चारण ।
करूनी एकाकीच निघाला स्वये कराया रण ।
करचरणीच्या लोहशृंखला होय तुला भूषण ।
कारागारी अमित यातना करिती वपुदारण ॥
येई ते स्वातंत्र्य परी ये स्मरणहि न तुझे कुणा ।
उपेक्षिता आज ही० ॥ १ ॥
पुरस्कार निर्भय सत्याचा तुला खरा बाधला ।
सत्य जपुनि मिथ्या वागावे हे न साधले तुला ।
विश्ववाद सोडुनी ध्यास तू राष्ट्राचा घेतला ।
स्वत्व सोडुनी परमय व्हावे हे न साधले तुला ।
स्वत्वहीन या वातावरणी यास्तव तव वंचना । उपेक्षिता आज ही० ॥२॥
परी अस्मिता या राष्ट्राची जागृत होता खरी ।
तुझी हृदयसंपुटी पूजितिल भारतीय वैखरी ।
आकांक्षा पुनरुत्थानाची पेटताच अंतरी ।
द्रष्टया ! होईल मूर्ति विराजित तुझी हृदयमंदिरी ।
क्षण न दूर तो ऐकू ये आताच साद मन्मना ।
उपेक्षिता आज ही० ॥ ३ ॥
वीतराग माधवसामर्थ्ये दिसे राष्ट्रचेतना ।
पुनरुत्थानाचा न वाटतो दूर क्षण मन्मना ।
तत्तपोबळे अखंड भारत वरिल दिव्य जीवना ।
शत शत तोफा करितिल तदा त्वत्स्मरणी गर्जना ।
शत शत तोफा करितिल उद्या त्वत्स्मरणी गर्जना ।
उपेक्षिता आज ही० ॥ ४ ॥

## विजयादशमीचा संदेश

करीचे धनू दिव्य टंकारुनी तो करी राक्षसांची पुरी कंपित ।
निजास्त्राग्निकुंडी करी दुर्जनांच्या असूंचे हविर्भाग वेगे हुत ।
मदोन्मत्त लंकेशकाया रणी घोर बाणाग्रपाते करी दारण ।
दिनी आजच्या भारती संस्कृतीच्या करी संकटाचे प्रभू वारण ॥ १ ॥

तपस्वी ऋषींच्या असूंचे बळी हा असे खेळ ज्यांच्या मनाचा सदा ।
जयांच्या मिषे कोसळे नीति धर्मावरी प्राण संहारिणी आपदा ।
सदा वासनाग्नीत जाळावयाची सतीशील ज्यांची मनोधारणा ।
दिनी आजच्या श्रीरघूत्तंस रागे शरांनी करी तद्वपू दारणा ॥ २ ॥
खला दंडुनी धर्मसाम्राज्य विश्वी करी रामचंद्र प्रतिष्ठापित ।
तिथे शोषणाची न वार्ता असे ज्यांत उद्दिष्ट व्हावे जगाचे हित ।
महन्मंगलाच्या सुधेचा करी देव वर्षाव विश्वी घनाचे परी ।
पशुत्वास मानव्य उल्लंघुनी शीघ्र देवत्व ज्याच्या प्रभावे वरी ॥ ३ ॥
अहो राक्षसी संस्कृति ये उफाळून जाळावया ती पुन्हा मानवा ।
असे आसुरी धर्म संहारकारी जरी मानवी वेष घेती नवा ।
दिनी आजच्या साद घाली प्रभू राम रे जाग रे जाग हिंदू मना ।
निखंदूनि तीते करी विक्रमे तू पुन्हा धर्मसाम्राज्य संस्थापना ॥ ४ ॥

---

## भावगीते (१)

वीणे कर बाई झंकार।
आसूभरल्या स्वरमालेला। कर सखये साकार ॥ धृ. ॥
वाट सख्याची किति ग पाहू।
आसवात या कुठवर नाहू ।
विसर मनाच्या या सादेला । दे एकच हुंकार ॥ १ ॥
पाश मला ग दाहि दिशांचे ।
दिन वाटिकांचे पळ निमिषांचे ।
अर्ध रंगले स्वप्न मनाचे । घेईल का आकार ॥ २ ॥
ताल स्वरांची विरली गुंफण ।
करिसि कशाला सखया गुंजन ।
कळली का ग व्यथा तुलाही । थरथरली ग तार ॥ ३ ॥

## (२)

भावगर्भ तव लोचनयुगुली प्रणयभाव पाझरे ।
मृदुल नितळ तव ललित कपोली रम्य उषा संचरे ।
मला पाहता अधर तुझे थरथरति किती मानिनी ।
संकोचे किती संभ्रम उडतो शब्दांचा भामिनी ॥
दिसता पंथी गजेन्द्रगमने ना परिचय दाविसी।
येता घरि परि संवादाची लांबण किति लाविसी ॥
पूर्वीचा मोकळेपणा अन जिज्ञासा ती कुठे ।

कुठे हारपे विवादनाची हौस, चातुरी कुठे ।
गांभीर्यें वरिशी मौन जरी मानिनी ।
तव भाव सांगती नयनकंज भामिनी ।
लपविशी कशाला अंतरंग कामिनी ।
कमल नाल मृदु अधर दले, तव ललित गाल लोचने ।
तुला फसविती मृगांकवदने, गूढ भावदर्शने ॥

## सुदिन उगवणार का ?

सुदिन उगवणार का ? सौख्यरवि किरण पसरणार का ?
भूमंडळ रक्ताळत सगळे
उंच उंच वैश्वानर उसळे ।
प्रलयाते मैदान मोकळे ।
ही दानवताच का ? सौख्य रवि० ॥ १ ॥
दारुणतर रणकुंड पेटले ।
लक्ष लक्ष जीवन हवि झाले ।
प्रतिदिन संख्यातीत चालले ।
विकसन पथ हाच का ? । सौख्य रवि ० ॥ २ ॥
काल करालानन झणि उघडी ।
पथ सगळे मोकळे हरघडी ।
मानवताही घे त्यांत उडी ।
दग्ध भुवन गोल का ? सौख्य रवि० ॥ ३ ॥
होय हेच प्रश्नाचे उत्तर ।
बसे घडी विध्वंसानंतर ।
बीजप्रध्वंसातच अंकुर ।
न्याय सनातन न का ? सौख्य रवि ० ॥ ४ ॥
उषा हासते रजनीनंतर ।
प्रतिपच्चद्रहि दर्शानंतर ।
कृतयुग उगवे कलिच्यानंतर ।
विकसन पथ हा निका । सौख्य रवि ० ॥ ५ ॥
क्रांतीचे हे अरुण निदर्शन ।
सुवर्णयुग जन्म घेत यांतुन ।
हा विध्वंसच आणिल विकसन ।
प्रश्न कासया फुका ? सौख्य रवि किरण वितरणार कां ?

## खिन्न मना

(सेनापति तात्या टोपे यांची स्मृति समाधि पाहून)

खिन्न मना जाग जाग जाग जागरे।
पवनवेग सार दुरी, जाग जाग रे॥ धृ.॥
येथ घेत विश्रांती।
राष्ट्राचे सेनापति।
हो विनम्र करि प्रणती।
देतिल तुज आशीर्वच "कर्तव्या जाग जाग"
जाग जाग रे ॥ १ ॥
रिपुतति शिरकमलहार।
जननिकंठी अर्पिणार।
निजजीवन समुपहार।
अर्पुनि निर्मिति अभिनव। मातृअर्चना विभाग।
जाग जाग रे ॥ २ ॥
तिमिर पारतंत्र्याचे।
दाट पसरले साचे।
थय थय थय थय साचे।
दुर्भाग्या कालरात्रि, आणतें मनास उबग।
जाग परी जाग जाग, जाग जाग रे ॥ ३ ॥
तात्यांची स्मृतिसमाधि।
जाळिल झणि दास्य व्याधि।
दूर सारूनी उपाधि।
चिन्मय तच्चरणकंज, पूजाया रुधिररंग।
ओत यावरी सत्वर, जाग जाग ॥ ४ ॥

५ फेब्रुवारी १९४३

---

## रासबिहारी बसू

पारतंत्र्य पंजरांत फसली मंगलमय आर्य भू।
आर्तरवे आक्रंदत 'कुणी मज सोडविण्या का विभू' ॥ धृ.॥
पाश तोडण्या जननि कंठिचा कंठीरव कुणि निघे॥
श्वेताविंधा शासन करण्या वाण सतीचेच घे॥

दुर्जनयंत्रित राज्ययंत्र हे समूळ उत्खाणणे ।
क्रांतिमये निजमंत्रे अवघे भारत अभिमंत्रणे ॥
उद्देश धरुनि मानसांतरी दिव्य हा ।
क्रांतिचा लोळ भारती पेटवी अहा ।
धडधडा उफाळत हव्यवाह मग पहा ।
त्या हुतवह्नी हवन कराया सकलहि जीवन वसू ।
नवभारत सेनानि निघाला रासबिहारी बसू ॥ १ ॥

शचीन्द्र, विष्णू, अवधबिहारी अमीरचंदादिका ।
कर्तारा, विश्वासुजतीना बालमुकुंदादिका ॥
नग्न करी करवाल कालपुरुषाची जणु जिव्हा ।
देइ, म्हणे घ्या शपथ मातृमोचना सिद्ध क्षणि व्हा ॥
रिपुरुंडांची रक्तकुसुममय माला अर्पावी ।
रुधिरौघाच्या चंदनलेपे सती तोखवावी ॥
या रुद्रपूजनी प्रसन्न मन होइल ।
चंडिका कृपादानाते मग देइल ।
दुरितौघ निवारण निजशीर्षी घेइल ।
भारतिचा मग राहु न देइल गुलाम एकहि तसू ।
नवभारत० ॥ २ ॥

पेटविला बंगाल जतीने अवघा अभिमंत्रणे ।
सेनासागरी विष्णु रिघे तै बसूच्याच मंत्रणे ॥
शचीन्द्र संयुक्तांत करी संयुक्त युवक संघ ॥
पावन पंचनदांतरि लागे जमू सैन्यसंघ ॥
यंत्रित चापा अग्निगोलका दे ठायी ठायी ।
सुपर्ण जव मग रासबिहारी यज्ञ साम गायी ।
या प्रबळ शत्रुचा प्रत्यय जइ जाइल ।
निजजीवनि तन्मन शंकाकुल होइल ।
निजदर्पदलन तो धाक मनी घेइल ।
विजयश्री प्रगटेल निश्चये घेउनि षड्विध वसू ।
नवभारत० ॥ ३ ॥

सुरनर मुनिवर पूजित जरि हे दिव्य भरतखंड ।
अभिशापित नित व्हाया जणु सद्भाग्य खंड खंड ॥
फितुरीचा अभिशाप भारता विश्वेशे दिधला ।
धर्मापरि तो परंपरागत सनातनहि ठरला ॥

ग्रहण पारतंत्र्याचे या अभिशापाने टिकले ।
टिपले वीरांगनावदनगत रिपुसंघे टिकले ॥
विष्णुला बाधला दुर्दैवे शाप हा ।
सांपडे अग्निगोलकासहित सिंह हा ।
लटकला वधस्तंभावरि म्हणता न हा ।
धन्य धन्य पिंगळे तयाची धन्य माय वीरसू ।
नवभारत० ॥ ४ ॥
अभिशापाचे बळी यदा कर्तारादिक जाहले ।
रासबिहारी बद्ध कराया पाश सिद्ध झाले ॥
शचीन्द्र अत्याग्रहे पाठवी त्याल जपानास ॥
कळे तया की आतंकाचा प्रधान वध नाश ॥
जपानची त्या वीरवरा दे आश्रय भूमाता ।
कायमची त्या होय पारखी भारत भूमाता ॥
झगडला तेथ राहुनी धैर्यमेरु तो ।
की मातृहृदयी दास्यकंटक न हा रुतो ।
जीवनभर रुचला भीषण संग्राम तो ।
परलोकी घेउनी निघाला प्राणोपायन वसू ॥
प्रार्थिया परमेशा भावे रासबिहारी बसू ॥ ५ ॥

REFBK-0018853
ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
काव्य
१८८५३